


मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे
घराण्यांतील छत्रपती शिवाजी कालखंडांतील




ऐतिहासिक कागदपत्रे

संपादक: राजाराम देशपांडे







दार उघड बया आता दार उघड









लेखकाचा परिचय



राजाराम शंकर देशपांडे
चार्टर्ड इंजिनिअर
एम्.आय्.ई.सी.ई., एम्.एस्.ई (१)

१९५९ ला कॉलेज् ऑफ इजिंनियरींग पुणे, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, कोलकत्ता व मिलिटरी इंजिंनियरींग कॉलेज्, खडकी येथे पदवी. बाँब डिस्पोजल तंत्रज्ञान. यशवंतराव चव्हाण प्रबोधिनी, पुणे व मेरी नाशिक-प्रशिक्षणाधिकारी, ३६ वर्षे सरकारी नोकरी त्यानंतर वडिलोपार्जित शेती व्यवसाय. "वनश्री" पुरस्कारासाठी नामनिर्देशन.

प्रतिनियुक्ती- वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान पुणे. पुणे विद्यापीठ, जिल्हा- उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा परिषद- पुणे व सातारा, डिझाईन्स सर्कल- मुंबई.

पत्ता:
आदिती, प्लॉट नं ८,
भरतकुंज वसाहत नं २,
एरंडवणा, गणेश नगर,
पुणे: ४११०३८
दुरध्वनी: २५४४११७८
मोबा: ९४२०६९६४३२

मुद्गल – नऱ्हेकर – नांदोशीकर – देशपांडे (पाटील)
या घराण्याचा ... छत्रपति शिवाजी महाराजांच्या कालखंडातील

ऐतिहासिक कागदपत्रे

(इ. स. १६३० ते इ. स. १६८०)

लेखक व प्रकाशक :

श्री. राजाराम शंकर देशपांडे
एम्. आय्. ई. सी. ई.
एम्. एस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर

मूल्य : रु. ८००/-

प्रोफिशन्ट™
पब्लिशिंग हाऊस

लेखक व प्रकाशक : राजाराम शंकर देशपांडे
एम्. आय्. ई. सी. ई., एम्. एस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर
पत्ता : "आदिती," प्लॉट नं. ८,
भरतकुंज वसाहत नं. २, अेरंडवणा (गणेशनगर),
पुणे ४११०३८.
फोन : ०२० - २५४४११७८, ९४२०६९६४३२

प्रथमावृत्ती : दिनांक १४ मार्च २०१०

अक्षर-जुळणी : स्वाती एन्टरप्राईजेस, पुणे - ९
अर्क डिझाईन, पुणे.

मुखपृष्ठ, मलपृष्ठ व आतील चित्रे
शंकर गोजारे, संदीप साळुंके, अमोल क्षीरसागर, शशांक गुप्ते

प्रकाशन सहाय्य व वितरक :
अ. र. नांदुरकर
अनमोल डिस्ट्रिब्यूटर्स
५३५, शनिवार पेठ, शॉप नं. ९, राधाकृष्ण बिल्डिंग ;
प्रभात सिनेमा समोर, पुणे - ४११०३०.
फोन : ०२० - २४४८४५३८.

मुद्रक : अभिषेक क्रियेशन्स
९८७, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.

अनुक्रमणिका

प्रस्तुत पुस्तकातील रेखाचित्रे व फोटो यांचे वर्णन व पुस्तकातील पृष्ठ क्रमांक

* देशपांड्यांच्या सदरेपुढे *

श्रीमंत नऱ्हेकर देशपांड्यांचे घराणे बारा मावळात तालेवार आहे. हे नऱ्हेकर देशपांडे पुण्याजवळच्या नांदोशी गावात गेली तीनशे वर्षेनांदत आहेत. म्हणून त्यांना नांदोशीकर देशपांडे म्हणूनही ओळखतात. तसा या नांदोशीकर देशपांड्यांचा वंशपरिवार मोठा आहे. आजच्या काळात उद्योग-धंद्यासाठी या घराण्याच्या शाखा विखुरल्या आहेत. एक शाखा मात्र आजही नांदोशीच्या काळी-पांढरीत नांदते आहे. इ.१९४७ पर्यंत नांदोशीत देशपांड्यांचा वाडा सरदारी दिमाखात उभा होता. दि.१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. देशपांडे वाड्यावर स्वातंत्र्याचा झेंडा फडकला. पुढे साडेपाच महिने उलटले आणि महात्माजींचा दारुण घात झाला. दिल्लीत गांधीजींची चिता पेटली आणि महाराष्ट्रातील गावोगाव निशपाप घरांच्याहि चिता पेटल्या. नांदोशीच्या देशपांडे वाड्याची त्यावेळी राख-रांगोळी झाली. शिवकालीन वस्तू, वास्तू, शेले-शालू, दागदागिने, कागदपत्रे, घोड्या-उंटांचा साज-सरंजाम, घागरी-हंडे, जुनी हत्यारे पात्यारे शिवकालीन ऐतिहासिक साहित्य पार खलास झाले. शिवकालात ज्या घराण्यातील अनेक पुरुष हिंदवी स्वराज्यासाठी लढले, राबले अन मेले, त्याच घराण्याचा वाडा, देश स्वतंत्र झाल्यावर बेचिराख झाला.

त्याच वाड्याच्या राखेतून आजचा देशपांडे वाडा नांदोशीत पुन्हा उभा राहिला. जुने काहीच उरले नव्हते. वाड्याबाहेर कुठे-कुठे देशपांडे घराण्याची कागदपत्रे शिल्लक होती आणि त्यातल्या मुख्य देशपांड्यांची जिद्द! त्यांच्या इतिहासाचे प्रेम आणि अभिमान टवटवीत, गर्द पिंपळासारखा ताजा होता. त्या देशपांड्यांचे नांव नऱ्हे-नांदोशीकर राजाराम शंकर देशपांडे मुक्काम - नांदोशी, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे, सिंहगड रस्त्यावर! वय ७५. देहाची इमारत भक्कम. छाती आणि गर्दन ताठ!

श्री. राजाराम शंकरराव देशपांडे हे मराठी इतिहासकार आणि विशेषत: शिवकालावर मनापासून भक्ती करणारे डोळस अभ्यासक व संशोधक आहेत. स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांच्या आणि राजमाता जिजाऊ साहेबांच्या क्रांतिकारी अनुष्ठानात अगदी प्रारंभापासून शिलेदारीचे व्रत घेतलेले हे देशपांडे

घराणे आहे. बापूजी मुद्गल हा महाराजांचा कर्तबगार सहायक. तो मुत्सद्दी होता तेवढाच शिलेदारही होता. कोंढाणा उर्फ सिंहगड किल्ला याच बापूजीने मोठ्या मुत्सद्दीगिरीने कारस्थाने करून कब्जात आणला. शिवापूर हे गाव व पेठ महाराजांच्या लहानपणीच नव्याने वसविण्यात आली (इ.१६३७ ते १६४६ चे दरम्यान) त्यावेळी या शिवापूरात महाराजांसाठी वाडा बांधण्यात आला. याच वाड्याशेजारी बापूजी मुद्गल देशपांडे यांचाही वाडा बांधून तयार करण्यात आला. या बापूजी मुद्गल देशपांड्यांना तीन पुत्र होते. नारो बापूजी, बाळाजी बापूजी आणि चिमणाजी बापूजी. हे चौघेही बापलेक स्वराज्याच्या सैन्यात लष्करी कामगिरी शेवटपर्यंत करीत होते. बापूजी मुद्गल देशपांडे हे स्वराज्याचे पहिले सरहवालदार होते. म्हणजेच स्वराज्याच्या अंतर्गत संरक्षणाची व सुव्यवस्थेची जबाबदारी शिवाजी महाराजांनी व जिजाऊ साहेबांनी बापूजींवर सोपविली होती. बापूजींचे व्यक्तित्व व व्यक्तिमत्व निश्चितच कर्तृत्वशाली व भारदस्त होते हे त्यांनी केलेल्या कामगिरीवरुन सिध्द होते. किल्ले कोंढाणा हा अदिलशाही होता. गडावर विजापूरकर अदिलशहाचाच, म्हणजेच केंद्रसत्तेचा ताबा होता. कोंढाण्याचा गडकरी होता सिद्दी अंबर वाहब. जोपर्यंत दादाजी कोंडदेव हे हयात होते, तोपर्यंत शिवाजी राजांनी कोंढाण्यावर आपला ताबा बसविण्याचा विचार कृतीत आणला नाही. 'कोंढाणा' हा किल्ला कोंढाणा सुभ्याचा मुख्य कचेरीचा केंद्र होता. तेथूनच सुभ्याचा शाही कारभार चालविला जात असे. शाही सुभेदार होता दादाजी कोंडदेव. त्यामुळेच जुन्या कागदपत्रात दादाजीचा हुद्दा सुभेदार सुभे कोंडाणा असाही येतो. याच दादाजी कोंडदेवांकडे सुभेदारी होती. पण प्रत्यक्ष कोढाणा किल्ला सिद्दी अंबर वाहब या केंद्रिय अदिलशाही अधिकाऱ्याकडे किल्लेदार म्हणून होती. तो किल्ला सिद्दी अंबर वाहब कडून बापूजी मुद्गल-नऱ्हेकर-देशपांडे याने कारस्थाने करुन हिंदवी स्वराज्यात आणला. ही बापूजीची अतिशय मोठी कामगिरी. हे राजकारण इ. १६४८ च्या प्रारंभास घडले.

बापूजी नऱ्हेकरास तीन पुत्र होते, हे वर आलेच आहे. नारोजी, बाळाजी व चिमणाजी हे तिघेही शूर सैनिक आहेत. या तिघांनीही स्वराज्याकरिता अनेक

युध्दात प्रत्यक्ष भाग घेऊन शौर्य गाजविले आहे. मतळ हातावरी शीर घेवोन लढताती असा यांचा बहादूरीचा वाटा स्वराज्यात आहे. अफजलखानाच्या स्वारीच्यावेळी, म्हणजेच प्रतापगडच्या युध्दात नारो बापूजीकडे महत्वाची कामगिरी सोपविलेली होती. बाळाजी व चिमणाजी यांनीही शाहिस्तेखानावरील छाप्यात महाराजांच्या बरोबर लाल महालात भाग घेतला होता. या मुलांचे वडील केंव्हा वारले, याची नोंद अद्याप मिळालेली नसली तरी वार्धक्याच्या काळातही स्वराज्यातील कामे शेवटपर्यंत करित असावेत असा तर्क आहे.

महाराज सुरतेच्या पहिल्या स्वारीच्या वेळी, (म्हणजेच इ.१६६४ जानेवारी ६ ते १०) नारो बापूजी हे या स्वारीत होते. दि. १० जानेवारी रोजी लूट घेऊन परतले. लोहगडापर्यंत स्वारी व लूट यशस्वीपणे आली. पण लोहगाव ते वडगाव (ता.मावळ जि.पुणे) या भागात पोहोचताच महाराजांस बातमी समजली की, पुण्यातील मोघलांची फौज आपल्या रोखाने चाल करुन येत आहे. तेंव्हा महाराजांनी सांगातच लूट लोहगडावरच नेताजी पालकरांबरोबर पाठविली व स्वत: कोळवण, मुठे खोरे, खामगाव या मार्गाने राजगडाकडे जाण्यासाठी निघाले. येणाऱ्या मोघली हल्ल्याला आडविण्यासाठी वडगाव जवळ काही मराठी सैन्य त्यांनी ठेविले. त्यात प्रमुख होते नारो बापूजी नऱ्हेकर देशपांडे. हा प्रसंग दि. ४ किंवा ५ फेब्रुवारी १६६४ या दिवशी घडला. आलेल्या मोघली हल्ल्याबरोबर नारो बापूजी व मराठी सैन्य झुंझले. मोघली हल्ला त्यांनी उधळून लावला. पण या युध्दात नारो बापूजी रणांगणी पडले. गळ्याजवळ बाण लागून ते घोड्यावरुन कोसळले व मृत्यू पावले.

या नारो बापूजींना 'केशव' नावाचा पुत्र होता. आगऱ्यास जाण्याच्यापूर्वी मिर्झाराजे व दिलेरखान या मोघली सरदांशी शिवाजी राजांनी पुरंदर गडाखाली जो तह केला, त्यात पुरंदरगडासह २३ किल्ले मोंगलाना द्यावे लागले. पुरंदरावर मोगली निशाण लागले. व पुरंदरगड पुन्हा जिंकून घेण्यासाठी चार वर्षांनी, दि. ८ मार्च १६७० रोजी निळो सोनदेव बावडेकर यांस महाराजांनी पाठविले. गडावर शेख रजिउद्दीन नावाचा मोगली किल्लेदार होता. या अचानक छाप्यात मराठी सैन्याचा जय झाला. गड घेतला. पण या युध्दात केशव नारायण नऱ्हेकर देशपांडे ठार झाला.

पुढे साल्हेरच्या युध्दातही बाळाजी व चिमणाजी नऱ्हेकरांनी पराक्रम गाजविला. असा हा शिवकालीन नऱ्हेकर देशपांड्यांचा इतिहास आहे. अशा या घराण्यास खेड-शिवापूर व सिंहगड खोऱ्यातील काही भागाचे देशपांडे - वतन महाराजांनी दिलेले होते किंवा ते आधीपासूनच होते, तेच पुढे स्वराज्यात चालू ठेवले.

नऱ्हेकर देशपांडे घराण्याची कागदपत्रे, विपूल प्रमाणात श्रीमंत राजाराम शंकरराव देशपांडे यांनी अतिशय कष्टपूर्वक संशोधन करुन एकत्र जमा केली आहेत. त्याचप्रमाणे पुण्याच्या पेशवे दप्तरात याच घराण्याबद्दलची जी दप्तरे पाहणे आवश्यक आहे, ती पाहून श्रीमंत देशपांडे यांनी फार मोठ्या प्रमाणावर पत्र संग्रह केला. या पत्रात शिवकालिन, स्वातंत्र्ययुध्दकालिन (इ.१६८३ ते १७०७),पेशवेकालिन व ब्रिटिशकालिनही कागदपत्रे आहेत. मुगल बादशाहांच्या सनदांचा संग्रहही त्यात आहे. अभ्यासकांना या कागदपत्रांचा मोठाच उपयोग होणार आहे. नऱ्हेकर देशपांडे घराण्याच्या इतिहासाबरोबरच इतर घराण्यांची माहिती यात सापडणार आहे. अजूनही प्रकाशात न आलेले नऱ्हेकरांचे दप्तर ठिकठिकाणी नऱ्हेकरांच्या कुटुंबशाखात विखुरलेले आहे. या सर्वच प्रसिध्द आणि अप्रसिध्द कागदपत्रांचा डॉटरेटच्या प्रबंधासाठी उपयोग होणार आहे. माझ्या माहितीप्रमाणे एक प्रज्ञावंत इतिहासाभ्यासक तरुण संशोधक डॉटरेटसाठी आत्तापासूनच कामाला लागले आहेत. अशा प्रज्ञावंत अभ्यासकांना श्री.रा.शं.देशपांडे-नऱ्हेकर यांचे मोलाचे सहाय्य लाभणार आहे. प्रस्तुत देशपांडे घराण्याची 'ऐतिहासिक कागदपत्रे' या ग्रंथाचा लाभ अशा प्रकारे संशोधन कार्यास होणार आहे.

देशपांडे घराण्यातील प्रस्तुत ऐतिहासिक कागदपत्रांतून अनेक महत्वाचे धागे-दोरे जुळत आहेत. पंतप्रधान मोरोपंत पिंगळे, रामचंद्रपंत आमात्य, रघूनाथ बल्लाळ कोरडे, सोनोपंत डबिर, चिंचवडकर देव इत्यादी घराण्यांची नाती-गोती यातून लक्षात येत आहेत. विशेष म्हणजे या घराण्यातील कर्तबगार पुरुषांच्या समाध्यांचा शोध लागत आहे. त्याचप्रमाणे त्यांनी बांधलेली मंदिरे आणि अन्य बांधकामे लक्षात येत आहेत. शिवकालिन एका प्रख्यात घराण्याचा इतिहास सुसंगत तारिखवार जुळविण्यास या 'ऐतिहासिक कागदपत्रे' या ग्रंथाचा

संशोधकांस उपयोग होणार आहे. ही कथा-कादंबरी नव्हे. सर्वसामान्य माणसास या ग्रंथातून मिळणारे शोध व निष्कर्ष समजतील.

श्री रा. शं. देशपांडे यांनी घेतलेले कष्ट आणि चिकाटीने केलेले हे ग्रंथ लेखन व संपादन पाहून मन थक्क होते. नव्या पिढीला यातून प्रेरणाच मिळेल. श्रीमंत देशपांडे यांचे अभिनंदन करताना त्यांना सादर दंडवत घालावे असेच त्यांचे कार्य आहे.

बहुत काय लिहीणे? राजते लेखनाविधी!

पुरंदरे वाडा, पुणे ९. **– बाबासाहेब पुरंदरे**

॥ श्री ॥

खेडेबाऱ्याच्या देशपांडे घराण्यातील पुरुषांनी शिवकालात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्या घराण्यातील बापूनी मुद्‌गल यांनी १६४७ मध्ये शिवाजी महाराजांकरिता कोंढाणा किल्ला काबीज केला अशा आशयाची नोंद जेधे शकावलीत आहे. त्यांचे पुत्र बाळाजी व चिमणाजी हे शाइस्तेखानावरील छाप्यात आघाडीवर होते.

बालपणी खेडला असताना शिवाजी महाराज काही काळ याच घराण्याच्या वाड्यात रहात होते.

अशा या घराण्याचा इतिहास श्री. राजाराम शंकर देशपांडे यांनी मोठ्या कष्टाने लिहिला आहे. ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

– गजानन भास्कर मेहेंदळे

श्री
शिवचरणी
निरंतर गंगाधर
सुत निनाद
बेडेकर

माघ कृष्ण चतुर्दशी
श्रीशिवराज्य शके ३३६
०१० फेब्रुवारी १२

॥ श्री [illegible] ॥

अखंडितलक्ष्मीआलंकृत सकलगुणालंकरण राजमान्य राजश्री आर. एस देशपांडे प्रति निनाद बेडेकर दण्डवत. विशेष तरी आपण नऱ्हेकर- नांदोशीकर देशपांडे (पाटील) यांची काही कागदपत्रे माझ्याकडे दिली होती. ती मी वाचली. आपल्या घराण्याबद्दल अभिमान असणे ही गोष्ट आवश्यक आहेच परंतु घराण्याच्या इतिहासासंबंधी कागदपत्रे जमवून त्यांचा एक ग्रंथ करण्याचे फार मोलाचे काम आपण केले आहे. आपल्या उतारवयात मोठ्या जोमाने हा उपक्रम केला आहे. ऐन कागदपत्रेच छापल्याने ग्रंथाचे मोल वाढले आहे. मी आपल्याला शुभेच्छा देतो आणि ग्रंथ लवकरात लवकर प्रसिध्द व्हावा असा जोगवा तुळजाभवानीकडे मागतो [illegible]

[illegible]

॥ श्री ॥

आपण हाती घेतलेल्या स्तुत्य उपक्रमाबद्दल मनःपुर्वक धन्यवाद ! आपण प्रकाशित करीत असलेल्या मुद्गल – नऱ्हेकर – नांदोशीकर – देशपांडे (पाटील) या घराण्याचा ..... छत्रपति शिवाजी महाराजांच्या कालखंडातील (इ.स. १६३० ते १६८०) ऐतिहासिक कागदपत्रे या अत्यंत उद्बोधक आणि माहिती प्रधान अशा पुस्तकाबद्दलचा अहवाल देणाऱ्यांपैकी मी एक असावा याचा एक वेगळाच आनंद पुरेपुर मिळाला आहे.

आपण अत्यंत परिश्रमपूर्वक असा हा ग्रंथ / पुस्तक तयार केलेला आहे. आपल्या अनेक वर्षांच्या परिश्रमांना आज अत्यंत स्पृहणीय यश प्राप्त झालेले आहे. असे सांगण्यास नक्कीच अभिमान वाटतो.

अनेक ठिकाणाहून स्वतः मेहनतीने वणवण भटकून आपण मौलीक माहिती गोळा केलीत. तसेच त्याचे यथायोग्य संकलन करुन एका अप्रतिम अशा ग्रथांची निर्मिती अगदी यशस्वीरित्या केली आहे. नुसतीच माहिती मिळूवन भागत नसते, कारण ऐतिहासीक माहिती ही अनेक वेगवेगळ्या स्वरुपात प्राप्त होत असते. कधी अनेक भाषांमध्ये विखुरलेली असते, कधी गद्यात, कधी पद्यातही लिहीलेली असते. त्याचप्रमाणे विविध लेखकांच्या मातब्बरीप्रमाणे माहिती नोंदविलेली असते. तेंव्हा त्या लेखकाचा पक्ष, परिस्थिती, ज्ञान आणि अभिनिवेश याचाही विचार करावा लागतो. बाजारी माहिती, दरबारी माहिती, खाजगी माहिती असेही बरेच प्रकार असतात. शिवाय या वेगवेगळ्या उपलब्ध लिखाणामधील संगती, विसंगती शोधावी लागते. काळस्थळासंबंधीच्या चुका शोधून काढाव्या लागतात. अशा प्रकारे परिश्रमपुर्वक घटनानिश्चिती करावी लागते. मग त्या निश्चित केलेल्या घटनांची संगतवार घालून / लावून त्यावरुन प्रकरणांची निर्मिती करून हाती घेतलेल विषय पूर्ण करावा लागतो.

हा अशा प्रकारे या सर्वांची सांगड घालत आपण देशपांडे घराण्याचा अतिशय दैदिप्यमान आणि खराखुरा इतिहास वृत्तांतरुपाने अगदी सहज सोप्या अशा शैलीमध्ये मांडलेला आहे.

आज लोकांना इतिहास म्हटलं की, छत्रपति शिवाजी महाराज आठवतात. पण त्याच छत्रपति शिवाजी महाराजांचे स्वराज्य वाढविण्यासाठी, आणि घडविण्यासाठी देशपांडे कुटुंबियांची पिढ्यानपिढ्याची मौलीक साथ त्यांना लाभली होती. परंतु आपल्या या पुस्तकामुळे ही आजपर्यंत अप्रकाशित असलेली माहिती आज सर्वांसमोर प्रगट झालेली आहे. आज अनेक किल्ले ऐतिहासिक स्थळे लोक अनेकांना दाखवितात. पण त्याबाबतची खरीखुरी ऐतिहासिक माहिती मात्र त्यांना नसते. छत्रपति शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाने बळकाविलेल्या लालमहालावर छापा घालून त्यास पिटाळून लावले हे तर सर्वश्रुतच आहे. पण त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांना जीवाची बाजी लावत देशपांडे कुटुंबियांनी अत्यंत मौलीक अशा साथ केली होती हे कित्येकांना माहित नव्हते.

शिवरायांच्या स्वराज्याच्या अनेक मोहिमांमध्ये देशपांडे कुटुंबियांचा सहभाग होता व त्यांनी वेळोवेळी शिवरायांना मोठे मौलीक सहकार्य केले होते. देशपांडे कुटुंबियांनी कायमच तन मन धन सर्वस्वी अर्पण करून स्वराज्याची सेवा केली होती. त्यांनी शिवरायांना वेळोवेळी केलेली मदत किती लहान किती मोठी याला महत्व नाही, पण त्यामागे असलेल्या तुळशीपत्राच्या त्यांच्या भावनेचे मोल कधीच करता येणार नाही.

आपल्या गुणांचा उपयोग देशकारणी व्हावा हे बोलणे जितके सोपे त्याच्या अनंतपट तसे घडविणे अवघड. परंतु तसे घडविण्यासाठी तहान भूक विसरुन स्वराज्याच्या कारभारात देशपांडे कुटुंबियांनी दिलेले योगदान थक्क करणारे आहे. इतिहासाच्या पानांमध्ये प्रत्यक्ष नावांनीच नव्हे तर आपल्या अलौकिक कर्तुत्वगुणांनी ज्यांची नोंद प्रकर्षाने द्यावीच लागेल अशा लोकांमध्ये आज देशपांडे कुटुंबियांचे नाव झळकत आहे.

तसेच मराठी स्वराज्याच्या इतिहासातील देशपांडे कुटुंबियांच्या कर्तृत्वाचा सिंहाचा वाटा अमान्य करण्यासारखा नाही. आपल्या बऱ्याच वर्षाच्या तपश्चर्येला आज मधूर, गोड, रसाळ फळे आली आहेत हे पाहून आनंद वाटला.

अगदी सुयोग्य पद्धतीने मांडणी करून आपण या पुस्तकाचे लेखन केले नाही. इतकी माहिती, इतका तपशिलवार वृत्तांत देऊन एखादे पुस्तक लिहिणे हे सोपे तर निश्चितच नाही. अत्यंत उच्च दर्जाची मानसिकता अशासाठी आवश्यक असते तेव्हांच हे जमते. मानसिक आध्यात्माची बैठक अशी प्रवृत्ती निर्माण होण्यासाठी असावी असते मनाचे मोठेपण टिकवावे लागते आणि बुद्धीचा समतोलही राखावा लागतो. आपण या सर्वाचा योग्य मेळ साधत तयार केलेल्या या पुस्तकाबद्दल कितीही लिहिले तरी ते कमीच ठरेल यात शंका नाही. पण एका अनमोल पुस्तकाची/ग्रंथाची निर्मिती करून आपण आज देशपांडे कुटुंबियांचा इतिहास अगदी समर्पकपणे व समतोलपणे मांडलेला आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ इतिहासाचे ज्ञान सर्वांना मिळणार आहे.

या पुस्तकाच्या/ग्रंथाच्या निर्मितीसाठी आपण आपल सर्वस्व झोकून देवून काम केलेत ही गोष्ट मोठी विलक्षण आहे. देशपांडे कुटुंबियांचा उज्वल इतिहास सांगणारे एक विश्वासार्ह आणि अधिकृत असे ऐतिहासिक साधन आपण तयार केले आहे.

कर्तृत्व संपन्न, व्यवहारीक चातुर्य, भविष्याचा अचूक वेध घेऊन धाडसाने उद्योग व्यवसाय करणे आणि परमेश्वर कृपेने त्यात यश मिळविणे हे अनेकांना जमते आणि एवढे सर्व करूनही पुन्हा कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत, अशी जाण असून सुद्धा ती कृतीत अणणारी माणसे फारच थोडी आहेत, अशा अत्यल्प माणसापैकी आपण एक महान गृहस्थ आहात असे अभिमानाने सांगतो आणि माझा अहवाल संपवितो.

– ॲड. संजय चितळे,

हायकोर्ट

एका सार्थ इतिहासाची ओळख

प्रथम शहाजी राजांच्या पदरी असलेल्या व नंतर शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात सहभागी होऊन मोलाचे योगदान देणाऱ्या जेधे, पासलकर, बांदल, मालुसरे या घराण्यांप्रमाणेच शिवापूरकर नऱ्हेकर – नांदोशीकर घराण्याचाही समावेश होतो.

शहाजी राजांच्या पदरी असलेल्या बापूजी मुद्गल देशपांडे यांनी १४ मार्च १६४७ रोजी कोंढाणा उर्फ सिंहगड स्वराज्यात आणून शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात मोलाचा वाटा उचलला. तर लालमहालातील शाहिस्तेखानावरिल छाप्याच्या प्रसंगी बापूजी पंतांच्या बाळाजी व चिमणाजी या दोन्ही पुत्रांनी मोठा पराक्रम गाजविला व तिसरा पुत्र नारो बापूजी याने १० जाने १६६४ रोजी वडगाव मावळ येथे मुघल सरदार मुकुंदसिंग रजपुत याच्या बरोबर झालेल्या संघर्षात बलिदान दिले. याच घराण्यातील नारायण देशपांडे यांनी वणी दिंडोरीच्या युद्धप्रसंगी वीर मरण पत्करले. राघो मोरेश्वर, महादजी रघुनाथ, खंडो मोरेश्वर, या व्यक्तींनी पेशवाईत मराठी राज्याचा कारभारातही म्हणजेच मुलकी सेवेतही मोठी कामबिरी बजावली आहे. देशपांडेपणाचे काम असो जे जे कार्य आपल्या पदरी आले ते ते प्रामाणिकपणाने करणे हीच त्यांची ध्येय निष्ठा होती. ती पार पाडत असतांना या घराण्यातील अनेक व्यक्तिंनी दाखविलेले धाडस, शौर्य, प्रसंगावधान, व्यवहार चातुर्य वगैरे गुणांचे आपणास दर्शन होते. या घराण्याने मराठ्यांच्या इतिहासांत दिलेले योगदान पहातां प्रत्येक मराठी माणसाच्या मनात या घराण्याविषयी आपलेपणाची भावना निश्चित निर्माण होईल.

राजाराम शंकरराव देशपांडे यांना आपल्या घराण्याचा सार्थ अभिमान आहे. परंतु ते तेवढ्यावरच न थांबता त्यांनी आपल्या पुर्वजांच्या या तेजस्वी इतिहासाला ग्रंथ रुपात साकार करण्याचा निर्धार केला व त्या साठी उतार वयातही अत्यंत परिश्रम घेऊन विविध प्रसिद्ध व अप्रसिद्ध साधनांचा अभ्यास करून हा ग्रंथ साकार केला आहे.

मुळचे देशपांडे घराणे कुठले, त्यांच्या उपशाखा कशा झाल्या, त्यांचा विस्तार कोठे कोठे कसा होत गेला. त्यांच्या इनाम जमिनी, इनाम गावे, वतनाच्या

जागा, रहाते वाडे, देशपांडे.कुलकर्णी व पाटील वतना विषयीची माहिती प्रस्तुत ग्रंथात सविस्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी अनेक इतिहासाची पुस्तके, बखरी, ऐतिहासिक पत्र संग्रहांचा अभ्यास केला आहे व त्याच बरोबर भारत इतिहास संशोधक मंडळ आणि पेशवे दप्तरांतील शेकडो मोडी कागदपत्रांचा अभ्यास केला आहे.

वंशवेल, नकाशे, मोडी पत्रांची छायाचित्रे, तसेच लिप्यंतर केलेली पत्रे परिशिष्टा सोबत जोडली आहेत. त्यामुळे या ग्रंथाचे महत्व आणखीच वाढले आहे. या ग्रंथाच्या परिशिष्टामध्ये दिलेल्या ग्रंथाची यादीच त्यांच्या श्रमाची साक्ष देते.

आपल्या पूर्वजांनी स्वराज्याशी एकनिष्ट राहून देशासाठी केलेले बहुमोल कार्य लोकांसमोर आणण्याचा राजारामपंतांचा ध्यास व त्यासाठी घेतलेले अपार कष्ट हे या ग्रंथरूपाने साकार झाले आहेत. म्हणूनच ते अभिनंदनास पात्र आहेत.

– पांडुरंग बलकवडे

(इतिहास संशोधक)

नांदोशीकर देशपांडे घराण्याची शिवकालीन कागदपत्रे

श्रीमान राजाराम शंकर देशपांडे सेवानिवृत्त शासकीय अधिकारी राहणार मौजे नांदोशी, ता. हवेली, जि. पुणे, हे श्री शिवकालीन ऐतिहासिक देशपांडे घराण्याचे कर्तृत्ववान असे वारसदार आहेत. आपल्या घराण्याचे शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाशी फार मोठा संबंध असल्याचा व महाराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात आपल्या पूर्वजनांनी जे अपूर्व, अद्भुत आणि जीवाची पर्वा न करता जे योगदान दिले त्याचा त्यांना सार्थ अभिमान आहे. त्यांनी आपल्या घराण्यातील आगीच्या आणि कसरीच्या तावडीतून जगल्यावाचल्या कागदपत्रांचे संकलन करून जतन केले आहे. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यावर या कागदपत्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. पर्वतप्राय प्रयत्नांनी आणखी शेकडो मोडी कागदपत्रे त्यांनी पुणे पुराभिलेखागारातून प्राप्त केली, त्याचे लिप्यंतर केले. पर्शियन कागदपत्रांचे अनुवाद केले. हे सर्व झाल्यावर यापूर्वी प्रसिद्ध झालेली नऱ्हेकर देशपांडे, खेडेबारे - शिवापूरकर देशपांडे यांच्या कागदपत्रांचा सखोल अभ्यास केला. अनेक इतिहास संशोधकांशी संवाद केला. नांदोशीकर देशपांडे घराण्याची कागदपत्रे आजपर्यंत प्रसिद्ध झाली नव्हती. ते अत्यंत खडतर काम श्री देशपांडे यांनी बहुप्रयत्नाने आज प्रसिद्ध केली आहे. ही गोष्ट अतिशय मोलाची आहे.आपल्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमांच्या स्थळांचे नकाशे तयार केले. अद्यावत वंशावळी तयार केल्या. आपल्या घराण्यातील पराक्रमी पुरषांच्या समाध्यांचा शोध घेतला. त्यांची छायाचित्रे घेतली. पराक्रमांच्या प्रसंगांचे दर्शन वाचकांना घडविण्यासाठी त्यांनी रेखाचित्रे तयार करून घेतली.

आपल्या सध्याच्या तीन जळीताच्या दिव्यातून पुन्हा उभ्या असलेल्या वास्तूचा त्यांना अभिमान आहे. जुन्या वाड्याच्या तटबंदीच्या भिंतींचे अवशेष आजही त्यांच्या घराण्याच्या ऐतिहासिकतेची आठवण करून देतात. अजूनपर्यंत गावचे वतनदार पाटील म्हणून गावात ते ताठ मानेने वावरतात. वडजाई देवी हे त्यांचे कुलदैवत. तिच्या मंदीराच्या जीर्णोद्धार त्यांनी केला. तिच्या यात्रेतील आपले मानाचे स्थान त्यांनी आजही जपले आहे. त्यांची शेती, आमराई आजही त्यांच्या

ऐतिहासिकतेची साक्ष देतात. वाघजाई मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम आणि गावात बसविलेले सौरदिवे यातून त्यांचे आपल्या जन्मभूमीवरील उदंड प्रेम व्यक्त होते.

श्रीमान राजाभाऊ देशपांडे हे आपला घराण्याचा वारसा अत्यंत मनोभावे जपत आहेत. यांनी आपल्या घराण्याच्या कागदपत्रातून अनेक मौलिक गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. ऐतिहासिक कागदपत्रांच्या दुर्मिळतेच्या काळात देशपांडे यांनी ही कागदपत्रे ज्या आस्थेने, आपुलकिने आणि दुर्दम्य आशावादाने जपली आहेत त्याचे मोल अपार आहे. देशपांडे यांनी हा ग्रंथ लिहून एक महाकृत्य केले आहे.

बहुतीं शोधुन पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ।

तरी मग जाणावें साधिलें । महाकृत्य ।। – समर्थ

राजाभाऊ देशपांडे यांनी हा ग्रंथ लिहून महाराष्ट्रावर फार मोठे उपकार केले आहेत. त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच अदिशक्ती चंडमुंडभंडासुरखंडिनी रामवरदिनी तुळजाभवानीच्या चरणी प्रार्थना.

– डॉ. सदाशिव म. शिवदे, पुणे.

मराठेशाहीच्या सीमा युद्धनीतीवर अवलंबून असतात काय ?

......स्वत:च्या घराण्याचा इतिहास, लेखक जितक्या आत्मियतेने साकार करतो तितका इतरांकडून सुसंगतपणे होत नाही. लेखकाने इतिहास लिहिताना फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचाच कार्यकाल निवडला त्याला निश्चित कारणे होती. असे प्रकाशित व अप्रकाशित ऐतिहासिक कागदपत्रांवरून स्पष्ट होते. भरपूर रेखाचित्रे देऊन प्रसंग पुढे ठेवल्याने इतिहास योग्य तऱ्हेने समजून येतो. शिवाय लेखकांनी वतनाची जागा, नांदोशी व खेड शिवापूर येथील तत्कालीन काम करणाऱ्या व्यक्ति व त्यांचे कार्य व सरकारकूनांसंबंधीचे संबंधांनीही सुराज्य स्थापनेसाठी युद्धात देखील उल्लेखनीय विजय संपादून स्वराज्याच्या मर्यादा अडीचशे पटींनी वृद्धिंगत झाल्या याचे नकाशासह रेखाटन करून वाचकांसमोर नेमकी व वास्तव परिस्थिती मांडण्याचे काम झालेले आहे.

शेती, शस्त्र व शास्त्र या विषयात प्रत्येक ठिकाणी देशपांडे कुटुंबाचा उल्लेखनीय सहभाग असल्याबद्दल खात्री पटते. स्वत: लेखकांचे पूर्वजांनी म्हणजे **नारो बापूजी, केसो नारायण व नारायण – नांदोशीकर** यांनी सर्व महत्त्वाच्या व प्रतिष्ठेच्या लढायात भाग घेतल्याचे दिसून येते. तसेच पंचहजारी घोडदळाने केलेला अपूर्व पराक्रम कायम पहिल्या दर्जाच्या सेनापतीने वाढविलेला दिसतो. **आजोबा, मुलगा व नातू हे एकाच कुटुंबातील व्यक्ति** घोड्यावरून पडून लढायांत मृत्यू पावल्याने देशातील हे उदाहरण क्वचित एकमेव असल्याचे दिसून येते.

त्यामुळेच शिवाजीच्या समकालीन व मोगल राजवटीतील इतिहास लिहिणारांनी इंग्लिश, पोर्तुगिज, डच, फ्रेंच व मोगल (फारसी) लेखकांनी देशपांडे कुटुंब हे "**प्रितीपात्र**" व छत्रपती शिवाजी महाराजांचे "**उजवा हात**" म्हणून समजले जाई व "**बॉडी गार्ड**" या नावांनी संबोधले आहे. रघुनाथ पंडीत शिवाजी महाराजांच्या सांगण्यावरून संस्कृतमधून "**राज्यव्यवहारकोश**" लिहावयास सांगतात. या कुटुंबाची पिढ्यान् पिढ्या मौलिक साथ राजांना लाभली असल्याने व सर्व अप्रकाशित कागदपत्रे प्रथमच वाचकांसमोर आल्याने, यामुळे शिवाजी राजांनी **बाळाजी बापूजी, चिमणाजी बापूजी, बापूजी मुद्गल** त्यांचे आप्त मोरोपंत पेशवे, रामचंद्रपंत अमात्य, त्र्यंबकपंत डबीर, रघुनाथपंत कोरडे यांना राजांच्या तोलामोलाचे स्थान दिले होते.

शिवाजी राजांच्या राज्यात वतनाचे धोरण आवश्यक नव्हते. मोगल राजवटीत औरंगजेबाने ज्याप्रमाणे मातब्बर लोकास वतने देऊन वळविले तोच प्रकार राजारामांनासुद्धा अवलंबावा लागला की ज्यामुळे औरंगजेबाशी लढणे सोपे गेले.

शिवाजी महाराजांच्या वेळी पगार रोखीने होत असे. परंतु पैशाअभावी राजारामांच्या वेळची परिस्थिती वेगळी असल्याने २१ वर्षे स्वातंत्र्याचा लढा लढावा लागला. वतने / जहागिरी देण्याचा मार्ग चोखाळावा लागला. रामचंद्रपंत अमात्य हे पाच छत्रपतिंचे अमात्य होते. मुत्सद्देगिरी, राजनिष्ठा आणि प्रसंगी तलवार गाजवूनही सुराज्य राखावे लागले.

रामचंद्रपंत बाबडेकरांच्या (अमात्य) उत्साही कामगिरीमुळे राजाराम महाराजांच्या सात वर्षांच्या गैरहजेरीतसुद्धा दक्षिणेत मोगलांना फारसे काही करता आले नाही. शिवाजी महाराजांकडे जेवढे सैन्य होते त्यापेक्षा कितीतरी पटींनी ते आकाराने वाढले होते.

शिवाजी महाराज व मराठे केवळ गनिमी काव्याने लढले, हे काही इतिहासकारांचे मते, ही धारणा उभयतांचे अवमूल्यन करणारी आहे. शौर्यात युद्धतंत्राचीही सुयोग्य जोड असल्यास बलाढ्य शत्रूंनाही नामोहरम करता येते. उदा. वणी - दिंडोरीची लढाई पहा. मोगलांचे प्रचंड सैन्य व अजब तोफखाना पुढे असूनही मराठ्यांनी डाव्या-उजव्या बाजूंनी सैन्याचे आक्रमण केले व त्यामुळ प्रकाश - युद्धात मोगल हरले - मराठे जिंकले. सेनापती नारायण नांदोशीकर देशपांडे यांनी मोगल सैन्यावर हल्ला करून शत्रूचा तोफखाना थंड ठेवला. एकच गोष्ट वाईट झाली की नारायण देशपांडे कामास आले (१७ ऑक्टोबर १६७०) - राजे शोकाकुल झाले.

लेखकाने पुस्तकात नमूद केलेले उपरोक्त मुद्दे युद्धनीतीबद्दल विशेष प्रकाश टाकतात.

- मेजर मु. ना. जोशी

(इतिहास संशोधक)

पश्चिम भारतातील सर्व शहरात पुणे या शहराची एक वेगळी शान आहे आणि त्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. मावळ आणि देश यांच्या सरहद्दीवर वसलेला पुणे हा एक फार प्राचीन प्रांत आहे. 'सिलीकॉन व्हॅली' म्हणून माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर पुण्याचें नाव पुढे येत असतानाच पुण्याजवळील दक्षिणेस असलेल्या सिंहगडच्या पायथ्याशी असलेला नांदोशी या गावातील सर्वांनाच ज्ञात असलेले गावचे पाटील श्री. राजाराम शंकर देशपांडे ह्यांनी संग्रहीत/संकलित केलेली 'मुद्‌गल - नऱ्हेकर - नांदोशीकर - देशपांडे शिवछत्रपतींच्या कालखंडातील ऐतिहासिक कागदपत्रे' हे पुस्तक खरोखरीच वाचनीय आहे.

ह्या कागदपत्रातून देशपांडे यांचा ओघानेच पुण्याच्या इतिहासाचा आढावा घेणाऱ्या ह्या पुस्तकाचे काम साकारताना बघायची संधी मिळाली. 'इतिहास' शब्दाचा अर्थच खूप व्यापक आणि बोधक आहे. प्रत्येक वेळ, वस्तू, वास्तू आणि व्यक्ती ह्यांच्यामागे एक इतिहास असतो.

तो अभ्यासपूर्वक जाणून घेऊन पुस्तकरुपात एकत्रित करण्याचे अवघड काम श्री. राजाराम शंकर देशपांडे ह्यांनी करून दाखविले आहे.

पेशवेकालीन पुण्याचे ऐश्वर्य व वैभवाची लोकांना आठवण करून देत तत्कालीन पुणे शहराची, परिसराच्या माहितीला इतिहासाची जोड देऊन नांदोशी गावाच्या निर्मितीपासून श्री वडजाई/ वज्रादेवी देवस्थानापर्यंत विविध स्थळे, घटना, घडामोडी आणि वास्तू यांच्या तपशीलवार वर्णनांसह प्रस्तुत पुस्तकात निवेदन केले आहे.

या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे इतिहासातील संशोधनात्मक लेखन असूनही ते अत्यंत सहजसुलभ घाटणीचे आणि ओघवत्या प्रसन्न शैलीतले आहे. इतिहासातील दाखले देत वास्तव परिस्थितीची माहिती देणारे हे पुस्तक इतिहासाच्या अभ्यासकांबरोबरच सर्वसामान्य वाचकालाही रमविण्याचे सामर्थ्य ह्यात भरून राहिलेले आहे.

सध्या इतिहास संशोधन व अध्ययन दुर्मिळ होत चाललेले असताना वयाच्या ७४ व्या वर्षी इतिहास जाणून घेत अनेक वर्षे विस्मृतीत गेलेला हा दुर्मिळ खजिना पुन्हा नव्याने वाचकांपुढे, जाणकारांपुढे मांडण्याचे अत्यंत अवघड पण त्याचबरोबर तरुणांना नव्याने संजीवनी देण्याचे काम श्री. देशपांडे ह्यांच्या लेखनातून झाले आहे.

इथे शिवपूर्वकालापासून चालू वर्तमानकालापर्यंत एका विशाल प्रदेशात वाचक फिरून येतो.

हे लेखन केवळ अभ्यासकांपर्यंत मर्यादित न राहता ते सर्व स्तरांवरच्या जिज्ञासूंपर्यंत पोहचावे हाच एकमेव उद्देश ठेवून झालेले हे लेखन वैविध्यपूर्ण व अभ्यासपूर्वक सादरीकरणामुळे व्यासंगी वाचकांना उपयुक्त माहिती देणारे ठरणारे आहे.

वाचकांनी जिज्ञासा जागृत करून इतिहासातील संस्मरणीय प्रसंग व व्यक्ती ह्यांच्याविषयी नवी माहिती व नवे ज्ञान देणारा हा मराठी इतिहासातील आतापर्यंत अप्रकाशित असलेला दुर्मिळ खजिना खुला करण्याचे काम ह्या पुस्तकामुळे झाले आहे.

विपुल इतिहास साधने, संदर्भासाठी ऐतिहासीक कागदपत्रे मिळवून ती जुळवून इतिहास संशोधनाबरोबरच नवीन साधनांच्या माध्यमातून काम लवकर पण उत्कृष्ट व्हावे ह्याकरिता सतत प्रयत्नशील राहून चिकाटीने व जिद्दीने हे काम श्री. देशपांडे ह्यांनी पूर्ण केले.

पुस्तक वाचण्यावर भूतकाळ अभ्यासताना, इतिहासात खोलवर डोकावून रस घेणाऱ्या जिज्ञासूंना इतिहासातील संस्मरणीय प्रसंग व व्यक्ती ह्यांबद्दल जे परिचित नाहीत त्यांची माहिती मिळेल अशी खात्री वाटते.

सर्वच वाचकांची ह्या ऐतिहासिक वर्णनात्मक पुस्तकामुळे इतिहासाची गोडी निश्चितपणे वाढेल असा विश्वास वाटतो.

– सौ. किमया किशोर देशपांडे

।। श्री ।।

मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांच्या ऐतिहासिक घराण्यासंबंधी संपादकांची बहीण कुसुम दंडवते यांनी नांदोशीकर देशपांडे या सरदार घराण्यातील एकत्र कुटुंबातील व्यक्तींबद्दल व्यक्त केलेले विचार प्रस्तुत पुस्तकात मुद्दाम समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यावरून पाटील घराण्यासंबंधी व्यक्ती विशेष प्रामुख्याने उद्धृत करणे आवश्यक आहे. ते विचार खालील प्रमाणे –

माझी १ जानेवारी १९२९ जन्मतारीख तर संस्मरणीय आहेच. नांदोशी हे माझे माहेरचे गाव. सिंहगडच्या पायथ्याशी डोंगराच्या कुशीत (पूर्वी हा भाग खेडेबारे म्हणून ओळखला जायचा) वसलेले छोटेसे गाव. पण गावाला तसा फार मोठा इतिहास आहे. आमचा वाडा **छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळेपासून असून राजे व त्यांची आई जिजाऊ बरेच दिवस येथे मुक्कामाला होते**, असे वडिलांनी आम्हास सांगितले. दगडी चिरेबंदी वाडा व ऐसपैस गढी असल्यासारखी वाड्याची रचना. चौसोपी वाडा. रस्त्याच्या एका टोकापासून त्याचे मागे असलेल्या रस्त्यापर्यंत विस्तृत रचना असलेला. समोर आड, आडापासून आमचे घराच्या तळघरापर्यंत जाणारा बंदिस्त मार्ग, आडाची चिरेबंद दगडी बांधणी, त्यावर घडीव दगडांची धांव, त्यावर बसविलेला रहाट, पुण्यापासून सुमारे १२ किलोमिटर अंतरावर असलेला हा गाव. त्यात पूर्वीप्रमाणे मोठे स्वयंपाकघर, माजघर, देवघर, ऐसपैस ओसरी, त्यापुढे दोन्ही बाजूंना गुरांचे प्रचंड गोठे, त्यालगतच्या बखळीत, घोड्यांचे तबेले, मागे पुढे प्रचंड अंगण, परस इतका भव्य वाडा व त्यात राबती माणसे, गड्यांकरिता स्वतंत्र सोय. खरोखरच वैभवाची साक्ष देणारा असा आमचा वाडा होता. जवळच मोगलपूर्वकालीन व छत्रपती शिवाजी राजांकडून इनाम वतनाची जमीन, आंब्याच्या प्रचंड बागा, शेतमळा, सहा बारमाही पाण्याच्या विहिरी, जांभूळ, फणस, काजूची झाडे, वडजाई (वज्रदेवी) मंदिर इत्यादी वर्णन करावे तेवढे थोडेच. नांदोशी हे गावच इनाम मिळाले असलेल्या वंशपरंपरागत **पोलीस व मुलकी पाटीलकी** आजतागायत आमच्या घराण्याने केले असल्याने **खानदानी पाटीलकी** (जो गाव वसाहतीला योग्य करतो त्यालाच पाटील असे संबोधले जाते) गाजविली. गावातील तीन चतुर्थांश जमीन देशपांडे घराण्याकडे असून, माझे वडील पोलीस व मुलकी पाटील असल्यामुळे मान मरातब, वतनदार, जमीनदार, इनामदार इ. उपाधी त्यापाठोपाठ आलीच.

घरात ४५ माणसांचे एकत्र कुटुंब, गोठ्यात साठ जनावरे (गाई, म्हशी, जातिवंत खिलारी बैल, वासरे), फारच सुस्थितीत असलेले आमचे घर, माझे वडील त्यांचे तिघे सख्खे बंधू, दोन आत्या घरी आलेल्या, एवढ्या कुटुंबाचा विस्तार. त्यामुळे बाकीच्या आमच्या कुटुंबाबद्दल फारच आकर्षण असायचे. मला शाळेत घालायची वेळ आली त्यामुळे मी फॉर्म घेऊन आले. मी पुण्यास काकांकडे असायची. कारण माझे आई-वडील नांदोशीस असायचे व शिक्षणाची मुले पुण्यातल्या घरी अशी पद्धत होती. पुण्यात आमचे लक्ष्मीरोडवर होलसेल सायकल विक्रीचे दुकान होते. तेथे माझे धाकडे दोन काका बसायचे. दुसरे काका यांचे सासवडला सायकलचे दुकान होते. आम्ही १७ बहिणी व आठ भाऊ एकत्रच वाढलो. हे प्रेम मला एकत्र कुटुंबात अनुभवाला मिळाले. माझ्या माहेरातील फॅमिली मेंबर्सची यादी दिली व ती पाहिली की हल्लीची पिढी निःसंशय आश्चर्यचकित झाल्याशिवाय रहाणार नाही.

१) ... चौघांच्या एकत्र कुटुंबातील बंधूपैकी माझे वडील सर्वात मोठे ... शंकर रामचंद्र देशपांडे, माझी आई पार्वतीबाई. आईला सहा मुले ... पाच मुली व एक मुलगा (राजाराम), असा परिवार. माझी थोरली बहिण **शांता शिंदगीकर**. शांत स्वभावी, लग्नात १३ वर्षाची होती. तीला तीन मुले व एक मुलगी. दुसरी मी, **कुसुम दण्डवते**. मला दोन मुल, दोन मुली. तिसरी बहिण **तारा सोनटक्के** ... तिला एक मुलगी, एक मुलगा चौथी **विमल पिंगळे**. पाचवी बहिण **कमला सहस्रबुद्धे** ... तिला दोन मुली, भाऊ राजाराम (वडीलांचे पणजोबांचे नाव) ... अशी आमच्या आईची २१ नातवंडे आहेत.

२) ... थोरले काका **मार्तंड त्यांचे नाव, पत्नी – लक्ष्मीबाई**. तिला ४ मुली ३ मुलगे असा काकूचा परिवार. मोठी मुलगी प्रभावती सोलापूरकर, दुसरी मालती देव – (चिंचवडचे), कमल पानसे (सरदार पानसे घराण्यातील), शरयू किराणे. तीन मुलगे – थोरला रंगनाथ, मधला अरुण व धाकटा – नारायण. काकूला एकूण २० नातवंडे आहेत.

३) ... मधले काका, **दत्तात्रय रामचंद्र देशपांडे, काकू आनंदी**. तिला ४ मुलगे व ४ मुली. मधुकर, रामचंद्र, वसंत व दिगंबर हे चार मुलगे. पुष्पा पारखी, रजनी थिटे, सरोज याकुंडी व कुंदा खळदकर अशा चार मुली ... अशी आनंदी काकूची २० नातवंडे आहेत.

४) ... धाकटे काका, **विनायक रामचंद्र देशपांडे, पत्नी सरस्वतीबाई,** मुली अंबू गंधे, मंगल कुलकर्णी, प्रमोद काळे, उषा इनामदार - या चार मुली. लक्ष्मण, कृष्णा ही दोन मुले ... या काकूंनासुद्धा २० नातवंडे.

मौजे नांदोशी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे आमच्या मालकीचे वडजाई (वज्रादेवी) देवीचे देऊळ आहे. तेथे दसरा व माघी पौर्णिमेस वर्षातून दोन वेळी पालखी निघते. हा मान आठशे वर्षापासून आमच्या घराण्याचा असून आमचे घरातून पालखीची मिरवणूक निघते व आमचे घरातच ती ठेवली जाते. पालखीला लग्नकार्याप्रमाणे घरातील मंडळी जमा होतात. पाटीलकीचा मान असल्यामुळे देवीची पालखी, देवीच्या उत्सवाची सर्व तयारी याची धामधूम असायची. पुण्यातून आमची बैलगाडी पाठवून सामानसुमान यायचे. माझे वडील मी सहावीत असताना गेले. पण काकांनी आम्हाला कधी जाणवू दिले नाही. बैलगाडीत बसून आम्ही नांदोशीला जात असूं. माझे वडिलांना जनावरांची फार हौस होती. तीस वर्षे दुग्ध व्यवसाय जोरांत होता. गिऱ्हाइके पुण्यातील असत. जाता येता व कार्याच्या प्रसंगी बैलगाडीने प्रवास होत असे. बैलपोळ्याच्या दिवशी पाटलाच्या घरचे १२ ते १५ रंगविलेले बाशिंगाने नटविलेले बैल गावच्या चावडीवर **प्रथम मानांकन** घेत असत. वडिल / काका बंदुकांच्या फैरी काढत असत. रुबाबदार बैल हे कुटुंबाचे भूषण होते. त्यावेळी तिन्ही बाजूस डोंगर, दाट झाडी असल्याने वाघ, डुकरे, ससे, मोर, हरणे, विषारी साप हे दिवसा ढवळ्या शेतामधून फिरत असत. वाघ तर वारंवार गावातील वस्तीत येऊन जनावरे मारीत असत. एकदा तर आम्ही सुट्टीला नांदोशीस असता फौजदार नावाच्या बैलाने धावून आलेल्या वाघाला जायबंदी करून मारुन टाकलेले आम्ही प्रत्यक्ष पाहिले. आमच्या घराच्या समोरचे बाजूस सिंहगड उर्फ कोंढाणा असल्याने रानटी जनावरे शेतात / गावात नेहमी येत.

... माझी आई, पार्वतीबाई एका सुसंस्कृत घराण्यातील (डॉ. जेजुरीकर) होती.तिचे हुजुरपागेत इ. ४ थी (इ.स. १९०४) शिक्षण झाले होते. इंग्लीश बोलायला येत होते. तिचे वडिल व तिचे काका हे सर्व डॉक्टर होते. व एक पुण्याचे महापौर झालेले होते व कॉसमॉस को ऑपरेटिव्ह अर्बन बँकेचे संस्थापक होते. अशा या घराण्यातील आमची आई अशा या घराण्यातील आमची आई एका शेतकरी कुटुंबात (चौघा भावांच्या) एका कुटुंबात आली व नांदोशीस राहिली. त्या काळच्या रिवाजाप्रमाणे तिला पहाटेपासून कामला लागावे लागत होते. नांदोशीला गिरणी नव्हती. घरी १३ / १४ दळण्याची लहान मोठी जाती होती. त्यावर दळणकाम चाले. शेणगोठा पण करावा लागे. त्यावेळेस गावाला स्वतंत्र पाण्याची

व्यवस्था नव्हती. डोक्यावरून ३ / ४ हांडे आमच्या मळ्यातील / इनामांतील विहिरीतून दररोज पाणी आणावे लागे. घरासमोर आड होता. तेथून इतर कामासाठी पाणी रहाटाने काढावे लागे. हे दृष्य आतां फक्त सिनेमातच कधीतरी दिसू शकते. पण मन मारून माझी आई हे सर्व करीत असे. त्यावेळी माझे तिघे काका, दोन आत्या व आजी असायची. तरीसुद्धा त्या सर्वांचे करताना कुठलेच स्वातंत्र्य नसायचे. घरात जुन्या पोथ्या असायच्या त्यांचे वाचन वेळ मिळेल त्यावेळी करीत होती. त्यात शेतात पण जायला लागायचे. घरचे धान्य (गहू, भात, हरभरा, डाळी इ.) डाळी घरीच सडायच्या तांदूळ सडण्यासाठी उभ्या आणि बैठ्या उखळी असायच्या १५ / २० मुसळे असायची. त्यांनी तांदूळ सडले जायचे.

घरी रोज एक किलोचा तांदूळ पाच किलोच्या भाकरी करायला लागायच्या त्यात भाजीसुद्धा स्वयंपाक असायचा. त्यावेळी रस्ता व वाहने यांची सोय नव्हती. बैलगाडीने किंवा चालत् पुण्याला यायचे. कारण बस ही एकच असून, ती सुद्धा नियमित नसायची. पावसाळ्यात चिखल, दगड गोटे तुडवतच प्रवास असायचा. वडिल काका व आई पुष्कळदा घोड्यावरूनच पुण्यात यायची मला आता आश्चर्य वाटते की एका स्त्रीत अशी अनेक रूपे पहायला मिळाली. कधी आई म्हशीची धार करताना आठवते, तर कधी शेणाच्या गवऱ्या थापताना आठवते, कधी डोक्यावरून हंडा व कमरेला कळशी असणारी आठवते, धुणे धुण्यासाठी गांवाच्या ओढ्यावर जाणारी, स्वयपाक घरात भाकरीच्या थाप्या थापणारी, कधी गडी माणसांना प्रेमाने जेवण वाढणारी, वासरांना / कालवडींना पाणी पाजणारी तर कधीशेतात मिरच्या तोडायला जाणारी आमची आई अशी विविध स्वरूपातील एक कर्तृत्ववान प्रेमळ अशी आमची आई पण माझे वडील गेल्यावर एक मूक अभिनय करणारी व स्वतःला मन नसणारी अशी आमची आई पार खचून गेली. माहेरचे म्हणजे माझे आजोबा आईला पढवायचे तूं स्वतःचा निर्णय घे. पण आई कधी कुणाला न दुखवता राहिली प्रेमाने व कष्टाने घरातील सर्वांना जिंकले.

आमचे काकापण आईला कधी दुखवायचे नाहीत. अवघ्या ४० / ५० माणसांच्या कुटुंबाची ती आईच राहिली. माझी चुलत भावंड आमच्या आईला आईच म्हणत व त्यांच्या आईला काकू म्हणत माहेरी (डॉ. जेजुरीकांकडे) आईला शाळेत पोचवण्यासाठी बरोबर शिपाई असायचा डबा दप्तर घ्यायला पण सासरी ती शेतकरी कुटुंबातील कुटुंब प्रमुख होती. वडिलांच्या पश्चात सर्व मुलींचे लग्न काकांनीच केली.आईचे माहेर एक ध्येयवादी कुटूंब होते. सावरकरवादी, हिंदुत्वनिष्ठ तिच्या माहेरी सावरकर, भोपटकर यायचे.

आमची आत्या.......... लग्न होऊन सासरी पंढरपूरात गेली त्यावेळी प्लेगच्या साथीत तिचा नवरा गेला. माहेरी आली ती जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत माहेरी येताना बिंदी पट्ट्यासह दागिने घेऊन आली. शिक्षणाची आवड असून पुरी करता आली नाही शिक्षण चौथीपर्यंत झाले. आमच्या थोरल्या काकांनी तिने सासवडला सायकल दुकान काढून तिचे दागिने खर्च केले. धाकट्या दोन काकांनी लक्ष्मीरोडवर होलसेल सायकल विक्रीचे दुकान काढले पुण्यातले पहिल्या पांच दुकानापैकी होते. परदेशी माल यायचा तो पुण्यातील व पुण्याबाहेरील किरकोळ दुकानदारांकडे विकला जायचा. त्यामुळे दुकानाची भरभराट झाली. त्यांतच युद्ध सुरू झाले व पैसा भरपूर यायचा. नंतर काकांनी ३५९ शनिवार पेठ येथे जुने घर रु १६०००/- घेतले. व थोरल्या काकांनी मंडईजवळ नवीन सायकल दुकान स्वतःच्या खर्चाने काढून दिले. त्यामुळे आत्याला घरात मान व दरारा मिळत होता. सर्व काकू सासूबाईप्रमाणे त्यांच्या आज्ञेत वागत. शनिवार पेठेतील घरात २५ भाडेकरू होते. त्याचे भाडे गोळा करण्याचे काम माझ्याकडे असे. दुधाच्या रतिबाची बिले, शेतातील गहू, तांदूळ, भाजीपाला याचे हिशेब बधावे लागत होते. त्यामुळे मलाही घरात प्रतिष्ठा होती. सर्व जावयांवर तिचा लोभ असायचा. माहेरी गेलो की जेवणामध्ये भजी ही केली जायची. आत्या सर्व काका जावयांची खूप बडदास्त ठेवायचे. शेतावर गडी कांही कामानिमित्त शेऊ शकला नाही तर ती स्वत: शेतावर कामे राखणीसह करायची. अशा तऱ्हेने स्वतःचे जीवन समर्पण करणारी आमची आत्या .... तिची वारंवार आठवण न होऊन कसे चालेल ?

मार्तंड रामचंद्र देशपांडे - माझे थोरले काका सोशिक व कष्टाळू, काकू लक्ष्मीबाई तिचे माहेर जेजूरीचे काकांनी आम्हाला पोहायला शिकविले होते. मी व त्यांची मुलगी प्रभावती नांदोशीकर (महारकी) विहीरीत पोहायला शिकलो. अनेक वर्षे सायकल धंदा असल्याने जेव्हा जेव्हा सायकलीच्या पेट्या दुकानात येत तेव्हा तेव्हा आम्ही सर्व भावंडे सायकली दिवस रात्र करून जोडत असू शिवाय सुट्टीमध्ये आम्ही सर्व बहिणी व भाऊ नांदोशीकस शेतामध्ये भाजीपाला लावायला जायचो. बैलगाडीने रोज माल पुण्यात आल्यावर मंडईमध्ये पोहोचता करून लिलाव झाल्यानंतर त्याचे पैसे घेऊन यायचे अशी कामे होत असत. मोठी आंबराई व मोसंबी/पेरूच्या बागा असल्यामुळे एकदाच तोड झाली की त्या पैशावर एक एक लग्न किंवा मुंज पार पडावयाची. मुंबईला सुद्धा आंब्याचे हारे व करंड्या पाठविल्या जायच्या. त्यामुळे शेतकरी कुटुंब, व्यापारी धंदा - त्या वातावरणाचह आम्हां सर्वांना आपेआप सवय लागली.

१९४८ साली गांधी खून खटल्यात आमचे घर जळाले. धायरीतील माणसांचा त्यांत समावेश होता. कमिशनवर बर्वे असताना त्यांची चौकशी व शिक्षापण झाली. परंतु माझ्या काकांना भर दिवसा कुऱ्हाडीने वार लावून मस्तकावरचा नऊ इंचाचा भाग चिरला गेला होता. सहा महिने ते शनिवार पेठेतील डॉ. धारप यांच्या दावाखान्यात होते. चांगले पावनेतीन महिने आमचे घर जळत होते व त्यांत गांवच्या धान्याची पोती जळून गेली. सर्व चीज वस्तू जळाल्या भांड्याकुंड्यांच्या व शेती औजारांच्या तांबा / पितळ लोखंडाचा रस हाऊ न गेला. आर्म्स व ॲम्यूनेशन जळतेसमयी वाड्याच्या मागील विहिरीत टाकल्यामुळे वाचले. प्रतिकार करताना गावातील मंडळींनासुद्धा त्रास झाला.

घोड्याच्या पागेमागच्या बखळीत पुन्हा घर बांधले तळमजला १८ खण व पहिला मजला ९ खण अशी २७ खण जागा बांधून जिद्दीने सर्व व्यवहार सुरूझाले. काका काकू तिथेच राहिले. मुलींची लग्ने कार्ये होत राहिली. कधी सुखाचे व विश्रांतीचे आयुष्य उपभोगावयास मिळाले नाही. आम्ही मुली सुट्टी संपतेक्षणी त्यांना वाईट वाटायचे. त्यादिवशी ते खडकवासल्याहून किराणा माल मागवित व पुरणपोळीचा बेत केल्याशिवाय जाऊ देत नसत. सख्खी - चुलत भावंडांचा विचार त्यांच्या मनाला कधी शिवलाच नाही. निघते वेळी त्यांच्या डोळ्यात अश्रू जमा होत. आम्हालाही गलबलल्यासारखे व्हायचे. पुढील भेटींच्या वेळी "अश्रुंची झाली फुले" होऊन वातावरण परत सुरळीत व्हायचे.

दत्तात्रय रामचंद्र देशपांडे - मधले काका त्यांना "आप्पा" नावाने सर्व संबोधीत व्यायाम व कुस्त्या खेळून शरीर तयार झालेले अनेक बक्षिसे मिळवीली. रेखीव चित्रे काढण्यात पटाईत शांत व भोळ्या स्वभावाचे, व्यवहार कुशल, वधु-वर सूचक मंडळासारखे लग्ने ठरविण्यात पटाईत.

सायकल दुकानात गिऱ्हाईक आल्यावर त्यांची इत्थंभूत माहिती गोळा करून नोंद ठेवणार. आमच्या आत्याने व काकांनी आम्हा बहीण भावंडाना अशी शिस्त लावली की दिवाळी दसऱ्यास भावांनी चुलत बहिणीकडे भाऊबीजेसाठी जेवायला जायचे व बहिणींनी चुलत भावांना बोलावयचे असा प्रघात होता. त्यामुळे शेवटपर्यंत बहिण - भावंडांत आपपरभाव कधीच निर्माण झाला नाही. चांगल्या अगर वाईट प्रसंगी हे सख्खे व हे चुलत असा भेद कधीही नव्हता. एकमेकांकडे वारंवार जाणेयेणे असायचे. **आनंदीबाई** - ही माझी काकू. अतिशय भोळी भाबडी. पण प्रेमळ व आप्पांची दुसरी बायको. मधुकर पहिल्या बायकोचा. पण हा फरक कोणासही जाणवला नाही. तिचे माहेर हिवऱ्याचे. सरदार घराण्यातील

बोकील, त्यांचे सुद्धा थोरले कुटुंब होते. घरी गाई म्हशी असल्यामुळे बारा महिने खरवस व्हायचा. तो सर्व लग्न झालेल्या मुलींकडे पोहोचता व्हायचा. सासवडला त्यांचा मोठा वाडा आहे.

आप्पा व आण्णा (धाकटे काका) हे सायकल डीलर असोसिएशनचे पदाधिकारी होते. सर्व परदेशी मोटार सायकलींचे पण विक्री व्हायची. परदेशी सायकली, रॅले, रज्, रॉबिनहूड, स्टेगर, बीएसए, हंबर. विक्रीपण मोठ्या प्रमाणावर व्हायची.

विनायक रामचंद्र देशपांडे ... धाकटे काका. त्यांना सर्वजण ''अण्णा'' म्हणायचे. काकू सरस्वतीबाई. देशपांडे घराण्यातील एक आधारस्तंभ. दुकान भरभराटीला आणण्यात मुख्य वाटा. कुटुंबाचा डोलारा सांभाळण्याचे काम त्यांचेच. सायकल डिलर्स असोसिएशनचे मुख्य. आमचे दुकान पुण्यातील पहिल्या नंबरचे. १९४३ साली शनवार पेठेत घर बांधल्यानंतर

वाड्यात मागील बाजूस दोन मजली चाळ बांधली काकू-सरस्वतीबाई दिसायला चांगली दागदागिने घालून लग्नाला कुणाकडे निघाली की नकळत बायकांनासुद्धा मागे वळून पहावेसे वाटे तिला ४ मुलगे ४ मुली असूनसुद्धा तिचा फॉर्म काही बदलला नाही घरात नकळत तिचा वरचष्मा असे पण आत्याच्या धाकात असे आणा मात्र सर्वांना सांभाळून घेऊन वागत असत. आमच्या घरात आले - गेलेल्यांचे अतिशय स्वागत व्हायचे नातेपरिवार फारच मोठा. प्रत्येक लग्न कार्यात एक हजाराहून जास्त नातेवाईक यायचे डायबटिसने आजारी पडले नांदोशी येथे प्रत्येक कुटुंबात अडचणीतील लग्न कार्ये देशपांडे कुटुंबाने पार पाडलेली आहेत. माझ्या भावाची मुंज व लग्न कार्ये देशपांडे कुटुंबाने पारपाडलेली आहेत. माझ्या भावाची मुंज व लग्नकार्य पुण्यातच झाले. त्यात खूपच मोठी वरात काढली होती पुढे ७०-८० जणांचे ढोल लेझिम व त्यामागे प्रभात ब्रासबँडची पथके रस्त्यावर सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. गावकरी मंडळींना दोन्ही दिवस दोन वेळा मेजवानी मिळाली. ३५९ शनिवारपेठेतील जुने बांधकाम पाडून सिमेंट कॉंक्रीटची सहा मजली प्रचंड वास्तू मिलिंदच्या पुढाकाराने देशपांडे वाड्याला नवलाई मिळाली. मिलिंदचे सर्व चुलत बंधू त्या नव्या वास्तूत प्रवेश करते झाले.

प्रसंगवशात वरीन परिस्थितीत बदल घडत गेले परंतु हे विचार येथेच संपविते.

- कुसुम भालचंद्र दंडवते.

संपादकीय

आजपर्यंत खेड शिवापूर देशपांडे करिना दोन खंडांत प्रसिद्ध झाला. ते कृष्णाजी वासुदेव पुरंदरे (इ. स. १९२६) यांनी छापून प्रसिद्ध केले आहेत. शिरवळ व शिवापूरचे देशपांडे ही वेगवेगळी घराणी आहेत. तसेच १२ मावळांमधील देशपांडे; व कर्यात मावळ येथील देशपांडे घराणी ही वेगवेगळी असून त्यांच्या वंशावळीही अलग अलग आहेत. यामध्ये नऱ्हेकर देशपांडे व मुदगल नांदोशीकर देशपांडे असे दोन भाग आहेत सिंहगड किल्ल्या सभोवतालचा परिसर शिवाजी महाराजांचे वेळेस खेडेबारे म्हणून गणला जात असे. खेडेबारे हा भाग छत्तीस गावं मिळून बनला आहे. त्यांतच मौजे नांदोशी तालुका हवेली; जिल्हा पुणे व खेड शिवापूर हा भाग आहे.

पुणे सिंहगड रस्त्यावर मौजे धायरीला लागून नांदोशीची शीव येते. पुण्यापासून बारा किलो मीटर अंतरावर नांदोशी असून ते सिंहगडाच्या पायथ्याशी येते. घरांतून सिंहगड किल्ला दिसतो. नांदोशी गाव छोटेखानी, वस्ती अंदाजे २५०० डोंगरांनी वेढलेले (तीन बाजूंनी); दाट झाडी व निसर्ग सुंदर शांत वातावरणाने समृद्ध त्यांत ऐतिहासिक महत्त्व लाभलेले व शिवरायांच्या वास्तव्याने पावन झालेले गाव असून त्याचा इतिहास लिहिण्याचे काम हाती घेतले. प्रकाशित व अप्रकाशित अशा सर्व अस्सल कागदपत्रांचा समावेश करण्यांत आला आहे. तसेच इतरही माहिती नमूद करणे आवश्यक आहे असे वाटते.

शिरवळकर देशपांडे करिना खेड १ व २ श्री पुरंदरे यांनी व अनेक समकालीन लेखकांनी देशपांडे घराण्याबद्दल त्रोटक माहिती, सनदापत्रे, बखरीं मधून, प्रकाशित साधनांमधून नमूद करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये शिरवळकर देशपांडे; खेडेबारेकर मुदगल् नऱ्हेकर देशपांडे व कसबे खेड येथील शिवापूर देशपांडे यांच्या संदर्भात संपूर्ण इतिहास अंतर्भूत केलेला कोठेही पाहिला नाही. तसाच तो दुसऱ्या कोणी

लेखकाने तो अंतिम टप्प्यावर नेलेला ही पहाण्यांत नाही. मात्र त्या त्या घराण्यांत कोणा कोणाला इनाम, वतने, जहागिरी, हवालदारी दिली; कोणी कोणाकडे नोकरी (शिवाजी/ आदिलशाही/ कुतुबशाही/ मोगल) केली; स्वराज्यासाठी कोण उपयोगी पडले, लढायांत कोणी कोणी भाग घेतला त्याचा लहान मोठ्या प्रमाणांत आढावा घेतलेला दिसून आला. खेडेबारेतील कसबे खेड व नांदोशी येथील घराण्याची हकिकत किंवा करिना पूर्णपणे घेतलेला, एकत्रित केलेला इतिहास आढळला नाही. देशपांडे वतन कोठेही जरी असले तरी त्यांचे इतिहासाविषयी अनेक बाबी नजरेसमोर येतात. म्हणजे त्या व्यक्तिने "वतनदार" सरंजामदार म्हणून केलेले काम व स्वराज्यासाठी गड, कोट राज्ये जिंकण्याचे काम त्यांत छत्रपति शिवरायांनी स्वराज्य स्थापनेच्या कामी ज्या ज्या व्यक्तिंनी कार्य केले त्यांचे ते कार्य काही विशिष्ट घराणी करीत असत व अशा घराण्याची माहिती ऐतिहासिक लेख, पुस्तके, बखरी यांतून त्रोटकपणे जशी उपलब्ध झाली त्यांतूनच मुदगल नांदोशीकर देशपांडे किंवा न्हेकर देशपांडे या घराण्याबद्दल आहे. ही दोन्ही घराणी एकच असून त्यांचे कार्यक्षेत्र तर्फखेडेबारे अंतर्गत मौजे नांदोशी, तालुका हवेली, (पूर्वीचे कर्यात् मावळ) जिल्हा पुणे व तर्फखेडेबारे अंतर्गत **कसबे खेड व खेड शिवापूर** येथील देशपांडे हे वतनदार, सरदार, हवालदार इ.

नांदोशी येथील देशपांडे घराणे हे मुसलमान अंमलाचा पूर्वीपासून ते शिवकालांता, पेशवे व ब्रिटीश अंमदानी अखेर असे अस्तित्वांत होते. त्यांचे कागदपत्र लेखकास १९९५ ते २००४ या अवधित **"भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे"** व **"पेशवे दप्तर" यांजकडून सही शिक्यानिशी उपलब्ध झाले.** लेखकाचे वडील, चुलते पोलीस व मुलकी पाटील असल्यामुळे त्यांना फक्त वतनाबद्दलचीच माहिती होती. आमच्या घराण्यांत मूळ पुरूषापासून शिवशाहीच्या अखेरीपर्यत मुदगल देशपांडे न्हेकर नांदोशीकर घराण्यांतील व्यक्ति व त्यांचे आप्त फारच शूर व लढवय्ये होते व त्यांनी स्वराज्य स्थापनेपासून शिवशाहीच्या अखेरीपर्यंन्त व त्या नंतरही शेकडो लढायांत भाग घेतला कित्येक जणांस वीरगतीही प्राप्त झाली.

इतकेच काय, **देशपांडे घराण्यांतील व्यक्तिंची आप्तेष्ट मंडळीही श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत मोठमोठ्या हुंद्यावर होती. अष्टप्रधान मंडलांतील तिघे जण मुख्य प्रधान श्री (१) मोरेश्वर त्र्यंबक पिंगळे उर्फ**

पेशवे (२) रामचंद्र पंत (सुमंत) (३) नारो नीलकंठ व निलकंठ मुजुमदार अमात्य (४) रघुनाथ नारायण कोरडे, (५) प्रभाकर भट्ट (६) नारायण भट्ट (७) श्रीदेव चिंचवडकर, (८) बाळंभट उपाध्ये व (९) कसबे खेडे बारे येथील जोशी ठकार अशी मंडळी होती. मोरोपंत पेशवे (मुख्य प्रधान) यांनी जवळ जवळ १४० पेक्षा अधिक लढायांत भाग ही सर्व लष्करी इतिहासाच्या दृष्टीने विशेषतः प्रतापगडाचे युद्ध, अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानावर हल्ला, व सुरतेचीमोहीम ही गनिमी काव्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. शिवाय मराठेशाहीच्या सीमा पेशवाई अखेरपर्यंत २५० पटीने वाढल्या आहेत.

अप्रकाशित इनाम वतने, देशपांडे यांची वंशपरांगत पाटीलकी व सेनानायकत्त्व व लढायांत घेतलेला भाग यासंबंधांत संपादक राजाराम देशपांडे यांनी बारामती, औरंगाबाद, मुंबई, सिल्लोड, कन्नड, श्रीगोंदा व बृहन्ममहाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद- रत्नागिरी या ठिकाणी शोध निबंध सादर केले असून त्यांची त्यांच्या घराण्याविषयी हजारोंचे वर अप्रकाशित ऐतिहासिक कागदपत्रे प्रथमच वाचकांसमोर वाचलेली आहेत. विशेषतः इ.स. १६३० ते १६८० पर्यन्तची कागदपत्रे प्रकाशांत आणली असून **छत्रपति शिवाजी महाराज, राजाराम व शाहू महाराज, पेशवे** व मराठेशाहीशी संबंधित असलेली दिल्लीचे मुघल बादशहाचे नववे अंमलदार बादशहा आलम (दुसरा राज्यकाल १७५९ ते १८०६ यांनी घराण्यास इनाम वतने, सरदारकी, सेनानायकत्त्व; जहागिरी; हवालदार-सुभेदारी दिली व त्यामध्ये चौदा पिढ्यांच्या समावेश आहे. या घराण्याचे कार्यक्षेत्र नांदोशी व कसबे खेडेबार (खेड शिवापूर) येथे आजपर्यंत अस्तित्त्वांत असून आजतागायत नांदोशी येथे शेती व्यवसाय स्वतः करीत आहेत. आताही प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

देशपांडे घराण्यातील व्यक्ति व त्यांचे जवळचे शेकडो आप्त शिवाजी महाराजांच्या वेळी शस्त्र व शास्त्र व शेती व्यवसाय निष्ठेने करीत होते व अजूनही करीत असून शिव स्वराज्याच्या मांडणी पासून अखेरपर्यंत स्वराज्याची सेवा करीत आले आहेत. छत्रपति शिवरायांच्या समवेत जे जे युद्ध प्रसंग घडलेले आहेत त्या त्या प्रत्येक बाबतीत देशपांडे व त्यांच्या आप्तांनी मोलाची कामगिरी केल्याचे इतिहास सांगतो. उदा. सिंहगड ताब्यांत घेणे, (बापूजी मुदगल) शाईस्तेखानावर हल्ला, (चिमणाजी

व बाळाजी बापूजी) प्रतापगडचे युद्ध-अफजलखानाचा वध (नारायण नांदोशीकर सेनापती) आग्राभेटीच्या वेळी घडलेले चित्तथरारक प्रसंग (रघुनाथ कोरडे व त्र्यंबपंत डबीर), सुरतेवरील पहिली लढाई (नारोबापूजी देशपांडे), वणी-दिंडोरीची व पुरंदरची लढाई (केसोनारायण देशपांडे व नारायण देशपांडे) या प्रत्येक प्रसंगी मुदगल्-नऱ्हेकर-नांदुसकर-देशपांडे व त्यांचे आप्त यांचा प्रमुख सहभाग होता. ज्यांत तीन नांदोशीकर-देशपांडे यांना लढाईमध्ये वीरगती प्राप्त झाली.

कृष्णाजी अनंत सभासद, ज्याने बखरीत छ. शिवाजी महाराजांचे "प्रीतिपात्र" म्हणून उल्लेख केला तेच हे देशपांडे कुटूंब जे केवळ पुण्यापासून १२ किमीवर अद्यापही कार्यरत आहेत.


शिवचरित्राचे पैलू या पुस्तकांत द. वा. पोतदार म्हणतात की जहागिरीच्या आसपासची ठिकाणे व्यापण्यात येत होती. सैन्य नाममात्रपणे सुलतानाच्या सत्तेखाली हे काम करीत होते. **बापूजी नऱ्हेकर, चिमणाजी/नऱ्हेकर नांदोशीकर, देशपांडे, मुदगल,** यांच्यामार्फत हे भाग शिवाजीने जिंकले होते. जदुनाथ सरकार त्यांच्या पुस्तकांत **बाळाजी/चिमणाजी बापूजी मुदगल् (देशपांडे)** हे छत्रपति शिवाजी राजांचे **"बॉडी गार्ड"** होते व ते छत्रपति शिवाजी राजांचे **उजवे हात समजले जात होते.**


इनाम वतनांचे व इतर अप्रकाशित साहित्य पेशवे दप्तरांतून (पुणे पुरालेखागार) सरकारी सही शिक्क्यांनिशी असून त्यामध्ये संस्कृत, पर्शियन, मोडी, इंग्लिश व मराठी इतिहास प्रसिद्ध साधनांचा समावेश आहे. त्याचा उपयोग विद्या वाचस्पतींना नव्याने करण्यास विद्यापीठाने मुभा दिली आहे.

इ. स. १६६५ च्या पुरंदरच्या तहांत छत्रपति शिवाजीराजांना जे २३ किल्ले मिर्झा जयसिंगामार्फत औरंगजेबास देण्यात आलेले होते. शिवाजी राजे आग्र्यास गेले त्यांचे पश्चात मोरोपंत पेशव्यांना (देशपांडे यांचे आप्त) सर्वच्या सर्व किल्ले लगोलग ताब्यात घेऊन स्वराज्याच्या सीमा पूर्ववत ठेवण्यांत यश मिळविले व सर्व मोगल अधिकाऱ्यांस काढून टाकले ही काही साधी गोष्ट नव्हे. कारण ज्या समाजाला व सुराज्याचा घास मुघल राजवटीत नष्ट होती किंवा कसे ही गंभीर बाबच होती.

मौजे-नांदोशी (कर्यात मावळ, खेडेबारे)
तालुका - हवेली जिल्हा - पुणे
येथील....
देशपांडे-पाटील-इनामदार यांची घरे व जमीनी
दाखविणारा कारणापुरता उतारा....

स्केल नाही
पुणे ते नांदोशी
अंतर =१२ किमी





पुणे शहराचा इतिहास व भौगोलिक परिस्थिती इ. स. १६०० ते १८२०

गेली चारशे वर्षे (इ. स. १६३६ ते १७७५ पर्यंत) पाटील पद व वतनांची वहिवाट देशपांडे घराण्याने (चौतीस व्यक्तिंनी) अव्याहतपणे सांभाळली आहे. हे उदाहरण इतिहासांत अपवादात्मक स्वरुपात असावे. तसेच स्वराज्यांत चार वेळी घर दग्ध होऊनही निष्ठेने ते संभाळणारे एकमेव देशपांडे घराणे. छत्रपति शिवरायां अखरेच्या क्षणी सर्व राज्याची जबाबदारी देशपांडेच्या आप्तांवर सोपविली होती इतका विश्वास कुटुंबाने जपला होता.

खेडेबारे मधील कसबे खेडे याठिकाणी छ. शिवाजी महाराज व जिजाऊ देशपांडे कुटुंबाच्या वाड्यांत रहात होते. त्यांचा ठोबळमानाने वसतिक्रम असा होता.

(अ) १-२-१६३७ ते १७-२-१६४१ - १५२० दिवस

... बापूजी मुदगल् न्हेकर यांच्या वाड्यात

(ब)१-३-१६४२ ते ३१-३ १६४७ ... १८५७ दिवस

(दादोजींच्या मृत्युपर्यंत)

... पुणे ते खेडेबारे, आलटून पालटून

(क) १-४-१६४७ ते ३१-५-१६४९ ... ७९२ दिवस

(शहाजींच्या सुटकेपर्यंत)

... खेडेबारे, कोंडाणा, पुणे

कसबे खेड येथे बापूजी मुदगल् - न्हेकर व शिवाजी महाराज यांची घरे एकमेकां शेजारी होती शिवाजी महाराजांचा वाडा बांधून पूर्ण होईपर्यंत शिवाजी महाराज व जिजाऊ हे उभयतां बापूजी मुदगल् यांच्या वाड्यात वर निर्देश केल्याप्रमाणे वसतीस होते.

शिवाजीचा युद्धखोर (?) असून तो सतत युद्धात गुंतलेला असा समज सर्वत्र प्रचलित असला तरी त्याच्या आयुष्याचा १/७ भाग युद्धांत गेला व बाकीचा स्वाऱ्यांमध्ये मिळविलेले यश त्याच्या सरदारांनी मिळविल्याचे ठरते. स्वतः युद्धांत गेला नसतांही तसे शिवाजी शत्रूस भासवी. त्यांतच त्याच्या बुद्धीची चमक व कार्यकुशलता दिसून येते.

शिवाजीचा कालपट पाहिल्यास त्याच्या आयुष्याचे अधिक दिवस देशावर गेले. अर्थात कालपटांत पुणे, सुपे, बारा मावळे, वगैरे भाग हल्ली जरी देशांत मोडतो असे दर्शवले असले तरी त्याकाळी तो भाग कोकणांत मोडत असे.

मुदगल् - नऱ्हेकर - नांदोशीकर देशपांडे व आप्त संबंधातील व्यक्ति : देशपांडे घराण्यातील कागदपत्रांचा शोध व त्यांचे पराक्रमाबद्दल इतिहास लिहितांना त्यांचे आप्तांचीही माहिती या पुस्तकांत देणे वावगे होणार नाही. कारण त्यांनीही स्वराज्यासाठी अमोल निष्ठावानपूर्वक सहकार्य छत्रपतींना अखेरपर्यंत दिले आहे. म्हणनूच छत्रपतींना सर्व राज्य त्यांचे ताब्यांत सुरक्षित राहील म्हणून त्यांना राज्यांचे अधिकासुद्धा त्याप्रमाणे सोपविले होते.

नांदोशीकर व त्यांचे नातेसंबंध - श्यामराव पेशवे (मुख्यप्रधान) त्यांच्या मुलास नारो बापूजी यांची लेक दिली.

मोरोपंत पेशवे व नारोबापूजी - मुदगल् - नांदोशीकर व्याही व्याही.

२५ बहिरे मोरेश्वर पाा

२८ लोखंडदरा शेलके

४५ वडसेत रामचंद्र चिमणाजी पाा

२० सखाराम लक्ष्मण पा

४५

४५ निंब सेत राणोजी सणस

४५ म्हसाळदरा

३० पडीत

१५ कुरणाचे बदाफी

४५

३६ भातशेत

२१ सखाराम पंत

५॥. खंडो मोरेश्वर मो

१ रामचंद्र चिमणाजी व गणेश सदासिवपां

१॥. सखाराम लक्ष्मण व राजाराम नारायंण पां

१. त्रिंबकराम पा.

३०॥.

५॥. मव्हारी हेमगुडा

१० अवलदरा पडीत कुरणाचे बदालीमुळे

४५ सेतमाची २

३० साजू झाडापा

१५ सिदोजी माचुगा

४५

१४॥- गवामाच कुरणाचे बदालीमुळे पडीत

३६

२ त्रिबकराम

२।४ मल्हारी हेमगुडा पायेटे

.॥६ संताजी विश्वासराव

.॥० विठोजी कालोखा

२।. कृष्णाजी घुले

.॥. शेलके मंडळी

.॥. गणपती देव माहादेवाजवळ

.॥६ सणस मंडळी

६०

१४ चोर टिके भटाकडे

० चोर टिके हरीजाधव

१० भटकडे
२ हरिजाधव
२ बहिरजी घुले

१४

६६५
२० गणेश सदासिव बेक टिके
४० जांभूळदरा
३० सखाराम पां
१० मव्हारी हेमगुडा
४०
३० सालपाई जेगनाथ कृष्ण
जोग
२५ जोगदरा संताजी विश्वासराव
६० वडदरा
१८ राणोजी सणस
१५ सिरसोजी खैरा

१५ बापू तेफकरव मगर

१० सोमा पारगी व
५ दारकोजी गवळी

६०

४० यैन सेत
२२ सणस मंडळी
१८ संताजी विश्वासराव

८ पळसपाटी बहिरजी घुला
चोर टिके पौ
७ वडपाटी रघोजी वसिबला

१४ भोकर सेत
.।।. श्री मारुती
४ हरजी जाधव
६८।।।.खंडो मोरेश्वर
६९ गोविंद मोरेश्वर
६९ बहिरो मोरेश्वर
.।।२।।।. गणेश
सदासिव पाटील
.।।२।।. रामचंद्र
चिमणाजी पाटील
१।४ सखाराम
लक्ष्मण पाटील
.।।।४ राजाराम
नारायण पाटील
५।।८ त्रिंबकराम
पाटील

१४

६१।।. कुरणाचे बदलीमुळे पडीत

४०

४६ विहीर सेत

२४ रामचंद्र चिमणाजी

२२ गणपतराव सदासिव

४६

६० वडजाई पाट्या ४

येकूण थल टिके ७० पौ

दवाकडे टके १० बाकी

१२ इनाम पाटील

२५ वसाहत पांढर

पायेटी व मके

.।।२।। खंडोमोरेश्वर

.।।३.।।. गोविंद मोरेश्वर

.।।३।।. बहिरो मोरेश्वर

२।।१० गणपतराव सदासिव

३।।८ रामचंद्र चिमणाजी

२।२ सखाराम लक्ष्मण १२०३.

२।२ राजाराम नारायण पाटील

१४ चिंचमांच

२।। धस टिके

८ पळसमाच

५ वाडेमाच

१६ ठाकूर माच

१६ आंबे टिके

६१।।.

१५ पाडेवार

२५ वोवळी

२ गुरव

८ सुतार

८ परीट

७ माहर हाडकी

२५

१२ ब्राह्मणमाचा गुरवाकडे

५६८

६६५ तेरीज

यादी खंडोमोरेश्वर मोकदम मौजे नांदोसी ता। कर्यात मावळ सु।। आर्वा मयातैन व अलफ मौजे मारी मोकासा रुपये १२८ येकसे अठ्ठावीस बहूत दिवस आमचे नावे चालत आला आहे साल तिगस्त राजश्री बाळोजी बावा याणी ता। का। मावळ येथील मोकासे जप्त केले त्यात आपलाही केला लोकाचे मोकासे मोकले जाले त्यास स्वामी कृपालू होऊन आमचा मोकासा आम्हाकडे चालवावयाविसी सनद राजश्री गोविंदराव सदासिव सुभेदार किले सिंहीगड यांस मोकासा पूर्वत चालत आला त्या आन्वये चालवावा म्हणून सनद

थळझाडा च्यकबंदी मौजे नांदोसी ता। कर्यात मावळ पा। पुणे सु।।
जमीन सिलक कदीम कास जिराईत

यैन	टके	ता। खते कास रोवली	टके १२०३
११५० खालीसा			टके
१६ पाडेवार		१२ मोकदम	
११६६		८ सुतार	
		८ परीट	
		७ तराळ	
		२ गुरव	
		३७	

येकूण चावरणा हा अमल आलमगीर पातशाहा मोजणी माहारुळ माहाबी शर्फाखान दिवाण दौलत काईर मुलुक उमदे उमरा उमर नाराज जयसिंग जमिन जुमका टके १२०३ येकूण चावर ११।।।८

दर चावरे बिघे १२० या। — बिघे १४१८ रोवली

यैनकास टके ११६६ — खते कास

दर चावरे टके १०१।६ — टके ३७ येकूण बिघे

येकूण चावर ११।। मो बिघे १३८०

११ मोकदम ११
८ सुतार ८
८ परीट ८
७ तराळ ७
२ गुरव २
३६

१३६३ खालीसा टके ११५०
चावर ११।१३
मो बिघे
१७ पाडेवार टिके १६

यासि धरणे भात खाचरे व काळणाची वावरे भिजत आहे ती पाणीश
आशाढमास ता। माघ धरणे ३ ता। जेव्हा

किती येकधरण वाडी वडजाईचे किता येकक्षण	किती येक धरण दिघेवाडी	
	कास टिके	एकूण बिघे
उंबरसेत		
र्दहमाल पाटी	६०	७१॥.
वडपाटी	७	८॥.
पाडस टिके	८	९॥.
भोकर बेत	१४	१६
बापूजी येपाटी	४५	५४
कन्हेर पाटी	४५	५४
जांबुलदरा	४०	४५
साकपाई	३०	३४॥.
ताम्हणदरा	३०	३४॥.
रिठे सेत	१४	१६॥.
वज्जाई मख्ता	६०	७१॥.
टके ७० यो		
चोर टिके	१४	१६॥.
सेत माची	४५	५३
यैन सेत	४०	४५
वावळदरा	१०	१२
बेलसेत	२०	२३॥.
जोगदरा	२५	३१
वडदरा	६०	७१॥.
मुरुडमाची	१४॥.	१६॥.
वड सेत	८०	९५॥.
लोखंड दरा	२८	३३४॥.
चिचंमाची	१४	१६॥.
वड सेत	४५	५३॥.

आंबे सेत	२२	
धस टिके	२॥	२७
पळस माची	८	३॥
म्हसकेदरा	४५	९॥.
कोंढूर माळ	१९	५३
निंब सेत	४५	२२
खेड माची	५	५३
ठाकूर माची	१६	६
भात सेत	३६	१८
अदंन टिके	१६	४१
पाडेवार	१६	१८
विहिर सत	४५	१८
मजार टिके	१४	५३
	११६६	१६
		१३८०

खते कास रोवळी

	कास टिके	एकूण बिघे
मोकदम	१२	१३
सुतार	८	८
परीट	८	८
तराळ	७	७
गुरव	२	२
	३७	३८

न्हेकर देशपांडे (नांदोशीकर) यांचे संदर्भात अैतिहासिक शकावल्या, (जेधे शकावली, शिवापूर शकावली, शिवापूरकर दप्तरांतील शकावली, पुणे-देशपांडे (होनप) दप्तरांतील शकावली, गोपाळ हरी देशमुख शकावली गदाधार प्रल्हाद शकावली, घोडे गांवकर वहीतील शकावली, सहा कलमी शकावली (शहाजी शकावली), चित्रे शकावली... वगैरेमधून घेतलेली टिपणे: –

(१) शिवचरित्र साहित्य, खंड १ ला, लेखक श्री कृ. वा. पुरंदरे पृष्ठ २५ ले. २६ व २७

बापूजी मुदगल हा पुणे प्रांताचा हवालदार होता. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण तर्फ खेडेबारेचा देशपांडे (नांदोशीकर) याने दादोजी कोंडदेवाच्या मृत्युनंतर कोंढाणा घ्यावयास शिवरायास मदत केली. शाईस्तेखानाच्या स्वारीत गाजलेले चिमणाजी बापूजी व दादाजी बापूजी हे बापूजींचे मुलगे होते.

(२) शिवचरित्र साहित्य, खंड ५ वाः पृष्ठ २६२; ले. श्री. कृ. वा. पुरंदरे (पे. द. ५ पोट)

"प्रति वरूष नवीन पत्राचा आक्षेप न का" रणे या पत्राची प्रत्ये लेहुन घेऊन मुखे "पत्र भोगवटीयास परतोन देणे म्हणू" न आज्ञा पत्र सादर जाले आहे व राजेश्री "पंत सचीव व र" पंताजी शिवदेव वर "शाम"जी हरी नामजाद सुभा प्रं "मावळवर" "आबाजी सोमवैंसी नामजाद व कारकून" कीले सीहीगड ची पत्रे खंडोजी बीन द "माजी धावडे सर पाटील याणी आणुन दाखविली ती सीरीं वटुन हे पत्र तुम्हास क" रून दील्हे असे देह ३६ छेतीस तरर्फ "त" पायेगुडे व "त" करंजवणे

१ मौजे डोणजे	१ मौजे सूस	१ मौजे सिवण
१ मौजे गोऱ्हे खुर्द	१ मौजे महालुंगे	१ मौजे आळंदे
१ खानापूर	१ मौजे चांदे	१ भुकुम
१ मालखेड	१ खामगांव	१ भुगांव
१ मांडवी बु"	१ मौजे वडदुरे	१ भरे
१ मांडवी बु"	१ हिंगणे खुर्द	१ नांदेड
१ आगळंबे	**१ मौजेनांदोशी**	१ गोदुबंरे
१ कुडिजे	१ कीर्कटवाडी	
१ मौजे कोरे	१ वडगांव खुर्द	
१ मोजे कोपरे	१ बावधन खुर्द	

(३) शिवचरित्र साहित्य खंड १ ला; ले. कृ. वा. पुरंदरे (शिरवळकर देशपांडे कागद)

ले. २८ (ठकार दप्तर - पृष्ठ ५१)

शके १५६९ अश्वीन वद्य १२ (इ. स. १६४७)

मोकदमानी मौजे पर्वता व "पुणे मालूम दानर सुहुरसन + समान अर्बेन अलफ विनायक भट ठकार, कुलकर्णी, मौजे मजकूर हुजूर (मालूम) केले जे आपले कुलकर्णी मजकूरचे म"रचे असोनु पुणाचे देशकुलकर्णी हरकती करूनु आपले नि" चा ब्राह्मण पांचकुडवी ठेविला आहे व मोकदम हि इस्कील करूनु पाठी राखताती आपले अकरा गांवे कुलकर्णी व जोतीस मिरासीची याचा महजर हि आहे आणि हाली हरकती करिताती दरीबाब सरंजाम होय मालूम जाले विनायक भट ठकार याचे कुलकर्णी मिरासाचे असोनु पुणाच्या देशकुलकर्णी याचा मुतालिक ठेवावयासि काय बजीत आहे दरीबाब ताकीद असे याचा मुतालिक हे होउनु जो ठेवितील त्याचे हाते गांवीच्या कुलकर्णपणाचे काम घेत जाणे. उजुर असिलिया देशकुलकर्णी यांचा मुतालिक जो ठेविला असेली त्यासि हुजुर घेऊनु येणे असेली कागद कुलकर्णी यापासी फिराउनु देणे छ २६ रमजानु. मोर्तब सुदु. रुजुसुरू (१) निवीस

(४) ले. २९ (ठकार दप्तर)

१५६९ आश्विन वद्य १२ (इ. स. १६४७)

(वाटोळा शिक्का)

अज दिवाण ठाणे प "पुणा ता हुदेदारानि व मोकादमानि व रयानि मौजे परवती प "म" बिदानद सु" समान अरबैन अलफ हुजुरून हातरोखा राजश्री तेथ रजा जे विनायक भट ठकार सो"कसबे मजकूर हुजुर घेऊनु मालुम केले जे आपली कुलकर्ण मिरासीची देहाये प "मजकूर पैकी ब" महजर सालाबारपिढी दरपिढी चालिले आहे बि त"

धाइरी, नांदोशी, किरकटवाडी, न्हे, हिंगणे, चादे

आंबेगांव बु", आंबेगांव खु", धनकवडी, पर्वती, मुडदौनी

सदरहू गांवीची कुलकर्ण व जोतीसपणे आपल्या मिरासीची आहे नियापैकी नवदेहासी आपला मुतालिक पांच कुडवी ठेउनु कुलकर्ण व जोसीपन चालवितो. बाकी मौजे न्हे व परवती येथील मुकादमी हरकती करून पुण्याच्या देशकुलकर्णे याचे मुतालिक ठेउनु कुलकर्ण चालवित होते. त्यावरी आपण हुजुर फीर्यादी घेत

होतो. म्हणौनु नऱ्हेचे मोकदमे आपले कुलकर्ण आपले दुमाले केले आणि मौजे परवतीचा मोकदम देशकुलकर्णी यासि मिलोनु त्याचा मुतालिक पाठी राखताती आपले कुलकर्ण आपले दुमाले करीत नाही. दरीबाब सरंजाम होथे मालूम झाले विनायेक भट ठकार याची अकरा गांवाचे कुलकर्ण व जोतीसपण मिरासी महजर हि असोनु परवतीचे मोकादमासी हरकती करावया कामे बजीत हाली मौजे मजकुरीचे मोकदमासी ताकीद करूनु याचा मुतालिक देउनु कुलकर्णपणाचे काम घेत जाणे जरूर हरकती करीत असतील तरी मोकदमासी व देशकुलकर्णी व मुतालिक ठेविला आहे त्यसी हुजुर पाठविजे उजुर न करणे असली हातरोखा फिराउनु दीजे छ २६ रमजान म्हणौनु रजा बरहुकुम अंमल करून तुम्ही तालीक घेऊन असली चिठी फिराउनु दीजे मोर्तब सुदु (मोर्तबाचा शिक्का)

तेरीज १९ माहे सौवालु

सौवाल

(५) ले. ३० (पुणे, ठकार दप्तर) शके १५६९ आश्विन वद्य १२ (इ. स. १६४७)

.... इजन म" सिद्दी अंबर हवालदार व कारकुनु प" पुणे राजश्री राजश्री शिवाजी राजे सुहुरसन समान अर्बेन अलफ विनायक भट ठकार सेकीन क" मजकूर हुजुर येऊनु मालूम केले जे आपली कुलकर्णी मिरासीची देहाय प ॥ पैकी ब" महजर सालाबाद पिढी दरपिढी चालिली असेती बि त"

धाइरी, नांदोशी, कीर्कटवाडी,

नऱ्हे, आंबेगांव बु", आंबेगांव खु", चादे ०

धनकवडी, पर्वती, हिंगणे, गुडदौनु ०

सदर गांवीची कुलकर्णे व जोतीसपणे आपले मिरासीची आहे यापैकी नवरेहास आपले मुतालिक पांच कुडवे ठेउनु कुलकर्णे व जोतीसपणे चालवितो. बाकी मौजे नऱ्हे व पर्वती येथील मोकदमी हरकती करूनु पुण्याच्या देशकुलकर्णी याचे मुतालिक ठेउनु कुलकर्णे चालवित होते त्यावरी आपण हुजुर फिर्यादी येत होतो. म्हणौनु नऱ्हाचे मोकदमे आपले कुलकर्ण आपले दुमाले केले आणि मौजे पर्वतीचा मोकदम देशकुलकर्णी यासी मिळोनु त्याचा मुतालिक देउनु पाठी राखतानी आपले कुलकर्ण आपले दुमाले करीत नाही दरीबाब सरंजाम होये मालूम जाले. विनायेक भट ठकार याची अकरा गांवीचे कुलकर्णे व जोतिसपण मिरासी महजरहि असोनु पर्वतींच्या

मोकादमास हरकती करावया काय बजीत आहे हाली मौजे म'' च्या मोकादमास ताकीद करूनु याचा मुतालिक देऊनु कुलकर्णीपणाचे काम घेत जाणे जरूर हरकती करूनु आसिलिया मोकादमास व देशकुलकर्णीयासि व मुतालिक ठेविला आहे त्यासि हुजुर पाठविणे उजुर न करणे असेली हातरोखा फिराउनु देणे छ २६ रमजान मोर्तब सुदु रुजु सुरू निकीस

रुजु सुरू सूद

(६) शके १५८८ पराभव संवत्थरे (इ. स. १६६६)

ज्येष्ठ शुद्ध द्वितीया २५ मे १६६६ राजश्री शिवाजी राजे आगरियास जाऊन औरंगजेबाची भेटी घेतली. बिधाड होऊन राजश्रीस चौकिया दिल्या. १

श्रावण वद्य द्वादशी अगरियांतून (आग्रा) पेटारियांत बैसौन पळाले. यावरी राजश्री संभाजी सहवर्तमान मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस राजगडास आले. १

श्रावण वद्य अमावाशेस **त्र्यंबकपंत** व **रघुनाथपंत कोरडे** अगरा धरिले १. मार्गशीर्ष मासी देवरूख येथे असलेल्या पीरमिया व ताजखान यांच्याशी लढाई होऊन दोघेही मारिले गेले. हाथी पाडाव केला १

(७) शके १५८९ प्लवंग संवल्छरे (इ. स. १६६७)

चैत्र वद्य पंचमी **त्र्यंबकपंत डबीर** व **रघुनाथपंत कोरडे** दिल्लीहून औरंगजेबाच्या कैदेतून सुटले. राजश्री शिवाजी राजे व मोंगलांचे सख्य झाले. तेचवर्षी मुलुखाची बटाई (प्रतवारी) केली १.

वैशाख मासी बहलोलखान व राजश्री येकोजीराजे रांगण्यास वेढा घातला. राजश्रींनी वेढा मारून काढला. आदिलशहा व शिवाजी राजे यांचा सल्ला जाहला १

(८) शके १५५१ प्रमोद नाम संवत्सरे

मुऱ्हार जगदे राऊ ईदलशाही मोठे फौजेनिशी निजामशाहीवर चालोन आले. पुणा कसबा जाळून गाढवाचा नांगर + पांढरीवर धरिला. सात आठ वर्षे कसबा ओस पडला होता. पहार रोविली होती. कलम १

(९) शके १५५७ युव नाम संवत्छरे

शहाजी राजे भोसले यांसी बारा हजार फौजेची सरदारी ईदलशाहीकडून जाली. सरंजामास मुलुख दिले. त्यांत पुणे देश राजांकडे दिला. राजांनी आपले तर्फेने दादाजी कोंडदेव मलठणकर यांसी सुभा सांगून पुणियास ठाणे घातले. तेव्हां सोन्याचा नांगर पांढरीवर धरिला शांति केली. मग सुभेदार यांनी कसब्याची व गांवगनाची

प्रांतात वस्ती केली. कोल्याच वषे दिल्याचे सहावे वर्षी साली तनखा घेतला. शाहजी राजे विज्यापूर प्रांती गेले. कलम १ (सोन्याचा नांगर फिरविल्याची हकिकत याखेरीज इतरत्र आढळत नाही.)

(१०) साष्टीची बखर

साष्टी उर्फ ठाण्याची बखर म्हणजे पेशव्यांच्या वसई संग्रामाची हकिकत इ. स. १८८२ मध्ये ही बखर काव्येतिहास संग्रह ७ मध्ये देवनागरी पाठाच्या स्वरुपांत प्रसिद्ध केली.

मूळ बरवर शके १६६४ (इ. स. १७४२) असा उल्लेख आहे. "केळव्या महिनास मोर्चे लावण्याचे उद्देशाने माहादाजी केशव, कर्णाजी शिंदे, शिवाजी नाईक व खंडोबा प्रभु यांनी मोरचे लावले. आप्पासाहेबांस पुण्याहून रामचंद्र हरी, जिवाजी ढमढेरे, आप्पाजी शितोळे, **चिमणाजी बापूजी** व वाघोजीराव खानविळकर यांनी कुमक पाठविली.

दिल्लीहून आलेल्या किलिचखानाचा भूपाळगडाखाली वेढा घालून मोड केला. दरोबस्त माळवा मुलुख बाजीरावास देऊन मोंगल दिल्लीस गेला. (अैति बखरी, अ. सोवनी, खंड - १)

(११) शके १५६५ (इ. स. १६४३) सुभान संवत्छरे

बहादुरशाह उपजले. नांव शाह आलम ठेविले - १)

(१२) शके १५८९ प्लवंग संवत्सरे

डबीर व रघुनाथपंत कोरडे हे दिल्लीहून सुटले.

(१३) शके १६०० फाल्गुन वद्य १०

बादशहा शाहा आलम औरंगाबादेस आला.

(१४) शके १६०५-१६०६ (इ. स. १६६७)

संभाजी, शाह आलम हे औरंगाबादेस गेले.

(१५) शके १५६९ इ.स. १४ मार्च १६४८ रोजी **राजश्री बापूजी** पंत (न्हेकर-नांदोशीकर) देशपांडे यांनी शिवाजी राजांस किल्ले सिंहगड घेऊन दिले. कलम १

(१६) शके १५८५ शोभकृत संवत्सेर

चैत्र शुद्ध अष्टमी; रविवार; शास्ताखानावरी पुणिर्यात सिवाजी राजा खासा जाऊन छापा घातला. शास्ताखानाचा हात तुटला. मग पळाला. त्याचा लेक अबदुला

फतेहखान ठार झाला. लालमहालांत सिरले तेव्हा कान्होजी नाईक जेधे याचा पुत्र चांदजी नाईक समागचे युद्ध समयी होते. सर्ज्याराऊ स्वारांच्या जमावांत नदीपलिकडे ठेविले होते. राजश्री यानी राजमहालाचे दिंडीने बाहेर निघतांच घोडियावरी बैसोन निघोन स्वारीबरोबर कर्यान मावळांत निघाले. वरकड जागा लष्कराच्या टोल्या ठेविल्या होत्या. त्याही निघाल्या १.

मार्गशीर्ष मासी जसवंतसिंग कोंढाणियातले वेढियास आले. १

माघ वद्य चतुर्दशी भृगुवारी राजे फिरोन गडास आले. पौष मासी वद्य चतुर्थीस जाऊन सुरत लुटिले. १

(१७) शके १५९२ आषाढ शुद्ध ९, गुरुवारी माहुली घेतली.

(१८) शके १५९३ विरोधी संवत्सरे

माघमासी मोरोपंत पेशवे यांनी हशम घेऊन सातेरीचे माचीचा वेढा मारिला. उपराळा केला. प्रतापराव, आनंदराऊ फौजेनिसी जाऊन बहलोलखान धरिला. हत्ती ११ व घोडी १७०० पाडाऊ केली (पृष्ठ १५, मराठ्यांची इतिहासाची साधने, खंड १८, पुणे-देशपांडे, वि. का. राजवाडे)

(१९) शके १६२३ आषाढ वद्य १४, चिंतामणी गोसावी यास लिहीलेले फारकत पत्र

"फारखती राजश्री बाळाजीपंत व मोरोपंत देशपांडे प।। खेडेबारे यांसि, रामचंद्र न्हेकर बाळाजी व विसाजी त्र्यंबक व कृष्णाजी बाबाजी देसपांडे प।। पुणे. नमस्कार. सु।। स हजार ११११ कारणे फारखान लेहोन दिधली जे आमचे कर्ज र "चिमणाजी बापूजी" आमचे भाऊ यावरी होते. त्याची खते वजिनस आम्हांपासी आहेत. त्यास तुम्ही लिंगाड वारावयास दरमियान श्री श्रीदेऊ स्वामीचे पुत्र यास दरमियान घालून + + केला. रु.।। २००० दोन हजार सदरहू रुपये आपण तुम्हापासून घेतले आणि लिंगाड वारिले. सालीन हाल र ।। **चिमणाजीपंतांची** खते जे असतील ते रद्द असेत. त्याचे लिंगाड तुम्हापासी लावणार नाही. हे फारखती लिहिली सही छ २७ सफर आषाढ वद्य चतुर्दशी (पृष्ठ ६३, लेखांक ४२, मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १८, पुणे देशपांडे, वि. का. राजवाडे)

(२०) मराठ्यांच्या इतिहासाची साधने यांत समाविष्ट आहेत. वरील पृष्ठांपैकी पान १०७ वर "संभापूर" उर्फ मौजे मांडकी पेठ बसविली. कारकीर्दी राजश्री

छत्रपतीसाहेब पेठ वसाहती करून खालिसा बार जिरायती चावर १८ असा उल्लेख आहे (पृष्ठ ८५, ते पान ११४ शिरवळकर-देशपांडे वि. का. राजवाडे)

(२१) नारो बापूजी हा बापूजी मुद्गल यांचा मुलगा. नारो बापूजी (नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे) शिवाजीकडे नोकरीस होता. आणि शिवाजी लहान असतांना शिवाजी व जिजाबाई त्यांच्या शेजारीच रहात होती (इ. स. १६३६) त्यासंबंधामुळे शिवाजीने त्यांची पाठ राखून करिन्याचा लेखक सखो भिकाजी याचा बाप भिकाजी रूद्र याचेकडील कसबे खेडच्या कुलकर्णीपणाचा (पाटीलकीचा) रुमाल हिरावून घेऊन नारो बापूजी नऱ्हेकर देशपांड्यास दिला. म्हणजेच कुलकर्णीपण नारो बापूजीस दिले असे करिन्याच्या लेखकाचे म्हणणे आहे.

(गजानन मेहेंदळे, श्रीराजा शिवछत्रपती, खंड १, पृष्ठ ६१९, तसेंच पुरंदरे दप्तर, भाग ३, क्र. १५१ पृष्ठ १३२, १३३)

(२२) दादाजीने खेडमध्ये त्यांच्यांकरितां जो वाडा बांधला त्यात त्यांचे वास्तव्य खाली लिहिण्याप्रमाणे दिसून येते. (अ) १/१/१६३७ ते २८/२/१६४१ (ब) ... १५२० दिवस १/३/१६४२ ते ३१/३/१६४७ ... १८५७ पुणे व खेडेबारे आलटून पालटून. (दादोजींच्या मृत्यूपर्यंत.) (क) १/४/१६४७ ते ३१/५/१६४९ ... ७९२ दिवस खेडेबारे, कोंढाणा व पुणे (पु. द. ३ए पान १३० जेधे करिता, प. सासं ले. ५१० शेजवळकर, पान २४८.)

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद खंड ३१, क्र १२६ पत्र खेडेबारे तप्याच्या कावाजी रायाजी कोंडे देशमुख यांनी सीसाल सेत थल कास टके ३०० पैकी कास १५० टके मध्ये "**शहाबाग**" वसविली. (पृष्ठ ६२०, मेहेदंळे, खंड १ रा. शि. छत्रपति)

(२३) शके १५९२ साधारण संवत्सरे, चैत्र शु ।। ९ निलोपंत रवाना केले ज्येष्ठ शु।। ४ लोहगड घेतला, कार्तिक वद्य शके १५९२ राजश्री मोरोपंतांनी त्रिंबकगड घेतला (इ. स. १६७०)

आषाढ शु।। २ रोहिला घेतला

आषाढ शु।। ८ हिंदोळा घेतला

आषाढ शु।। १४ कर्नाळा घेतला. शिवचरित्र प्रदिप, श्री. दिवेकर, पृ. ५२ शिवाजीने सिद्धी विरूद्धच्या मोहिमेत

(२४) शके १६२४ चित्रमानू संवत्सरे, ज्येष्ठ वद्य ७ खेळणा. दोन लाख रुपये देऊन परशुरामपंतांपासून किल्ला घेतला. पन्हाळ्याजवळील वडगांव येथे छावणी केली. लष्कर फार मेले. पौष मासी पातशाहा येऊन कोंढाण्यासी वेढा घातला. तेच मासी नेमाजी सिदाज व केसोपंत नर्मदेपलिकडे जाऊन सिरोज मारली. (पृष्ठ ६७, शि. प्रदीप, दिवेकर)

(२५) शके १५९१ सौम्य संवत्सरे

भाद्रपदमासी औरंगजेब काशीस उपद्रव दिला. देवालय पाडिले १.

पौषमासी मोगलाचा व राजेश्री सीवाजीराजे यांचा सल्ला सुटला. प्रतापराव आनंदराऊ फौजेनिसी औरंगबादेस शाहाजादीजवळ होते. ते राजगडास आले १. माघ वद्य ९, सुक्रवारी कोंढाणा घेतला. उदेयमानू किल्लेदार मारिला. तानाजी मालुसरा राजश्री कडील हशमाने सुभेदार पाडिला १. फाल्गुन वद्य १२ सोमवारी नीळोपंत मुजुमदारांनी पुरंदर घेतला. **केसो नारायण न्हेकर (नांदोशीकर-देशपांडे) पडिले (इ. स. १८/३/१६७०) (जे. शे.)**

फाल्गुन शुध १५ राजगडी राजाराम उपजले १.

(२६) शके १५९९ पिंगल संवत्सरे (१८ अैप्रिल १६७७) चैत्र मासी १२)

राजेश्री त्र्यंबकपंत डबीर शिवापुरात कैलासवासी झाले. मार्गशीर्षमासी राजेश्री मोरोपंत पेशवे याणी नासीक लुटिले. त्या प्रांते विक्रमशहा जवारेचाँ राजा होता व सिदी फकिर मोंगलांचा फौजदार होता. तो पाडाव केला. फत्ते झाली १. (अै. श. अ. सोवनी; पृष्ठ २२)

(२७) शके १५९५ प्रमाथीनाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य पंचमी (इ. स. १६७२-७३) - मोरोपंत पिंगळे यांनी जव्हार प्रांत स्वारी करून जिंकला. तेथील राजा विक्रमशहा पळाला. मोंगलाईत आला.१

(२८) शके १६०१ सिधार्थी संवत्सरे, चैत्र शु।। प्रतिपदेस मोरोपंत पेशवे यांनी हुसेनखान मायणा याचा लेक पाठवून किल्ले कोप्पल घेतला. आणि हुसेन खानास सोडिले. अपला चाकर केला १.

(२९) शके १६०२ रैद्र संवत्सरे, आश्विन वद्य पंचमीस मोरोपंत पेशव्यांनी देह ठेविला. रायेगडी मेले. त्याचे पुत्र निळोपंत सोडिले. पेशवाई दिली १.

देशपांडे ता खेडेबारे याचा शिवकालीन करिणा

(हा करिणा श्री. रावासाहेब गंगाधरराव बाबासाहेब देशपांडे भा. इ. सं. मंडळाचे सन्मानीय इतिहासप्रेमी सभासद यांनी संपादिलेला असून तो पुरंदरे दप्तर, भाग - ३, पृष्ठ १३० वर उद्धृत केला आहे.)

श्री

असलप्रमाणें नकल

सन १०६३ (श. १५७४) मधे **चिमणाजी बापूजी व बालाजी व केशो नारायण** यामधे व सखो भिकाजी यामधे व गंगाजी विठल यामधे वाद जाला त्याचा करिना राजेश्री सिवाजी राजे यापासी सखो भिकाजी उभे राहून आर्ज केला की आपणास आनंदराव याची मजमू आहे. त्यास आपणास च्यार महिने निरोप दिल्हा पाहिजे. त्यास आज्ञा दिल्ही याउपरी दुसरा आर्ज केला की तर्फ खेडबारेच्या देशकुलर्णाचा कथला आपल्या वाद्याचा व आपला आपले आजे राजेश्री रुद्राजी नारायेण त्यापासून आहे. तो [१]साहेबास ठावका नाही यैसी खेड कसबा व सिवापूर हे दोन गाव आपले आपले बाप हाली भिकाजीपंत व नारोपंत चालवीत होते. पुरातनहि आमचेच यैस असतां साहेबापासी [२]**नारो बापूजी** चाकरी करीत होता. व साहेब मातुश्री [३]आईसाहेब [४]कसबीयामधे त्याच्या वाडियात सेजारी होते. त्या वलखीने साहेबी त्याची पाठी राखून आपल्या बापाच्या हातीचा कसबाच्या रुमाल हिरून त्याचे हाती दिधला. ते वेलस [५]**बापूजीपंतहि** होते त्यानी चाहाडी केली की सिवापूरचे पेठमधे [६]भिकाजी रुद्राने काही चोरी मारी केली आहे म्हणून साहेबापासी सांगितले. तेधवा साहेबी मनास आणिले ते समई राघो बलाल आत्र्या सोनाजीपत दबीर व भानजी बलाल यैसे बैसऊन मनास आणिले चोरीस कलम लटके जाले. ते वेलस पेठेचा हावालहार कासिबबे व मजमूदार बापूजी दामोधर होता. त्यास देशमुख बापूजी नाईक[७] व बोपजी नाईक व कानजी नाईक व भिवजी नाईक व रामजी नाईक व नागोजी नावडकर देशमुखाचा कारभारी त्या देखता सदरहु करिना जाला म्हणून त्यापासी जाऊन सागितले की दिवाणबळें त्याने तुम्हादेखता कसबाचा रुमाल घेतला. आपण दिवाणात उभे राहून खटपट करावी तर सिवाजी आवजी

---

१ आपणास, शिवाजीमहाराजास २ चिमणाजी बापूजीचा वडील भाऊ ३ जिजाबाईसाहेब ४ खेडात ५ बापूजी मुद्गल ६ सखो भिकाजीचा बाप ७ कोंडे

वाचा वाटेदार तो आपला वाटा मागो लागला. म्हणून नसरापूरचे कुलकर्ण चालवीत होता म्हणून त्यावर काही कुभांड करून त्याला मार केला. तो बहुतच केला. धोतरात हागला. तो घरात आणिला तेच वेळेस देशमुखादेखता आपला रुमाल घेतला. ते वेलेस आपण काही दिवाणात खटपट करावी. तो भये उत्पन्न जाले की सिवाजीचा न्याव होईल म्हणून आपले बाप देशमुखापासी सागितले की त्यास संगेन आपला निर्वाहा करणे त्यानी आपल्या बापास उतर दिधले की तुमच्या वादियाची राजेश्री राजे पाठ राखीत आहेत. ये प्रसंगी आम्हास बोलता येत नाही. आपला काळ पडल ते वेळेस तुमचे देसकुलकर्ण तुम्हास देऊ यैसे बोलिले त्यावरी ते प्रसगी उगच आपल्या बापास राहाणे जाले बापूजीपंत मेले नारो बापूजी सेवा महाराजांची करीत होते. आपले भाऊ नारो भिकाजी सिवापूरचे कुलकर्ण चालवीत होते. यैसीयास ते वेळेस [8]सन मधे फतेखान विजापूरकराची नामजाद राजियावरी आली. ते वेळेस किले कोढाणा व सिरवळ खेडेबारे देऊन सला केला. राजेश्री राजे पुणियास गेले. तेथे आबाजी माहादेव हे कारभारी जाले यानी कुल मुलकावरी गुर व उटे व घोडी घातली ते वेळस सिवापूरच्या कुलकर्णास येक वाटी (?) व दोन टोणगे उटे घातले व्हन १० दाहा घातले. ते वेलस आपले बापापासी काही द्यावयास नव्हते तेधवा राजेश्री [9]माहादेवभट माहाभास राजेश्री राजियाचे गुरु ते आपले माऊस चुलते त्यास वरातदारी उपद्रव केला. तो त्यास दिल्हे वचना (?) मग आपल्या भावास नारोभिकाजी यास बराबरी घेऊन पुणियास राजेश्री राजियापायी गेले आणि त्यास विनंती केली की हे बहुत दुर्बल आणि यास वृत्तीसमधे उट घातले आहे. इतके याच्याने देवत नाही तर निमे ऊन निमे सोडिले पाहिजे. ते वेळेस नारो बापोजी सभेस बैसला होता त्यास त्याने उतर बरकसीने उतर दिधले की तुमचे कुलकर्ण तुम्ही सोसने आम्ही बोलणार नाही. मग राजेच कृपाळू होऊन व्हन ५ पाच करार केले आणि येक टोनगा फिराऊन घेतला आणि होन सोड देऊन पाच व्हन करार केले. तेहि द्यावयास गत नाही म्हणून सिवापूरचे घरी होते ते भगवत गोसावी भाडियाने यास देऊन रुपयास व्हन पाच घेऊन[10] दिवाणात

---

[8] फतेखानाची स्वारी शके १५७०. [9] ही माहिती अगदी नवीन. [10] या वाक्याचा अर्थ स्पष्ट होत नाही.

दिधले पुढे पेठेचे कुलकर्ण नारोपंत चालवीत होते. तो सामराजपत पेसवे याही मुलकावरी मोहीम पटी घातली पेठस घातली. ते वेलेस नारो[११] बापूजी इदलशाहीचा दिवाणाने कसबियामधे उपद्रव माडिला म्हणऊन पेठ राजेश्री राजियाची म्हणून तेथे आले होते. ते समई मोहिमपटी शंभर [१२]टके घातले. ते वेलेस नारो बापूजीसी आपले भाऊ नारो भिकाजी बोलले की आपण दिवाणात बोलून काही हालू करवणे त्यास नारो बापूजी बोलले की तुमचे कुलकर्ण जाणा आम्ही बोलणार नाही. तेहि खंडणी दिधली त्यावरी कितेक दिवस जाले नारो बापूजींने राजेश्री राजियापासी चाहाडी केली की सिवापूरवी पेठ दाहा बारा वरसे राजेश्री दादाजीपती इनाम वाढविले सन कुलारंग खडनी टके १२०० बारासे टके केली. त्या आलीकड साल दरसाल कमतर खंडणी होत आली. ते पैकी [१३]कारकुनानी व सेटियानी व कुलकर्णी याने खादले यैस सागितले त्यावरून आपले भाऊ नारो भिकाजी यास पुणियास नेऊन राजेश्री राजियास सागोन मार केला. हिसेब कितेब मनास आणिता चोरीचे लिगाड लटके जाले. त्यावरी नारो बापूजीचे राजेश्री राजियास सागोन पेठेच्या कुलकर्णाचा रुमाल हिरुन घेऊन नारो बापूजीचे हाती दिल्हा त्यावरी आपल्या भावानी राजेश्री राजियासी रदबदली केली की कसबाचे देसकुलकर्ण पुरातन आपले आपले बापातागाईत खात आलो. या प्राती साहेबाचे सुभेदार दादाजी कोडदेव कसबियात होते. ते वेलेस राजेश्री साहेब लाहाण होते. राजेश्री [१५]माहाराजसाहेबी मातुश्री आऊसाहेबास व तुम्हास खेडबारियास दादाजीपंतासाठी पाठविले. ते वेलेस राहावयास वाडा बापूजी मुद्गल याच्या वाडियात ठाव दिल्हा आणि तुम्हास वाडा बाधावयाची तजवीज केली यैसी कसबियाचे वाणियाची व बाजे मोहतर्फ कुळे याची घरे मोडून तो जागा वाडियास केला त्या कुलास वसाहातीस जागा पाहिजे. म्हणून कसबियाच्या सिवारात पेठ वसावयाचा तह केला पेठेचे नांव सिवापूर यैस साहेबाचे ठेविले. बारा वरसाचा इनामाचा कौल दिल्हा पेठेचा मुहुर्त करिता मखरे रोविता मिरासदारास वस्त्रे आपले बाप भिकाजीपंत यास वस्त्र दिल्हे ते वेलेस बापूजीपंतहि होते. त्यावरी

---

११ हा नारो बापूजी वर आलेल्या नारोबापूजीहून निराळा दिसतो. १२ ४८ रुका = १ टका. म्हणजे हल्लींची जवळ जवळ पै. बाजारभावे परत्वे टक्याची किंमत कमीजास्त होई पण साधारणत: ३।। टके = १ रुपया एवंच टका म्हणजे हल्लींची पावली. १३ पैकी-पैके? १५ शहाजीमहाराज.

नऊ वरस इनाम पाळली कसबीची रयेतीवर मुलकी रयेत कौल देऊन आणिली. ास घरे दिवाणातून बाधून देऊन कुळे पाहून दिल्ही त्याचा वसूल पेस्तर बोलू ास घेतला. नव वरसे निपोटी चाकरी आपल्या बापाने आपली व्रती म्हणऊन करी केली. दाहावे वरसी राजेश्री दादाजीपंत राजेश्री माहाराजाचे भेटीस करनाटकात ालिले. त्या वेळेस पेठची खंडणी कुळाचे कुल पाहु खंडणी केली. आकार टके १२०० बारासे जाला ते वेलेस आवघ्या वतनदारी अर्ज केला की आपल्या हाकाची ल्हे केली पाहिजे. त्यास त्याही उतर दिल्हे की समागामे दोन च्यार मजली येणे ल्हे करून सवेच निरोप देऊ त्यावरून वीरसेटी सेटिया व विजापूरपावेतो गेले. थे ज्याची त्यासारिखी मुशारियाची विल्हे केली. त्यास भिकाजीपंतास शभर टके मुशाहिरा केला आणि आपण फिरोन आलियावरी हाक लाजिमा याची विल्हे करून देऊ म्हणून निरोप दिल्हा त्यास हे गावास आले कसब्याचे व सिवापूरचे कुलकर्ण ातच होते त्यावरी राजेश्री दादाजीपंतहि करनाटकातून आले तैसच दुखन्य पडले आणि सवेच मेले हाकलाजिमियाची काही विल्हे जाली नाही. त्यावरी कितके वरसे कसबा सिवापूर आपले बाप व आपले भाऊ खात होतो. त्यावरी **बापूजी मुद्गल** व त्याचा लेक **नारो बापूजी** याने साहेबाचा बदनिशी करून साहेबाकडून रुमाल बलत्कारे घेऊन आपले हाती घेतला. ते वेलेस आपण रदबदली करावी तो चालली नाही. चौघा मिरासदारास गोही करून उगच राहोन पेठेचे कुलकर्णे बलत्कारे घेऊन साहेब त्यास देतात. यैसे कितेक प्रकारे राजश्री राजीयासी रदबदली केली परंतु त्यानी मानिले नाहीं त्याचे वकील सबल बित

रघुनाथ नारायेण यासी बापूजी पंताची लेक दिल्ही १	श्रीदेव चिंचवडकर यासी येक लेक बापोजीपंती दिल्ही
सोनाजीपंत डबीर याची लेक हे बालाजी बापोजीस दिल्ही १	बावाजी नो पुडे याचे लेक नारा-यण यासी रघुनाथ नारायेण याची लेक
रघुनाथपंत कान्हो डबिराचे जांवई १	दिल्ही १
शामराजपंत पेसवे त्यास त्याचा लेक चंदोपंत त्यास नारो बापोजीची लेक दिल्ही १	प्रभाकर भट व नारायण भट हे बापोजीपंताचे व्याही १

यैसा कुल दरबार कुल त्याचाच जाला आपले काहीं न चाले मग आपले भाऊ नारो भिकाजी पोट भरावयास निरोप मागत होते ते न देत मग शामराजपंत यानी पाव लोकाची सबनीस याची फडनिसी दिल्ही त्या दिवसापासून पेसजी देसकुलकर्णांची व बाजे गावकुलकर्णांची कटकट आसता हे नवी कसबाची व सिवापूरची कटकट चालली ये गोष्टीचा वादप्रतिवाद करावा तों **मोरोपंत पेसवे** तेहि त्याचेच जाले यैसा आवघा दरबार त्याची पाठ राखो लागले व गलबल मोगलाचा व इदलशाहाचा जाला मुळुक उद्वस जाला याजकरिता दाहा पाच वरषे गेली त्यावर आपणास आनंदरायाची मजमू होती रुईजुई गाव वसू लागले मग ते वेलस राजश्री राजे साहेबास आर्ज करून मजमू च्यार महिने टाकून राजियासी हाटकिले की आपले वतन व गाव तुम्ही बलात्कारे घेऊन त्यास दिधले आता तऱ्ही धर्मतेने आपला येक कागद कारकुनास व देसमुखास देऊन त्यास व आपणास परस्थलास पाठऊन निवाडा होये ते केले पाहिजे त्यावरून त्यानी मुकुंद धोडदेव आत्रे व हवालदार व बावाजी जनार्दन मजमदार याचे नावें येक रोखा व देशमुखाचे नावे येक रोखा दिल्हा की **चिमणाजी बापोजी** व सखो भिकाजी यासी परस्छलास पाठऊन देणे आपला निवाडा करून येतील व **चिमणाजी बापोजी** होता त्याचा रोखा त्यास पाविला वरकड कारकुनाचे व देसमुखाचे ज्याचे त्यास दिधले **चिमणाजी बापोजी** कारकुनी व देसमुखी येक दोन बोलाऊ पाठविले परंतु तो न येच मग आपण नायेगावास जाऊन त्यास दुऱ्हाई देऊन त्यास ठाणियास घेऊन आलो **चिमणाजी बापोजीस** कारकून व देसमुख बोलिले की तुम्ही जमान देऊन परस्थलास जाणे यास त्यानें उतर दिल्हे कीं आपण परस्थलास जाणार नाही. वेव्हार सागणार नाही. आपले कोण काय करील ते करो यैसे रेटाईच उतर दिल्हे त्यावर कारकुनी देसमुखानी राजश्री साहेबास बखर लेहून दिधली की **चिमणाजी बापोजी** परस्थलास जात नाहीं व निवाड्यासही उभा राहात नाहीं. यैसी बखर लेहून राजगडास पाठविली त्यावरून राजश्री साहेबी दुसरा रोखा **चिमणाजीस** पाठविला की तुझी वृती नव्हे तुवा बलत्कारे सखो भिकाजीपासोन घेतली आहे तरी त्याची वृती त्याचे सांभाली कर्णे यैसा रोखा आला तोही रोखा कारकुनानी व देशमुख यानी **चिमणाजीस** दिल्हा त्यावर जमान देऊन परस्थलास जावे यैसा तह केला आपण माहादाजी राम देस कुलकर्णी प्रा सिरवल याचा कतबा आणिला तो कारकून व नागोजी ने व

यसवंतराव मुलकात आबंराईच्या आबवाणीस चालिले. त्या बा मौजे उबरि येथे गेलो. तेथे कतबा त्यापासी दिल्हा. त्यावरून त्यानी नायेगावी चिमणाजी होता त्यास बोलाऊन आणून सांगितले की त्यानी जमान कताब आणून दिल्हा तुम्ही पुणेकराचा कतबया आणून देतो म्हणोन बोलिलेत तो आणून देणे त्यास त्याने उतर दिल्हे की बहुत बरें म्हणोन उतर दिल्हे आणि हुजूर बालाजीची सासू आबई व कारकून यास पत्रे पाठवोन परस्थल दिल्ही होती ती मोडली आणि चवडो बलाल गावीचा निवाडा करवा म्हणोन मागोन घेतले हे वर्तमान आपणास मौजे वरीये ता खेडेबारे येथ कारकूना बा होतो तेथे कलले त्यावरून आपण स्वार होऊन पद्मावती किले राजगड येथे राजश्री राजे होते तेथे गेलो. राजियाची भेट घेऊन त्यास बोलिलो की आमचे वतन बळेच घेऊन दिल्हे त्यावरी परस्थल दिल्हे तेही मोडोन हाली चौडोजी बल्लाल निवाडियास पाठविले की गावीच निवाडा करणे हे कोण गोष्ट केली त्यास ते बोलले की क्षणभर चिमणाजी आपण होतो तू मजीस च्यार गोष्ट रदबदलीच्या सागणे जर आपण उतरास भागलो तर चिमणाजी खोटा तू भागलास तर तू खोटा यैसे बोलिल्यावर सदरहू पुणियामधे नारो भिकाजीची व याची रदबदली जाली तितकी आसाल आपण उतर दिल्हे की नऊ दहा वरशे सिपेटी चाकरी केली व नागवणाही दिल्हे ते वेलेस फिकीरीत नव्हतो व काही फतुही होते आपण काही दिल्हे नाही यैसे आसता आपण तुलिलो कैस यैस उतर दिल्हे यैसी उदड रदबदली जाली मग आपण राजे साहेब उगेच राहिले मग आपणास बोलिले की त्याच्या वकिलानी आपणास भिडेस घालून परस्थळ मोडून चवडोजीस गावच्या निवाडियास मागोन घेतले. तेथवर जाणे तो कैसा निवाडा करील तो मनास आणने बरहाक करीत तरी पेस्तर आणीक विचार करू यैसे बोलिले त्यास आपण चवडाजीपंताकडे न जाऊ म्हणोन उदड हाटकिले परतु आतिशयेच तेथवर जा म्हणो लागले मग जरूर जाहिले मग पेठ सिवापुरी चवडाजी राहिला होता. त्यापासी त्याची भेट घेतली त्यावरी दुसरे दिवसी बोलाऊन आपणास सागितल्या चिमणाजीस विचारतो म्हणो लागला का हे आपले काही नव्हते. आपण नरेकर आणि हे आरवीकर त्यास आपण उतर दिल्हे की नरे तर्फ येलवडखोरे यास दोन महार आड आहेत. तेही व्रीत आपलीच यैसे आसोन आरवीतऱ्ही खेडबाराची पाणवथा येक या दोही गोस्टीनी यास समंध नाही त्यावर मागती त्याने पुसले की तुम्ही

सुतक धरिता की नाही त्यास आपण बोलिलों की इतके दिवस दाहा दिवस धरीत होतो नारो बापोजी मेले ते वेलेस ब्राह्मणास विचारिता सात पिढिया जाल्या तीन दिवस धरावे म्हणोन धरितो **चिमणाजीस** पुसता तो बोलिला की आम्ही सुतक धरीत नाही यैशास आपण बोलिले की यानी आमचे सुतके धरीत असिले यैसे त्याचे आगी लागिले म्हणजे हे खोटे यैसा याचा कतबा घेणे त्यास चवडाजी बल्लालास त्याची पाठ राखने सबब सभेमधे कतबा न घेता उगच मनास आणिता आम्हास म्हणो लागले की तुम्ही खरे करून देणे त्यावरी आपण त्याचा बापभाऊ सिवाजी आवजी तो त्यामधे वडील होता त्यास आपण त्याच्या तिघा लेकाची आण घातली की सते बोल त्यास आपण विचारिले आंताजी बापुजीचे व्हाड पुणियामधे होणपासी जाले ते वेलेस व्हाडास आमचे आजे रुद्राजीपत व आमची आजी बरवाई ते व्हाडास आली होती. तेथे बरवाईस वेथा होऊन व्हाडामधे देवआज्ञा जाली तेव्हा सोहिरीयाचे घरी बापूजीपत व कुलव्हाडी भोजनास बसले होते त्यास समाचार कलताच उठले. सुतकाचा निर्वाहा ब्राम्हण बसोन केला. सात पिढ्या दाहा दिवस सुतक धरावे. मग तीन दिवस सुतक धरावे येसा निर्वाहा जाला यैसी गोही सिवाजी आवजीनी दिल्ही मग उगच राहिले. त्यावरी चवडाजी म्हणो लागले की सुतकाचे ठाई धरिता अंतर पडिले त्यास आपण उतर दिल्हे की नेणता भटाचे बोले अंतर पडले असले तर आपण बापभाऊ नव्हे की काय त्यास ते बोलिले की **बापूजीपंत** समर्थ आणि त्याचे सोहिरे धाइरेहि समर्थ हे तुम्हास नकळे तेधवा त्याचे तुम्ही बापभाऊ नव्हा त्यास आपण उतर दिधले की महादेवभट महाभास व बापभट ठकार हे केळवडियात होते त्यास लेहून आणवले. त्याने आपल्याहि मते लेहून उतर आणवले आपण बोलिलो तैसच उतर आले त्यावरी आपण बोलिलो की तथापि येक वेळ आपण सुतकास चुकलोहि आसिलो तर बापभाऊ कैसे नव्हे **बापूजीपंताचे** लेक **चिमणाजी** हे प्रतेक्ष पदाजी नाईकाच्या बटकीच्या घरात राहोन तिचे चुलीवरी भात करून खाऊन त्याजवरी विडीयाच्या पिकां टाकून तिसी संभाल करून यैसी कित्येकं अनाचार हे **मुधाजी** व त्याची **माये अकाई** हे तुम्हा सेजारी आहेत. हे अनाच्यार वर्ततात तरी यास लेक व बापभाऊ नव्हे म्हणाल की काये त्यावरी उगेच राहिले. मग सिवाजी आवजी बोलिले की तुम्ही सिवापूरचे मुतालिकेसच ठेविलेस. त्यास आपण उतर दिल्हे की तू

सत्य स्मरून बोलत नाहीस आजीच तुज क्रिया लागल तेच दिवसी मलकू देवरकर याचे घरी त्याची गुरे होती. साहीकाली गाय येताचं कीवीरडोन मेली त्यावरी चिमणाजी आपणास बोलिला की कसबायीस मुतालीक जईतपली म्हणून होता त्यास ठेविले होते. तो मेलियावरी तुमच्या आजीयास ठेविले. यैसीयास आपण उतर दिल्हे की जैतपली कुणबी होता लेहु शिकला होता. तो बापू मालियाचे घरी आसत आस आमच्या बापाच्या वेलेस मुलास लेहु सांगत आसता आमच्या बापादेखत मेला तो आमच्या आज्याआधी कसा मुतालीक होता त्यावरून त्या गोस्टीने लटके जाले. त्यावरी साइकाली चवडजीपंती आम्हास व **चिमणाजीस** बोलाऊन नेले म्हणू लागले की तुमची गोही साक्ष विचारावयास कोण कोणास बोलाऊन आणावे. त्यास आपण बोलिलो की बहुता दिवसाचे पुरुष असतील त्यास बोलावणे बे तपसील.

बुबाई आवा देशमुखीन	कानजी ना १
	कमाजी पाटील
	गोगलवाडीकर १

....

दरणा गुरव

नसरापूरकर

येणेप्रो याखेरीज आणीकहि कोण वडील आसतील ते बोलाऊन पुसणे यैसे सांगितले. यावरी त्यानी सदरहू बोलावावे हे टाकिले आणि त्याचे पक्षीतेचे दुसरे दिवशी बोलाविले आणि आठ दिवस हे गोष्टीची रदबदल होत होती. तो रोजच्या रोज जे माणूस परनिष्ट बोलणार त्यास दापादापी करीत आपणासारखी गोही देणे म्हणोन सागणे गोही द्याना म्हणजे रा साहेब व सरकाकून तुमचा उबर राहणार नाहीत म्हणोन दबावीत ते देवसी रात्री **चिमणाजी** आपणास बोलिला की कानजी नो व नागोजी नो बापलेक भाडले आहेत. त्याची समजाविसी करू म्हणोन आपणास सागाते घेतले. तोहि येक मते होता म्हणोन त्याबा पेठेतून कसबीयात आलो. तो पाहार रात जाली आपला वोस तेथे नेले आणि आडाचे काठी उभा राहिला. इतकीयात आलो कसाबाचा लेक व बावाजी खाटीक याचा लेक आणि दोघेजण यैसे तेथे आले आणि आपणास झोबो लागले. काये मुदा होता तो न कले आपण त्यासी झीडाडून चालिलो. तो हिरोजी वाटील सोमन पाटीलाचा लेक त्याची म्हैस चुकली तो पाहात पाहात तिकडे आला. त्याबराबरी आपण दादाजीपताच्या वाडियावरून

नागेशाचे टोगीवरून सिवापुरास आलो. दुसरे दिवसी गोहीचा प्रसग पडिला. तो त्याचे पक्षीचे व ज्यास दापिले होते ते फडास आले. मनास मानिले तेसी गोही देऊ लागले. त्यामधे कानजी नो व **बुवाई आवा देशमुखे** आली. त्यानी गोही दिल्ही की वडील घर सखो भिकाजीचे वृती याची ते बले खातात. हे खोलेश्वर स्मरोन सत्य आपण सागत आहो त्यास नागोजी ना कानजी नोकाचे लेक बोलिले की आमचा बाप हे आफू खात आहेत. त्याचे बुधीस चल जाला आहे हे बरे होते तेव्हा आपण सागितले आहे की **चिमणाजी बापू** धणी तैसीच गोही लिहिली आहे. कानजी नााकाची व **बुवाई आवाची** गोही मानली नाही. यावरी मजीनाईक धाकटे बोपजीचा लेक तो भिकारी होता. त्यास **चिमणाजीने** च्यार मण दाणे देऊ करून गोही देविली की बोपजो ना धाकटे त्यानी येकवेल रुद्राजी नारायण याणी कसबाचे कुलकर्णे खात आसता त्यास कसबाचा हक मागितला तो त्याने दिल्हा नाहीं म्हणोन आपल्या बापानी त्यास म्हटले की तू कसबा खाऊ नको ते वेलेस आपण धाकटे होतो ते आपण यैकलें हे सत्य यैसी गोही दिल्ही त्याचे सिकविल्या प्रो त्यास आपण उतर दिल्हे की बोपजी नोकाचा चुलता जाखोजी नो ते तुझ्या बापास आडसेरी देत आसे त्याचे बगर रजा कसबाचा हक तुझिया बापास आपला आजा कैसा देऊ पहातो येक रुका देता तरी जाखोजी ना जिवेच मारिता यास लटिके म्हणसी तरी सखाजी मोरदेव याचा भाऊ देशमुखीची मुतालकी करीत असता काहीं चुकला चाकरास सांगितले की यास मारिणे यैसे म्हणताच तो खासनीस देसमुखाच्या वाडियातून पलाला तो बाजारांत चाहुडी होती तेथे हवालदाराची पाठ निघाला तेथे जाखोजी नो जाऊन बाजारांत निबाचा पार होता. त्यावरी उभा राहोन हवालदारास दटाऊन तिरान खासनीस जिवेच मारिला यैसा जाखोजी ना आसता तुझ्या बापास हक कोणे देऊ पाहतो यैसी थोतांडाची गोही दिल्ही यान काय बरे होते यैसे आपण बोलिलो त्यावरून **चिमणाजी** बोलला की मल्हार कोडो मुधाजी मल्हारीचा बाप त्याने महिना दोनी महिने कसबा चालविला त्यास आपण उतर दिल्हे की कोडसेटी सुकाला वाणियात कारभारी वाणी होता त्यामधे व आपले आज रुद्राजीपंतामधे कलागत जाली त्यानी त्यास थोरले बोपजी ना आपले आजीयास रागेले म्हणोन आपले आजे रुसोन चाकणेस महिनाभर गेले होते मागती बोपजी नो थोरले याणी समजावीस करून आणिले मागती कसबा खाउ लागले यैसा त्याचे

दाबदुब करून गोही मनास मानिले तैसे लेहु लागले वेकावा वेखडा केलवडेकर त्याचा मुतालिक तो येखाद्याने सुधी परनिष्ट गोही दिधली तऱ्ही त्याचेसारिखी गोही लिहीता मग ते धर्मता होईनासे जाले हे देखोन हाकबोंब केली की आपण पहिलेपासोन गावचीया निवाडीयासी राजी नाहीं व चौडोपतासहि राजी नाहीं म्हणोन परस्थल मागोन घेत होतो सेवट ते मोडोन जुलुम करून यैसे करिता यास आपण राजी नाही म्हणोन उठोन स्वार होऊन रा. राजेसाहेबापासी राजगडास गेलो आवघे वर्तमान राजीयापासी सागितले चवडाजी बलाल आम्हास पुसू लागला की नारो बापोजी मेले त्याचे सुतक तुम्ही किती दिवस धरिले होते त्यास चिमणाजी बोलिला की नारोपंत मेले ते यांस काये ठावके आहे त्यास आपण उतर दिल्हे की तू आध्धमपणे बोलतोस नारो **बापोजी हा व परसोजी माहाडीक व संताजी बोबडा** तिन्ही जुमले लोहोगडीहून **नेतोजीचे सरनोबतीचे वेलेस** [१]सुरतेहून आली यावर लोहगडी लस्कर राहिले तेथे **नारो बापोजीस** [२]राहुजी पतीकीयाची लेक नवरी पाहिली. वागनिश्चये केला. वऱ्हाडाबद्दल चिंचवडीहून सौ. भागुबाई नेली तेथे लोहवाडीस ठेवली स्वारीहून आलियावरी लग्न करावे यैसे करून **सदरहू तिन्ही जुमले स्वारीस लोहगावांपासी आलो तो वडगावाजवल वडाखाले** मुकुदसिंग रजपूत होता **त्यासी गांठ पडली ते वेलेस चिमणाजी पुढे** लुटीस गेला नारो बापोजीस **तीर थनसरीस लागला तो घोडा गजरत्न** आसनकोहो होता त्यावरी जीव **गेला तो आपण जवल होतो घोडियाखाले** पडला आपण उचलोन घोडियावर घातला परसोजी माहाडिकास व संताजी बोबडा त्यास सागोन पाठविले चिमणाजीहि त्याबो आला तो आपण नारोपंतास घेऊन सोनकीयाची आलंदीस चालिलो कटकहि आले गनीम पाठीवर येत आसे नारोपंतास मुडदा घेऊन आलंदीस येऊन आपण दहन केले ते वेलेस संक्राजी मोरदेव नारोपंताचा मजमदार होते त्रिंबक लुने परसोजी माहाडिकाचा मुजमदार त्याच्या श्वयेपाकात **चिमणाजीस** जेऊ घातले आपण उपोषण केले दुसरे दिवसी वडकीहून जाऊन आग गोला करून सागातेघेऊन लोहोगडास आलो तेथून राजगडाजवल हस्तीस मंत्रआग्न दिल्हा दाहा दिवस सुतक धरिले यैसे सांगितले. मग **चिमणाजी** खोटा जाला सदरहू करिना सुतकाचे वर्तमान वरले

१ शिवाजीची सुरतेवर पहिली स्वारी शके २ हे रावजी सोमनाथ असावेत.

बंदी लिहिले आसे येणेप्रो बोलोन राजगडास जाऊन राजश्री राजेसाहेबास वर्तमान सागितले की चवडाजी परनिष्ठ मनास आणीत नाहीत त्याची पाठ राखोन मनास आणू लागला म्हणोन आपण त्या फडास राजी न होता साहेबापासी वर्तमान सागावयासी आलो आणि तेथे च्यार दिवस राहिलो तो मागे आपण आलियावर चवडाजीने व **चिमणाजी बापोजीने** लोकास दाबदुब करून लटकिया मनास माने तैसी गोहीचा जाबता करून घेऊन आले त्यावरून [1]**आबई** व **मोरोपंत** व **बावाजी** ना व **रघुनाथपंत कोरडे** व चवडाजी बलाल आणि कितेक त्याचे वकील मिलोन राजश्री राजेसाहेबास म्हणो लागले की गोहीचा कागद आणिला आहे त्यावरून सखो भिकाजीपासून खोटेपणाचा कागद करून देवणे म्हणोन सांगितले. तो तेच दिवसी **मोरोपंत पेसवे** याच्या घरास आपण व त्रिब (क) विश्वनाथ पानसी यैसे दोघेजण **आबई दबीरीणीच्या** घरासरून जात होतो तो आपले दारी **आबई** व **तिचा लेक त्रिबकपंत** व **रघुनाथपंत कोरडे** यैसी उभी राहिली होती आपण वाटेने जातां आपणास म्हणो लागले की तू **चिमणाजी** व **बालाजीसी** भांडतोस. ती वृत्ती आमची आहे त्यास आपण उतर तीस दिल्हे की **बापोजी मुदगल** तुमची लेक आपण घेऊन तुम्हास लेक **बालाजी बापोजी** दिल्हा हे मज कलले नवते यैसे आसले तर मजसी व त्यासी लिगाड तुम्हास बोलावयासी समंध नाही यैसे उतर देता ते बायेको तैसीच राजियाकडे गेली हाट घेऊन बैसली की सखोपंताचा कागद करून देणे आपण तैसेच **मोरोपंताच्या घरास आलो** तो **मोरोपंतहि** आपणास दाबदुब करून बोलो लागले की गोहीचा कागद आला आहे तो आता खोटेपणाचा कागद लेहून द्यावा लागेल यैसे कोण्ही दिसत नाहीं ते बोलिले की आपण उतर दिधले की आपणापासून लेहून घेई यैसा कोणही दिसत नाहीं ते बोलिले की आपण दिसत नाही की काये आगर राजश्री राजेहि दिसत नाही की काये यैसे बोलिले त्यास आपण उतर दिल्हे की बरहाक होत नाहीं तेव्हा कोण्हीहि दिसत नाहीं त्यावरी मोरोपंती विश्वनाथभट दीक्षित सिवणेकर आपल्या पोवनमावळच्या वृत्ती निमित्य राजगडास आले होते त्या हाती **मोरापंती** निलोपंतास सांगोन पाठविले की तुम्ही आम्ही सायेरे जालो आहो तुमचा लेक रामचंद्रपंत त्यास आम्ही आपली

---

१ सोनाजीपंत डबिराची स्त्री

लेक सोयरिक देऊ केली आहे तुम्ही आम्ही सोयेरे तुम्ही सखो भिकाजीच्या कथलीयांत मन न घालणे राजश्री साहेब आज त्यापासून बऱ्या बोले कागद लेहून देईल तर बरे नाहीतर वाईट करून लेहून देणार आहेत तुम्ही काही फड न घालणे यैसे सांगोन पाठविले ते पदमावतीस निलोपंताच्या आंगनात उभे राहोन सागो लागले तो आपण बाहेरून गेलो तो दोघे उभे राहुन आम्हास निलोपंती बोलाऊन सदरहू वर्तमान सांगितले. आपण त्यास उतर दिधले की तुम्ही उगच आसणे जे होणार ते होईल त्यावरी निलोपती विश्वनाथभट बराबर सागोन पाठविले की तुम्ही आकरीत करिता आणि पाठ राखिता आणि सखोबावरी आकरीत होईल तेव्हा कैसी पाठी राखोन हे मुजमू गेली आगर तुम्ही मूल न द्या तरी दुसरी मेळऊ परतु आकरितात सिरणार नाही यैसे सागोन पाठविले तेच दिवसी साहिकाली आम्हास केशो नारायेण राजेश्री साहेबाकडे वाडियात गेलो बकी [१]गोमाजी नाईक व कृष्णाजी नाईक सोकटी खेलेत बैसले होते त्यापासी उभयेता बैसलो ओसरीवरी राजेश्री साहेब व पेशवे व बावाजी नाईक रघुनाथपत **कोरडे व त्रिंबकपंत डबीर आबई** यैसी व चौडोजी बलाल यैसे बैसले होते बंकास व वोसरीस पाच सा हात अंतर होते यैसीयास राजेश्री राजेसाहेब यैकत व सभासद यैकत यैसे आपण वर्तमान उभयेतां नाईकासी केशो नारायेणासी बोलो लागलो आपण नाईकास म्हटले की याणी दिवाणबले व पैकीयाच्या बळे आपली ब्रती घेतली आणि आपण राजेश्री साहेबास विनंती करून धर्मत परस्थळ मागीतले ते यानी मोडून चवडोजी बलाल गांवीचा निवाडडियास मागितले आपण त्यास राजी जालो नाही यानी गावास जाऊन लोकास दाबदुब करून गोहीचा कागद करून आणिला आहे तोच कागद याणी घेऊन आता तऱ्ही परस्थलास चलावे आगर म्हसलीयास जाऊन कोश घ्यावे आगर तो कागद कपाळी बांधोन दिव्य करावे इतकेहि न करीत यास पैका फार जाले आहेत कैस म्हणाल तर कोंढाणा निजामशाहापासून घेतला सिदी आबर धरिला ते वेलेस पनाससाठी हाजार व्हनाचे वित पातशाहाचा खजिना वरी होता तो लुटून आणिला माहुलीस महाराज निजामशाही दिवाण घेऊन गेले होते ते वेलेस मोगल व इदलशाही नामजादी माहोलीखाली वेढा बैसला होता त्यास सामान व खजना विज्यापुरीहोऊन डोणजाचे खिं(डी)तून

१ पानसंबळ

जात होता तोहि लुटलीयावरी मुधाजी मायद्या निजामशाही तो पलून खेडेबारीयास याच्या घरास लक्ष व्हनाचे वित्त घेऊन आला तो आपलीया घरात याणी गुप्तरूपे ठेविला होता यैसीयास 'पुरंधरास रा(जारा)ऊ ईदलशाही वेढा आला तो मुधाजीस धरावयास जपो लागला येके दिवसी बुधबळ खेळत आसता वाडियात रायेराऊ याचा माहालदार येऊन हाती धरिला. त्यावरी गदरी करून बापूजीपंती भट म्हणून हातीचा घेऊन चाकरीचे रूप त्यास देऊन व त्याचे बाइलेस बटकीचे रूप देऊन रातोरात रोहिडियास पाठविले. तेथेहि नाईकवाडी त्यापाशी पाठविले तेथेहि त्यास पाळ्ती लागली. तेथून ते गदक लक्ष्मीश्वराकडे गेले तिकडेच मेले. ते पैके त्याचे वित्त यास जिराले त्याचे बळे थोर-थोराशी सोईरिका केल्या आणि वकील करून मनास मानिले तैस करितात आणि मजपासून साहेबीच्या बळे कागद लेहून घेऊ म्हणतात तरी आपण ब्राह्मण लेहू जाणत आहे आपली ब्रह्महत्या केली तऱ्ही लेहून देणार नाही राजियाने अनीत केली तरी मज येकास मारील माझे भाऊबंद साहा सात आहेत ते तऱ्ही आपली व्रति घेतील आपणही मेलियावरी ब्रह्मराक्षस होऊन जे कोण्ही पाठीराखीत आहेत त्याचा वंश नाहीसा करील अबदूल वाटेस कोलाटी आले होते त्याणी क्रत्रीम नदी आणून गांवकरी यास दाखविली. ते नदी गांवाजवळ असावी म्हणोन कोलाटी मारिले येक बाईको गरीब गारोडीण होती तिचे पोटी लेक जाला. त्याने विद्याभ्यास शिकोन आपल्या बापाचा सूड घ्यावयास येऊन गांव बुडविला तैसे आपले वौंशी कोण्ही तरी निर्माण होईल तो जे पाठी राखितात त्याचा व वाद्याचा निर्वाह करील यैसीया कितेक गोस्टी उभयेता नाइकास व केशो नारायेण यापाशी राजेश्री साहेब यैकत यैशा सांगितल्या. त्यावरून काये राजियाचे चिती वाटले मग प्रहर रात्रपावेतो बैसले होते. त्यातून खासा आपण उठोन निद्रेस गेले. मग अवघच हालू हालू उठोनी आपल्या घरास गेले मग आपणही व केशो नारायेण उभयेतानी भिकाजी नाईक दिवटीया करून राजेश्री साहेबाचा निरोप घेऊन घरास गेलो. दुसरे दिवसी आबई व त्याचे वकील जाऊन राजेश्री साहेबास हाटकिले की कागद घ्यावयास काली काय म्हणोन गइ केली आजी कागद घेऊन देणे त्यावरी राजेश्री साहेबी त्यास सांगितले की तो धर्मतेन बोलतो आणि तुम्ही आमच्या बळे घेऊन मागती त्यापासून जुलमे कागदहि मागता परस्थलास निवाडियास जात नाही.

यावरून तुम्ही खोटे आहा तुम्ही आपले कार्येभागी म्हणऊन तुमचे भीडने बरहाक करीत नाही च्यार दिवस तैसच टाकिले आहे पुढे जे होणार ते सुखीच होये कागद काही त्यापासून आमच्याने घ्यवत नाही यैसे यास फजीत करोन सांगितले मग कागद लेहून मागावयाचे वर्तमान राहिले दुसरे दिवसी आपणास राजेश्री साहेबी बोलाऊन नेहून सांगितले की तुझ्या निवाडियाकरिता कुल आपले कार्येभागी दुखी होत आहेत. आपल्या कार्यास धका देत आहेत आपल्यावरी ये प्रसंगी राजकारन पडले आहे तरीं **चिमणाजी बापोजी बालाजी** व **बापोजी** यास दुखी करिता येत नाही च्यार दिवस निवाडा राहू देणे यैस कितेक प्रकारे आपणास समजाऊन सांगितले. पुढे मनास आणून तुझे वतन तुजला माहाराज देतील त्यावरी आठ-च्यार दिवस तेथ होतो तो यादो सिधनाथ हे पंढरपुरास गेले होते तिकडून आले ते सिवापुरात जावजी कुटे माहाजन त्याचा लेक गाविद कुटा त्याचे घरी राहिले होते. साईकाळाचे वेळस **केशव नारायेण** यादोपंताचे भेटीस गेला त्यास यादोपंती पुसिले की सुखो भिकाजीचा तुमचां कथला होतो तो कैसा जाला त्यावरी त्याचे हाती महजर होता. तो यापासी वाचावयास दिल्हा त्यामधे मकसूद आम्ही खोटे आपण खरे यैस आपणास पाहिजे तैसा करून घेतला यावरी सिके निशान सर्वाची होती तो महजर त्यानी वाचिला मागती त्याचा त्यापासी दिल्हा त्यावरी दो घटकानी आबदेव भट व सिवभट ठकार जोतिसी त्यापासी आले त्यास यादोपती म्हटले की सखोपताचा व **चिमणाजीचा** वेव्हार होता ते कैश जाले त्यास भटानी उतर दिल्हे की त्याचा निवाडा जाला नाही तैसच राहिले सखोपंत उठोन राजेश्रीपासी गेले त्यास यादोपंती उतर दिल्हे की केशवपंतासी महजर होता तो आपण वाचिला त्यावरी निशाने देशमुखाची व सर्वांची व तुमची देखील आहेत त्यास भट मजकूर बोलिले की तो महजर पहिले केला होता तो तुम्ही नेला त्याची तालीक करून आणिली आहे त्यावरी निशाने करणे देसमुखाचे सिखे आहेत म्हणून आम्ही निशाने करून घेतली हे आम्हास कलले नाही आगर देशमुखानीहि महजर वाचून पाहिला नाही त्याच्या बोलावरी विश्वासोन सिके व सर्वांना निशाने केली इतके यादोपंतास उतर देऊन तैसच सेटे माहाजन व समस्तान वर्तमान सांगितले त्यावरून देशमुखानी **केशो नारायेणास** बोलावू पाठविले तो **केशो नारायेण** पलून सोनगडास गेला यैसे वर्तमान जाले सदरहू वर्तमान यादो सिधनाथ राजगडास आले त्याही सागितले

त्यावरून आपण जाऊन राजेश्री राजेसाहेबास निवेदन केले त्यावरी राजेश्री साहेब बोलिले की यैसी गोस्ट घडणार नाही देशमुखास लेहून समाचार आणवणे त्यावरून आपण देशमुखास लिहिले की आपला व चिमणाजीचा निवाडा जाला नसता कैसा महजर करून दिल्हा त्याचे उत्तर राजेश्री साहेबाच्या नावे साकल्य बखर लेहून पाठऊन देणे त्यावरून खरेखोटे साहेबास कळेल यैसें आपण लेहून पाठविले होते त्यावरून त्याही राजेश्री साहेबाच्या नावे बखर लेहून पाठविली की केशो नारायेण मुधो मल्होरीस दिधला होतां त्याचा महजर नारो बापूजीने घेतला होता तो महजर ठेविला होता तो भिजला आणि तुम्ही पलोन गेला त्याची तालीक केली आहे त्यावरी सिके करून देणे म्हणून आम्हास सागितले बराबरी मुधो मल्हारीहि होता आणि क्रत्रीम महजर करून आम्हास मखसूद यैसा सागोन सखो भिकाजीचा महजर केला आणि आम्हा पासून सिके करून घेतले तैसच सेटे व महाज (न) व पट व दाहीजण याच्या गोह्या व निशाने घातली जबानी मखसूद केशो नारायेणाचा सांगितले आणि सखो भिकाजीचा महजरावरी सिके करून घेतले. सखो भिकाजी हा खोटा आपण खरे हा मकसूद त्यामध्ये लिहिली आहे हे आपणास कलोन आपण सिके केले आसिले तर आपण गुणेगार सखो भिकाजीचा काही निवाडा जाला नाही यैसी बखरे लेहून पाठविली त्यावरून राजेश्री साहेबासहि पस्ट कलो आले त्यावरीं पुढे कटकट आणिक करावी तो राजेश्री साहेब बारदेसाचे स्वारीस गेले मुलुखहि खराब याकरिता राहिल जे वेलेस आपणापासून बलत्कारे कागद लेहून मागत होते तेव्हा **चिमणाजी बापूजीने** राजेश्री **मोरोपतास** लेहून पाठविले की आपण येथ सखो भिकाजीस खोटे केले आहे हाली हुजूर आले आहेत तेथेहि तुम्ही सर्व प्रकारे त्यास तोडघसी दिधले म्हणून आवघे बापभाऊ उगेच राहतील यैस लिहिले होते तोहि राजेश्रीस निवेदन केल्यावरी कितेक दिवस तैसच राहिले मग सुवर्णदुर्गीहून आपण देवदर्शनास जेजुरीस जावयास सहपरिवारे आलो देवदर्शन करून सिवापूरास गेलो सिवापुरात **चिमणाजीची** माये द्वारकाही व त्याची **बहीन नागराबाई** वरकडहि माणसे होती त्याची भेट घेतली **चिमणाजीचा** समाचार घेता **चिमणाजीवरी** तजकरा आणाजीपती केला होतां त्याची निकट लाविली होती त्यावरी **चिमणाजीने** जरूराई करून बारा मावलावरी कबुलाती केली व्हन पाठवणे त्याची

तक्षीम कोडे देशमुखयावरी आली त्यास यैवज नाही म्हणून कसब्याची पाटलकी हिरोजी इदलकर यास विकावयास आपण व नागोजी नाईक व येशवतराव यैसें जाऊन दमाजी कोडे याच्या मल्यात प्रस्थाने गेले होत तेथे जाऊन आपण भेटी घेतील त्यानेहि घरास बोलाऊ पाठविले होते त्यावरून जाऊन भेटी घेतली चिरजीव रुद्राजी व गोदोबा सागाते होते त्यास ऊस व हरभरा आणून दिल्हा भोजनास राहवीत होता त्यास आपण राहिलो नाही आरवीस जातो म्हणोन म्हटिले त्यावरून निरोप घेऊन आरवीस गेलो तोहि तेच दिवसी रात्री **चिमणाजीही** आरवीस आला तेथे येऊन धनाजी कासार याचा सासरा त्याचे घरी राहिला दुसरे दिवसी गंगाजी विठल याचे घरी आपण होतो तेथे आला त्यान व आपण व रामभट घोडे यैसे येके ठाई भोजने केली आपली समजावीस केली कसबा व सिवापूर दिल्हे म्हणून चिरजीव रुद्रोबाचे डोईस आपले डोईचे मंदील किंमत व्हन १० दहाचे होईल ते बांधले मग आपणहि त्यास येक कोचकी व दुपटा दिल्हा तीर्थरूप भिकाजीपंतास पत्रहि लेहून दिधले की तुम्ही गावास येणे सदरहु वर्तमान नागोजी नाईक व येशवतराव त्यासहि कलले सदरहू वर्तमान जाले याची याद आलाहिदा आसे याही येक व आपला श्वार होऊन सुवर्णदुर्गास गेलो तेथून तीर्थरूप भिकाजीपंतासी सिवापुरास पाठऊन दिधले सिवापुरात येऊन **चिमणाजीची** भेटी घेतली. त्याचेच घरी दोन च्यार दिवस होते कसबा व सिवापूर तुमचे तुम्हास दिधले यैस बोलिला ब्रहस्पतवार सिवापूरचा बाजार आला ते दिवसी जकातीची टीन धरावयास भिकाजीपंतास पाठविले ते टीप लिहीत होते तो मुधो श्रीपती याने येऊन दुराई हे वर्तमान भिकाजीपती **चिमणाजीस** जाऊन सांगितले. त्यावरी त्याने उतर दिल्हे की आपण तो मनापासून दिल्हेच आहे. परंतु भाऊबंध कथला करितो यासहि सागोन इतकीयात **बालाजीपंतहि** कर्नाटकातून येणार आहेत आवघीयाच्या वीदमाने निर्वाहारूप तुमचे तुम्हास देऊ आपण तो दिल्हे आहे त्यावरी भिकाजीपंत **चिमणाजीचा** निरोप घेऊन सुवर्णदुरगास आले पुढे गलबला फारच जाला मुलूक वोस पडला निवाडा तैसाच राहिला आसे.

देशपांडे बापूजी मुद्‌गल (न्हेकर नांदोशीकर); शिवापूर संभापूर गांवे व शिवाजीन रायगड कधी बांधला याबद्दल लेखकः स. ग. जोशी यांनी लिहिलेला लेख क्र ३० (ऐति. संकीर्ण साहित्य खंड १; पृष्ठ ११८ व ११९)

श्री शिवछत्रपती यांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाल्यावर दुसरे वर्षी मातोश्री जिजाबाई आणि त्यांचे पुत्र या दोघांना शहाजी महाराज यांनी, त्यांचे पुण्याचे राहते वाडे आणि पुणें कसबा ही मुरार जगदेव यानें जाळून उध्वस्त केलेमुळें त्यांचे परम विश्वासू कारकून दादाजी कोंडदेव गोचिवडे मलठणकर, सुभेदार किल्ले कोंढाणा यांचे हवाली केले. ते कोंढाणा ऊर्फ सिंहगडावर राहात असलेमुळें त्यांचे नजीकचा ठाण्याचा गांव आणि खेडबाऱ्याचे देशमुख नलवडे उर्फ कोंडे यांचे वसतिस्थान, खेड येथें त्यांना आणून ठेविले. नंतर सुभेदार यानी शिवगंगेचे कांठची महाराजांची खासगी जमीन जीस शेरी म्हणत, तींत आंब्याची झाडें लाविली. त्यास 'शहाबाग' असें म्हणतात; आणि ती पुणे-साताऱ्याचे रस्त्यावर अजून दृष्टीस पडते. नंतर सुभेदार यांनी शिवछत्रपती यांचे नावें वसविली. त्यांपैकी संभापूर हे गांव शाहू छत्रपती यांचे वेळचा प्रबळ पुंड दमाजी थोरात यानें जाळलेमुळें तेथील वस्ती उठून शिवापूर व रांझे येथे गेली. येथे राहात असतांना खेडेबारेचे वतनदार **देशपांडे बापूजी मुद्गल** यांची व शिवछत्रपती यांची परम मैत्री व लोभ जडला. यांनींच सुभेदार दादाजी कोंडदेव यांचे मृत्युनंतर शिवाजीस सिंहगड घेऊन दिला. पुढें यांचे पुत्र **दादाजी बापूजी व चिमणाजी बापूजी हे बंधूद्वय शाहिस्तेखानावरील छाप्याचे वेळी शिवछत्रपतीचे मदतीस हजर होते; आणि नातू केसो नारायण हे शके १५९१ मध्यें पुरंदर किल्ला घेत असतां ठार झाले.** दादाजी कोंडदेव यांनी मावळचे देशमुख हरतऱ्हेनें आपले कबजेंत आणिले व त्यांचेवर आपले वजन राखिले. यांचे न्यायीपणामुळें घरगुती भांडणांत देशमूख यांचेकडे जात व वाटपपत्रें करून घेत. मुरुमदेव उर्फ राजगड किल्ला ज्या दोन खोऱ्यांच्या मध्यें आहे त्यांपैकी गुंजणमावळचे देशमुख शिंदे शिलिंबकर याचे वाटपपत्र यानीं शके १५५९ मध्ये करून दिले. आणि वेळवंडखोऱ्याचे देशमुख धुमाळ उर्फ ढोर यांचे शके १५६२ मध्यें वाटपपत्र करून दिलें आहे. शिवछत्रपती शके १५६४ पासून हळूहळू घरचे कामात लक्ष घालू लागले आणि राजकारणांत मन घालूं लागले होते. त्यानीं या वाटपपत्रासमयीं झालेल्या देशमुखांचे ओळखीचा फायदा घेतला आणि शके १५६२ विक्रमनाम संवत्सरी किल्ले मुरुमदेव ऊर्फ राजगड आपले ताब्यात घेतला. (पहा ले. १२० गुंजणमावळचे पुरोहित जोशी यांचा वाद व खंड

१७ लेखांक ८ 'शिवा मलाउननामे' इत्यादी) तेथे राहून ते आणखी पलीकडे सरहद्दीवर असलेल्या रोहिडखोऱ्यांत राजकारण खेळवूं लागले. सबब त्यांचे नादी लागल्याबद्दल दादाजी नरसप्रभू आणि कान्होजी जेधे यांची शिरवळचे ठाणेदारानें चांगलीच हजेरी घेतली. (पहा ग्रंड १५ लेखांक २६६, १६७). या किल्याचे बांधकामास शके १५७१ मध्यें श ाजी महाराज यांची विजापूरकरांचे प्रतिबंधातून सुटका झाल्यावर, प्रारंभ झाला. शि. व. जेधेकरिना पहा पृष्ठ ४१. प्रथम वास्तुशास्त्राप्रमाणे पूर्वचे बाजूस प्रारंभ केला व जी माची उर्फ किल्याचा भाग बांधला त्यास सुवेळा असे नाव दिले. नंतर दक्षिण अंगाचा भाग बांधला त्यास त्याच वेळी अपघातानें गडावरील दारुखान्याचा स्फोट झाला त्यावेळी तेथील हवालदार उडून दूर जाऊन पडला; परंतु त्यास फारसें काही न लागत तो जिंवत राहिला. सबब दक्षिण आंगचे माचीस संजीविनी असे नावं ठेविलें. अफजलखानाचे स्वारीचे वेळी राजगडचे बाले किल्याचें काम चालू होतें; म्ह. दरवाज्याचें काम चाललें होते. खानास मारल्यावर त्याचें शीर कापून गडाचे दरवाज्यावर कोनाडा करून त्यांत ठेविलें होते. (पहा जेधे करीना ४६.) यानंतर शके १५८५ पर्येत चार वर्षे गडाची उत्तर आंगची माची जी पद्मावती ती बांधण्याचें काम चालले होते; व तेथेंच महाराजांचे राजवाड्याची सदर म्हणजे सभेची (दरबारची) जागा आहे. 'येथील प्रासादाचे वास्तुशांतीचे उपेंद्र (उत्पन्न) आम्ही गुंजवणेकर पुरोहीत यानीं शके १५८५ (इ. स. १६६३) मध्ये घेतले आहे. तुम्हास संबंध नाही.' असे वादात बोरावळेकरांना बजावलें आहे शके १५८४ चे श्रावणांत बाजी सर्जाराव जेधे यांचे शिपायांनीं पंताजी पंडीत म्हण पंताजी गोपिनाथ बोकील यांचे बरोबर भांडणतंटा केला त्या वेळीं सर्जाराव यां त्याचा निषेध करून माफी मागण्यास सांगितले; आणि येणेप्रमाणें केले नाही तुम्हां सर्व भांडखोर शिपायांना महाराज कैद करून राजगडावर नेऊन कैदेत ठेवतीं व किल्याचे बांधकामाचे घोंडे वाहवतील; असें स्पष्ट बजविलें आहे. पहा

११९

ले. ११९

मु. दा. चा.

श. १५८४ श्रावण शु. ६

इ. १६६२ जुलै १३

बजानीब रजपुतानी देशमुख त रोहिडखोरे माव्लुम दानद सुहूरसन सलास सितैन अलफ मशुरल हजरत राजमान्य राजश्री पंताजी पंडित मौजे अंबोडा (गोल शिक्का आहेत तेथे रायाजी देशमूख बाजाराचे रोजी गेला होता त्यामध्ये अस्पष्ट व पंडीत माइळेमध्ये कळावती जाली ते वख्ती त्या पोराने कमबालबोध) अकली करून माइळेवर चालोन घेऊन बेअदबी कोली त्याबराबरी तुम्हीहि ती तालीक लिखणउनु साहेबास तहकीक खबर मालूम जाली तरी हे तुम्हास कैसे सहले खमजे आहे पंडित माइळे बहुत थोर मनुष्य आहेत साहेबाचे मेहेरेवानीत ते बहुत काही आहे असे असता तुम्ही लाहान लोकी त्यासी बेअदबी केली तरी साहेबांची रवेशी तरी तुह्मास ठावकीच आहे याउपरी कुल कोल तुम्ही पंडीत माइळे पासि जाऊनु बजीद होऊनु आपला गुन्हा त्यापासुन माफ करूनु घेणे जरी सदरहू लिहिलेप्रमाणें अमल न करा आणि ती तालिक रुजु राहे त्याचा बयेदा वारिला नाही म्हणिजे साहेब तमाम रजपुतांचे पायाी बेडिया घालुनु गळां तोग घालूनू किले **राजगडावरी ठेउनु घोंडे वाहवितील** यैसे बरे रीति समजोनू पंडीत माइळे साहेबाचे जागी समजोनु आदब वरखुद राखत जाणे छ ५ जिल्हेज मोर्तब सादर.

मोर्तब

(पत्राचे पाठीवर) बारसुद सुरुसुद
बारबार

ले. ४१ श. १५७८ श्री श. १५७८ भाद्रपद वद्य
भाद्रपद वद्य १० इ. १६५६ सप्टेंबर ३

श्री सके १५७८ दुरमुखनाम सवछर भाद्रपद वदे दसमी वार मग त दिवसी **नारो बापूजी देसकुलकणी ता खेडेबारे** यासि मलजी बिन डिमला मोकदम तर्फ १ मौजे सिवर ता मार आत्मसुरा लेहून दिधले मौजे मजकुरी ता ४ त्यामधे येक तरफ लागली बाकी तरफा ३ त्यामध्ये हरजी त्याच्याने ता लावना म्हणून परागदा होऊन गेला बाकी तर्फा मध्ये आपली तरफ ते आपल्याच्याने लाववेना व

आपलियासि कुल राजी नव्हे व दिवाणची बाकीची तगा (द) सोसना व भाऊबद
हातीचे सोडिले आपणास खावयासि नाही उपवासी काढिल्या हातदार (?) लागलो
याकरिता देसमुखापासी जाऊन आपला हल

नऱ्हेकर देशपांडे : कैफियत

ले. ३० श.[१] १३१७ श. १३१७ मार्गशीर्ष वद्य १०
मार्गशीर्ष वद्य १० इ. १३९५ डिसेंबर ७

(पहिला बंद गहाळ*)

*परंतु काही दिल्हे नाही कोढाणाहून च्यार माणसे पाठऊन त्यास बाहेर घातले. तैसीच दोघे उठोन आपल्या घरास मौजे नऱ्हे येथे गेली आणि नारो आबाजी नऱ्हेकर कुलकर्णी मौजे नऱ्हे निमेचा हाडभाऊ आणि निमेचा वतनसमंधे भाऊ कुलकर्णाचा त्यानी जावलीचा सुभा होता त्यासी हे वर्तमान सांगून त्याने दिवाण दरबारपावेतो कुमक केली आणि दिवाणच्या हाते कर्जाचा वसूल घेतला निमे होन ३०० तीनसे घेतले बाकी तीनसे होने राहिली त्यास दोन महिनियाचा वाइदा दिल्हा तो निमे वाइदा मागावयाबदल गोजो मल्हार व याची स्त्री आऊबाई यैसी दोघ आली आणि पैका मागू लागली तो **मोरोत्रिंबक** याणे त्याचे पदरी पैका घातला त्यास कुसगावचे ख (खिं?)डीने जाणे म्हणऊन सांगितले मोहर खिंडीने वाट चालत नाही वाट पडती म्हणऊन दहशत घातली बराबर दोघ माणसे गडचे चाकर दिल्हे वाटे लाविली गडकरी दोघे दिल्हे होते त्यासी सागितले की खिंडीपलीकडे याचे उभयताचे काम करणें ठिकाणी लावणे दिल्हा पैका घेऊन येणे म्हणऊन त्यास सागितले ती कुसगांवचे खिंडीपलीकडे गेली दोघे मारेकरी याणी गोजोपत यास जिवेच मारिले तलवारेचे दोनी वार पुरे जालें बाइकोवर हात टाकावा तो बाइकोन दोन बोब मारिल्या त्या परभारे सिकारीस राजश्री कानजी नाईक व सुलतानराऊ देशमुख रानात होते सिका

---

१ ही तर्फ खेडेबारे येथील नऱ्हेकर देशपांडे यांची जुनी माहिती देणारी कैफियत असून तिचा पहिला बंद गहाळ आहे.

खेलत आसता त्यानी यैकिले पाठिलाग हाकेस हाक लाविली जवल येऊन मिसळले तो तैसियामधे बाइकोस येक बार तरवारेचा लागोन भाईस पडिली तो सुलतानराऊ कोडो पोहोचोन दोघे मारेकरी धरिले बाइको पाहू लागले तो जीव आहे तिजला सावध करून हाकिकत मनास आणिली तो जाला करिना बाइकोन व मारेकरी यानी सागितला पुरुश तो ठार जाला मेला मुडदा व बाइको व मारेकरी यैसी घेऊन कुसगावास आले आणि मारेकरी यास वर्तमान पुसिले की हे कर्म काये निमित्य केले मारेकरी यानी विदीत केल की हे कर्म मोरो त्रिबक देशपांडे यानी करविले सत्य मिथ्ये साहेब मनास आणून पुढे जो विजार करणे तो करावा पुढे मोरो त्र्यंबक याचा लेक गोविदपंत यास बोलाऊन आणून वाजपूस केली की आम्ही ज्या कर्मास जमान होऊन आपला कागद गोविला उगवणीस खाबद झाले कजिया विल्हे लाविला यैसे आसोन तुम्ही जमीनदार होत आसतां हे कर्म केले पुढे याचा विचार काये आहे या उपर तुम्हास वतन भोगत नाही आम्ही हाकिमाकडून वतन न्हेकरास देतो खुनाचा जाब आम्हास फिटत नाही त्याहीमधे तुम्ही म्हणाल की आम्ही गडचे चाकर चाकरी करितो तरी आम्हास दरम्याने दिल्हे नसते आणि मन मानसे कर्म केले आसते तरी बरच होते येक जिवे मेला तर आगदी भाऊबद मेले की काये पोटी पुत्र आहेत ते मेले की काये यैसी बहूत रवेसीने भाशणे करून मुडदियास आग्न द्यावयाबदल विचार केला तो मधीलमधे गडाखाले हे कर्म दरम्याने दिल्हे न लागे म्हणऊन राजश्री नाईक यानी सुलतानराऊ बराबर देऊन मारेकरी किलियास पाठविले व माहालची बखैर पाठविली आस्तरमानी देसमूख कुसगावी राहिले दिवस उगवताच मोरो त्रिबक यास कसंदिबियान वर्तमान कलले मग मोरो त्रिबक याणे जहर घेऊन निजोन राहिला तैसाच प्राण टाकिला गोविद मोरदेऊ यास हाकिमानी पुरसीस केली की देशमुख दरम्याने जमान असता तुम्ही जमीदार होऊन यैसी कर्म की करिता तुमचा इतबार कोठे राहिला याउपरी तुम्ही किलियाखालते कबिलेसुधा बरे गोष्टी ने जाणे केले कर्म निर्गमून सरकारची ताजी सनद घेऊन येणे मग किलियावर घेऊन नाहीतर सेवेसी तुमचे प्रयोजन नाही यैसा निस्ठुरपणे जाब दिल्हा. मारेकरी यास बदखाना ठेऊन जमीनदारास निरोप दिल्हा की मेलिया मुडद्यास आग्न देणे आणि पंधरावे दिवसी बाइकोच्या

तयार करून निगेने बाइको व तिचे लेक आवलादी आफलादी समेत घेऊन
लियास येणे बरहाक इनसाफ मनास आणून हुकूम करणे तो केला जाईल हाकीम
सदरी (?) परिसोन जमीदार खालते येऊन मुडदियास आग्न दिल्हा पथराचे
बाइको व जमीदार मिलोन गोविदपत गपचूप देखील किलियास गेलेत याने
कतबा दिल्हा की हे कर्म आपणास दखल नाही परभारे बापाने हे कर्म
केले आणि येणेच करून बापहि आपमुत्ये आपघाते मृत्ये पावला. आपणास
आसोन पहनाम (?) करू तरी दिवाणचे गुन्हेगार व गोत-घरी खोटे दिवाणात
खालसा केले पाहिजे परभारे मारेकरी यानी गोही दिल्ही की मोरो त्रिबक
बाप सबनीस म्हणऊन आम्हास हुकूम केला. कर्म आम्ही केले त्याचा जाब
ल्या लेकाने करावा मारेकरी याची तकरीर व गोविद मोरदेव याचा कतबा व
रीर व आऊबाई कोम गोजो मल्हार इची तकरीर यैसिया तीन तकरीरा घेतल्या
णि मारेकरी कोण कोठील हे तहकिकात केली तो मारेकरी बो हणगोजी दलबी
दार मोकदम मौजे कुसगाऊ व रत्नोजी बिन कावजी चोर चौगुला मौजे वेलू
. मजकूर यैसे दोघे जण तहकिकात केली मारेकरी अटकेमधे ठेऊन जमीदार
ली जमा करून पुरसीस केली की हा आन्याये कोणाकडे लागतो तो चौकसीने
तावीने जाहीर करणे जमीदार मजकूर याणी बरहाक न्याये पाहात गोविद मोरदेऊ
चूप याचकडे आन्याये लागला खुनाचा जाब करावा आणि अकरगुणी कर्ज
वे यैसे बहूत मते खरे जाले बजिनस जाहिराना केला हाकिमाने हुकुम केला की
प्रमाणे बोलता आणि दिवाण दरबारी जो हुकूम होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू
णऊन राजिनामे देणे म्हणऊन हुकूम केला त्याजवर देशेमुखानी राजिनामा दिल्हा
की दिवाण दरबारी निवाडा होईल व गोत-घरी निवाडा होईल त्याप्रमाणे वर्तणूक
करू न सकू तर गुन्हेगार तैसेच गोविद मोरदेऊ याने तेच रवेसीने राजिनामा
दिल्हा उपरातिक हुकूम केला की उद-ईक तुम्ही बदगीस जावयास तयार होणे
आणि किला मातबर जमान देणे म्हणजे उदईक रवाना करू किला हाकिमानी
देशमुखास जमान दिनकरराऊ कालभर यानी कासी रामचद्र होनप प्रा पुणे जमान
दिल्हे आणि राजिनामा दिवाणात दिल्हा की जो न्याये गोतघरी व दिवाण दरबारी
निवडून येईल त्यास नव दीगर करणार नाही म्हणऊन राजनामे घेतले ते राजिनामे

व गोविद मोरदेऊ याचा तकरीर कतबा व वजिनस मारेकरी यैसे मिलोन हाकिमाने बेदरी हाजरत पातशाहास बखैर किलाची व नारो हरी मजमूदार किले कोंढाणा यैसे बदगीस जाऊन जाहिराना केला कानगोपासी वखैर देऊन आऊबाई कोम गोजो मल्हार हे दरबारी धूल घालून सांगितले की नहक अन्याये गहजोरी जाली आहे गरिबाची दादी देणे त्याजवर विस्वनाथ कानगो त्यास हुकूम जाला की गपचूप जमीदार आसता आन्याये गरिबावरी गोदावती जाली आहे. तरी गपचूप दूर करून हाली हे बाइकोस वतन देणे गपचुपास वतनासी समध नाही म्हणऊन हुकुम जाला आणि दिवाणपत्र व सुभे कोढाणा येथे हुकूम येथे पोहचला त्यावर विठल गोजो यास पत्र करून गोविद मोरदेऊ याने बेदावा लेहून दिल्हा शालिवाहान शके १३१७ तेराशे सतरा श्रीमुखमान सबछरे मार्गेस्वर वद्ये दसमी इदूबार ते दिनी वतनपत्र पेसजी तुम्हास करून दिल्हे वतन तुम्ही इ।। ता । छतीस वरसे आनभाविले देह देसेकुलकर्ण सुमार ४० व गावकुलकर्ण देह ६ येणेप्रमाणे मोईन हुकूम सिरस्ता टके तीनसे पूर्ववतप्रमाणे दर गावी देशेकुलकर्णपणे तूप ८ ।। । दाहा सेर तेली घाणा सालिना तेल टकबदी ५ पाच सेर व जकाती माजी वगैरे हकलाजिमे व किरकोली व गला भिकणे यैसे आनभवीत हाली नारो आबाजी व रंगो सामराज न्हेकर कुलकर्णी मौजे न्हे ता वेल वंडखोर याचा व विठल गोजो यासी कथला केला मी आपण वजिनस तुमचे भाऊ हाडभाऊ वतनभाऊ यैसी आसोन त्याहीमधे मारियापूर्वी आम्ही तुमची मदती केली आसता आम्हास नविया वतनामध्ये वाटा काये सबब देत नाही आम्ही तुमचे वैसीचे आहो की नाही यैसे बाहीर बाहीर वकवा करू लागले ते वर्तमान किलियास दखल जालियावर हाकिमाने तबी पोहचवून हुकूम केला की ज्याचे निसबतीचा खून जाला आहे वतन त्याने खावे बाजत दुसरिया गोष्टी नाही यैसे करून त्यास ठिकाणी ठेविले तो आलीकडे सैदमझी यास मामला मुलकी हजरतीने देऊन सुभा पाठविला त्याने धामधूम करून जमीदार धरून बदी घातले त्याचा खंड जमीनदारास बेमुबलग पडिला राजश्री कानजी नाईक व सुलतानराऊ यैसे धरून नेऊन बारासे होने घेतली आणि मुलुकास कौल दिल्हा तुम्ही खुनाबदल वतन साधले देसेमुखाचा सेला दिल्हा नाही व मिठाई दिल्ही नव्हती तुमचे वडील विठल गोजो याची आई आऊबाई याचे रजावदीने होन पातशाही

दीडसे देसमुखानी घेतले ते तुम्हास द्यावयास अवकास नाही तेव्हा नारो आबाजी व रगो सामराज याजपासून तीनसे होन घेतले निमे तुम्हास दिल्हे निमे देसेमुखीच्या सेलियाबदल दिले आणि पाठराखे भाऊ तुम्हास करून दिल्हे त्यानी तुम्ही वतन येणेप्रमाणे अनभगावे बा

वडील बगो विठल व रुद्राजी विठल त्यांनी निमे

देसकुलकर्ण देह २० वीस दस्त बो। वतन निमे खावे. वा टक्के १५०; निम्मे भाऊ नारो आबाजी व रघो सामराज यांनी निमे देसकुलकर्णी २० दस्त बरहुकूम वतन निमे

१५० दा टके १५०

याखेरीज गावकलकर्णे बा माजी गावकुलकर्णे पेसजी पुरातन

देह सुमार ६ ता सा वडीलपणाकडे व खुनाकडे दिले

कसबा खेड राजे राहाटवड आरवी असत वरकड वतनसमधे हक ला-

१ १ १ १ जिमे माहार राबणूक निमे घ्यावे कुल-

कल्याण कोंढाणपूर कर्णासी समं (ध) नाही वडीलपणाशी

१ १ समधे बाजार सेव धार उकाला निमे-

येणेप्रमाणे वडीलपणाकडे व खुनाकडे प्रमाणे खावे कसबे मजकुरी रुमाल सा गावकुलकर्णे दिल्हे असेत निमे टिके बिघे १२ बाराचे आहेत थल देसकुलकर्ण वडीलपण मानपान तश्रीफ कडजाई येकूण बिघे १० दाहा वगैरे हकलाजिमा शिरस्ताप्रमाणे व आहेत तो निमेप्रमाणे देखील बागा-माहार राबणूक शिरस्ताप्रमाणे निमे ईत जिराईत निमप्रमाणे खावे १ खावे १

येणेप्रमाणे हरदोजण भाऊ वतन अनभऊन तुम्ही व तुमच्या वंशपरपरेने मुखरुप राहणे कालकला गपचुपाचे वंशीचा कोणी भाऊबद वतनाकरिता तुम्हासी वाद सागेल तर दिवाणचा खोटा गोताचा अन्याई हे लिहिले वतनपत्र सही तेरीख ६ माहे सवाल बीदस्तूर खंडो गोविद होनप देशपांडे प्रां पुणे देश हाली मु कोंढाणा

३१ सु. १०४१ श्री शं. १५६२ माघ शुद्ध १३

१५६२ माघ शुद्ध १३ इ. १६४१ जानेवारी १४

महजर बतेरीख (मो. जा.) माहे जिलकाद हजीर मजालसी बि शरुल हजरत राजश्री दादाजी कोडदेऊ सुभेदार नामजाद किले कोढाणा हाला निहाय

भानजी कोडो हवालदार ता खेडेबारे गोविंद कृष्ण मजमूदार ता खेडेबारे

देशमुख ता खेडेबारे बापूजी मुदगल देशकुलकर्णी ता खेडेबारे

बिन तुलजी कानजी बिन

जोखीजी मोकदम मौजे खोपी

कसबे खेडेबारे मोकदम मौजे नसरापूर

जीव सतन पा मोकदम बापूजी सेट्या खंडोजी भोर्डा पा मो कासुर्डी

तिमाजी महाजन लखमोजी बिन बन पाटील मोकदम

मोकदम मौजे वर्ये मौजे मालेगाव

भिकाजी प्रा मोकदम मौजे करदी मोकदम मौजे वेलू

वाजी बिन कृष्णाजी पा मोकदम केलवडे

सु इहिदे आर्बैन मसा[१] अलफ शके १५६२ विक्रमनास संवछरे माघसुध त्रयोदसी गुरवार ते दिवसी महजर केले जे भिकाजी बिन नाईकजी डिमले मौजे सिवरे ता खेडेबारे नाइकजी बिन तान्हाजी डिमला सिने कल्याण ताच्या सरमोकदमी बदन भांडत आले त्यावरी हाजीर मजाल सांगणे हर दो जणास पुसिले की तुम्ही हाजीर मजालसीस राजी आहात हे मजावस त्यावरी हर दो जण हाजीर मजालसी बहुजूर बोलिले की साहेब हाजीर जे निवडितील त्यास आपण राजी आसो म्हणून बोलिले त्यावरून करिता मजालसीने ता मजकुराच्या देशमुखास पुसिले की हर दो जणाचा जाखोजी कैसा आहे तो सांगणे त्यावरी बापूजी बिन तुलजी व कानजी बिन जा कोडे बोलिले की बेदरी दिवाण होते ते वेलेस भिकाजी मजकूर याचे वडील खात आले व कल्याणची मोकदमी खात आले नाइकजी डिमला यासी कल्याणचे मोकदमीसी व सरमोकदमीसी समंध नाही भोगवटा भिकाजी मजकूर याच्या वडिलांचा चालत आला याप्रमाणे आपलियास दखल आहे त्यावरी देशमुखाचे बोलणे मनास आणून ता मारच्या मोकदमासीहि पुसिले की देशमुख बोलिले हे गोष्टी खरी की खोटी

त्यावरी मोकदम बोलिले जे देशमुखानी सांगितले हे सत्यच आहे यैसी साक्ष गुजरली त्यावर नाइकजी डिमला खोट्याजाला सर मोकदमीचा हक लाजिमा दर गावी रु १ येक व गल येक मण व मान पान व तश्रीफ तिही वतनाची भिकाजीने घ्यावी कल्याणकर डिमले यास सरमोकदमीसी व मोकदमीच्या मानपानासी समंध चही सरमोदमीसी समंध नाही सरमोकदमीची गोष्टी न करावी येणेप्रा निवडले आसे जो हिलाहरकत करील तो दिवाणचा गुन्हेगार होन ५०० पाचशे द्यावे हा महजर सही सांगितला त्यावरी दे(श) मूख म्हणाले जे आपली मोकदकर्मी आहेत आम्ही (?) यल ठेऊन दिवाणची बाकीस कर्जदारास थोड बहूत देऊन पाबवणे यावरी आपण वाणी वेव्हेरी यापासी पाटिली आही (?) पल ठेऊन कर्ज मागत होतो परतु कोणी वाणी नव्हे यावरी मागतेन दे समुखापासी जाऊन उभे राहिलो दे(श)मुखी म्हटिल की येथ तुला कोणी वाणी वेव्हरा नव्हे मग आपण बोलिलो जे च्या आ ही आपला कागद राजश्री नारोपंतास देणे ते राजश्री राजेसाहेबापासून कर्ज देवितील यावरी देशमुखी आपला कागद देऊन रा नारोपतापासी पाठविले मग याणी कागदावरून रो । नारोपंती आपले कर्ज होन ५ पाच दिल्हे आणि शाही थल घालून होन दिल्हा ते आपण घेतले रासी माथा नेदू तरी पाटिलकी डुलली म्हणून खत लेहेऊन दिधले म(ग) तो पैके घेऊन गावासला दिवाणची बाकी थोडी बहूत दिधली यावरी दुसरीहि साली ताबरा दिला याकरिता द्यावयास जागा नाहि पैकियासि दीड वरीस जाले त्यासि ह ऊ ल येक तागयेत होन ९ नऊ तुमचा बाप बापूजीपत त्या हाती ५ यकूण होनू १४ हे आपण द्यावयास मवसर नाही मग आपण मौजे तकुरी तर्फा ४ दिली आसे येथील पानमान व नागर व होलीची पोली दिवाणातील तश्रीफ व किरकोल हक लाजिमा व वडीलपण जैस आपली दर पिडी भोगभोगवटा चालिला आहे तेणप्रमाणे मौजे मजकुराच्ये कदमी वडीलपणाची तश्रीफ तुम्ही पिढी सुख लेकराचे लकरी निभावण आपणास काही मोकदमीस समध नाही व आपला बाप भाऊ कोणी उभा राहिला त्यास समध नाही हे लिहिले सही सु ।। सबा बसैन

आलफ

गोही

मोकादाम मौजे मालगाव नाइकजी मोकदम मौजे देगाव

मोकदम मौजे डिवले बाजी बिन कृष्णाजी मोकदम मौजे

रुद्राजी मोकदम मौते उबर कलवड

व गोदजी पा आरबी दाद पाटील मोकदम मौजे वरये

मोकदम कसबा खेड साडकर

जोसी ता खेडेबारे कसबे खड

तिमाजी माहाजन बापूजी सेटे

सूर्याजी दि देशमुख ता मा

कावजी चौगुला देवडी

ले. ४२ सु. १०५७ श्री श. १५७८ - ७

इ. १६५६ - ५७

सु सबा खमसैन अलफ कारणे [१]नारो बापूजी देसकुलकरणी तपे मजकूर तेथील मोकदमीच्या तरफा चार ४ यामधे यकी तर्फ लागली आहे यक तर्फचा मोकदम हरजी डिमला त्याच्याने लावना म्हणून परागदा होऊन गेला बाकी तर्फा दोनी बितपसील

मलजी बिन रंभाजी डिमला वडील रंग माली बिन बाजमाली

पणाची तर्फ येकी १ तरफ येकी १

हर दो जणाच्या तर्फा त्या त्याच्याने लावतना व त्यास कुल कोण्ही राजी व दिवाणची बाकीचा तगादा व कर्जदाराचा तगादा सोसवना त्याच्या भावबंदानीही हातीचे सोडिले त्यास खावयास नाही यावरी हर दो जण हाजी मजालसी हुजुर येउनू उभे राहोन आर्ज केला जे आपल्याच्याने तरर्फा लावणी व सचणी होवेवना व देवाणची बाकीचा तगादा व कर्जदाराचा तगा(दा) सोसना याकरिता तरर्फा दोन विकून दिवाणची बाकी व कर्जदार कर्ज फिटंना म्हणून हर दो जण हाजीर मजालसीस बोलिले यावरी सदर्हू **नारो बापूजी देसकुलकरणी तपे मजकूर** यासी हर दो जणी आपले खुस विकत दिधल आसे त पैकै तुम्हापासून घेतला बितपसील

तरफ मलजी बिन रंभाजी डिमल तरफ रंगमाली बिन बाज

वडीलपणाची तरफ म्हणून घेतले घेतले टके सभर १००

होन चवदा १४

सदरहू येणप्रमाणे पैके हर दो जणी तुम्हापासून घेऊन मोकदमी निमे तुम्हा दिधली आस मोकदमेचा हक उत्पन्न व पानमान व दिवाणातील तश्रीफ व नावनागर

व इनाम व पटी व पासोडी व होलीची पोली व टिला वडीलपण पिढी दर पिढी भोगवटा सालाबाद चालिला आहे तेणेप्रमाणे लेकराचे लेकरी देखील काली व पाढीर सुख खाणे आपणासी व मीसी अर्थाअर्थी समध नाही आपले कोण्ही वेलीजदार उभ तरी त्यास निस्बती नाही म्हणून हर दो जण हाजीर मजालसीस घालील सदरहू तर्फा हर दो जणी तुम्हास आपले खुसीने विकत दिधल्या असती दो जण आपले तुम्ही लेकराचे लेकरी पिढी अवलाद व अफद सुख मौजे मजकुरीची निमे मोकदमी सुख खाणे हर दो जणास व कोण्ही वेलीजदार खुसी निसबती नाही.

शिवकालीन पत्रसार संग्रह – खंड १

सा. ले. १०५ (६५७) श. १५७५

पृष्ठ १४१ उल्लेख इ. १६५३

श्रींमत शिवाजी महाराज शिवापुरात येऊन बाग आमराई लाववयाकरितां धरणाचे काम लावले.

खं - २०, ले - ५५, ५६ (१२७७) श. १५९१ मार्ग व .९

सु. १०७० रजब २२ उल्लेख इ. १६६९ डिसें. ६

(रकमालापैकीं) रा. मोरो त्रिमल प्रधान यांचे खुर्दखत आहे की मौजे. मांडणी प।। शिखळ येथे पंठ संभापूर करून वसाहत करण्यांस जागा दिली.

शिवकालीन पत्र सार संग्रह – खंड २

सा. ले. २७५ (१७८१) श १५९७ अश्विन शु. ४

मु. १०७६ रजब ३ शिव. मु. मर्या. सी. इ. स. १६७५ सप्टें १३

रा. शिवाजी राजे – माहादाजी सामराज, सुभेदार व कारकून, कर्यातमावळ बकाजी फर्जंद साहेब कामावरी कष्टमशागती करितो. याबद्दल साहेबी मौ. खामगांव येथील स्वतःचे पाटिलकी वतन बकाजीस दिले असे. ते चालविणे खं. १८, ले ६०. (२३२५) श. १५८९ इ. १६६७

मोरो तानदेऊ होनप देशपांडे यांचे पुत्र तान्हाजीराम व त्यांचा गुमास्ता नामाजी लांडा. हे वारल्यानंतर नामाजीच्या पांच मुलांपैकी यादव संभाजीकडे व निळो सोनदेव यांचे नातलग आपाजी व अंताजी. हेहि नामाजीचे पुत्र, शिवाजी राजांकडे नोकरीस राहिले. पुढे शाहिस्तेखान पुण्यावर आला. त्याकडे तक्रार

केली. पण इतक्यांत खान दिल्लीस परत गेला. त्यावर जयसिंग आला. त्याकडे कर्यात मावळ व इतर मावळे इत्यादींचे दे ।। डे, दे ।। ख इत्यादी मंडळी आली. त्यांनी तीन लाख होन करार करून वतने दुमाले करून घेतली.

शिवकालीन पत्र सार संग्रह – खंड ३

पे. द. ३१ ले. ४ (२३७६) श. १५२५ श्रावण शु. ९

सु. १००७ए रखर ७ सनद इ. स. १६०६ ऑगस्ट २

रा – शहाजी राजे भोसले ... रा. बापूजी मुद्गल देशपांडे कसबे खेड तर्फ खेडेबारे येथे जमीन बाग लावण्यास बागेसरीची मजमू सांगोन सालिना तैनात होन १०० करार केले असे.

पे. द. ३१, ले. १६ (२४५४) श. १५५८ मार्ग व ८

सु. १०३७, रखर २० इ. स. १६३६ डिसें ९

महमदशहा महमदआली – हवालदार व कारकून अंमल दौलतमंगल, ... बापूजी मुद्गल यास इनाम बमय कुलबाब मेहेरबानी फर्मावून ठेविले आहेत. दुमाला करून हुकुमाप्रमाणे चालवावे.

कर्याज् मावळचे लांडे – देशपांडे, ... त्रै. २३.३; शके १८६४, पौष, इ. स. १६४३, जानेवारी ... ऐतिहासिके संकीर्ण साहित्य ४; पृष्ठ ९३; लेखांक ५०, कै. स. ग. जोशी शके १६२५ इ. स. १७०६.

हकिकत :

लांडे (देशपांडे) डोणजेकर यांचा मूळ पुरुष "**कृष्णाजी**" हे मूळ गांव सेकीन सर्जापूर व कळंबे व इडमिडे पाईन किल्ले वैराटगड तर्फ वंदन, जिल्हा–सातारा राहिले. त्यांनी आपली मुले तान्हाजीराम होनप देशपांडे यांचे घरी शागिर्दीस ठेवली. कृष्णाजीस पुत्र दोन. वडील बाळाजी व धाकटा नामाजी. आणि विठीबाचा पुत्र नरसोबा. पैकी नामाजी लिहिणार सरंजाम देखोन होनप देशपांडे यांनी तर्फ कर्यात मावळ दहे ३६ येथील देशकुलकर्णावर पेशजी गपचूप गुमास्ते ठेविले होते. त्यांची नजर बदलली म्हणून त्यास तगीर करून **नामाजी कृष्ण** यास गुमास्तेगिरी सांगोन **पाठविले. विठोबांचे पुत्र नरसोबा यास ठकार–कुलकर्णी मौजे डोणजे व गोऱ्हे खुर्द या दोन गावचे कुलकर्ण पांच कुडवीने सांगितले. बाळाजी कृष्ण यास संतान झाले नाही.**

नामाजिस पुत्र पांच. अनुक्रमे अप्पाजी, तुकोबा, अंतोबा, यादव आणि रंगोबा. नंतर नामाजी गुमास्तेगिरी करून कागदाचा शिरस्ता हक्क वगैरे होनपास देत गेला. तो वारल्यावर आप्पाजीने प्रतारणा करून दस्तुर खुद म्हणून कोंडाणा उर्फ सिंहगड येथे विजापुरचे बादशहाकडून उदयभान राठोड किल्लेदार असतां, जमाबंदीस कर्यात मावळ, पुणे देश वगैरे जमिनदार किल्ल्यांवर जमा झाले. तेथे जमाबदी होऊन कौल शिरपाव द्यायचे वेळेस कर्मात मावळचे देशपांडे आपण म्हणून नामदेव पुढे आले. ते वेळेस बाबाजी राम होनप देशपांडे पुणे यांनी पदरि धरिला की तूं गुमास्ता असून आम्ही खुद्द हाजीर असतो शिरपाळ घेण्याचा तुज अधिकार नाही तुझा बाप नामाजी मौत जाहल्यापासून आमच्या कागदाचा शिरस्ता व हक्क लाजिमा वगैरे तुजकडे राहून गेला आहे तो देणे.

त्यावेळेस कब्जा माजला तेंव्हा किल्लेदार यांनी मनास आणतां गुमास्ता ठरला. त्यावरून आप्पाजीपासून होनप यास शके १५९० चे साली फारखती देवविली. नंतर गुमास्तोगिरीवर ठेवला. त्यावर आप्पाजीचे भाऊ तुकोबा व यादव व रंगोबा शिवाजीराजे भोसले यांचे स्वारीबरोबर चंदी-चंदावर कर्नाटकांन जाऊन बस्तावार (?) जाहले. देशी आल्यावर फिरोन देश कुलकर्ण्यांच्या मानपानास खलेल करूं लागले. ते समयी शिवाजी महाराजांच्या होनपांनी बिदीत केले. परंतु निळो सोनदेव मुजुमदार, किल्ले सिंहगड मजकूर याने पाठ राखली. शिरस्ता न देऊन आप्पाजीस रुजू होऊ न देत म्हणून महाराजांस समस विनंति केली. पुरंदरचे मुक्कामी होते तेथून करंजावणे व पायगुडे यास महाराजांनी पत्र सन तिस्सा सबैन व अलफ शके १६०० चे साली लिहून दिल्हे की मोरो विठ्ठल व बाबाजी राम देशपांडे पुणेकर यांचे देशपांडेगिरीचे वतन तर्फ कर्यात मावळचे असतां दरम्यान आप्पाजी खलेल करतो. तर त्यांचे त्यास देववून लांडे यास तगीर करणे. त्यावरुन आप्पाजीस तगीर करावे तो देशमुखास रदबद्दलीस घालून पुन्हां गुमास्तेगिरी बदली करून घेतली. त्यानंतर शिवाजी महाराज कैलासवासी झाले. संभाजी महाराज हे सातारीयास असतांना दिल्लीहून कबजा व महाराजास बादशहाकडे फौजा येऊन घेऊन गेले. मुलुकांत मोगलाई अंमल, त्यावेळेस फिरोन आप्पाजींने बदलोन दस्तके व हक्कालाजिमा वगैरे होनप देशपांडे यास देईनासा झाला. म्हणोन मोरो विठ्ठल व

बाबाजी राम होनप देशपांडे यांनी पुण्याचे ठाणेदार, काजी महंमद, तुळापुरी कारभार करीत असतां त्यास इकिकत सांगून आप्पाजीस धरुन नेले. तेथे बारा मावळ व पुणे देशचे जमिनदार जमा झाले होते. त्यांचे गुजारतीने इन्साफ केला तेंव्हा काईल झाला की मी गुमास्ता, माझी कारकूनीच आहे. शिरस्ता मजकडे राहून गेला असेल तो देतो परंतु गुमास्तिगिरी कायम राखावी. तेंव्हा काजी महंमद यांनी मागील सारा संदर्भ लावून फारसी पत्र शिक्क्यानिशी व चार जमिनदारांच्या सही शिक्क्यानिशी होनपास सन १०९९ म्हणजे शके १६११ ची साली करून दिले. नंतर गुमास्तेगिरी कागद करून फिरून गुमास्ते ठेविले बादशहास अर्ज केला की तर्फ कर्यात मावळचे देशपांडे पण मला दिले पाहिजे. तेंव्हा बादशहा बोलिले की वाटेल त्याला देईन. ते वेळेस बाळाजी कृष्णा यास संतान नव्हते. ते वाटून बादशहाचा खाना खायला. सबब त्यांचे नांव **लांडे-देशपांडे** म्हणून सनद शके १६२५ व्ययनाम संवत्सरे (इ. स. १७०६) करुन दिले. तेव्हांपासून लांडे यांची देशकुलकर्ण तर्फ कर्यात मावळचे झाले. नामाजीचे पुत्र पांच. पैकी **तुकोबा व अंताजी व अंतोबा** यांचा वंश कर्नाटकात राहिले आणि **आप्पाजी व यादव** यांचा वंश या देशी आहे.

शके १७४४ चे वेळची वंशावळ

- कृष्णाजी
  - बाळाजी (नकल) (वाटून वतन मिळविले
  - नामाजी गोदाबाई
    - तुकोबा रंगोबा (वंश कर्नाटकांत आहे.) (ठकार-गोऱ्हेकर यांची संग्रहातील कागगदावरून नक्कल केली)
    - अंतोबा
    - आप्पाजी
      - नामाजी
        - धोंडो शके १६५४
          - देवाजी
            - जगन्नाथ दत्तक घेतला
        - म्हादोजी
          - पंताजी
            - मोरो
            - जगन्नाथ दत्तक दिला
            - दाजी
    - यादव
      - रामचंद्र
        - यादव उर्फ तात्याबा
        - महिपते उर्फ बऱ्याबा (हाराब्या)
          - मल्हार ३ पुत्र
            - अंबाजी वगैरे
          - सदाशिव
- विठोजी
  - नरसोबा (यास ठकारांनी डोणजे व गोऱ्हेखुर्दचे कुलकर्ण दिले.

कोंडे देशमुख यांच्या कामथडी येथील पाटीलकीचा वाद : -

मैजे कुसगांव तर्फ खेडेबारे येथील पाटीलकी कोंडे देशमुख यांची आहे. त्यांतील आठवी तक्षीमेतील पिराजी बिन बाबाजी कोंडे यांनी आपली आठवी तक्षीम बाबाजी बहिलमे मुसलमान यास विकली. त्याबद्दलची हकिकत अशी आहे.

पुणे महाबळेश्वर रस्त्यावर पुण्याहून २३ मैलावर नसरापूरशेजारी मौजे-कामथडी गांव आहे. या गांवास "शिवगंगा" ही नदी आहे. कामथडी हा गांव शिवछत्रपतिंच्या मातोश्री जिजाबाई यांचा. त्रेथे देशमुख-देशपांडे यांनी हकदारी मिळत नसे. सारा हक्क वसूल आई-साहेबांकडे पावत असे. शिवापूरपासून कामथडी पर्यन्त शिवगंगेच्या पूर्व बाजूची नदीतीरावरील जमीनही जिजाबाईसाहेब यांची शेरी म्हणजे खाजगी मालमत्ता होय. त्याचा वसूल करण्यास आईसाहेब यांनी नारो त्रिंबक पिंगळे हे कारकून ठेवले होते. त्यावेळी शंकराजी बिन खंडोजी इंगळकर हा या गांवची पाटलकी करीत होता. त्यास **कानजी नाईक कोंडे** हा त्या गांवात हात शिरकावण्यास पाहू लागला. तेंव्हा खंडोजी व शंकराजी पाटील बोलले की गांव **मातोश्री आईसाहेबांचा** आहे. तेथे तुमच्या काही दाखला नाहीं. कुल हक्क फक्त आईसाहेबांकडे त्यांचा त्यांचा कमाविसदार गांवास आहे. आम्ही नाईक कोंडे याने सिंहगडचा त्यावेळेचा अंमलदार सिद्दी अंबर (शक १५४५ ते १५५५) यास सांगितले की देशमुखीचा हक्क पाटील खातो-त्यास धरून आणून पारपत्य करावे. सिद्दीने स्वारी पाठवून इंगुळकरास धरून आणणेचा प्रयत्न केला. परंतु पाटलास ही खबर कळून ते स्वारी पोचण्याचे थोडे अगोदर बायका-मुले घेऊन रातोरात गांवातून पळून गेले. ते उजाडतां आदिलशाही हद्दीत शिरवळनजिक पांडे या गांवी गेले. तेथे ते ८०-९० वर्षे राहिले. नंतर शंकराजीचे पुत्र भिकाजी व नातू शिवाजी हेहि पांडे येथेच नांदले. पणतू हिरोजी हा शाहू छत्रपति यांजजवळ पाटीलकीचे वादास उभा राहिला. शंकराजी पाटील पळून गेल्यावर कामथडीची पाटीलकी बाबाजी कोंडे-देशमुख करुं लागला.

या संधीस बहिलमे या आडनांवाचे एक मुसलमान घराणे पुण्याजवळ कात्रज व कोंढवे या गांवची पाटीलकी करीत होते. त्यांतील काही पुरुष सधन असून सावकारी करीत असत. बाबाजी कोंडे याने त्यांस काही पैक्याची नड लागल्यामुळे कामथडीची पाटीलकी आल्लिभाई बहिलमे यास विकली. त्याचा मुलगा सुलतान आणि वल्लिभाई यांनी ते वतन अनभवले. त्या वेळी हिरोजी इंगूळकर हा पाटिलकीस

अडथळा करून वादास उभा राहिला. हा वाद शाहू छत्रपतिंनी खेडेबारे हा प्रांत पंतसचिव यांचे हद्दीतील सबब त्यांचेकडे सोपविला. त्यांचे दरबारी हा वाद १०-१२ वर्षे रेंगाळला होता. नंतर छत्रपतिंनी ताकीद केल्यामुळे हे काम नेटास लागले. बाबाजी कोंडे याचा मुलगा पिराजी नाईक कोंडे याने शेवटी इंगुळकरास निम्मी पाटीलकी देण्याचे कबूल केले. त्यास हिरोजी इंगुळकर बोलला की आम्ही १०-१२ वर्षे वादापायी खराब झालो. आतां खा दिव्य करीन. खरा झालो तर सर्वच पाटीलकी करीन. खोटा झालो तर गांवातून निघून जाईन. त्यावर हिरोजीने सातारप्रांती खंडोबाची पाली येथे दिव्य केले. रवी दिव्यांत खरा झालेमुळे शाहु छत्रपतिंनी पिराजी नाईक कोंडे आणि वल्लिभाईंचा मुलगा बाबाजी यांचेकडून पाटीलकी काढून ती हिरोजी इंगुळकराचे हवाली केली. आणि त्यास महजर करून दिले त्यानंतर बाबाजी मुसलमान पिराजी नाईक कोंडे देशमुख यास म्हणाले की आतां आमच्या पैक्याची वाट काय ? तेव्हां पिराजी नाईक कोंडे यांनी पैक्याकरितां पुष्कळ खटपट केली परंतु पैका मिळेना.

सबब कुसगांव येथील आपली पाटीलकीची आठवी तक्षीम घरवाडासुद्धा बाबाजी वलद वल्लिभाई यास दिली. याच बहिलमे मुसलमानांचे भाऊबंद वाईजवळ खंबाटकी घाटाचे पश्चिम बाजूस कण्हेरी या गांवचे निम्मे पाटील आहेत. यांचा घरठाणा, तेथे **रामदासस्वामीचें शिष्य वासुदेव गोसावी** यांचे मठास लागून आहे. हे पाटील मुसलमान असल्यामुळे होळीच्या पोळीचा पाटलाचा मान यांनी पाटलास दिला आहे. व मठपतीच होळीस पोळी लावतात.

याच बहिलम्यानी कण्हेरीचे मुसलमानांची पाटीलकी सावकारी खाण्याचा घाट घातला होता. परंतु त्या घराण्यांतील एक कर्तृत्ववान आऊबाईनें तो साधू दिला नाही. वाईचे विद्यमान पाटलाचेही आडनांव बहिलमे आहे. असे शक १६११ चे कागदपत्रावरून दिसून येते.

(भा. इ. सं. मं. पुर्वे, स्वीय ग्रंथमाला क्र.६० ... ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड १ त्रैमासिक २४/२ रा अंक, पान ११, अ,क्र ३ ... कै. स. ग. जोशी)

छ. शिवाजी महाराज - यांनी साध्या सुध्या मावळ्यांना योद्धे केले त्याबद्दल जयसिंगराव पवार म्हणतात की

... या गरीब, कष्टाळू काटक व स्वाभिमानी मावळ्यांमधूनच येसाजी कंक,

बाजी पासलकर, बापूजी मुदगल, नारोजी नऱ्हेकर, चिमणाजी नऱ्हेकर, बाळाजी नऱ्हेकर, जिऊ महाला, तानाजी मालुसरे, सूर्याजी मालुसरे, वाघोजी तुपे, सूर्याजी काकडे, बाजीप्रभू देशपांडे ही मंडळी पुढे आली. या साध्या मावळ्यांचे मातीच्या गोळ्याचे महाराजांनी योध्ये केले व त्यांच्या पराक्रमास युक्तीची जोड देऊन स्वराज्याची इमारत बांधली.

शायिस्तेखानावर हल्ला करते वेळी

महाराजांनी आपली एकनिष्ठ सेवक बाळाजी मुदगल व चिमणाजी मुदगल यांच्याकडे खानाच्या छावणीची व वास्तव्याची माहिती कामगिरी सोपविली होती. ती त्यांनी चांगली पार पाडली.

नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे इत्यादी आपल्या सहकाऱ्यांसह महाराज रायगडावरून सिंहगडास आले. नंतर प्रत्येकाच्या हाती फौज देऊन त्यांना महाराजांच्या वाटेवर परंतु मोगलांच्या छावणीपासून थोड्या दूर अंतरावर उभे रहावयास सांगितले. शिवचरित्राचे पैलू यापुस्तकांत द.वा पोतदार म्हणतात की,

जहागिरीच्या आसपासची ठिकाणे व्यापण्यांत येत होती. सैन्य नाममात्र पणे सुलतानाच्या सत्तेखाली काम करीत होते. **बापूजी नऱ्हेकर चिमणाजी/बाळाजी नऱ्हेकर** (नांदोशीकर देशपांडे) मुदगल, शिरवळचे देशपांडे यांच्यामार्फत शिवाजीने हे भाग जिंकले होते. जदुनाथ सरकार हे त्यांच्या **शिवाजी अँड हिज् टाईम्स या इंग्लिशमध्ये खेडचे नऱ्हेकर नांदोशीकर देशपांडे या कुटुंबांनी पुस्तकांच्या बाळाजी बापूजी व चिमणाजी बापूजी मुदगल हे छत्रपति शिवाजी राजांचे बॉडी गार्ड होते असे म्हटले असून ते राजांचे उजवे हात समजले जात होते.**

चिमणाजी बापूजी मुदगल् नांदोशीकर देशपांडे हे लेफ्टनंट किंवा सरदार होते व तेच प्रथम शायिस्तेखानावर हल्ल्याचे ठिकाणी प्रथम गेले व त्याचे मागोमाग २०० मावळे लालमहालांत शिरले.

दुसरी टोळी बाळाजी बापूजी मुदगल नांदोशीकर देशपांडे ही हल्ल्याच्या ठिकाणी बाहेरच्या थांबून, झोपेत असलेल्या मुख्य पहारेकऱ्यांच्या समोरून महालांत शिरून अशी पहारा तुम्ही करतात काय ? असा प्रश्न विचारून नंतर शाहिस्तेखानावर हल्ला केला. त्याने एका टोळीत **नेताजी पालकर** व दुसऱ्या टोळीत **शिवाजी महाराज होते ...**

मथुरेतील तीन दक्षिणी ब्राह्मण (१) कृष्णाजी (२) काशी (३) विसाजी हे मोरोपंत त्र्यंबक पेशवे यांचे मेव्हणे होते. त्यांचेकडे शंभूराजांना ठेवले होते. ते शंभूराजांचे नातेवाईक असल्याबद्दल खात्री पटावी म्हणून त्यांना एकत्र जेवण्याबद्दल (Kinship) सांगितले गेले. ते त्यांनी केले तेंव्हा मोगलांची खात्री पटली.

त्रैमासिक १०:३ पृष्ठ १२९ १०३६/६५१ भाइ सं. मं. पुणे नऱ्हेकर देशपांडे दप्तर यांच्याविषयी श्री. बाबासाहेब देशपांडे म्हणतात की ...

शके १६३८ मध्ये हिंगण्याचे गढीतील पुंड दमाजी थोरात याने बाळाजी विश्वनाश सुभेदार प्रांत पुणे यांना भेटीस बोलावून दग्याने कैद केले. आणि मावळ प्रांती पुंडावा करून दादोजी कोंडदेवांनी **शिवछत्रपतींचे तिसरे वर्षी त्यांचे नांवाचे बसविलेली ''शिवापूर पेठ'' हे गांव जाळून टाकले.**

आदिलशाही अफझलखानाची स्वारी - (कवि परमानंदांचे अनुपुराण प्रसंगांत) ... "कमलोजी साळुंके (सौलाक्षर) येसाजी कंक, तानाजी मालुसरे, कोंडाजी वटखल आणि रामजी पांगारकर (पांगारिक) हे पांच अग्निप्रमाणे पांच तेजस्वी वीर एकेक हजार पायदळासह तसाच प्रख्यात व पांच हजार पायदळा घोडदळासह **असलेला नारायण ब्राह्मण (मुदगल नऱ्हेका-नांदोशीकर-देशपांडे) अशा या सर्वच महायोध्यांनी वेगाने येऊन अरण्याच्या मध्यभागी असलेल्या पुष्कळ योध्यांची** गर्दी असलेल्या शत्रुसेनेस चोहोकडून घेरले

मोरोपंत पेशवे, निळोपंत, आण्णाजीपंत व दत्ताजीपंत हे कोकणांतून मजल दरमजल करून ५/७ गांवे रोज करून सुरतेवरच्या लुटीत सामील झाले.

शिवापूरकर देशपांडे यांच्या शकावणीतील सर्व नोंदी जेधे शकवलीसारख्याच आहेत.

दादोजी कोंडदेव दि. ९।३।१६४७ रोजी वारले. खेडेबारेचा ताबा ६।१।१६४८ पूर्वी आलेला आहे. यावरून दादोजी कोंडदेवाचे पश्चात मुतालिकिचे काम शिवाजी महाराजांनी स्वतःच करावयास सुरुवात केली होती.

कोंडाण्यावर मात्र दादाजीनंतर बापूजी देशपांडे होता. जेधेकरिता सांगतो **की त्यावरी कसबे खेडेबारे (शिवापूर) येथेहि वाडे बंधले.** तेथून बापूजी मुदगल **नऱ्हेकर देशपांडे, त।। खेडेबारे यांचे** राजकारण करून हवालदार, सिद्दी अंबर, **याचेकडून दग्याने किल्ले कोंढाणा** घेतला.

शिवापूर शकावलीची नोंद की ''शके १५६९, (इ.स. १६४७) राजश्री बापूजी पंतांनी किल्ले सिंहगड घेऊन दिले.

शिवकालीन पत्र - सार संग्रह भाग १, भाइसमं पुणे, न.चि केळकर, द. वि. आपटे यांत औरंगजेबाकडे २३ किल्ले छ. शि महाराजांनी सूपूर्त केले. त्याची नांवे पुरंदर, रूद्रमाळ, कोंढाणा (सिंहगड), रोहिडा, लोहगड, इसागड, डंकी, खडकाळा, तिकोना, माहुली, मुरंजन, खिरदुर्ग, भांडदुर्ग, तुळशीकुल, नरदुर्ग, सैरगड, मार्गगड, कोहज, वसंतगड, माणिकगड, कर्नाला, सोनगड व मानगड

छत्रपति शिवाजी महाराजांकडे १२ किल्ले राहिले. त्याशिवाय एक लाख होनाचा मुलुख, ते येणेप्रमाणे

राजगड, तोरणा, लिंगमगड (लिंगाणा) भोरप (सुधागड) सरसगड महागड (महानगड); घोसला, तळेगड, पालगड, उदयदुर्ग, रायरी (रायगड-अशेरी) कुंवारीगड

पान ३३८ लेख क्रमांक १२११ (शि. पा.सा.सं.) नावे क्र / दवि आ

खंड १५ ले २७८ शके १५९० ज्येष्ठ शु.९

सु. १०६८, जिल्हेज ८ इ.स. १६६८ मे १०

... राजश्री थोरले कैलासवासी याणी **चिमणाजी बापूजी** (न्हेकर-नांदोशीकर देशपांडे) यांस पत्र दिले. त्यामध्ये मजकूर लिहिला आहे की **सखोजी भिकाजी** यामध्ये व तुम्ही व **बाळाजी** बापूजी (न्हेकर-नांदोशीकर-देशपांडे) यामध्ये कसबे खेड व खेड शिवापूरच्या कुलकर्णीचा मिराशीचा कथला आहे. त्याबद्दल सखोजी भिकाजी तुम्हांस निवाडा करण्याबद्दल एका स्थळास बोलतात. तो तुम्ही जात नाही. तेंव्हा असे दिसते की, तुमच्या बापाने व भावाने साहेबाचे बळे त्यापासून कुलकर्ण झोंबून घेऊन खात आहांत.

परंतु तुमचे कुलकर्ण नव्हे. असे दिसते. तरी हली **सखोपंत** व तुम्ही एका थळास जाऊन कुलकर्णाचा निवाडा करणे.

सा.ले.१०५	६५७	शके १५७५
पृष्ठ १४१	उल्लेख	इ.स. १६५३

श्रीमंत शिवाजी महाराज शिवापुरास येऊन बाग आंबराई लावावयाकरितां धरणाचे काम लावले.

खं.१७ ले. १०   ७२२   शके १५७९ चैत्र वद्य ९
सु. १०५७ जखर   इ.स. १६५७ मार्च २१

महजर पुणे, देशमुखी नंटा

हाजीर मजलसी : रा: सिवाजी राजे, सामराम निलकंठ (पेशवे) वासुदेव बाळकृष्ण (मजलसी) : सोनाजी विश्वनाथ (डबीर) महादाजी सामराज (सुरनीस) माणकोजी दहातोंडे (सरनौबत); रघुनाथ बल्लाल (स.सबनीस) नूरबेग (सरनौबत, पाऊलोक) सामराज पद्मनाभी (सब पाऊ) देशमुख देशकुलकर्णी वगैरे ...

तंट्याचे स्वरूप (लेखांक ४३२) प्रमाणेच असून दादोजी कोंडदेवांचा निवाडा फिरविला आहे ...

हबाजी वडिले घरी दिधता आहे म्हणोन वडिल, बाजी रुद्राजीचा लेक म्हणौनु वडिल. ऐसी दोघांस वडिलपणाची निसबती व करकसाही तिन पिढ्या लागला आहे. त्याबद्दल तह दिधला की वडिलपणाची तक्सीम दोघास बराबरी. वडिलपणाचे पाऊ प्रत्येकी एक तकसीम. येणेप्रमाणे निवाडा केला आहे.

शेजवळकर पान ३३ - परधर्मीय मुसलमानांच्या सेवेत सर्वच जातीधर्माचे लोक असून त्यांची नीतीमत्ताही समाजाच्या पातळीच्या वर खासच उरलेली नव्हती. अपवादात्मक हाताच्या बोटावर मोजण्याइतके सत्पात्र, वेदविद्यारत ब्राम्हण क्वचित कोठे राहिले असतील. महाराष्ट्रांत कोणत्याही कारणामुळे असो, ब्राह्मणवर्ण हा मराठ्यांपेक्षा म्हणजे बहुजनसमाजापेक्षा अर्थिक किंवा सांस्कृतिक दृष्टिनेही वरच्या दर्जाचा राहिला नव्हता, तर समान पातळीवर राहिला होता.

पान ५०६ shivaji The Great vol I, part II, p-477 [Dutch Records] शिवभारतात आलेले शिवाजीचे पायदळ प्रमुख

कमलोजी सोळंखे, येसाजी कंक, तानाजी मालुसरे, कोंडाजी वरखल **आणि रामाजी पांगेरा हे एक हजार पायदळांतील** अधिकारी असून नारायण **ब्राम्हण हा पांच हजार पायदळाचा** अधिकारी होता.

सामाजिक परिस्थितीचे अवलोकन :

मुसलमानांचे भारतांत आगमन होणेपूर्वी अनेक राष्ट्रे होती. त्यापैकी स्वायत्त व परतंत्र. दोन्ही होती. स्वदेशी व स्वधर्मीय राज्यांकडून जनतेला धक्का पोचत नव्हता. साधारण दहाव्या शतकात, धर्मवेड्या मुसलमानांनी भारतातील जुनी राष्ट्रे

विस्कळीत केली. त्याचा प्रारंभ उत्तर भारतात प्रथम होऊन अंग, वंग, कलिंग, कोसल, गांधार, मगध ह्यांची धुळधाण झाली.

दक्षिण भारतात मात्र साधारणपणे तीनशे वर्षानंतर म्हणजे चौदाव्या शतकांत उपद्रव सुरू झाला. अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रावर धडक देऊन आंध्र, कर्नाटक, गोमांतक आपल्या सत्तेखाली आणली. फक्त विजयनगरचे साम्राज्यांनी ही वाट थोपवून ठेवण्यास मदत केली. त्यांत संत-महंतांनी धार्मिक परिस्थिती सुरक्षित करण्याचे प्रयत्न केले. राजे शिवछत्रपतींनी राजकीय दृष्ट्या आव्हान देण्याचे काम सुरू केले. त्याचसुमारास वायव्येकडून मोंगल, पोर्तुगाज, इंग्रज, फ्रेंच, डच हे व्यापाराच्या निमित्त पुढे करून घुसू लागले.

पाटील हा गांवचा राजा. ग्रामीण जीवन स्वयंपूर्ण व बारा बलुत्यांच्या धाग्यांनी एकत्र विणले असून पाटील हे केंद्रस्थान आहे. त्याला संसारोपयोगी वस्तू गांवांतील बारा बलुतेदार मोफत पुरवित. तांबोळी रोज १०० विड्याची पाने, तेली घरी व चावडीवर गोड्यात तेलाच्या समया, चांभार पायतान, धनगर बैठकीसाठी चवाळा, थंडीमध्ये कोष्टी पासोडी, पाटलीण बाईंना शिपी पाच चोळखण, बाजाराच्या दिवशी फसकी घेऊन गई, जोंधळा, कडधान्ये, माळणींकडून सेबसबजी, कोळ्याने पाणी भरणे, मोळीवाल्याने जळणासाठी सरपण, मांगाने मोटेचा (विहीरीवर) नाडा, घरी राबता महार, कुंभाराने रांजण व वेठबिगाऱ्याकडून गाडी, घोडा गडी माणसे मिळत.

त्याशिवाय पाटलाच्या घरची गुढी प्रथम उभारावी, लग्नसराईत पहिला टिळा पाटलाला, दसरा दिवाळीत सूर-सनई व ताशामर्फ्याची हजेरी, दसऱ्याला शमीपूजन सजविलेल्या घोड्यावरूनच पाटलाने करावयाचे, बैलांना बाशिंगे, झुली घालून, ढोल लेझिम वाजवून भाद्रपद अखेर पोळ्याचा सण प्रथम पाटलांच्या बैलांनी तोऱ्याने मिरवावा. होलिकोत्सव धडाक्याने साजरी करावयाची त्यांत पुरणाच्या पोळीचा नैवेध पाटलांच्याच घरचा. मग शंखध्वनी करावयाचा. महजरावर वा अन्य सरकारी कागदपत्रांवर "निशाणी-नांगर" पाटलांचाच तसेच दरसाळ मानाचा शिरपाव.

पौष माघांत शालू, हरभरा, गहूं वगैरे हिरव्यागार पिकांनी डोलू लागतात. पोरे राखणीस बसत व गोफणीतून पांखरावर दगड भिरकावीत. ऊन उतरल्यावर हुरडा भाजून त्याबरोबर गूळ, खोबरे, गाजरे, भुईमुगाच्या शेंगा, लसणीचे तिखट यांचा समाचार घेत हिरवागार हुरडा मजेत खाण्याचे कार्यक्रम होत. ओल्या हरभऱ्यापासून "हुळा" ही मौजेने खात.

याप्रमाणे वरील कारणाकरितां पाटलास वतनाबद्दल कां बरे आकर्षण असणार नाही? त्यांच्या हक्काकरिता वारंवार तंटेबखेडे होत. म्हणून शिवकालांत अशा वतने देण्यावर छत्रपतींचा विरोध होता.

मोंगल व शिवकाळांत सर्व ब्राह्मण वतनदारांना "पंडीत" हे उपपद लावीत असत. शहाजी व शिवाजी राजे यांची जहागिर पूर्वीपासून असल्याने त्यांत कुलकर्णी-देशपांडे इत्यादी वतनदार देशस्त ब्राह्मण असत. शिवाजीच्या स्वराज्यांत ही सर्व मंडळी आपल्या गुणांच्या जोरावर हवालदार, सुभेदार, एवढेच काय प्रधानपदापर्यन्तच्या जागी कार्यरत झाले.

शिवकालांतील दुष्काळ शके १५५३ मध्ये महाराष्ट्रांत पडला. खुद्द राजांचे घरेवाडे इत्यादी बेचिराख केले गेले होते. त्यांत दादोजी कोंडदेव यांनी पुढाकार घेऊन परिस्थितीत बदल घडवून आणला,

फौज बाळगून युद्धाच्या वेळी सरकारची नोकरी करण्याच्या शर्तिवर राज्यांतील गांवे व जमिनी देण्याची पूर्वापार पद्धत होती. तिला मोकासा म्हणत. मौजे नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा पुणे येथील देशपांडे (नांदोशीकर) घराण्याकडे मुलकी व पोलीस पाटिलकी वंशपरांगत होती. त्याशिवाय सुभेदारी/हवालदार हे पद होते. तो मामलेदार-जिल्हाधिकारी तोडीचे समजले जायचे. शेतसारा वसूल होण्याच्या बाबतीत अधिकार चालवायचा देशमुखाने व वसूल झाल्यावर त्याचा हिशेब ठेवण्याचा देशपांडे यांनी. देशमुखाने त्याचा कारभार दिवाणाच्या साहाय्याने करावयाचा, त्याचा हिशेब मुजुमदाराने तपासावयाचे व दस्तऐवज फडणिसाने नोंदवायचे, जाबजबाब दप्तरदाराने लिहावयाचे, वसूल संभाळावयाच्या पोतनीसाने व पोतनीसाकडे जाण्यापूर्वी नीट पारखून घ्यावयाचा पोतदाराने अशी देशमुखाच्या कचेरीतील कामची पद्धत होती.

पाटलीची चावडी : पाटलाच्या हुकुमावरून महाराने शेतकऱ्याला चावडीत बोलावून आणावे, त्याने आणलेला पैसा पोतदाराने पारखावा व पाटलाच्या ताब्यांत द्यावा, त्याची पावती कुलकर्ण्यांने शेतकऱ्यास द्यावी व पाटलाने तो पैसा देशमुखाकडे द्यावा.

पाटील व कुलकर्णी यांजकडून गांवच्या इनाम जमिनी, रयतवा व पडजमिनी यांचे पत्रक तयार करावे. हेच जमाबंदीचे अंदाजपत्रक होय. याच्याच आधारावर गांवचा वसूल व्हावयाचा.

देशमुख देशपांडे हे अेका अर्थाने मामलेदाराच्या बरोबरीचे जुने अधिकारी त्यांच्या खालचे दिवाण, फडणीस, पोतनीस, मुजुमदार. हे गणले जात. पेशवाईत देशमुख देशपांडे हे शेतकरी वर्गाचे हितकर्ते समजले जात.

वसुली कामास व प्रदेशाच्या बंदोबस्तास सैन्याची जरूरी असे. ते सैन्य शिवाजीच्या यांच्या काळांत राजसत्तेस भय होते ते पेशवाईत उरले नाही हा महत्त्वाचा फरक होय. बाळाजी बापूजी देशपांडे (नांदोशीकर) व चिमणाजी बापूजी देशपांडे (नांदोशीकर) ह्यांच्याकडे सुभेदारी, पोलीस व मुलकी पाटीलकी व सरदारकी होती. व जेव्हा जेव्हा युद्ध होई तेव्हा तेव्हा हे दोघे बंधू व इतर घराण्यांतील मंडळींनी शिवाजीराजांना वेळोवेळी स्वत:च्या घोडदळ व इतर फौजफाट्यानिशी युद्धावर हजर राहून मर्दुमकी गाजवीत असत.

शिवकाल हा मुसलमानी कालाला जोडूनच बाहेर आला आहे. तो सर्वच काळ लढाईचा व धामधुमीचा असल्याने व त्यांत बदल करण्याचे शिवाजीराजांना वेळ मिळाला नाही म्हणून इस्लामी राजवटच बहुतांशी वापरण्यांत आली.

राज्याचे सर्वसाधारणपणे विभाग ग्राम, तर्फ, तपे व परगणा असत. सरकारी अधिकाऱ्यांपैकी एका अधिक परगण्यांवर सुभेदार असे. सेनाधिकारी व त्याच्या मदतीस हा मुलकी अधिकारी सुभेदाराच्या हाताखाली सेना असून तिच्या जोरावर परगणा ताब्यांत ठेवी. बाळाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशपांडे-नांदोशीकर यांच्याकडे सुभेदारी होती व त्यांना या पद्धतीनेच काम करावे लागत असे. तद्वत पोलीस व मुलकी अधिकारी वंशपरांगत होते.

शिवाजीने नवा मुलुख घेतांक्षणीच त्यात बऱ्याच सुधारणा केल्या. जमिनीची मोजणी करून क्षेत्रफळ रयतेला निश्चित करून दिले. अस्मानी सुलतानीमुळे गाव वारंवार ओस पडत. पेशवाईत सुभेदारास पालखी व मुजुमदारांस अबदागिरी ठेवण्याची मुभा होती.

उपलब्ध अप्रकाशित साधनांचे आधारे मुदगल - नऱ्हेकर नांदोशीकर - देशपांडे (पाटील) या इतिहास प्रसिद्ध घराण्याने शेती व शस्त्र समर्थपणे कसे पेलले त्याचा त्रोटक गोषवारा : -

(१) राजमुद्रेत उल्लेख केल्याप्रमाणे "भद्राय राजते" या उल्लेखावरुनच मराठ्यांचे राज्य लुटारुंचे, लष्करी राजवटीचे अथवा सरंजामशाहीचे नसल्याचे

इ.स.१६३० ते १६८० च्या कारभारावरुन दिसून येते.

(२) घराण्याच्या कागदपत्रांत प्रकाशित / अप्रकाशित कागदपत्रे समाविष्ट केली असून त्यातून कज्जे / खटले, वाटणीपत्रे, हकिकती, कैफियती, निवाडापत्रे, याद्या, सनदा, शेती व्यवहारासंबंधीचे कागदपत्रे, याद्या, ग्रा.पं., गोतसभा, वगैरे प्रकारची पत्रे आढळून येतात.

(३) खेडे हा शेती व्यवसायाचा केंद्रबिंदू असून पाटीलपद अनुभवणे म्हणजे इनाम / वतनाचा संपूर्ण विकास त्याने करावयाचा असा "पाटील" शब्दाचा अर्थ आहे. नांदोशी हे गांव देशपांडे घराण्याने बसविले आहे. त्यांनाच खानदानी पाटील (आडनावाचे नव्हे) अशी संज्ञा आहे खेड्यांतील वसाहतीची जागा, तिला "पांढरी" व शेतीखालची "काळी आई" म्हणत. गांवामध्ये देशपांडे - नांदोशीकर हे हवालदार किंवा "राज्यधिकारी" होत. वास्तविक हवालदार हे अशाश्वत पद व पाटील हे शाश्वत पद असून ते चाकरी वतन समजले जाते व त्यांना साऱ्याची बिले तयार ठेवणे हे काम असते. मिरासदार यांचेसुद्धा ते काम असले तरी जमिनीवर आकारलेला सारा नियमानुसार त्यांना भरावा लागतो व मिराशी वतन वंशपरंपरा उपभोगतात. त्यांना "थळकरी" असेहि संबोधतात. (थळ म्हणजे स्थळ) गावामध्ये "बलुतेदार" (बहुदा १२ किंवा कमी अधिक) असून त्यात परीट, न्हावी, सुतार, लोहार, कुंभार, सोनार, तेली, चांभार, जोशी, गुरव मुलाणा हे इसम असतात. त्यांना वतने देतात किंवा वेतनाच्या मोबदल्यात "नख्त" म्हणजे रोख रक्कम किंवा वस्तूरुपाने दिल्यास "गला" म्हणत. गांवकऱ्याकडून चाकरीच्या मोबदल्यात "हकलाजिमा" म्हणतात. ही सोय मुसलमान राजवटीत सुद्धा होती. "मुलाणा" - म्हणजे गावच्या मशिदीची व कबरस्थानाची रखवालीचे काम असे.

वतनदार व्यक्तीचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा यांचे गमक म्हटले जाते. त्यांत समाजातील भांडण तंट्याचे मूळहि वतनांतच असे. वतनावरील अधिकार - प्रत्याधिकार यांतून कज्जाखटल्यांची मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे दंगे धोपे, कारस्थाने, हिंसक कृत्ये, खून, फसवेगिरी इ. गुन्ह्यांना उत येत असे. असतस "पाटील" हा गावचा वंशपरंपरागत अधिकारी असतो. कागदपत्रांतून त्याचा उल्लेख गांव पाटील, मोकदम अथवा मोकदम पाटील असा आला आहे. त्याचा संबंध गांवच्या वसाहतीशी असे. काळ्या जमिनीवर जेंव्हा वसाहतीस सुरुवात झाली तेंव्हापासून पाटीलकीचा उदय झाला असे स्थूलमानाने म्हणता येते. "काळीवर पांढरी रचली" - हे पाटलाच्या कामाचे द्योतक.

लावणी, संचणी, उजवणी ही पाटलाची प्रमुख कामे. पडीत जमिनीत धान्योत्पदन करण्याला पाटलांची मदत होई. त्याची निशाणी "नांगर" - आहे.

"पाटील" हा गोतसभेचा प्रमुख वतनदार, बलुतेदार आणि मिरासदार यांचा त्यांत समावेश असे. पाटलांना विचारात घेतल्याशिवाय हवालदार, कमाविसदार, कारकून अथवा मोकासेदार राजपत्रित अधिकाऱ्यांना निर्णय घेता येत नसे. गावचे संभाव्य उत्पन्न मात्र कुलकर्णी ठरवित असे.

गांवचे शिवार पिकले नाही, अवर्षणामुळे नुकसान झाले, किंवा पिकाची हानी झाली तर रयतेला सारा देण्याचे बळ रहात नसे. अशावेळी पाटील सरकार दरबारी प्रतिनिधित्व करी व सारासूट मिळवून देई.

वरील सर्व गोष्टींचा खुलासा करण्याचे कारण ह्या सर्व गोष्टींची दखल मी पुस्तकात समाविष्ट केलेल्या अप्रकाशित कागदपत्रांत झाल्याचे दिसून येईल. पुस्तकामधील हिशोब जमा वसूल, जमाबंदी, थळझाडा पाहिल्यास सध्यां कृषी विभागाच्या पद्धतीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळेपासून तितक्याच काटेकोरपणे तपशील बघितला जात असे. खाली दिलेल्या काही तपशीलावरून वरील पद्धती स्पष्ट होतील.

(१) अवर्षणकाळी दिलेली सारा - सूट कालील "कौलनामा" पहा :- (पुस्तकात तो दिलेला आहे) "कौलनामा" ...

।। श्री ।।

कौलनामा आज दिवाण किल्ले सिंहगड त ।।। मोकदमानी मौजे नांदोशी त।।। क।।। मावळ सु।। आबी असरैन मया व अलफ बाबे कौलनामा सादर केला ऐसाजे तुजला किल्ले मजकुरास बोलावून आणून खंडणीचे बाबे फर्मावले. त्यावरुनच तुझे बाबे देशमुख व देशकुलकर्णी त।।। यानी मालूम केले की स्थळ मजुकरी पिकाचे हंगामी पाऊस झाला नाही. रिता खरीप व रबीचे पिकाचे कुल अकाल वेळेस झाली आहे. त्यामुळे रयतेस पैका मिळत नाही. जरी याही जीवन पहिले खंडणीचा तह देऊन कौल सादर केला तर खातरजमा पाहिजे. पेस्तर सालकिर्दी मामुरीवर नजर ठेवून नवीन माफक खंडणीचा तह दिधला असे. गा. कबूल कतबा

बेरीज रुपये - ४९ मोगलाई, ० लग
२४।। बाबती
२० मोकासा बाब
९३।।

येकून साडे त्र्याण्णव रुपये रास बरार केले असे उगवती करुन सुखुप किर्ती करणे असे

छ - १४ जमादिलाबल मो ।। सूद
मोर्तब सूद

(२) कधी कधी इनाम वतनाबद्दल पाटीलास जो मुशाहिरा मिळत असे त्यामध्ये कधी कधी त्यामध्ये गडकरी यांचेकडून दिरंगाई होई व कधी मिळतही नसे. त्याबद्दल छत्रपतिंकडून संबंधितांना समज दिला जाई. ते खाली पहा-

म।। अनाम देशमुख व देशपांडे त।।। क।। मावळ यांसी ... पंताजी शिवदेव सुहुरसन सलास अशरीन अलफ ...,

श्री
भार्गवचरणी तत्पर पंताजी
शिवदेव निरंतर

पेशवे दप्तर
इ.क.१४५३
इ.क.८१२२९
इ.स.१७६३

मौजे नांदोशी म।। मजकूर हा गांव राजश्री मोरो बल्लाळ देशपांडे ता।। खेडेबारे यांसी पुरातन इनाम आहे. त्याची दुमालपत्रे सालगुदस्ता सादर केली आहेत. यैसे असतां तुम्ही इनाम सुरळित चालो देत नाही. हा कोण विचार? यांसी मौजे मजकूर इनाम दिला आहे तो हे देशपांडे म्हणून कांही दिला नाही. यांच्या वडिलांनी या राज्यांत सेवा बहुत केली आहे. याबद्दल इनामगांव दिला आहे. तरी या उपरि यासी कटकट करावयाची प्रयोजन नसे. याचा इनाम सुरळित यांजकडे चालविणे. फिरोन भाट येऊं न देणे जाणिजे.

छ - १५ मोहरम
मोर्तब
सुरु सुरु सुरु

वरील आदेशानंतर गडकरी यांना कामावरुन दूर केले. (छत्रपति राजाराम यांचा आदेशानुसार)

(३) दुसरे पत्र छत्रपति शिवाजी महाराजांनी, सचिव, शंकराजी नारायण अंमलदार किल्ले सिंहगड यांना लिहिले आहे. ते खाली दिले आहे.

श्री नक्कल इनाम ११०७ फसली

पेशवे दप्तर कमिशन

इ. क. ४०५७६

इ. स. १६९८

राजश्री सेना सरसर श्री व पंचसहस्त्री व सहश्रीलस्कर यांसी ... नकल अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री शंकराजी नारायण, सचिव सु।। समान तिसैन अलफ मौजे - नांदोशी त।। क।। मावळ हा गांव राजश्री बाळाजी बापूजी यांस राजश्री छत्रपती स्वामीने इनाम करुन दिला आहे. तरी मौजे म ।। रास तगादा हरयेक बाबे करीत नव जाणे. बोभाट आला म्हणजे कोण्हाचा मुलाहिजा होणार नाही. यैसे जाणून वर्तणूक करणे. लेखना

छ - १४ जिलकाद प।। हुजुर लेखनावधि

(४) देशपांडे - पाटील यांची घरे आजपर्यंत चारवेळा दग्ध झाली, जळाली. तीन वेळा सरकारी मदतही मिळाली. त्यामध्ये कागदपत्रे जळाली. गांवही दरोबस्त जळून दंगे धोपे झाले. यामध्ये रयतेवर जुलुम - जाजती करुं नये. लावणीस कुळापासून पैका घ्यावा व जळीत प्रकरणात मदत करावी असे आदेश सुद्धा देण्यांत येत असत. (पहा : हिशेब - जमावसूल)

(५) नांदोशी येथील कुरण, गायरान, गांव वसाहत यांची पालणूकही सुतार, गुरव, परीट, तराळ लावून परत पडजमीन सुधारणा व फळझाडे (आंबा, फणस) नियमितपणे लावली जात असे व त्याबद्दलहि पाटलास मोबदला मिळत असे. (कृपया हिशेब जमा वसूल पहा.)

(६) एकादे वर्षी सारा पूर्ण जमला नाही तर पाटलाला त्याची भरपाई करावी लागते. प्रसंगी पाटीलकीही गहाण ठेवावी लागते. त्यामुळेच पाटलास, सारामुक्त जमीन दिली जात असे. पुस्तकातील पेशवे दप्तर, बखरी पाहिल्यास अशी उदाहरणे त्यांत आहेत. (चिमणाजी बापूजीकर्ज प्रकरण)

(७) पाटलास सणासुदीच्या अथवा इतर प्रसंगी खेड्यातून अग्रहक्काने मानपान मिळे. गांवच्या जत्रेस अथवा उत्सवाच्या तो प्रमुख नायक असे. गावकऱ्याकडून त्याला होळीची पोळी, संक्रातीस तिळ गुळ, तसेच दसरा / दिवाळीस, गुढीपाडवा,

नागपंचमी, पोळा या सणांसाठी सुद्धा भेटवस्तू मिळत. पुस्तकात हिशेब जमावसूल अंतर्गत असे सण दिलेले असून नांदोशीकर-देशपांडे (पाटील) यांना अशा उत्सवाच्या प्रसंगी बराच खर्च अधिकृतपणे करावा लागत असे. उदा.

(अ) गांवखर्च - वडजाई देवस्थान, महादेव व मारुती मंदिराच्या उत्सवाचा प्रसंगी शेंदूर, सांज वात, तेलाबद्दल, नाडा-पुडी, खोबरे, सुपारी, नैवेद्य, नवरात्रीतील नऊ दिवसातील खर्च, दसरा-शिलंगण-आपटा पूजन, पाले जत्रा, आषाढमासी खर्च, किल्ले सिंहगड येथील किल्लेदार, नाकेदार, मोकदम, नायकवडी, पोतदार, ग्रामजोशी-अभिषेक खर्च, संत कबीर, कथेकरी-किर्तन, सिंहगड किल्ल्यावरील सालाबादप्रमाणे स्वारी खर्च, मार्गशीर्ष, पौष व माघमास खर्च, शिमगा-खर्च, नाच्या पोऱ्या.

(ब) चूर्णास खोबरे, गूळ व भांग, आहेर खर्च, संत कबीर, कथेकरी किर्तन, सिंहगड किल्ल्यावरील भाजी, कुलकर्णी यांना मुशाहिरा, रामोशी यास गांव चाकरीबद्दल.

(क) गांवमध्ये अनेक स्थानिक भागांची नांवे ठेवलेली असत व त्यावर गांवखर्च करावा लागे. (कृपया हिशेब जमा वसूल पहावा) उदा.

उंबर शेत, रिठे शेत, यैन शेत, बेल शेत, वड-शेत, आंबे शेत, निंब शेत, भात शेत, विहिर शेत.

.... दही भात पाटी, वड पाटी, बापूजी पाटी, कन्हेर-पाटी

..... पाऊस टिके, चोर टिके, धस टिके, मजार-डिके,

.... जांभूळ दरा, ताम्हण दरा, वावळ दरा, जोग दरा, वड दरा, लोखंड दरा, म्हस्के दरा

.... शेत माची, मुरुड माची, चिंच माची, पळस माची, खेड माची, ठाकूर माची वरील ठिकाणाचे कास टिले व त्यातील किती बिघे क्षेत्र अंतर्भूत आहे त्या चे वर्णन लिहिले आहे. तीच गोष्ट मोकदम, सुतार, परीट, तराळ व गुरव वगैरेंची असे.

(८) खुर्दा अथवा रोकड - गांवापासून सरकारला जे निव्वळ उत्पन्न मिळे त्यापैकी कांही हिस्सा पाटलालनाही मिळे. तो हक्काच्या स्वरुपात मिळे. उदा. पाटीलकीचा हक्क बावीस टक्के दिवाणाचे नेमून घेतले.

(९) पुस्तकात नांदोशी गांवच्या जमाबंदीचे काही कागदपत्रे आहेत. त्यांत नांदोशी गांवातील विहीरी, तलाव, इ. बद्दल माहिती नमूद केलेली असते उदा.

तंस्दी देवालये - तीन - (१) वडजाई (२) महादेव (३) हनुमंत

बगर तंस्दी देवालये - सहा - (१) कालकाई (२) वागजाई (३) बावदेव (४) म्हसोबा (५) जांभुळजाई (६) बागजाई.

बाकीच्या तपशीलांत गांवांत लोकसंख्या किती, घरकुले किती, मर्द (पुरुष) किती, बायका किती, छोक्रा (पुरुष) + (स्त्रिया), आठ बैली, चौ-बैली, सोळा बैली नांगर, म्हशी, बैल, गाई, वासरे, बकरी, पारडी यांचा तपशील सविस्तर दिलेला असतो. व त्याखाली पाटीलांची सही असते.

"गला अथवा ऐनजिनसी" - प्रत्येक जमीनधारकाकडून त्याला काही धान्य अगर इतर वस्तू मिळत असत. उदा. घुगरी (शेतात पिकणारे धान्य, फसकी म्हणजे कोणतेही पसाभर धान्य, पळकी म्हणजे पळीभर तूप अथवा तेल, हुर्डा, गांवच्या कारागिराकडून आणि वाणी व्यापाऱ्याकडून काही भेटवस्तू, दरसाल मिळत. उदा. चांभाराकडून पायपोसी, कोष्टयाकडून "पासोडी" विणकराकडून चोळखण, पेठेतील व्यापाऱ्याकडून नारळ, सुपारी, तूप, मास इ. वस्तू काहीही दाम न देता त्याला मिळत

"**वेठबिगार**" किंवा पाडेवार (गांवकीवर नेमून दिलेला महार व राबता महार म्हणजे घरकामासाठी दिलेला महार, वाजंत्री आणि कारागीर यांच्याकडून ते विनामुल्य काम करुन घेत असे. "तराळ" अथवा येसकर सरकारी निरोप रयतेला पोचविण्याचे काम. उदा. दवंडी पिटविणे.

"**चौगुला**" म्हणजे पाटलांचा मदतनीस. निशाणी नांगर किंवा काठी. पाटलास सारा वसुलीच्या कामी मदत करतो. चौगुला प्रत्येक गांवास असतोच असे नाही.

"**शेटे - महाजन**" - हा देखील वतनदारांचाच प्रकार. नवीन गावाच्या पेठेचे वंशपरंपरागत अधिकारी.

"**देशमुख**" - परागण्यातील सर्व पाटलांचा नायक. आणि देशपांडे हा कुलकर्ण्यांचा नायक. देशमुख मराठा जातीचा. (मराठवाड्यात ब्राम्हण सुद्धा असत) असे.

"**इस्तावा**" - गांवची वाजट - जमीन (पोटखराबा) गरजूंना लागवडीसाठी देणेचे काम देशमुख करी. त्याचा सारा क्रमाक्रमाने वाढविला जाई. कर्नाटकात देशमुखांना "नाडगौडा" आणि कोकणात "देसाई" अशी संज्ञा आहे.

थोडक्यात वतनदार, मिरासदार, बलुतेदार, आणि उपरी या सर्वांचा मिळून हा शिवकालीन गांवगाडा बनलेला होता. आणि या गांवगाड्यातील प्रत्येक घटक समाजाच्या विकासासाठी झटत होता.

"महसूल पद्धती" शिवकालात महसूल पद्धत कशी होती सारा निश्चित करणेपूर्वी जमीनीची मोजणी आवश्यक होती. त्यांत तीन प्रकार होते. दादोजी कोंडदेवाने पुणे मावळ या भागात धारा ठरविण्याचे काम १६३६ च्या सुमारास केले. हा पहिला प्रकार. दुसरा प्रयत्न मोरो त्रिमल पिंगळे याने १६४८-४९ च्या वर्षात शिरवळ परगण्यात व तिसरा महत्वाचा पद्धतशीर प्रयत्न आण्णाजी दत्तो सुरनीस (सचिव) या शिवाजी राज्यांच्या मंत्र्याने केला. (रोहिडखोऱ्यातील परगण्यातील अशाच पद्धतीने जो एक "कौलनामा" दिला आहे त्यावरून ह्या पद्धतीची कल्पना येते.

मोजणीसाठी जे साधन वापरीत त्यास "शिवशाही काठी" असे म्हणत. या काठीच्या लांबीविषयी सभासद बखरीत म्हटले आहे ...

"पांच हात पांच मुठीची काठी, हात चवदा तसूंचा असावा. हात व मुठी मिळून ब्यैंशी तसूंची लांबी काठीची. वीस काठ्या औरसचौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशे वीस यांचा एक चावर. अशी जमीन मोजून, आकारून गांवची मोजून चवकशी केली." पुस्तकात नऱ्हेकर-देशपांडे-खेड शिवापुर मधील असा कौलनामा करण्यात आला आहे. तो पाहिल्यास मोजमाप कसे करीत याचा अंदाज येईल.

.... नंतर आता जसा सात बारा, ७=७अ व १२ चे जमिनीचा उतारा करतात तसे लागवडीखाली असलेल्या जमिनीचाही सर्व्हे नंबर / गट नंबर, (भूमापन क्रमांक), धारणा प्रकार, लागवडीचे योग्य क्षेत्र (जिरायत, बागायत, भात शेती, पोटखराबा, एकूण क्षेत्र. खेड शिवापूर येथील नऱ्हेकर देशपांडे यांचे इनाम जमिनीबद्दल, वंशावळ वगैरे माहिती : -

श्री

इनाम

१२२१

आय् १४३२

कमिशन ९४२२३

राजश्री निंबाजी बांडे हवालदार निगाशाह ब्रात्र, कसबे खेड शिवापूर तर्फे खेडेबारे गोसावी यास -

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री श्री मनोहरगीरे किल्ले सिंहगड व

कमाविसदार कते मजकूर, इसने अशर मया तेन व अलफे (इ.स.१८१२) राजश्री जनार्दन नारायण देशपांडे त. मजकूर यांनी पुण्याचे मुक्कामी विदित केले की कसबे मजकूरी आपले वतनी घर करणे आहे. त्याखेरीज नूतन जागा घर बांधावयास व परसू बागायत नेमून दिल्यास त्या जागेत घर बांधून परसांत बागाईत करून वंशपरंपरेने जाऊ म्हणोन त्याजवरुन तपे मजकूरची नव्वद टक्के जमीन गांवचे वसाहतीची. त्यापैकी खोलेश्वरनजिक जमिन सव्वा दोन बिघा आहे. त्यावर वसाहत नाही. त्याजमुळे लगे मजकूरचे शहाबागकडे लावणी करून थळझाडे व साराही जमेस येत आहे. ती निवासी करण्याबद्दल घेऊन त्या जमिनीचा वापर जमेस येत होता तो वंशपरंपरेने माफ करुन जिल्हेस घर बांधावयास व परसांत मन मानेल तसे घर - जिन्नस बागाईत करावयास जमीन नेमून दिल्ही. त्याची मोजणी कुल लांबी


दक्षिणोत्तर	पूर्व पश्चिम
२७ पूर्वेचे अंगे दक्षिणोत्तर काठ्या नुसार	१४ दक्षिण अंगे पूर्व पश्चिम
२२ मध्य	१५
२० पश्चिम अंगे दक्षिणोत्तर	१५ उत्तरेकडे पूर्व पश्चिम
६९	४४
पैकी तीजाई काठ्या २३	१५ तिजाई काठ्या
एकूण गुणाकार - शिव ...	३४६
वर बिघा ... प्रमाणे ४००	बिघे ८ ।।। =।

यासी चतुःसीमा : -

१ पूर्वेचे अंगे शापूरवाज वलद महंमदशाह वलद नशीबा मुजावर याचे घरामागे. पश्चिमेस परसू आहे. त्याचे बांधास आंब्याची झाडे मुजावर याने लावली आहेत व बांधावर कुडण आहे. त्या बांधाची हद्द.


१ पश्चिमेस उत्तर दक्षिण जनार्दन नारायण देशपांडे तपे मजकूर यास रघुनाथ त्र्यंबक देव यांनी आपले घर व वाणियाची जागा दरोबस्त दिली आहे. त्याचे पुढे वागजाई देव आहे. थोनजी दाजी बिन गोदाजी व राणोजी बिन डोग्राजी गुरव याचे घराचे पाठीमागील परसाचा बांध आहे. त्या बांधाची हद्द ....

१ उत्तर दक्षिणेचे अंगे सरकार बागांतील थडे - पटीची जमीन आहे. त्याचे शेजारी श्री खोलेश्वर देव आहे. त्याचे दक्षिणेस बांधानजिक पाण्याचा पाट पूर्व पश्चिम जात आहे. त्या बांधची हद्द



मौजे नांदोशी : ता. हवेली जि. पुणे येथील देशपांडे (नांदुसकर) यांचे रहाते घर
(पुण्यापासून १२ किलोमीटरवर, पुणे सिंहगड रस्त्यावर धायरी गांवालगत)

पुणे जिल्ह्यातील, देशपांडे–कुलीय व्यक्ती आणि आप्त यांची समाधिस्थाने



१. **नारो बापूजी नऱ्हेकर (देशपांडे - नांदोशीकर) :** यांची समाधी पुण्याहून ३१ कि.मी. अंतरावर थनसरीस. बाण लागून घोड्यावरून पडले, त्यांत मृत्यु. वडगांव मावळ येथे, जानेवारी १६६४ (सुरतेहून पहिल्या लढाईतून परत येत असतांना)

२. **त्र्यंबक सोनदेव डबीर (बाळाजी बापूजी नऱ्हेकर देशपांडे यांचे सासरे) :** अष्टप्रधानांतील 'प्रधान - सुमंत'; पुण्याहून २२ कि.मी., खेड शिवापूर येथे मृत्यु. शके १५९९ पिङ्गल नाम संवत्सरे, चैत्र वद्य १२, दिनांक १८ एप्रिल १६७७. ....शाळेच्या मागे भिंतीलगत त्यांची समाधी व वृंदावन.

३. **सोनोपंत डबीर :** २५ जानेवारी १६६५ राजगडावर मृत्यु.

४. **मोरोपंत त्र्यंबक पिंगळे - पेशवा :** अष्टप्रधानांतील 'मुख्य प्रधान' यांची समाधी व स्मारक रायगडावर. शके १६०२, अश्विन वद्य, पंचमीस दि. ३-४-१६८०. नंतर त्यांचे पुत्र निळोपंत पेशवेपदावर.

५. **चिमणाजी बापूजी नऱ्हेकर - नांदोशीकर देशपांडे :** यांची समाधी मौजे नांदोशी; तालुका हवेली, जिल्हा पुणें. पुण्यापासून ११ कि.मी. अंतरावर, महादेव मंदिराच्या आवारांत.

६. **रामचंद्रपंत निळोपंत सोनदेव : आणि त्यांच्या पत्नी** जानकीबाई रामचंद्रपंत हे अष्टप्रधानांतील 'अमात्य'. समाधिस्थान - पन्हाळा, कोल्हापूर जिल्हा. मृत्यु दि. १३-३-१७१६. 'हुकुमतपनाह' राजांनी दिलेला किताब. ''आज्ञापत्रा''चे लेखक.


७. **केसो नारायण देशपांडे - नांदोशीकर :** फाल्गुन वद्य १२, शके १५९१, सौम्यवासरे संवत्सरे, मंगळवार. दि. ८-३-१६७० रोजी पुरंदर किल्ल्यावर मृत्यु (जेधेकरिना) निळोपंत मुजुमदार यांनी किल्ला जिंकला.

८. **नारायण ऊर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे** हे पंचहजारी घोडदळाचे सेनापती म्हणून अफझलखानाच्या हल्ल्याचेवेळी होते. ते दिंडोरी येथील लढाईत मारले गेले.

हिश्याचा नकाशा : मौजे-नांदोशी, तालुका-हवेली; जिल्हा-पुणे सिटी सर्व्हे नं. ३९ क्षेत्रफळ : ५५९.५० चौ. मीटर

कबजेदाराचे नांव : श्री वडजाई देवस्थान, पंच = १) श्री. मार्तंड रामचंद्र देशपांडे २) श्री. सिताराम धोंडिबा वाटाणे
३) श्री. ज्ञानोबा गोविंद घुले ४) श्री. पिरताजी धोंडिबा चौधरी
५) श्री. बबन नारायण बाळोखे

क्षेत्र एकर/हेक्टर खराबा बाकी - एकर/हेक्टर




स्केल: १ इंचास ५००

सही	सही	सही
तपासणीदार	तपासणीदार	सर्व्हेअर

अस्सलवंर हुकुम नकलेची नक्कल

पुरंदरचा तह : सन १६६५




ह्या तहानुसार मोंगलांना द्याव्या लागलेल्या तेवीस किल्ल्यांची नांवें

पुरंदर, रुद्रमाळ (रुद्रगड), कोंढाणा, रोहिडा, लोहगड, इसागड, टंकी (तुंग), खडकाळा (कोंढाण्याजवळ), तिकोणा, माहुली, मुरंजन, खिरदुर्ग, भांडदुर्ग, तुळशीकुल, नरदुर्ग, खैरगड (अंकोला), मार्गगड, कोहज, वसंतगड, माणिकगड, कर्नाळा, सोनगड, मानगड.

श्रीशिवाजी महाराजांकडे केवळ बारा किल्ले उरले : त्यांची नावें (याशिवाय एक लाख होनांचा मुलूख)

राजगड, भोरप, घोसाळा, उधेदुर्ग, तोरणा, तळेगड, अलवारी (अशेरी), रायरी (रायगड), लिंगणगड, पालगड, कुंबारीगड.

पाच परगणे आणि बारा मावळे



* शिवशाहीच्या आज्ञेवरून खेडेबारे ह्या भागात मरळकर, मांढरेकर, देशपांडे ह्यांचे वतन (इनाम, जहागीरी) अंतर्भूत आहे.

३ दक्षिणेस नारोपंत भावे यांच्या घराची भिंत पूर्व पश्चिम. त्याची हद्द

४ सदरहू जमिनीत झाडे आंब्याची ८, खोलेश्वरा नजिक ३, भोर ५, जांभळीची रोपा १, भोकर १.

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक जमिन पाऊण बिघा सव्वा दोन पांड व त्या जमिनीत एकूण दहा झाडे सुद्धा, घर बांधावयास व बाग करावयास पुत्रपौत्रादि वंश परंपरेने व सारा माफीने दिली आहे. या पत्राची प्रती लेहून घेऊन हे अस्सल पत्र भोगवटीयास परतोन देणे जाणिजे ... १४३२ इ.क.

जुडी अथवा विशेष व पाण्याचा आकार. रु. आ.

नांव, रीत, हंगामानुसार (खरीप / रब्बी) पिकांच्या नोंदी व दरवर्षी घेतलेला आढावा अशा नोंदी घेऊन परगण्याचे अंदाजपत्रक तयार केले असे व एकूण "सारा आकारणी" ठरविली जात असे.

बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा (भाग) पिकाचे करुन तीन तक्षिमा रयतेस द्याव्या, दोन तक्षिमा दिवाणास द्याव्यात .... येणेप्रमाणे रयतेपासून घ्यावे. ही २ / ५ ची पद्धत मलिकांबरच्या काळात पण रुढ होती.


स्वराज्यास लागून शत्रूंचीच प्रभावळ असतांना आर्थिक पाठबळ सुरुवातीस नसताना वरील स्वराज्यास लागून शत्रूंचीच प्रभावळ असतांना आर्थिक पाठबळ सुरुवातीस नसताना वरील शेतीसंबंधी धोरण प्रभाविपणे केल्यामुळेच व युद्धनीती सदैव ठाकली असताना कौटिल्यप्रणीत अर्थकारण व आज्ञापत्राचे महत्त्व पाळल्यामुळेच एकूण राजनीतीही योग्य तऱ्हेने हाताळल्यामुळे स्वराज्याचा डोलारा पुढे पुढे जात राहिला. विशेषत : इ.स. १६४५ ते १७०८ म्हणजे शाहू स्वराज्याचा डोलारा पुढे पुढे जात राहिला. विशेषत : इ.स. १६४५ ते १७०८ म्हणजे शाहू महाराज गादीवर येईपर्यंतचा काळ छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज व ताराबाई यांचा येतो. रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्रही याच संधित येते.

समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत स्वराज्याचा लाभ जनतेस पोचावा या हेतूने स्वराज्यातील कारभार होत असे हे जमीन महसूलासंबंधी व्यवस्थेवरुन ध्यानात येईल. मध्यस्थास दूर करुन **"सरंजामशाहीच्या जाचातून जनता मुक्त करण्याची मध्ययुगातील एकमेव राजवट"** असे शिवकालीन वर्णन करता येईल. तसेच कौटिल्याचे अर्थशास्त्रहि विचारात घेतले असावे असा तर्क करता येतो. कारण कोश संचयाचे सर्वात मोठे, साधन म्हणजे शेतकऱ्याकडून वसूल करण्यात येणारा जमीन महसूल.


जहागिरदार, मिरासदार व वतनदार यांसारखे मध्यस्थांमुळे सारावसुली पूर्ण
क्षमतेने कधी होत नव्हती. याकरीताच छत्रपति शिवाजी महाराजांनी वतनदारीस
विरोध का केला हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.
एका राज्याचा प्रदेश दुसऱ्या राज्याने ताब्यात घेतला तर तो प्रदेश जिंकला
असे आपण म्ह तो. तद्वत **विक्रमार्जीत धन म्हणजे “लूट” नव्हे.** नांदोशीकर
- देशपांडे घरा ाने लहान मोठ्या सर्व लढायात भाग घेतला व त्यांचे अष्टप्रधान
मंडळातील मोरोपंत पिंगळे उर्फ पेशवे उर्फ मुख्य प्रधान व इतर अनेक यांनी
एकशे चाळीसपेक्षा जास्त लढाया केल्या. व स्वराज्यासाठी धनसंचय (लूट
नव्हे) करुन इथेही कौटिल्य अर्थशास्त्रानुसार राजकारण केले. स्वराज्याचे तोरण
शून्यातून निर्माण झाले होते. व लढाऊ तरुणांची जमवाजमव निर्मितीताच भाग
होता. केवळ ध्येयवादामुळेच तरुण मंडळी भगव्या झेंड्याखाली आली. व्यवसायाने
शेतकरी कुटुंबातून आले असल्याने, मावळ्यांची पहिली पलटण पूर्णवेळ सत्तेची
सेवा करणाऱ्या सैनिकांची नव्हती. हे मावळे शेतीचे काम करीत व इतर वेळी
युद्ध - प्रसंग करीत. पूर्ण वेळ लष्करात राहून स्वराज्याचे रक्षण व विस्तार
करणाऱ्या शिपायांची भरती नंतरच्या काळांत झाली. मोठे लष्कर न ठेवता गनिमी
काव्याने युद्धतंत्र छत्रपती शिवाजी महाराजांनी निश्चित केले होते.
सिंहगड जिंकताना तानाजी मालुसरे यांनी “आधी लग्न कोंढण्याचे मग रायबाचे”
करण्याचे ठरवून तो किल्ला ज्याप्रमाणे जिंकला तद् वत नारो बापूजी देशपांडे
(नांदोशीकर) यांनी सूरतेची लढ्यातून जिंकलेली धनसंपदा रायगडावर नेताना स्वतःच्या
सख्या भावास म्हणजे चिमणाजी बापूजी देशपांडे (नांदोशीकर-पाटील) हजारो
बैलगाड्यावर, घोड्यावर ठेवलेली धनसंपदा रायगडावर सुखरुपपणे नेण्यास सांगितले
व त्याच वेळेस समोर आलेला मोंगल सरदार मुकुंदसिंग रजपूत यांचा समाचार
मी घेतो असे नारो बापूजींने सांगितले व त्याप्रमाणे त्याला लष्कराने वडगाव मावळ
येथे अडवून थोपावून ठेवून त्याचेशी घनघोर सामना केला. त्यांत नारो बापूजी
बाणाच्या वेधाने घोड्यावरुन पडून खाली धारातिर्थी पडले. सुरतेचा माल रायगडावर
पोचला पण होता. परंतु नारो बापूजींच्या मृत्युने महाराज अतिशय शोकाकुल झाले.
अशा तऱ्हेने नांदोशीकर देशपांडे घराण्यातील आजोबा - नारो बापूजी (१० / १
/ १६६४) रोजी सुरतेवरील हल्ल्याचे वेळी धारातिर्थी पडले. नंतर त्यांचा मुलगा
केसो नारायण दि. १८/३/१६७० पुरंदर किल्ला जिंकताना व नातू नारोपंत

हिंदुस्थान

मराठेशाहीच्या वर्धनशील सीमा



श्रीशिवछत्रपतींनी शहाजीराजांच्या जहागिरीच्या
२५पट मुलूख संपादन केला.
नानासाहेब पेशव्यांचया आमदानीत मूळ जहागिरीच्या
१३०पट मुलूख मराठेशाहीच्या ताब्यात आला.
सवाई माधवराव पेशवे यांच्या कालखंडात मूळ जहागिरीच्या
२५० पट मुलूख मराठेशाहीच्या अंमलांत होता.



▲ **प्रतापगडचे युद्ध (इ.स.१६५९-६०) व अफझलखानाचा वध :**

प्रतापगड लढाईतील युद्धमंडळ खालीलप्रमाणे होते-

१) नेताजी पालकर-सरनोबत २) मोरोपंत पिंगळे ३) मोरोपंत हणमन्ते
४) नारायण उर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे
५) श्यामराजपंत रांझेकर ६) सोनाजीपंत डबीर ७) निळोपंत मुजूमदार
८) रघुनाथपंत अत्रे-सबनीस ९) गोमाजी पानसंबळ १०) गंगाजी मंगाजी वाकनीस
११) आण्णाजीपंत १२) सुभानजी नाईक -कनखरे १३) कृष्णाजी पानसंबळ
१४) जिवाजी देवकाटे १५) माणकोजी दहातोंडे १६) सुभानजी इंगळे १७) सेनापती
१८) उपाध्ये १९) पिलाजी बेलदार २०) कान्होजी जेधे २१) झुंझारराव मरळ
२२) जिवामहाल २३) श्यामराज पद्मनाभी २४) बाजी जेधे २५) सिद्दी इब्राहीम
२६) कानाजी इंगळे २७) कृष्णाजी गायकवाड २८) रामाजी पांगारकर
२९) कृष्णाजी बंककर ३०) संभाजी कावजी (कोंढाळकर)

Dutch Rcord, Shivaji the great Vol-I Part II, P- 77 वरील इसम लढाईत होते व नारायण ब्राह्मण नांदोशीकर देशपांडे हा पांच हजार पायदळ/घोडदळावरील/अधिकारी सेनापती.

शिवभारत २२ (२-३) मध्ये ही ह्याच पायदळ प्रमुखांची नांवे असत.

नांदोशीकर पंचहजारी सेनापती दि. १७ / १० / १६७० नशिकवणी - दिंडोरी येथील लढाईत रणांगणावर मृत्यू पावले. एकाच कुटुंबातील तीन लढवय्या व तलवारबहाद्दर सरदारांनी सहा वर्षात देशासाठी प्राणार्पण केले.

एवढेच नव्हे तर देशपांडे यांच्या आप्तांनी महत्वाच्या युद्धप्रसंगात एकशे चाळीसपेक्षां जास्त लढायात भाग घेऊन तितक्याच आत्मियतेने स्वराज्यासाठी योगदान देऊन मराठेशाहीच्या सीमा मोठ्या प्रमाणावर वाढविल्या. छत्रपति शिवाजी महाराज सैन्याचा सर - सेनापती पदावर असेलला प्रत्येक मावळा / धारकरी ते सेनापती जिंकू किंवा मरु या आवेशाने कृति करत होते.

बाजी प्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे, केसो नारायण देशपांडे, नारायण नांदोशीकर देशपांडे, नारो बापूजी देशपांडे इत्यादिंच्या बलिदानाने स्वराज्याचा विस्तार वेगाने आक्रमत होता. राज्यभिषेक झाल्यानंतर शिवाजी महाराजांच्या मनात आले की जर नारो बापूजींनी सुरतेवरुन परत येताना वडगाव मावळ येथे मोंगल सरदाराचा बिमोड केला नसता तर राज्याभिषेकाचा प्रसंगहि घडला नसता. बालपणीचा बालमित्र काळाने हिरावून नेला. सुरतेच्या स्वारीनंतर तेराच दिवसांनी त्यांचे वडिल शहाजीराजे होदेगिरे येथे दि. २३/१/१६६४ रोजी मृत्यु पावले.

घोडदळाचा दरारा

गज, रथ, अश्व आणि पदाती या चार जागांवर आधारलेल्या सैन्यास चतुरंग सेना असे नांव आहे. त्यापैकी गज व रथ हा प्रकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करात नव्हता. फक्त पायदळ व घोडदळ. नेताजी पालकर सप्त हजारी घोडदळ, नारायण ब्राह्मण नांदोशीकर-देशपांडे (अनुपुराण, ...) पंचहजारी घोडदळाचा सेनापती होता, प्रतापराव, आनंदराव, धनाजी व संताजी हे पण सेनाधुरंधर व घोडदल प्रमुख होते.

विजापूरच्या दरबारी कवी नुस्रती याने रचलेले "अल्लिनामा" तारिखे इस्कंदरी" हे दोन्ही दख्खनी भाषेतील काव्यग्रंथ शिवकालीन राजकारणाचे व युद्धादि प्रसंगांचे वर्णन करणारे आहेत. त्यांत मराठ्यांचे घोडदळाच्या प्रभावाची कबुली दिली आहे. या योद्ध्यांना वतन व वेतन यांचे आकर्षण नव्हते.

मराठा लष्कराची झेप भुजंगासारखी असते. नुस्रतीनेही मराठा योध्यांची सुरतेवर शिवाजी राजांनी केलेल्या स्वारीचा उल्लेख केला आहे तो -

"या स्वारीचा वृतांत ऐकून सारे विश्व थक्क होऊन आकाशाकडे पहात राहिले. औरंगजेबाने तर दातांत बोट धरले व ते रगडितच तो उद्गारला ही काय अस्मानी

माया म्हणावी ? एरवी भोवऱ्यात फडफडणारा हा पक्षी जमिनीवर आणि सागरावरही झेप घेतो याला काय म्हणावे ? "हा कवी मराठ्यांचा पक्षपाती नव्हता. फक्त छत्रपति शिवाजी महाराजांचा समकालीन होता एवढेच!

शिवाजी महाराज व मराठे केवळ गनिमी काव्याने लढले ही धारणा उभयतांचे अवमुल्यन करणारी आहे. शौर्यात युद्धतंत्राचीही सुयोग्य जोड लाभली होती. परराष्ट्र संबंधही योग्य तऱ्हेने हाताळले गेल्यामुळे व रामचंद्र पंडीत अमात्य शिवरायांच्या अष्टप्रधानांतील एक असल्याने राजाराम महाराजाच्या काळात देखील पोर्तुगीज व मोगल युती होणार नाही याविषयी रामचंद्र पंडीत बरेच जागरुक होते. तशी जागरुकता त्यांनी दाखवली नसती तर इ.स. १७०० च्या पूर्वीच स्वराज्य इतिहास - जमा झाले असते.

१६६५ साली झालेल्या पुरंदरच्या तहासंबंधी बरीच उलट सुलट चर्चा ऐकिवात येते. का तह म्हणजे संपूर्ण शरणागती व ती विजयासाठी घेतलेली "तात्पुरती माघार आहे" हे दुसरे मत. वास्तविक हा तह म्हणजे युद्धनिती व राजनिती या दोन्ही अंगांचा विचार केल्यास हा तह म्हणजे परराष्ट्र संबंधाचे बदलते स्वरुप म्हणूनच गणले जाते.

आरमार छत्रपतिंना सर्वात महत्त्वाचा मुद्दा जाणवला तो आरमारी सामर्थ्याचा आरमार म्हणजे हिंदुस्थानाच्या बाबतीत दर्शनी ढालच समजली जाते. परंतु हा विषये माझ्या घराण्याचा संबंधी नसल्याने संक्षिप्त अहवालाने त्याचे महत्त्व देण्यात हरकत नसावी. कांही इतिहासकारांच्या मते इ.स.१७५६/५७ च्या सुमारास पेशव्यांनी इंग्रजांची मदत घेऊन आंग्रयांचे आरमार उध्वस्त केले. त्यामुळे पेशव्यांच्या या कृत्याने मराठ्यांच्या राज्याचा मृत्युलेख ५० वर्षे अगोदर लिहून टाकला. महाराजांना लष्करात इ.स. १६५७ ते १६५९ च्या सुमारास हजारो गलबंत बांधून सागरी वैभवाच्या साम्राज्याला फायदा होईल अशी अनेक धोरणे अवलिंबली. आरमारी बळ काय असते तेही मराठ्यांना परदेशी आक्रमक व व्यापारी विशेषत : सिद्धी, पोर्तुगीज व इंग्रज यांना दाखवून दिले.

शिवरायांनी शून्यातून स्वराज्याची निर्मिती केली. त्याचप्रमाणे औरंगजेबासारखा प्रबळ शत्रू सतत २५ वर्षे पाठीवर असतानाही मराठ्यांचे राज्य जमिनदोस्त झाले नाही. या यशात <u>युद्धनीती</u> व <u>युद्धतंत्र</u> यांचा महत्वाचा वाटा आहे. मराठ्यांनी जिंकलेल्या सर्व लढायात आदिलशाही वा मोंगल या दोन्ही शत्रुपक्षाचे सैन्यबळ

तौलनिक दृष्टया अधिक होते परंतु युद्धसामुग्री व कोशबल दोन्ही सत्ता मजबूत असतांनाही त्यांचा युद्धांत पराभव झाला. त्याचे वर कारण दिले आहे. या वरील तंत्रात लष्कराची पिछाडी सुद्धा फौजेचे मर्मस्थान असू शकते. या गोष्टी नाशिकच्या वणी-दिंडोरीच्या लढाईतीलउभय सैन्याच्या हालचाली या संदर्भात लक्षात घेतल्यास मोंगलानी तोफखाना आघाडीवर ठेवला होता. मराठ्यांनी तोफखान्याचा भाग वगळून मोंगलांच्या डाव्या उजव्या बाजूने आक्रमण केले. त्यामुळे शत्रू नेमका कोणाच्या दिशेने चाल करतो हे मोंगलास न समजता तोफखाना थंड पडला. सैन्यात गोंधळ निर्माण झाला. व परिणामी त्यांना माघार घ्यावी लागली. मोंगलांचे लष्कर व तोफखाना यांची साथ असूनही विजयाने मोंगलांची साथ केली नाही. म्हणूनच "अलिनाम्यात" कवी नुस्रति लिहितो की "मराठ्यांचे सैन्य म्हणजे केवळ मृगजळ. या सैन्याची धग शत्रूला लागत असे .... वगैरे"

या लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांच्याबरोबर नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे पेशवे व पंचहजारी घोडदळाचे सेनापती नारायण नांदोशीकर देशपांडे (पाटील) म्हणजे सरदार बापूजी मुद्‌गल नांदोशीकर यांचे खापर पणतू होते. जे या लढाईत मात्र (दि. १७/१०/१६७० रोजी म्हणजे शके १५९२ साधारण नामसंवत्सर, कार्तिक शुद्ध १४ ... जे.श.) धारातिर्थी पडले. अशा तऱ्हेने वणी-दिंडोरीचे प्रकाशयुद्धात मराठ्यांनी मोंगलाना धुळ चारली.

देवस्थाने : मुलुख परकी अधिराज्याखाली गेला तरी हिंदु देवस्थानाचे हक्क देवस्थानांचे हक्क तसेच कायम राहिलेले दिसतात. त्याचे एक कारण साहजिकच लक्षांत येते ते हे की अधिराज्य असले तरी देशमुख-देशपांडे हे तसेच कायम रहात असत. इकडील मुलुखात बहुतेक हिंदूच असल्याने त्यांनी हिंदू देवस्थानाबद्दल सहानुभूतिच बाळगली होती.

पत्रव्यवहार : विसाव्या शतकांत अर्ध्यावरच मोडी लिपी शिक्षणक्षेत्रांतून कायमची हद्दपार झाली. पूर्वी पहिल्या इयत्तेपासून मोडी शिकविले जात असे. ही पद्धत बंद झाल्यामुळे दप्तरखान्यांत मोडी कागदपत्रे अक्षरशः धुळीत पडली. बासनांत बंदिस्त झाली. त्यामुळे पूर्वीच्याच प्रकाशित साधनांवर आजपर्यंत मोडीचे मराठीकरण सुरू झाले होते. अस्सल पत्रव्यवहार, शकावल्या, बखरी, हकिकती, कैफियती, पोवाडे वगैरे काव्ये अशी अनेकविध साधने देवनागरीत प्रसिद्ध करण्यात आली.



कसवे-खेड (खेड-शिवापूर) येथील ठकार प्रभूती व्यक्तींची इतिहास प्रसिद्ध वास्तु
(काही ठिकाणी नूतनीकरण झाले आहे.)




कसवे-खेड (खेड-शिवापूर) येथील ठकार प्रभूती व इतर छत्रपति शिवाजींचे सहकारी
मंडळाची इतिहासप्रसिद्ध वास्तु काही ठिकाणी नूतनिकरण झाले आहे.




कसवे खेड येथील खोलेश्वर मंदिर- या इतिहासप्रसिद्ध वास्तूशेजारील छत्रपति शिवाजी महाराजांचे सल्लागार यांची घरे अद्यापही आहेत (पुण्यापासून २२ कि.मी.)



कसवे खेड, इतिहासप्रसिद्ध वास्तु- छत्रपति शिवाजीमहाराजांचे सेवक इ. (पुण्यापासून २२ कि.मी.)



मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्याहून १२ कि.मी.)
येथील ग्रामपंचायत इमारत.



महादेव मंदीर व त्यापुढे असलेले पिंपळाच्या झाडाखाली मुंजाबाचे देऊळ नंदीपासून
साधारण २० फूट अंतरावर चिमणाजी बापूजी नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे
यांची समाधी आहे. (पडीक अवस्थेत)



मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्यापासून १२ कि.मी.) राजाराम देशपांडे यांचे राहते घर. (उत्तरेकडील भागाचा फोटो)



मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्यापासून १२ कि.मी.) राजाराम देशपांडे यांचे राहते घर (जे पूर्वी चार वेळा जळाले होते) दुरुस्त्या करून नवीनीकरण केलेले. (दक्षिण बाजूकडील फोटो)



मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे यांचे मौजे नांदोशी येथील घराची पश्चिमेकडील बाजू (घर जळाल्यानंतर ऊर्वरित भाग)



मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे यांचे मौजे नांदोशी येथील घराची उत्तर-पश्चिम बाजू दर्शविणारा फोटो




मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्यापासून १२ कि.मी.)
राजाराम देशपांडे यांच्या राहत्या घराचे पूर्व व उत्तर बाजूकडील फोटो.



चिमणाजी बापूजी नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांचे समाधीचे ठिकाण-महादेव मंदिराच्या पुढे असलेल्या नंदीच्या दक्षिणेकडील अंगास.(पडीक अवस्थेत)



मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांचे मौजे नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे, येथील राहते घर (उत्तर बाजूकडील फोटो- घर जळाल्यानंतर त्याच ओट्यावर, १९४८ साली घर बांधले.)



मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांचे मौजे नांदोशी घराचा पश्चिमेकडील भाग (अंदाजे ४० फूट उंच)



मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे या एकत्र कुटुंबाच्या मालकीचे असलेले घर, आठशे वर्षापासून सर्व हक्क देशपांडे कुटुंबाकडे असून त्याची पूजा दसरा व माघी पौर्णिमेत दरवर्षी होत असते.



देशपांडे कुटुंबातील व्यक्ति व गांवकरी मिळून दसरा व माघी पौर्णिमेत देवीची पूजा व भजन करून मिरवणूक सुरू होण्याचे अगोदर घेतलेला फोटो



नांदोशी येथील देशपांडे यांच्या घरून मिरवणूक सुरू होण्यापूर्वी देवीची पूजा व आरती करण्यात येते




देवीची मिरवणूक होण्यापूर्वी भजनांत गावकरी दंग होऊन जातात



मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्याहून १२ कि.मी.) राजाराम देशपांडे यांच्या आंबराईत आंब्यांच्या बहारामुळे झाडास टेकू दिले आहेत.




मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्यापासून १२ कि.मी.) राजाराम देशपांडे यांच्या आंबराईत...




मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्यापासून १२ कि.मी.) राजाराम देशपांडे यांच्या आंबराईत...



मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे (पुण्यापासून १२ कि.मी.) राजाराम देशपांडे यांच्या आंबराईत...



वडजाई (वज्रादेवी) माता मंदिर-पुण्यापासून १२ किलोमीटरवर (सिंहगड रोड, तालुका- हवेली, जिल्हा- पुणे) पूर्व व उत्तर भागाकडील फोटो




वडजाई देवीच्या गाभाऱ्यातील उत्सवमूर्ति




"हुकुमतपन्हा" रामचंद्रपंत अमात्य (भादाणेकर-बावडेकर) यांचे समाधीवरील आलेख. पन्हाळा किल्ला



" हुकुमतपन्हा " रामचंद्रपंत अमात्य यांची पन्हाळगडावरील समाधी



रामचंद्रपंत अमात्य यांच्या पत्नी जानकीबाई यांची पन्हाळगडावरील समाधी



रामचंद्रपंतांच्या समाधीच्या बाजूस असलेल्या समाधी



" हुकुमतपन्हा " रामचंद्रपंत अमात्य यांची पन्हाळ गडावरील समाधीच्या
खाली असलेली चक्राकार वलये



दि. ६, ७, ८/११/२००९ रोजी भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे यांचे शताब्दि समारंभ नि
अध्यक्ष बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते श्री. राजाराम शंकर देशपांडे (मुद्गल-नऱ्हेकर-
नांदोशीकर-देशपांडे, पाटील) यांना शाल, श्रीफळ व पदक देऊन सत्कार करण्यात आला.



इतके करूनहि न वाचलेल्या व अप्रकाशित पत्रांची संख्या काही लाखांत भरेल असे भांडार अद्याप अप्रकाशितच आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाकडे आर्थिक मर्यादेमुळे हे काम मोठ्या प्रमाणावर झालेले नाही. पाबळ, पुरंदर, मावळ, हवेली, इंदापूर, भोर शिवनेर, भिनथडी त्या महालांतील गावातील जमिनींची मोजणी-मापणी, पिकपाणी, जमीन वहिवाट वगैरेंची माहिती जमाबंदी कागदांत आढळून आली आहे. (महाराष्ट्रांतील दप्तरखाने - खोबरेकर पृष्ठ १८, अ. नं २५)

इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर त्यांनी सर्वांना जुने कागद हजर करावे असे फर्मान काढले. त्यानुसार ज्यांनी ज्यांनी ऐतिहासिक कागद आणून दिले ते परत करण्याच्या उद्देशाने वेगळे ठेवले. पण कित्येक मालकांनी ते परत नेले नाहीत. म्हणून ते कागद पुणे दप्तराचाच एक भाग होऊन बसले. यामध्ये दप्तरांत पानीपतोत्तर काळापासून १८५७ च्या बंडाचे वेळेपर्यंत प्रसिद्ध घराण्यांची खाजगी व इतर माहिती आहे. १८५७ पूर्व दप्तर एलिएनेशन ऑफीसमध्ये पाठविण्यांत आले. (पृष्ठ १५, अ. नं. १६ म. द. खोबरेकर). मंडळाचे ७००० कागदाचे दप्तर १३ रुमालांत बांधून संग्रह केला असून त्यामध्ये ४७ ठिकाणांहून कागद मिळविले असून त्यांत देशमुख-देशपांडे, कुलकर्णी, कानगो, फडणीस वगैरे सरदार, जहागिरदार इत्यादी घराण्यांचे कागद आढळतात. (पृष्ठ ५७, चांदोरकर पां. मा.)

स. ग. जोशी (पृष्ठ ६०) म्हणतात. त्यांनी इतिहास शोधण्यासाठी सबंध मावळ पालथा घातला आणि सुमारे ९००० कागद मिळवले. ते ३७ दप्तरांत ठेविलेले आहेत.

• • •

मौजे नांदोशी येथील वडजाई मंदिर संबंधी बहपीस ७२८, इनाम जमिनी

बहपिस
फैसल नंबर ७२८
मौजे नांदोसी, पेटा डोणजे, ता. हवेली, जिल्हा पुणे
येथील श्री वडजाई देवीचे इनाम जमिनीबा
फेरीस्त सुद्धा कागद
दप्तरात दाखल तारीख ३० । ११ । ५८
सेज नंबर ९१७

फैसल नंबर ७२८ पौ हा कागद
असे नि।।१
लक्ष्मण कृष्ण कारकून
हजरी बुकातील शेज नंबर १४१
मौजे नांदोसी तर्फ कर्यातमावळ, पेटा डोणजे ता. हवेली

(इनाम ए कमिशन)

जमीन कदीम मापाप्रमाणे	प्रतबंदी नंबर	येकर	आकार सो	इसमाचे नांव	सरकारास येण्याचे रुपये दरसाल
सन १२३९ फसलीचे हिशेबास जमीन दाखल नाही सबब गैर दाखला जमीन इनाम	१७	२८२५	३	श्री वडजाई वहिवाट करणार निंबाजी बिन होनाजी शेळका	

सदरहू श्री वडजाई देवी वा वहिवाट करणार निंबाजी बिन होनाजी शेळका म्हणोन हिशेबी दाखल आहे. परंतु सदरहू शेळका याजला विच्यारता मी देवाचे इनाम जमिनीची लावणी करीत आहे. मी देवाची पूज्या वगैरे कांही करीत नाही म्हणोन जबानी लिहून दिल्ही. याजबद्दल इकडील हुजूर रिपोर्ट होऊन त्याखाली हु॥ नंबर ६१४ तारीख ११ माहे मार्च सन १८५३ इसवीचा त्रिबंक बिन सिदोजी कोली याजकडून कैफियत घ्यावी म्हणोन आल्यावरून मौजे मारचे पाटील याचा जाब घेता त्याणेहि सदरहू देवाची पूजा त्रिबंक कोली हाच करीत आहे म्हणोन लिहून दिल्हे सबब याचकडून कैफियत घेणे ती.

तारीख १४ माहे मे सन १८५३ इसवी
मुक्काम डोणजे
सही
गंगाधर बापूजी अवलकारकून
माहालकरी गांवगना

इसम मजकूर याचे म्हणणे खाली लिहिण्याप्रमाणे -

(१) आमचे नावं त्रिंबक बापाचे नाव सिदोजी व आज्याचे नाव रामजी आडनाव नारगे जात कोली कसब पूज्या करण्याचे उमर वर्ष ३५.

(२) आमचा जन्मजागा मौजे वाघेरा किक्ला, तालुका माहित नाही, व मूळवतनाची जागा मजरे बांदलवाडी ता. पुरंधर व हल्ली राहण्याची जागा मौजे नांदोसी पेटा डोणजे, ता हवेली, जिल्हा पुणे

(३) मौजे मारचे कदीम मापाप्रो श्री वडजाई देवीची किती जमीन इनाम चालत आहे ती माहीत नाही.

(४) सदरहू जमीन सर्वइनाम परंपरा चालावयाची आहे. याजबद्दल सरकारास जुडी वगैरे कांही देणे नाही.

(५) सदरहू जमीन जिराईत आहे मुळी मिळाल्यापासून तसीच आहे.

(६) सदरहू जमीन मुळी देवास कोणी दिल्ही त्याचे नांवहुदा माहीत नाही.

(७) सदरहू जमीन कोणच्या साली दिल्ही ते माहित नसोन अमुक दिवसाचे इनाम म्हणोन सांगण्यास आम्हांजवळ सनदपत्र नाही.

(८) इनाम जमीन संपादन करणार श्री वडजाई देवी त्यावेळेस वहिवाटदार कोण होता व तो आमचे पूर्वज्य नव्हे.

(९) सदरहू जमीन श्री देवास काय कामाबद्दल मिळाली ते माहित नाही. परंतु हल्ली मी देवाची पूज्या करून देवाबत्ती व झाडलोट करीत आहे.

(१०) ज्या दिवसी माजी आमक दूर जाहला त्यावेळी वहिवाटदार कोण होता ते माहीत नाही.

(११) सदरहू जमिनीस सन १२२७ फसलीपासून सन १२५९ फसली पर्यंत कोणी किती दिवस वहिवाट केली ते माहीत नाही. सन १२६० फसलीपासून वहिवाट करीत आहे याजबदल सरकारचा हुप्त कांही जाहला नाही. मौजे मजकूरचे पाटील कुलकर्णी याणी काम करण्यास ठेविला आहे.

(१२) सदरहू जमिन मुळी इनाम मिळाल्यापासून माजी अंमल अखेरदिवस पर्यंत जप्ती वगैरे दिकतजाहली किंवा नाही ते माहीत नाही.

(१३) ज्या दिवशी कुंपणी सरकारचा अंमल सुरू जाहला. त्या दिवशीपासून सन १२६० फसली पर्यंत जप्ती वगैरे दिकत जाहली किंवा नाही ते माहीत नाही. सन मार पासून आजपर्यंत सदरहू जमिन जप्ती वगैरे दिकत नाही बिनदिकत चालत आली आहे.

(१४) सदरहू जमिनीपौ पोट इनाम कोणास काही दिल्ही नाही व सरकारानी हि परत घेतली नाही.

(१५) सदरहू देवाचे इनाम जमिनीची लावणी रयतास लाविली आहे त्याचे उत्पन्न व सदरहू जमीन ज्या कामाबद्दल मिळाली त्या कामाबद्दल परभारे कांही मिळत नाही. त्याचा जमाखर्च बीतपसील जमा----------स्त्रो ९ --------- स्त्रो ३ सदरहू जमिनीचे लागवडखर्च ० सरकारास कांही देणे नाही वजा जाता दरसाल उत्पन्न स्त्रो ३ देवाचे देवळांत लावण्यास रु. ३ तेल घ्यावे लागते त्याजबद्दल

येणे प्रो तीन रुपये खर्च होत आहे. नफा राहात नाही आणखी मिळत नाही.

(१६) सदरहू पंद्रा कलमाचा मजकूर खरा करण्यास सनदपत्र वगैरे काही नाही व साक्षी हि देणे नाही देवाची किती जमीन इनाम कदीम मापाप्रो चालत आहे ती माहीत नाही सरकार हिशेबी दाखल नाही. ते आम्हांस माहीत नाही आणखी काही मजकूर जाहीर कर्णे नाही.

येणेप्रमाणे सवालाचे जबाब माहलकरी, पेटा म्हणजे, ताा हवेली याचे कचेरीत लिहून देण्यास प्रारंभ तारीख १४ माहे मे सन १८५३ शा पुरी तारीख मजकूर

दस्तुर विष्णू पांडुरंग कारकून ताा सदर

सहीच नि।। त्रिबंक बिन सिदोजी कोली याणे केले असे दस्तुरसदर.

सदरहू कैफियतीत जो मजकूर लिहून दिल्हा तो खरा आहे. यांत काही कम जाजती कर्णे नाही म्हणजे इस मजकूर याणे आमचे समोर आज तारीख १४ मिनहू रोजी कबूल करून दाखल्याबद्दल सनदपत्र नाही म्हणोन जाहीर केले सबब परवानगी दिल्ही तारीख मजकूर दस्तुर विष्णू पांडुरंग कारकून ताा सदर

सही गंगाधर बापूजी अवल कारकून

माहालकरी ग्यांवगना

तपासणार हरी कृष्ण हुजूर कारकून ता १० जुलई सन १८५६

वशावल त्रिंबक बिन सिदोजी कोली रहाणार मौजे नांदोसी पेटा डोणजे ताो हवेली याणे मौजे माारचे श्री वडजाई देवीचे व श्री मारुती देवाचे इनाम जमिनीबद्दल कैफियती लिहून देऊन त्याजबरोबर ही वंशावल संपादक श्री देव त्यावेळेस वहिवाटदार कोण व ते आमचे पूर्वज्य नव्हे. सबब आपले पणज्यापासून लिहून दिल्ही असे तारीख १४ माहे मे सन १८५३ इसवी

दस्तुर विष्णू पांडुरंग कारकून ताा सदर.

सहीची नि‍ाा त्रिंबक बिन सिदोजी कोली याणे केले असे

दस्तुर सदर

सही गंगाधर बापूजी अवल कारकून, माहालकरी

गांवगंना

जबानी बाो राघो रामचंद्र पाटील मुलकी काम पाहणार मौजे नांदोसी, पेटा डोणजे, ताा हवेली सन १२६२ फसलीस जबानी लिहून देतो ती.

सवाल

मौजे माारचे सन १२६० फसलीचे हिशेबास नंबर १ पेकर २८२५ आकार स्त्रो ३ ची इनाम जमीन श्री वडजाई देवी म्हणोन खर्च आहे त्या देवाची पूजा कोण करीत आहे व सदरहू जमीन हली पडआहे की काय

जबाब

सदरहू जमिनीची देवाची पूजा त्रिंबक बिन सिदोजी कोली हा करीत असोन सदरहू जमीन हली लागण आहे ही जबानी लिहून दिल्ही. सही तारीख १३ मे सन १८५३

दस्तुर विष्णू पांडुरंग कारकून ताा सदर

सही राघो रामचंद्र पाटील दस्तुर खुद

साक्ष

१ बालाजी बाबाजी कारकून निाा देशपांडे ताा हवेली

१ सखाराम अमृत कारकून निाा देशमुख ताा कर्यात मावळ

आमचे समोर जाहली असे

सही गंगाधर बापूजी आवल कारकून

माहलकरी गांवगंना

कॅप्टन कोपर साा आा इनाम कमिशनर यांजकडे रिपोर्ट नंबर ३४ च्या बरोबर माहलकरी डोणजे यांजकडून रवाना.

पेटा डोणजे, तोा हवेली, इनाम कमेटी कचेरीस विाा रामचंद्र बलाल माहलकरी जबानी बोा लिंबाजी बिन होनाजी शेळका आड शेळके, जात कुणबी, कसब शेतकाम करण्याचे, उमर वर्ष ४६ रार मौजे नांदोसी सन १२६२ फसली जबानी लिहून देतो ती.

सवाल

मौजे माारचे सन १२६० फसलीचे हिशेबास श्री वडजाई देवीकडे इनाम नंबर १ येकर २८२५ आकार रुपये ३ ची इनाम जमीन वहिवाटदार तुझे नांवे असे आहे. त्यास सदरहू इनामाची वहिवाट किती दिवसापासून करीत आहेस व सदरहू जमीन काय कामाबद्दल आहे व ते काम हली तू करीतोस किंवा नाही.

जबाब

सदरहू जमिनीची वहिवाट आम्ही करीत नाही. परंतु देवाचे इनाम जमिनीच लावणी करून सारा तीन रुपये गुरवाकडे तेलाबद्दल देत आहे व सदरहू जमीन देवाचे देवळात दिवा लावण्याबद्दल आहे ते काम मी करीत नाही व सदरहू जमिनीची लावणी अजमासे सात वर्ष पर्यंत करीत आहे.

जबाब

सदरहू इनाम जमीन देवास कधी मिळाली व कोणी दिल्ही त्याजबाा पुराव्याचे कागदपत्र तुम्हापासी आहेत किंवा नाही.

जबाब

सदरहू जमीन कोणीच्या साली दिल्ही व किती वर्ष जाहली व कोणी दिल्ही ते माहित नाही व या इनामचे पुराव्याचे कागदपत्र आहेत किंवा नाही अम्हापासी कांही नाही.

सवाल

सदरहू देवीची पूजा वगैरे करून दिवाबत्ती वगैरेचे खर्चाचे काम कोण करीत आहे.

जबाब

सदरहू देवीची पूजा वगैरे काम त्रिंबक कोली हा करीत आहे मजकडे या जमिनीचा काही वारसा नसोन मी फक्त साऱ्याने जमीन लावणी करून सारा दरसाल देत आहे. पाटील कुलकर्णी याणी माझे नांव हिशेबी वहिवाटदार म्हणोन कशावरून दाखल केले आहे ते आम्हांस माहीत नाही.

येणेप्रमाणे सवालास जबाब लिहून दिल्हे सही तारीख २६ माहे फेब्रवारी सन १८५३ इसवी मुकाम डोणजे

दस्तुर विष्णू पांडुरंग कारकून तारीख सदर

सहीच निाा लिंबाजी बिन होनाजी शेळका यांणे केले

दस्तुर सदर

साक्ष

१ सखाराम अमृत कारकून निन देशमुख ताा कर्यात मावळ

१ वामन दिनकर कारकून निाा देशमुख ताा हवेली

आमचे समोर जाहली तारीख मजकूर
रामचंद्र बलाल माहलकरी, पेटा डोणज

नंबर ३४

पो ताा ३ माचे सन १८५३
ताा हवेली पुणे आवक नंबर
७३५१
वार

हजरत खुाा ज्यामंत कपतान कोपर साा आा इनाम कमिशनर साहेब ---
---------------------- खिजमतीस

अजदास्त फिदवी रामचंद्र बलाल माहलकरी पेटा डोणजे, ताा हवेली आदाय आदाब बंदगी तागाईत तारीख २६ माहे फेब्रवारी सन १८५३ शा पावेतो सरकार कामात हजर असो हजरत सलामत मौजे नांदोसी पेटा डोणजे या गांवी श्री वडजाई देवीचे नावे नंबर १ येकर २८२५ आकार रु. ३ ची इनाम जमीन वहिवाटदार निंबाजी बिन होनाजी शेलका यांचे नांवे दाखल असोन सदरहू मनुष्यास सवाल करून जबाब घेता जबाबांतील हसील की सदरहू जमिनीची वहिवाट मी कांही करीत नाही. साऱ्याप्रमाणे करीत आहे व सदरहू सारा मी कोली यांजकडे देत आहे तो देवाचे कामाकडे खर्च करीतो म्हणोन लिहून दिल्हे आहे त्यास सदरहू इनाम जमिनीबा हिशोबांत नांव दाखल आहे त्याजकडून कैफियत घ्यावी किंवा जो मनुष्य पूजा वगैरे करून वहिवाट करीत आहे त्याजकडून कैफियत घ्यावी किंवा कसे येविसी हुाा येईल त्याप्रमाणे तजवीज करीन.

मौजे मजकुरी श्री मारुतीकडे इनाम जमीन १ येकर ८१२ आकार स्त्रो ८४ आण्यांची इनाम जमीने देवाचे नांवे असे आहे. परंतु हिशेबी अमुक वहिवाटदार म्हणोन नांव लागत नाही व सदरहू जमीन हली पड आहे त्यास सदरहू इनाम जमिनीबद्दल कैफियत कोणाकडून घ्यावी येविसी हुकूम येईल त्याअन्वये अंमलांत आणीन.

येणेप्रो मजकूर खावंदास जाहीर केला आहे. हुाा येईल त्या आन्वये तजवीज करीन खावंदास जाहीर व्हावे पोटी कागद येक असे. हा अर्ज

दस्तुर विष्णू पांडुरंग कारकून
तारीख सदर
आ. इ. क. जावक नंबर $\frac{६१२}{६१४}$

रामचंद्र बल्लाल माहलकरी
पेटा डोणजे

डोणजे सेजनंबर ४९७

अजम माहलकरी पेटा डोणजे, तो हवेली पुणे यांस वडजाई देवीचे ...माबद्दल त्रिंबका कोली पुज्यारी याची कैफियत घ्यावी व त्यास सदरहू शेलका ...ची जबानी लगत करावी.

२ मारुतीचा पुज्यारी जो असेल त्याची कैफियत घ्यावी पुज्यारी नसेल तर ...रहू जमीन पड होण्यापूर्वी ज्याणे लावणी केलेली असेल त्याची घ्यावी समजोन ...ली रिपोर्ट करावा. तारीख ११ मार्च सन १८५३

चिंतो वासुदेव हुजूर कारकून ता सदर

आवक नंबर १००१

पो ता मार्च सन १८५३

तो हवेली, पुणे

जबाब नाही.

दाखल तारीख १४ मिनहू

बार

डोणजे रा नंबर हुजूर अर्ज तारीख १६ मिनहू

११४

सदर हुकुमांतील मजकूर समजला ह्या प्रो तजवीज ठेवितो पोटची जबानी ...कैफियती लगत करण्यास्त व ठेऊन घेऊन खावंदास जाहीर होणेस अर्ज केला ...आहे हा अर्जदार.

दस्तुर विष्णू पांडुरंग कारकून तारीख सदर

सही गंगाधर बापूजी अवल कारकून
माहलकरी गांवगंना

पो तारीख १६ ऑगष्ट सन १८५६ इसवी

अ. नंबर ४०८

मोरो विठ्ठल हुजूर कारकून यास

हा कागद सदरहूचे कैफियतीस लगत ठेवावा. तारीख १६ ऑगस्ट सन १८५६ इसवी मुकाम पुणे.

बहपिस उतारा ५५१/६

उतारा फैसलनंबर ७२८ हा कागद असे निाा ३

लक्ष्मण कृष्ण कारकून

फैसल नामा विद्यमान पिटर डॉड्स साहेबबहादूर

असिष्टंट इनाम कमिशनर उत्तरभाग सन १८५८

इसवी फैसल नंबर ७२८ तालुके हवेली नंबर ८९

मौजे नांदोसी पेटा डोणजे, तालुके हवेली, जिल्हा पुणे या गावाचे हिशेबांत श्री वडजाई देवी इचे नांवाने देवादाये म्हणोन प्रतबंदी नंबर २१७ दोन येकर २८२५ पंचवीस गुंठे आकार ३ तीन रुपयांची जमीन इनाम प्रमाणे दाखल आहे त्याजबद्दल.

दप्तरचा दाखला

सन १२६० फसलीचे हिशेबास श्री वडजाई देवी इचे नांवाने देवादाये म्हणोन प्रतबंदी नंबर १७ दोन येकर २८२५ पंचवीस गुंढे, आकार ३ तीन रुपयांची जमीन सर्व इनाम दाखल आहे. त्याची वहिवाट लिंबाजी बिन होनाजी शेलके करीत आहे म्हणोन सेरा आहे.

सदरहू जमीनीबद्दल फेरीसा तारीख २१ माहे सपटेंबर सन १८५८ इसवीप्रमाणे कागद दप्तरी दाखल आहेत.

सदरहू दाखवल्यावरून फैसल केला जातो जे

सारांश :

मौजे नांदोसी, पेटा डोणजे तालुके हवेली, जिल्हा पुणे येथील जमीन सर्व इनाम प्रमाणे श्री वडजाई देवीचे नावाने देवादाये म्हणोन चालत आहे तेविसी फैसल खाली लिहिल्याप्रमाणे

१ सदरहू जमीन माजी अंमल अखेर चाळीस वर्षांवर इनाम चालली असे गांवचे हिशेबावरून दिसते.

२ सन १८५२ च्या ॲक्ट् ११ अंक २ कलम ७ रकाना ४ अन्वये असिस्टंट

इनाम कमिशनर साहेब ठराव करीतात की, सदरहू जमीन दोन येकर पंचवीस पुढेपर्यंत वडजाई देवीचे इनाम म्हणोन निरंतर चालवावी असे नजरेस आल्यावरन ठराव केला असे तारीख १ माहे सप्टेंबर सन १८५८ इसवी मुक्काम पुणे

दस्तुर आत्माराम रावजी कारकून

वर लिहिले जमिनीवर ज्यास फैसल नामा मिळेल -

त्याशिवाय दुसरे कोणी भाऊबंद अथवा दुसरे कोणचेही लोकाचा मालकी बद्दल किंवा हिशाबद्दल अगर वहिवाटीबद्दल अथवा दुसरे कोणचेही सबबेने दावा असेल तर तो दावा चालण्यास या फैसलनाम्यावरून अटकाव होत नाही. या फैसवलनाम्यात कोणाचे नांव दाखल असल्यामुळे किंवा कोणाचे नांव दाखल नसल्यामुळे कोणाचा वारसा. जमिनीवर कांही कमी अथवा जास्ती होतो असे नाही. जमीन किती दिवस माफीने चालेल इतक्यापुर्ता या फैसल नाम्याचा अर्थ आहे ताा सदर उतारा करणार जिवाजी विनायक कारकून ताासदर

सही पी. डॉडस् लेफ्ट.

असे इनाम कमिशनर, एम्. डी.

सदरहू उतारा यांत ओळ १ यात 'खरे' यास काटव 'खरे' हा शोध असे ताा सदर.

रुजू पाार रामचंद्र कासिनाथ कारकून

ताा सदर

फैसल नंबर ७२८ पौ हा कागद

असे निाा ४ ब.

वामन कृष्ण कारकून

इनाम कमिशन खात्याकडील

रजिस्टर नंबर ३७ फैसल नंबर ७२८, तालुके हवेली, नंबर ८६ मौजे नांदोसी, माहालपेट डोणजे, येथील त्रिंबकजी बिन सिदोजी कोली यांस कळावे की, तुम्ही मौजे मजकूर येथील देवादाये जमिनीबद्दल कैफियत लिहून दिल्ही त्याबद्दल मेहेरबान असिस्टंट इनाम कमिशनर साहेब याणी फैसल करून सारौंषाचा उतारा पाठविला तो तुम्हांस दिल्हा आहे. त्याजवर अपील करावयाची तुमची खुषी असल्यास फैसल्याचे

तारखे पासून शंभर दिवसाचे आंत सदरहू असल उताऱ्यासहित अपिलाची अर्जी मेहेरबान इनाम कमिशनर साहेब यांजकडे पावती करावी. त्या मुदतीनंतर दिरंगाचे योग्य सबबे शिवाय अपील चालणार नाही. जाणिजे. तारीख २४ माहे सप्टेंबर सन १८५८ इसवी

वामन हरी माहलकरी

सदरहू उतारा आम्हांस पावला. त्याजवर अपील करण्याविसी सदरी लिहिलेला मजकूर आम्हांस समजला. तारीख १ माहे अक्टेंबर सन १८५८ इसवी

सही त्रिंबका बिा सिदोजी कोली याचे हातची
निा रेघ

१ लक्ष्मण कासिनाथ कुलकर्णी
मौजे मजकूर

१ अनाजी गोविंद पाटील   रा तारीख ३ नोवेंबर सन १८५८
वामन हरी माहलकरी

सदरहू पावती माहलकरी पेटा डोणजेचे, सेरे रिपोर्टनंबर १३३ ता ३ नोवेंबर सन १८५८ बरोबर आली.

वामन कृष्ण कारकून

बहपीस

मौजे नांदोसी, ता कर्यात मावळ, पेटा डोणजे, तो हवेली

जिल्हा पुणे, येथील श्री वडजाई देवी वहिवाट करणार निंबाजी बिन होनजी शेलका म्हणोन जमीन दाखल आहे त्याबा.

फेरीस्त फैसलनंबर ७२८ ता २१ माहे सप्टेंबर सन १८५८ शा प्रकर्णी कागदाचे बिा पिटर डॉडस् सो असिस्टिंट इनाम कमिशनर उत्तर भाग

१ कैफियत त्रिंबक बिन सिदोजी कोली याची वशांवळ व जबानी राघो रामचंद्र पा मौजे नांदोसी याची ता १३ मे सन १८५३ शाची व जबानी लिंबाजी बिन होनाजी याची ता २५ फेब्रुवारी सन १८५३ शाची व आा इनाम कमिशनर सो यांचे नांवे माहलकरी पेटा डोणजे, याचा अर्ज नंबर ३४ ता २६ फेब्रुवारी सन १८५३ शा चा लगत काम चाललेला सुा यो कागद

२ इंग्रजी प्रोसिडिंग
तयार करणार सदासिव विनायक कारकून ताा सदर
रुजु पाहणार शेषगीर कान्हेरे हुजूर कारकून ताा सदर
३ फैसल्याचा उतारा

४ माहालकरी, पेटा डोणजे, याचे सरे रिपोर्ट नंबर १३३ ताा ३ नोव्हेंबर १८५८ बरोबर आलेली पावती उतारा पावल्याबाा त्रिंबक बिन सिदोजी याची ताार ऑक्टोंबर १८५८ ची सदरहू सेरे रिपोर्ट फैसल नंबर ७२१ यांत दाखल आहे. येकूण कागद च्यार असत. ताा ११ नोवेंबर सन १८५८

तयार करणार वामन कृष्ण कारकून
ताा सिदर

रुजु पाहणार बाळाजी विठ्ठल कारकून
ताा १३।११।५८

लेफटनंट
असिस्टंट इनाम कमिशनर
उत्तर भाग

।। श्री ।।

इनाम आय ६२६/६
कमिशन इसवी १७२१
कमिशन

अस्सल बरोबर नक्कल
आर -१४३२ इनाम

फसली २१३१

स्वास्ति श्रीराज्याभिषेक शके ४८ प्लव संवत्सरे आषाढ शुद्ध प्रतिपदा सौम्य वासरे क्षत्रिय कुलवतंस श्री. राजा शाहू छत्रपती स्वामी यांसी देशमुख व देशपांडे तालुका कर्यात मावळ यांसी आज्ञा केली ऐसिजे.

सिक्का	सिक्का
पंतप्रधान	पंतप्रतिनिधी

मौजे नांदोशी तालुका मजकूर हा गांव रावसाहेब मोरोबाकल्ल ढोंढे बारेकर (देशपांडे) यांस कुलबाब, कुलकानू पेशजीपासून इनाम चालत आला आहे. येणेप्रमाणे करार केला असे. तरी तुम्ही मौजे मजकूर मशारनिल्हेस पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने इनाम चालविणे.

अंमल सिक्का मोर्तब सादर रूजू सुरूजीद सादर

स्व ।।

मंत्री

वार सुदर सूद सदर बार बार

वडजाई देवस्थान : कायम स्वरूपी

अ.नं. ६०, गांव क्रमांक : १७२ नांदोशी

इनाम वर्ग - ३, इनाम कमिशन नं. ७२८,

दिनांक : २१/०१/१८७८

६२६/६

R 1432

स्वस्तिश्रि राज्याभिषेक शके [illegible]

[illegible]

क्षत्रीयकुलावतंस श्रीराजाशाहछत्रप

ति स्वामी यांणी [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


1432

53 of the Bombay Land Revenue Code (Bomay Act of 1879), as it stood on

CULARS OF THE VILLAGES OR LANDS			LAND REVENUE GOVERNMENT			Total	Revenue	Remark
	Area	Survey Assessment	Amount of old judi or if salami	Additionoal quit rent, anympayable under the sand			Alienated	
				Rate	Amount			
13	14	15	16	17	18	19	20	21

A. G. Rs. a. p. Rs. a. p.
8 0 8 0 0 .... 8 0 0

Sd/- x x x Date : 28/01/2000 Round Seal
Asst. Director Pune Architraves, Pune
Pune Architraves Govt. or Maharashtra

Register of Alienated villages and Lands in the Taluka Haveli District Boona

Ser. No.	Name of Village	Name of the Present Alience	Class of Alienations	Num ber	Date month & year	PARTICULARS OF SANAD				
						Name & office of the officer signing it	Name of Holder	Name of the Taluka & Dis. in which it is entered	No. of form of the sanad tp register annexed	Duration of tenure i.e. whether continuable or permanently hereditarily, for more lives than the one or for life only, or for what period
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11

60 Nandoshi Shri Vadjai Class III Assistant Inam Commissioner N.D.'s decision No. 728 Permanent

152 Devi Manager,

Govind, Kashinath Abhyankar

Devastan dated 28 September, 1858

Applicat: Shri. Rajaram Shankar Deshpande

Copy : One; Fee: Rs.21/-

Dated :27/10/99

Copy Ready : 28/1/2000


Rs.19/-(Rupees Ninteen only)

as fee (Indnding Seavch fee)

Round Seal
of Pune Archi
Govt of Maha.

for this certified extract Pune
Pune date 27/2/2000

Sd/- x x x
Asst.
Pune Architaves, Pune



मौजे-नांदोशी ता. हवेली जि. पुणे येथील
राजाराम शंकर देशपांडे व इतर.....
यांच्या.... शेतजमिनींचा उतारा
तसेच इनामी जमिनींचा कारणापुरता उतारा (ग.नं.३५)
किरकटवाडीकडे
ओढा
१८४
१८५
१८६
१८० विहीर
१८१
१६८
१६९
१७०
१७१
१७२
१३६
१३५
१७३
१७७
आंबराई
१७८ विहीर
१७५
१७४
१७६
१९१
१९२
दगडी पक्के धरण
१९३
विहीर
१९४
१९५
१९७
१९८
महादेव मंदिर
विहीर
६६
६७
६५
६८
९९
७०
७१
दगडी पक्के धरण
वडजाई देऊळ
विहीर
३५
पाईप लाईन
३४
३३
१४
१३
१२
मौजे सणसवाडीकडे
ग्रामीण मार्ग
११ पाण्याची टाकी
उत्तर
स्केल १ :५०००
१ सेमी = ५० मीटर
अ. नं. ११९१/१५२ मौजे-नांदोशी,
पाटील (देशपांडे) : सर्व्हे नं. ९
(हल्लीचा ग. नं. ३५) क्षेत्र २० एकर १४ गुंठे
वंशपरंपरेने इ. स. १८७४ चा बॉम्बे
ॲक्ट - III
सही ---------
पुणे लेखागार, पुणे
महाराष्ट्र शासन...

बहपीस........फैसल नं. ७२८

मौजे नांदोशी, पेटा डोणजे, ता. हवेली, जि. पुणे

येथील श्री वडजाई देवीचे इनाम जमिनीबाबत...

५४० ते ५४५/६ , ५५१/६	:	फेरिस्त-सुद्धा कागद ५ दतरांत दाखल तारीख ३०/११/१८५८ सेज नंबर ११७
जमीन कदीम मापाप्रमाणे	:	सन १२३९ फसलीचे हिशेबास इनामी वर्ग - ३
प्रतबंदी नंबर	:	१७
ऐकर-गुंठे	:	२ एकर २५ गुंठे
वहिवाट पुजेची करणार	:	त्रिंबक बिन सिदोजी कोळी इ.स.१२२७ ते १२५१ पुजेची वहिंवाट केली नाही परंतु इ.स.१२६० पासून मात्र पाटील, मौजे नांदोशी यांनी काम करण्यास सदरहू इसमास ठेविले आहे असे ७२८ कैफियतीत म्हटले आहे. अ.नं. ११)

सही
राघो रामचंद्र पाटील
मुलकी-पाटील मौजे-नांदोशी
इ.स.१२६२ फसली

या फैसलनाम्यावरून कोणाच्या मालकीबद्दल किंवा हिश्याबद्दल अगर वहिवाटीबद्दल अगर दुसरे कोणत्याही सबबेने दावा असेल तर तो दावा चालण्यास अटकाव होत नाही. या फैसलनाम्यांत कोणचे नांव दाखल असल्यामुळे किंवा नसण्यामुळे कोणाचा वारसा जमिनीवर कमी अथवा जास्ती होतो असे नाही.

सही	सही
सहाय्यक संचालक	पीटर डॉडस्, लेफ्टनंट,
पुणे लेखागार, पुणे -१	असि. इनाम कमिशन, उत्तर भाग

बदपिस

R

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१ [illegible]

[illegible]

२ [illegible]

[illegible]

[illegible]

३ [illegible]

[illegible]

INAM COMMISSION

R

४ [illegible]

[illegible]

५ [illegible]

६ [illegible]

७ [illegible]

[illegible]

८ [illegible]

[illegible]

९ [illegible]

[illegible]

१० [illegible]

११ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१२ [illegible]

[illegible]

१३ [illegible]

[illegible]

[illegible]

R ५९२/६

[illegible]

१२ [illegible]

IRAN A COMMISSION

[illegible]

[illegible]

१४ [illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

३ [illegible] ८ [illegible]

[illegible] ३ [illegible]

३ [illegible]

१६


R
INAM
A
COMMISSION


[illegible]

R ५४४/६

[illegible]


INAM A COMMISSION

[illegible]




इंजमोडंग

R ५५/६



R ५४६/६


IRAN
A

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

R

INAM A COMMISSION

[signature]

[signature]


for Captain

[illegible]

Proceedings No. 728 — Dated at [illegible] the 21st April 1858

Collectorate Poona Taluka [illegible]

Village Nandoshee

Claimant [illegible] bin [illegible] Narwangay

Claim A piece of land continuable permanently as the Inam of Warpee Dewee

Entered in the Chitta [illegible] of the present Government for 1850/1 Two acres and twenty five goontas (2-25) of land assessed at three Rupees (3-0-0) and entered in the Revenue Survey Books under No. 17 [illegible] Dewasthan of Warpee Dewee; Incumbent [illegible] bin [illegible]

---

1 Particulars and date of Grant as stated by the claimant

Unknown

2 Occupant at the introduction of the present Government by the claimant Do

3 Number of years and descents through which it would appear from the claimant's statement, the Enam had been continued previous to the introduction of the present Government

Years Do Descents Do

4 Particulars of the history of the alleged Enam since the introduction of the present Government, as stated by the claimant

Held [illegible] by the Claimant since 1850, but he does not know who held it formerly

5 Description of the evidence produced by the claimant in support of his title A Genealogical Table dated 14th May 1857 Recorded with the [illegible] Proceedings

---

Bu Lands as shown by
the forthcoming village accounts had
been held in Inam for upwards of 40
years before the introduction of the
British Government.


The Assistant Inam

Commissioner therefore decrees that to
the extent of (2-25) two acres & twenty
five goontas this holding shall be
continued permanently as the Inam
of Wurjace Devee Act XI of 1852
schedule B Rule 7 Provision 4.-

R. Dods Lieutenant
Assistant Inam Commr.

Copied
Compared

Assistant Director
Pune Archives, Pune



[illegible] १७ [illegible]
२८२५

[illegible]

[illegible]

[illegible]
१८८

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१ [illegible]

[illegible]

२ [illegible]







मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे
घराण्यांतील छत्रपती शिवाजी कालखंडांतील

ऐतिहासिक कागदपत्रे

संपादकः राजाराम देशपांडे










दार उघड बया आता दार उघड









लेखकाचा परिचय



राजाराम शंकर देशपांडे
चार्टर्ड इंजिनिअर
एम्.आय्.ई.सी.ई., एम्.एस्.ई (१)

१९५९ ला कॉलेज् ऑफ इजिंनियरींग पुणे, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, कोलकत्ता व मिलिटरी इंजिंनियरींग कॉलेज्, खडकी येथे पदवी. बाँब डिस्पोजल तंत्रज्ञान. यशवंतराव चव्हाण प्रबोधिनी, पुणे व मेरी नाशिक-प्रशिक्षणाधिकारी, ३६ वर्षे सरकारी नोकरी त्यानंतर वडिलोपार्जित शेती व्यवसाय. "वनश्री" पुरस्कारासाठी नामनिर्देशन.

प्रतिनियुक्ती- वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान पुणे. पुणे विद्यापीठ, जिल्हा- उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा परिषद- पुणे व सातारा, डिझाईन्स सर्कल- मुंबई.

पत्ता:
आदिती, प्लॉट नं ८,
भरतकुंज वसाहत नं २,
एरंडवणा, गणेश नगर,
पुणे: ४११०३८
दुरध्वनी: २५४४११७८
मोबा: ९४२०६९६४३२

मुद्‌गल – नऱ्हेकर – नांदोशीकर – देशपांडे (पाटील)
या घराण्याचा ... छत्रपति शिवाजी महाराजांच्या कालखंडातील

ऐतिहासिक कागदपत्रे

(इ. स. १६३० ते इ. स. १६८०)

लेखक व प्रकाशक :

श्री. राजाराम शंकर देशपांडे

एम्. आय्. ई. सी. ई.

एम्. एस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर

मूल्य : रु. ८००/-

प्रोफिशन्ट™
पब्लिशिंग हाऊस

लेखक व प्रकाशक : राजाराम शंकर देशपांडे
एम्. आय्. ई. सी. ई., एम्. एस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर
पत्ता : ''आदिती,'' प्लॉट नं. ८,
भरतकुंज वसाहत नं. २, अेरंडवणा (गणेशनगर),
पुणे ४११०३८.
फोन : ०२० - २५४४११७८, ९४२०६९६४३२

प्रथमावृत्ती : दिनांक १४ मार्च २०१०

अक्षर-जुळणी : स्वाती एन्टरप्राईजेस, पुणे - ९
अर्क डिझाईन, पुणे.

मुखपृष्ठ, मलपृष्ठ व आतील चित्रे
शंकर गोजारे, संदीप साळुंके, अमोल क्षीरसागर, शशांक गुप्ते

प्रकाशन सहाय्य व वितरक :
अ. र. नांदुरकर
अनमोल डिस्ट्रिब्यूटर्स
५३५, शनिवार पेठ, शॉप नं. ९, राधाकृष्ण बिल्डिंग ;
प्रभात सिनेमा समोर, पुणे - ४११०३०.
फोन : ०२० - २४४८४५३८.

मुद्रक : अभिषेक क्रियेशन्स
९८७, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

अनुक्रमणिका

प्रस्तुत पुस्तकातील रेखाचित्रे व फोटो यांचे वर्णन व पुस्तकातील पृष्ठ क्रमांक

	इ) महादेव मंदीर व चिमणाजी बापूजी नांदोशीकर - देशपांडे यांची समाधी	८६२
	ई) ग्रामपंचायत नांदोशी	८५९
	ह) रामचंद्रपंत अमात्य व त्यांची पत्नी यांची समाधी - पन्हाळगड (५ चित्रे)	८६९, ८७०, ८७१
	ग) नारो बापूजी नांदोशीकर देशपांडे यांची वडगाव मावळ येथील समाधी (४ चित्रे)	७२
	म) वडजाई मंदिराची गावठाणातील जागा (बखळ)	८४७
११	खेड शिवापूर येथील कसबे खेड मधील खोलेश्वर मंदीर, त्र्यंबकपंत डबीर यांची समाधी, माध्यमिक शाळा, गावठाणाकडील मुजुमदार, खासनीस, जठार, देशपांडे, वगैरेंची घरे १२ चित्रे.	८५७, ८५८, ११७
१२	मौजे नांदोशी ता. हवेली जि. पुणे येथील वडजाई पालखी सोहळा ४ चित्रे, अंबराई ४ चित्रे	८६४, ८६५, ८६६, ८६७
१३	नाशिक - वणी - दिंडोरी लढाई जिंकली. छत्रपती शिवाजी महाराज, मोरोपंत पेशवे व नारायण - नांदोशीकर - देशपांडे पंचहजारी सरदार यांचा मोठी लढाई. त्यात नारायण नांदोशीकर यांचा मृत्यू त्याप्रसंगीचे रेखाचित्र.	११६
१४	दि. ६/११/२००९ रोजी शताब्दी महोत्सवासंबंधी झालेल्या प्रसंगी राजाराम देशपांडे यांचा भा. इ. सं. मंडळ पुणे येथे सत्कार झाला. (२ फोटो)	८७२
१५	मराठेशाहीच्या सीमा - १६३० ते १८०० दर्शविणारा नकाशा	८५२
१६	१६६५ इ. स. ..... पुरंदरचा तह व शिवाजी महाराजाकडे राहिलेले किल्ले दर्शविणारा नकाशा	८४८
१७	इनामी जमिनी देशपांडे यांना दिल्या जाणारे क्षेत्र दाखविणारा नकाशा	८९१
१८	मौजे नांदोशी, ता. हवेली, जि. पुणे येथील नांदोशीकर देशपांडे पाटील यांच्या राहत्या घराचा नकाशा	८६०, ८६२, ८६३
१९	पुणे शहराची इतिहास भौगोलिक परिस्थिती इ.स. १६०० ते १८२०	६

२०	पुणे जिल्ह्यातील देशपांडे – कुलिय व्यक्ती व आप्त यांची समाधी स्थिती दर्शविणारा नकाशा	८४६, ९९
२१	पाच परगणे व बारा मावळे दर्शविणारा नकाशा	८४९
२२	कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळगड येथील रामचंद्रपंत अमात्य व त्यांची पत्नी यांची समाधी स्थाने दर्शविणारा नकाशा	८६९, ८७०
२३	प्रतापगडचे युद्धातील (इ.स. १६५९-६०) युद्धमंडळातील सरदार व प्रतापगडचे युद्ध दर्शविणारा नकाशा (अफजलखान युद्धाचा प्रसंग)	८५३
२४	इनामे वारसा हक्काने देणेबद्दल सरकारी आदेश अ) मौजे नांदोशी ब) खेड शिवापूर	८९० १७, १८ ५४९, ५५०
२५	खेड शिवापूर येथील नऱ्हेकर देशपांडे यांचा वंशवेल	६३१, ६३२
२६	नांदोशी येथील नऱ्हेकर देशपांडे यांचा वंशवेल	१०२८, १०२९, २०
२७	१६३० ते १९७५ पर्यंत मुद्‌गल नऱ्हेकर नांदोशीकर यांना देण्यात आलेल्या वतनांचा तपशील	२२, २३
२८	औरंगजेबाने रामचंद्रपंत अमात्य यांना पाठविलेले धमकीचे फर्मान	१०२७

* देशपांड्यांच्या सदरेपुढे *

श्रीमंत नऱ्हेकर देशपांड्यांचे घराणे बारा मावळात तालेवार आहे. हे नऱ्हेकर देशपांडे पुण्याजवळच्या नांदोशी गावात गेली तीनशे वर्षेनांदत आहेत. म्हणून त्यांना नांदोशीकर देशपांडे म्हणूनही ओळखतात. तसा या नांदोशीकर देशपांड्यांचा वंशपरिवार मोठा आहे. आजच्या काळात उद्योग-धंद्यासाठी या घराण्याच्या शाखा विखुरल्या आहेत. एक शाखा मात्र आजही नांदोशीच्या काळी-पांढरीत नांदते आहे. इ.१९४७ पर्यंत नांदोशीत देशपांड्यांचा वाडा सरदारी दिमाखात उभा होता. दि.१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. देशपांडे वाड्यावर स्वातंत्र्याचा झेंडा फडकला. पुढे साडेपाच महिने उलटले आणि महात्माजींचा दारुण घात झाला. दिल्लीत गांधीजींची चिता पेटली आणि महाराष्ट्रातील गावोगाव निशपाप घरांच्याहि चिता पेटल्या. नांदोशीच्या देशपांडे वाड्याची त्यावेळी राख-रांगोळी झाली. शिवकालीन वस्तू, वास्तू, शेले-शालू, दागदागिने, कागदपत्रे, घोड्या-उंटांचा साज-सरंजाम, घागरी-हंडे, जुनी हत्यारे पात्यारे शिवकालीन ऐतिहासिक साहित्य पार खलास झाले. शिवकालात ज्या घराण्यातील अनेक पुरुष हिंदवी स्वराज्यासाठी लढले, राबले अन मेले, त्याच घराण्याचा वाडा, देश स्वतंत्र झाल्यावर बेचिराख झाला.

त्याच वाड्याच्या राखेतून आजचा देशपांडे वाडा नांदोशीत पुन्हा उभा राहिला. जुने काहीच उरले नव्हते. वाड्याबाहेर कुठे-कुठे देशपांडे घराण्याची कागदपत्रे शिल्लक होती आणि त्यातल्या मुख्य देशपांड्यांची जिद्द! त्यांच्या इतिहासाचे प्रेम आणि अभिमान टवटवीत, गर्द पिंपळासारखा ताजा होता. त्या देशपांड्यांचे नांव नऱ्हे-नांदोशीकर राजाराम शंकर देशपांडे मुक्काम - नांदोशी, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे, सिंहगड रस्त्यावर! वय ७५. देहाची इमारत भक्कम. छाती आणि गर्दन ताठ!

श्री. राजाराम शंकरराव देशपांडे हे मराठी इतिहासकार आणि विशेषत: शिवकालावर मनापासून भक्ती करणारे डोळस अभ्यासक व संशोधक आहेत. स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांच्या आणि राजमाता जिजाऊ साहेबांच्या क्रांतिकारी अनुष्ठानात अगदी प्रारंभापासून शिलेदारीचे व्रत घेतलेले हे देशपांडे

४ वडील खंडोपंत याचे नकल हाल आमलात सन १२३६ चे श्रावणमासी जाळे सा. ० धाकटे
२ गोविंदपंतयास पुत्र
१ वडिल नरसोपंत
१ धाकटे आबाजीपंत
२ बहिरोपंत यास पुत्र
१ बाजीपंत
१ रामचंद्र
―――
२
४ हाल आहेत.
३ बालाजीपंत यास पुत्र १

धाकटे केसोपंत यांस पुत्र
० वडिल बालाजीपंत याचे नकल
१ लक्ष्मणपंत
१ नारोपंत
―――
२
वडील लक्ष्मणपंत यास पुत्र १
सखारामपंत यास पुत्र २
१ लक्ष्मण सखाराम
१ मोरोपंत
―――
२
हाल आहेत
नारोपंत यास पुत्र
० वडील बापूजीपंत याचे नकल
१ राजारामपंत हाल आहेत.
राजारामपंत यास पुत्र
१ गणपतराव
१ श्रीपतराव
―――
२
हाल आहेत.

सदाशिवपंत यास पुत्र १
गणपतराव यास पुत्र
हाल आहेत. लाहान

१ विश्वनाथ
१ माहादेव
१ गदाधर
३

२ चिमणाजीपंत यास पुत्र
१ वडील रामाजीपंत
१ धाकटे
१ लक्ष्मणपंत
० वेंकाजीपंत नकल
१

२ रामाजीपंत यास पुत्र
१ वडील दिनकरपंत
१ राघोपंत
२

हाल आहेत.

(रामाजीपंत याचे हातची वौंषावळ लिहिली. त्यास मारनिलेचा रंग निमगोरा. उमर वर्ष ५५ गेल्यास गंडमालाचे डाग येणे प्रो चेहरा आसे.)

यो वौंषावळ पुरुष वहिवाट आजपर्यंत करून इनाम जमीन पिढीदर पिढी खाऊन सरकारचाकरी गावची लावणी टुपर्ण करून जमीन इनाम खात आलो ही कैफियेत लेहून दिल्ही सही मिती आषाढ व।। ५ सके १७५१ विरोधी नाम संवछरे ता १६ माहे जुलाई

नि. नांगर
वि।। रामचंद्र चिमणाची पाा व कुलकर्णी मौजे माार.

श्री

पुणे जमाव १२० नकल

इनाम

अेम्

कमिशन

राजमान्य राजश्री कारकून दिमत गोविंदराव सदासीव गोसावी यांस सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार - समान मया तैन व अलफ (इ.स. १८५८) खंडो मोरेश्वर पाटील, मौजे नांदोसी, ताा कर्यात मावल, यांस मौजे मजकूर येथील, [१]मोकास बाबेचे आमलापैकी [२]इतलाख (रोख) नेमणूक येकसे आठावीस रुपये होती ते त्याजकडून दूर करून सन इहिदे मया तैनापासून (इ.स.१८०१) किले सिंहगड येथील बेगमीस सदरहू रुपये लाऊन दिव्हे आहेत. हाली किल्यांकडून दूर करून पेशजीप्रमाणे खंडो मोरेश्वर यांस मौजे मारचे मोकासबाबेचे आमलापैकी इतलाख नेमणूक रुपये १२८ येकसे आठ्ठावीस सालमारी करार करून दिल्ही आसे तरी लिहिल्याप्रमाणे नेमणूक पेशजीपासून सुदामत पावत आल्याबरहुकूम पाववीत जाणे व सन खमस मया तैनापासून येकसे आठ्ठावीस रुपये दरसाल किल्याकडे पावले नाही म्हणून खंडो मोरेश्वर याणी विनंती केली त्यास सन खमस मया तैनापासून याजकडील नेमणूकपैकी गांवाकडे बाकी राहिली आसेल ती मारनिलेकडे (उपरिनिर्दिष्ट) देणे जाणिजे छ १२ साबान आज्ञा प्रमाण मोर्तब सूद्र.

बार

श्री

पुरसीस नरसोगोविंद वगैरे भाऊ पाा मौजे नांदोसी, तााकर्यात मावळ, पो हवेली सुभापुणे सु।। सलासीन मया तैन व अलफ सन १२३९ फसली.

मौजे मजकुरी तुम्हास इनाम जमीन किती आहे व ती सनदी किंवा गावनि।। आहे व इनाम मिळविणारा पुरुष कोण व देणार कोण व मिळविल्याातागाईत वैवाट कोण करीतो व इनामाचे साधन तुम्हापासी काय आहे व इनामावर सरकारी बाब काही आहे किंवा नाही व तुम्ही इनाम खाऊन सरकारचे व गावचे काम काय करावे व इनामास हिसेदार भाऊ कोणी आहेत किंवा नाही. आसल्यास त्याचे हिसे कसे आहेत व इनाम मेळविल्याातागाईत दरम्यान कधी जप्ती जाली होती किंवा नाही. जाली असल्यास कोणत्या कारणामुळे जाली व त्याची मोकळीक कधी जाली व हाली इनामाची वहिवाट कोण करीत आहे व सदरी मजकूर लिहिला आहे त्याचे उत्तर लिहून देणे तारीख ७ माहे जून सन १८२९ इसवी.

याचे उत्तर : आम्हास इनाम जमीन आहे. १२ टके बाराटके गांवनि।। आहे सनदी नाही. इनाम मिळविल्याचा पुरुष **बालाजी बापूजी** व **नारोबापूजी न्हेकर देशपांडे** ताा खेडेबारे **पाा मार** याणी मेलविली त्यास पाच डोया जाल्या अजमासे वर्ष दीडसे पावणे दोनशे जाली. ती जमीन **राजे छत्रपती** याचे देणे यैसे वाडवडिल मुखे यैकणीयात आहे त्या दिवसपासून निर्वेध वहिवाट करीत आलो. **कागदपत्र राहिला नाही घरे दग्ध जाली गावही दरोबस्त जळाली.** दंगेधोपे जाले. यामुळे राहिला नाही वहिवाट त्या दिवसापासून हालआमल पर्येत करीत आहो इनामावर सरकारी बाब पेसवे कारकीर्दीत घेतली नाही. गांव इनामच **आम्हांस छत्रपतीचे कारकीर्दीत जाला होता** परंतु पेसवे आमलात चालला नाही यैसे वडीलमुखे यैकिले. इनाम खाऊन पांढरीची चाकरी काये करावी त्यास गावची लावणी उगवणी व सरकार चाकरी पाटीलकीचे वहिवाटीची करून इनाम जमीन खात आहो इनामास हिसेदार भाऊ विभागी आहेत ते आपलाले विभागा प्रो खात आहेत नांवनिसी वि।। ताा

१ नरसो गोविंद वडील घरभाऊसुधां

१ खुद	१ रामचंद्र	१ गणपतराव
१ बाजी बहिरव	चिमणाजी भाऊ	सदासिव
२	० लंग / १	० लंग / १

घरे चार ४

२ लक्ष्मण सखाराम व राजाराम नारायेण घरे

१ १

० त्रिंबक तिसरे विभागी हे मृत्य पावले त्याचे नकल त्याचा विभाग उभयेताकडे परंतु लक्ष्मण सखाराम व राजाराम नारायेण याचे कर्ज आहे म्हणऊन खातात त्याचा आमचा विभाग निमे निमे होणे आहे सां.

३ येकूण कलम येक इनाम मेलविल्या तां. कधी जप्ती जाली नाही व मोकलीकेचे कारण नाही वहिवाट इनामाची छत्रपती कारकीर्दीपासून ताा पेसवे सरकार ताा हक अंमलापर्येत निर्वेध वहिवाट आम्हाकडे आमचे वाडवडिल सुधा करून खात आलो हे लिहून दिल्हे सही ता माार.

नि।।नांगर

बि ।। रामचंद्र चिमणाजी न्हेकर देशपांडे त्या खेडबारे व पाटील जोसी कुलकर्णी मौजेमाार

श्री

पुणे जमाव १२०

इनाम

अेम्

कमिशन

पुरसीस खाली सही करणारे मौजे नांदोसी ताा कर्यात मावल पेटा डोणजे सु।। सबा सलासीन मयातैन व अलफ सन १२४६ फसली.

सवाल

मौजे माारी पाटील यास कदीम इनाम कोणते थळात आहे ताा २७ माहे फेब्रवारी सन १८३७ इसवी

जाब

वडजाई थळांत पाटील याचा कदीम इनाम आहे.

सवाल

त्याची वहिवाट आलीकडे म्हणजे चार पांच साले कोण करीत आहे व पूर्वी कोण करीत होते.

जाब

पेशजी वहिवाट मौजे माार येथील पाटील याणे आपले तर्फेने - सणस याजला सांगितली होती

सवाल

हरी सणस च्यार साल वहिवाट करीत आहे आसे तुम्ही जाब लिहितात त्यास शेतचा माल कोण नेला.

जाब

पाटील याजकडे वहिवाट जो पावेतो होती तो पर्येत हरी सणस यापासोन ते निमे माल घेत होते. हरी सणस सरकतीचा ऐवजी निमे माल घेत होता व सालगुदस्त निमे माल गणपतराव लक्ष्मण माजी तलाठी याणी सरकारतर्फेने निमे घेतला त्यास याची वहिवाट निमे माल द्यावयाची आहे याणे कधीही सारा दिल्हा नाही याप्रो आम्हास माहिती आहे ताा २७ फेब्रुवारी सन १८३७ शाा

नि।। सही सदू विश्वासराव

नि।। सही गोविंद शेलका

नि।। सही निबांजी सणस   नि।। सही राघू वासिद

साक्ष

१ नवरू सणस मौजेमाार   १ कृष्णा भिलारा मौजे माार

नि।। सरखाराम चिमणाजी तलाठी मौजे मार

श्री शंकर

तालीक

पुणे जमाव ११९

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये राजश्री गोपाल रायाजी देशाधिकारी पो. मावले गोसावी यांस,

शेवक नीलकंठ

सलास सलासीन आलफ मौजे नांदोसी ताा कर्यात मावल येथील मोकदमी **चिमणाजी बापूजी** यासी आहे. यैसियासी **चिमणाजी बापूजी** मोगलाईत गेला त्याचे पाटीलकीस दिवाणात आमानत केली. यैसियासी मोकदमीचे खटपटे भायाजी दिधा कारभारी करून तुम्ही गांवी ठेविला आहे. यैसियासी हाली काऊजी काळोखा व मोरोपंत कुलकर्णी भायाजीसी सुलखे वर्तत नाहीत नसती कैफियती करून हारकत करीतो म्हणोन कळो आले तर तुम्ही भायाजी ठेविला आहे त्याचे हाते मोकदमीचा कारभार घेत जाणे काळोखा कदीमी कैसा म्हणवीत आहे तोच ठेविल्याने मिरासास कथली आहे त्या निमित्ये भायाजीचे हाते कारभार घेणे व मौजे माा बाग आहे त्यास सालाबाद माली जतन करोन **निम्मा चिमणाजी बापूजीस** देणे.

श्री

इनाम

अेम्

कमिशन

पुरसीस मोकदम समस्त दाहीजण मौजे नांदोसी ताा कर्यात मावळ पो हवेली सुभा पुणे सु।। तिसा आशरीन मया तैन व आलफ सन १२३८ फसली

मौजे मजकूर हा गाव पेशजी कोणाकडे सरंजामी अथवा इनामी वगैरे होता किंवा नाही असल्यास सरकारात आल्यास किती दिवस जाहाले व मौजे मजकुरी पागे पथके वगैरे मोठे लोक कोणी राहातात किंवा नाही राहात असल्यास त्याचे नाव वगैरे काय हे तपसिलवार सदरी लिहिल्या मजकूराचे उत्तर लिहून देणे ताा २ माहे जून सन १८२९ इसवी

याचे उत्तर मौजे माार हा गाव पंत सचिव याचे जिल्हेतील श्रीमंत पेसवे कारकीर्दीत किले कोढाणा गड श्रीमंतानी घेतला. ते समई माहाल किल्याकडील श्रीमंताकडे आला त्यास वर्ष आजमासे सतरा होतील त्या दिवसापासून किले मजकुराकडे वहिवाटीस आहे इनाम कोणास दिल्हा नाही व सरंजामासही कोणास दिल्हा नाही. मोकासबाब नेमणूक रुपये १२८ खंडो मोरेश्वर न्हेकर याचे नावे इतलाख नेमणूक पेसवे कारकीर्दीत व हल आमलाकडे पावेतो चालत आली आहे हाल आमलात आली खंडोमोरेश्वर मृत्ये पावले दोन वर्ष जाली त्याचा रिपोर्ट सुभा राहून कलेक्टर साहेबास केला आहे त्याचे विभागी भाऊ हिसेदार विभाग खात आलो आहो. मोठे लोक व पागे पतके कोणी राहात नाहीत याप्रो मजकूर आहे. खंडो मोरेश्वर यांचे पुतने नरसो गोविंद वडील हालफिल आहेत वगैरे भाऊ विभागदार आहेत याखेरीज जाजती नाही हे लिहून दिल्हे सही मिती ज्येष्ठ शु ।। १४ शके ११६१ विरोधीनाम संवत्सरे सन १८२९ इसवी वि।। रामचंद्र चिमणाजी पां.

नि।। नांगर

बि।। गणेश सदासिव पा. व जोसी कुलकर्णी मौजे माार दस्तुर रामचंद्र चिमणाजी पां.

ताजा कलम हाल आमलात सन १२३० चे साली येकसाला विसाजी राम गोखले याजकडे सरंजामास येकसाल दिल्हा होता दुसरे साली विसाजी राम गोखले मृत्य पावले पुन्हा हाल आमलाकडे वहिवाट चालली आहे मिती माार.

श्री

इनाम
अेम्
कमिशन

पुरसीस रामचंद्र चिमणाजी पां व कुलकर्णी मौजे नांदोसी ताा कर्यात मावळ प्रो हवेली सुभा पुणे सन १२३८ फसली तारीख २६ माहे फेब्रुवारी सन १८२९ इसवी

तुमच्या कुलकर्णी याच्या तक्षीमा किती व वाटणीदार कोणकोण आहेत ते लिहून देणे व मौजे मजकूरची दर ठरोती करावयास सालवार सरासरी करिता जुने कागद कारकीर्दीवर नाना फडणीस व बाजीराव साहेब व हाल आमलचे ये।। तीन कारकीर्दीचे दरोबस्त आणून दाखवणे.

याचे उत्तर

१ कुलकर्णी आम्ही त्रिवर्ग मालक

१ नरसो गोविंद मौ व बाजी बहिराव मिलोन येकसाल

१ गणपतराव सदाशिव येकसाल

१ रामचंद्र चिमणाजी येकसाल

३

पौ दोघे मालक आम्ही कायम

१ गणपतराव सदाशिव

१ रामचंद्र चिमणाजी

१ नरसो गोविंद याचे सालमार निलेचे राजाराम नारायेण यांजकडे गहाण आहे त्याची वहिवाटचे कागदपत्र चिठे हाल आमलांत राजाराम पंताजवळ आहेत बाजी बहिरव व नरसो गोविंद याचे पेट्यात त्याची वहिवाट त्याचे साल आल्यावर कोणाकडूनही करवितात.

येणे प्रो तिघे मालक तक्षीमदार आम्हांस दुसरा कोणी नाही.

१ तीन कारकीर्दीतील हिसेब जुने कागद मागितले त्याचा तपसील

हाल आमलातील कागद चिठे जमाबंदीचे व लागवणे फेरीत लाऊन दिल्ही आहेत.

१ नाना फडणीस त्याचे कारकीर्दीतील रुमाल सालवार झाडे कुळवार नख्तीचे वगैरे आहेत त्यास जमीन झाडा कोठे लागला नाही लावणीच्या यादीस कोठे कोठे आमचे नाव मात्र लावणी लागतेवेळेस क्वचित लागले आहे येकसाह जमीन झाडा टकबंदीचा कोठे कुलवार लागला नाही. तहसिला बोटखत जबाबी नख्ती झाडे आहेत.

१ बाजीराव साहेब याचे आंमलातील हिसेब राजाराम नारायेण पां याजकडे आहेत परंतु तेही नख्तीचे वसूल बाकीचेच झाडे आहेत जमिनीची रिवाज कोठे नाही

कलम

१ हल अमलात जमिनी रिवाज लागल्याचे कारण

१ टकबंदी पूर्वी या गावास थलवार देशपांडे याजपासी होती ती कुंपिणी आमल जाल्या दिवसापासून त्याजवळून आणून लाविली.

१ शके १७२३ चे सालसन १२११ चे साली जमीन मोजणी गांवकरी आम्ही केली ती काही जमिनीची मोजणी होणे राहिली ते कागदपत्र

१ पुरवणी पुरसीस सन १२३८ सरतरम याजकडील सु।। तिसा आसर ते तारीख छ २६ माहे फेब्रवारी सन इसवी १८२९

याची वहिवाट मोजणीचा रिवाज कुंपिणी अंमलापावतो चालला नाही हालआमलात रो बालकोबा भाऊ यांनी चौकसी करून तो दराचा रिवाज बिघावण दरवारी जाऊन जमाबंदी चिठे केले त्याप्रो हाल वहिवाट चालली आहे बाकीचे जमिनीची मोजणी बार्डुल साहेब मेहरबान यानी नारायेणराव मामलेदार याजकडून करविली पुढे दरबारी रिवाज गावास जाजती बसू लागला उख्ती लावणी गतकुली कोणी शेते करीनात. सा।। येकदोन वेल कलक्टर साहेब बहादूर यास अर्ज केला त्यांनी हुकूम केला की सरकार मोजणी होईल त्यावेळेस दरबारी ठरून रिवाज बांधला जाईल याप्रो दरवारीचा व मोजणीचा माार आहे.

येकूण दोन कलमेची उतरे लिहून दिल्ही आहेत ही खरी आहेत यात कमपेश पडल्यास सरकारने गुन्हेगार वतनाचे बेदाखला हे लिहून दिल्हे सही ताा माार.

हस्ताक्षर रामचंद्र चिमणाची पां व कुलकर्णी मौजे माार.

श्री

तालीक

इनाम
अेम्
कमिशन

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४८ प्लव संवत्सरे आषाढ सुध प्रतिपदा सौम्य वासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यासी देशमुख व देशपांडे ताा कर्यात मावळ यांस आज्ञा केली यैसिजे मौजे नांदोसी ...... माार हा गाव राजेश्री

मोरोबल्लाल खेडेबारेकर यांस कुलाबाब कुलकानू पेशजी पासून इनाम चालत आला आहे. तेणे प्राो करार केला असे तरी तुम्ही मौजे मजकूर मशारनिल्हेस पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र भोगवाटीयास परतोन देणे. जाणिजे

श्री

इनाम

डी

कमिशन

नकल

राजेश्री देशमुख व देशपांडे प्रां पुणे स्वामीचे सेवेसी दाा बे।। मोकदम मौजे नांदोसी ताा क र्याित मावळ सन हजार ११८९ सु।। समानीन मया व अलफ कारणे जामीन कतबा लिहून दिल्हा ऐसीजे विठोजी बिन रखमाजी पाटील पोकले मोकदम व बापूजी बिन हेमाजी व कृष्णाजी बिन तान्हाजी पाटील पोकले मौजे धायेरी ताा हवेली कर्यात मजकूर याचा इनाम पासोडी व चोकी याजा कजिया वांटणीबदल भाऊपणीयाचा लागला आहे याजबदल मारनिलेस जामीन वर्तणुकेस मागितला त्याजवरून आपण या त्रिवर्गास जामीन जालो असो. आपण व पंचाईत मते वाजवी इनसाफ होऊन मनसुबी ठरेल त्याप्रमाणे हे वर्ततील जरी न वर्तत तरी त्यास आपण वर्तऊ, वर्तऊ न शेका तरी याचे निसबतीचा जाब करू हा जामीन कतबा लिहून दिल्हा. सही शो १७०१ विकारीनाम संवत्सरे ...... वद्ये १ प्रतिपदा.

बि।। चिमणाजी रघुनाथ पाटील मौजे मजूकर व कुलकर्णी मााए.

साक्ष

दावलनाकबिन मंतरनाक

माहर नगधा व भालेराव मेहेत्रे मौजेमजकूर नि।। नांगर

कुंपणी सरकार विद्यमान इनाम वगैरेची कमेटी यांस

मुखत्यारनामा बेशम नरसो गोविंद व आबाजी गोविंद नांदोसकर पाटील मौजे नांदोसी तर्फ कर्यात मावल, पेटा डोणजे पो हवेली, जिल्हा पुणे कारणे लिहून दिल्हा मुखत्यारनामा ऐसाजे सरकारात इनाम गावची व इनाम जमिनीची चौकसी होत आहे त्यास कंपणी इलाख्यांतील मौजे मजकूरच इनामी मोकासा आम्हांकडे वडिलोपार्जित चालत होता. त्याबदल कमेटीकडे जाब देण्याविसी आमचेतर्फे मुखात्यार विसाजी गणेश नांदोसकर व अंताजी लक्षमण भोले वीरगांवकर यांस मुखत्यारनामा देऊन नेमिले आहे तरी सदरहू इनामी मोकाशावर आमचा दावा आहे. त्याप्रकर्णी मुख्यत्यार उभयेता तपसीलवार लिहून देतील व दस्तऐवज वगैरे पुरवणी जे हजर

करावयाचे आहेत ते हजर करतील ते आम्हांस मान्य आहे. गैरमाहीत वगैरे सदरहू मुखत्यार याणी चुकून जबाब दिल्हा म्हणोन वगैरे तकरार कधी करणार नाही. सारांश जितका मजकूर मुखत्यार सांगतील व दस्ताऐवजी वगैरे पुरवणी करतील ते आम्हास कबूल आहे. आम्ही मजकूर सांगितल्याप्रमाणे कमेटीने समजला पाहिजे हा मुख्यत्यारनामा लिहून दिल्हा. सही तारीख ३ माहे नवंबर सन १८६३ इसवी.

सही नरसो गोविंद नांदोसकर दस्तुर खुद

सही आबाजी गोविंद नांदोसकर दस्तुर खुद.

१ सखाराम अमृत कारकून नि।।
देशमुख ताा कर्यात मावल

१ वामनाजी दिनकर कारकून नि।।
देशमुख तर्फ हवेली

सदरहू मुख्यत्यार नाम्यावर आमचे समोर सही साक्षी जात्या असत तारीख ७ मोह नवंबर सन १८६३

भास्कर सदासिव माहलकरी, पेटा मजकूर

सरकारातून समजनंबर २५३५ ताा २ मे सन १८५३ चे गेले आहे.

सदरहू .... वर दावा पोचत नाही म्हणोन सरकारातून ठराव होऊन समज सरकारातून नंबर ७८७५ ताा २२ ऑगष्टची विसाजी गणेश याचे नावे व मोरे सखाराम याचे अर्जावरून त्यास

नांदोसीकर याचे इंग्रजी सरजाम .....१ .....८ खंडो मोरेश्वर नांदोसकर असे फाइल आहे.

मौजे नांदोसी पेटा डोणजे तालुके हवेली जिल्हा पुणे येथील मोकासे अंमलाबदल नरसो गोविंद व आबाजी गोविंद नांदुसकर याणी सरकारास अर्जी केल्यावरून मेहेरबान इनाम कमिशनर साहेब बाहादूर याचे नांवे चौकशी करणेविसी सरकारची हु।। नंबर ४३४४ तारीख १० ऑक्टोबर सन १८५३ इसवीचा आला त्याजवरून मेहरबान इनाम कमिशनर साहेब याजकडून इंग्रजी पत्र नंबर २६२६ तारीख १७ मिनहूचे आल्यावरून सदरहू इसमास कैफियती करितां बोलावणे गेले. त्याजवरून इसम मजकूर इकडे येऊन हाजर जाले त्याजकडून कैफियत घेणे ती -

सुरू तारीख १६ नवंबर सन १८५३ इसवी

सदरहू इसमापौ उभयांतातून नरसो गोविंद हे वडील आहेत म्हणोन उभयताचे तर्फे मुखत्यार विसाजी गणेश नांदोसीकर, राहणार शहर पुणे ताो हवेली जिल्हा पुणे व अंताजी लक्ष्मण भाले, वीरगावकर राहणार शहर पुणे, ताो हवेली, जिल्हा पुणे याणी हजर होऊन जाहीर केले. सबब इसम मजकूर नरसो गोविंद यांचे तर्फेने सदरहू मुखत्यार यांचे म्हणणे रुबुरू आहे ते खाली लिहिल्या प्रो.

१ आमचे नाव नरसोपंत व आमचे बापाचे नाव गोविंदपंत व आज्याचे नाव मोरोपंत आडनाव नांदुसकर, उमरवर्षे ४० चाळीस आजमासे

२ आमची जन्मजागा व हली राहण्याचा ठिकाण व मूल वतनाची जागा मौजे नांदोसी तर्फ कर्यात मावल तालुके हवेली जिल्हा पुणे.

३ मौजे नांदोसी या गावातून दरसाल मोकासे अंमलाबदल म्हणोन रुपये १२८ नेमणुकीप्रो आम्हांस दरसाल मिळावयाचे आहेत व वंशपरंपरेने मिळावयाचे आहेत.

४ मौजे नांदोसी हा गाव मुळी सरकारातून राजा शाहू छत्रपती याणी बालाजी बापूजी याचे नावे इनाम करून दिल्हा ते कोणते साली दिल्हा साल माहीत नाही. अजमासे दीडसे वर्षापलिकडे मिळाला आहे असे सदरहूचे दुमालापत्रावरून समजते नंतर अजमासे सु।। इहिदे खमसेन मया व अलफ साली सदरहू गाव सरकारांत परत घेऊन सदरी तिसरे जबाबात लिहिलेप्रमाणे रुपये येकसे आठ्ठावीस नेमणुकी प्रो राघो मोरेश्वर याचे नांवे इनाम करून दिल्हे. असे सदरहू सालचे जमावसुलावरून समजते. सदरहू नेमणूक पेशवे सरकारातून जाली. कोणते पेशवे याणी केले हे माहीत नाही.

५ सदरहू नेमणूक कुटुंबाचे योगक्षेमार्थ इनाम मिळाली आहे. कामाकरिता म्हणोन कांही मिळाली नाही. सबब जो पर्यंत मोकासा चालत होता तोपर्यंत काम वगैरे काही करीत नाही नव्हतो.

६ सदरहू मूल संपादन करणारा बालाजी बापूजी हा आमचे साहावे पिढीचा पूर्वज होता व राघो मोरेश्वर आमचा पणजा होता.

७ ज्या दिवशी माजी अंमल दूर जाहला त्या दिवसी म्हणजे सन १२२७ फसली साली सदरहू अंमलाचा ऐवज खंडो मोरेश्वर हे घेत होते. ते मूल संपादन करणार याचे पांचवे पिढीचे वंशस्थ होते व आमचे सखे चुलते होते व दुसरे संपादक राघो मोरेश्वर याचे नातू होते.

८ सदरहू अंमल मिळाले दिवसापासून सन इहिदे मया तैन व आलफ सालीपर्यंत बिनदिक्क्त चालून सदर साल दर सालापासून. सदरहू अंमलकाचा पैसा बाजीराव रघुनाथ प्रधान याणी किल्ले सिंहगडचे बेगमीस लाऊन दिल्हा तो सु।। समान मया तैन व आलफ सालपर्यंत सदरहू अंमलाचा ऐवज आम्हांकडे चालविण्याविषयी बाजीराव रघुनाथ प्रधान यांणी मोकळीक केली. **त्या दिवसांपासून माजी अंमलकाचे अखेर दिवस पर्यंत सदरहू अंमलास जप्ती वगैरे दिकत कांही न होतां बिनदिक्कत चालत होता व जितके सालचा ऐवज किल्ल्याकडे गेला होता सदरप्रधान याचे हुकूमावरून परत मिळाला.**

९ इंग्रजी अमल सन १२२७ फसली साली सुरू जाहला त्या दिवसापासून सन १२३६ फसली पर्यंत सदरहू अंमलास जप्ती वगैरे दिकत कांही न होता बिनदिकत चालऊन सदरहू साली आमचे चुलते खंडो मोरेश्वर मयत जालेकारणाने सदर सालापासून आजपर्यंत सदरहू अंमल सरकार जप्तीस आहे.

१० इंग्रजी अमल सन १२२७ फसली साली सुरू जाहला त्या दिवसापासून सन १२३६ फसली पर्यंत सदरहू अंमलाचा पैसा खंडो मोरेश्वर हे घेत होते ते सदरहू साली मैत जाले त्या दिवसापासून आजपरीयंत सदरहू अंमल सरकार जप्तीस आहे.

११ सदरी वर लिहिलेला मजकूर खरा करण्यास सनदा व ताकीद पत्र वगैरे पुराव्याचे कागद हजर करावयाचे त्यास आमचे चुलत भाऊ दिनकर रामचंद्र याजपासी

सर्व पुराव्याचे कागद होते ते त्याणे इनाम कमिशनचे नोटीसी प्रो माहलकरी पेटा डोणजे तालुके हवेली जिल्हा पुणे याजकडे दिल्हे आहेत ते सरकारांत आले आसतील ते आमचे आणून या पुराव्यास लागू करून घ्यावे याशिवाय सनदापत्रे वगैरे कागद आम्हांपासी कांही नाहीत व साक्ष देणे नाही व पुरवणी मजकूर जाहीर कर्णे आहे तो असा की खंडो मोरेश्वर मयत जाल्यावर लागलीच आम्ही मेहेरबान कलेक्टर साहेब जिल्हा पुणे यांजकडे आम्ही अर्ज केल्यावरून चौकशी चालली होती त्याजबदल आतापर्यंत आम्हांस सदरहूचा निकाल हुकूम मिळाला नाही. त्याजविसी आम्ही वारंवार मेहेरबान कलेक्टर साहेब जिल्हा पुणे याजकडे फार वेळ अर्ज केले त्याजबदल चौकसीचे कागद सर्व कलेक्टर साहेब जिल्हा पुणे याजकडून आणून पाहावे म्हणजे आम्ही खंडो मोरेश्वर मेल्यापासून आजपर्यंत सरकारांस अर्ज करीत होतो असा सरकारची खात्री होईल व मूल संपादकाचे वंशांतील आम्ही आहो सबब सदरहू - अंमलकाचा पैसा आम्हांस मिळाला पाहिजे.

१२ सदरहू अंमलात आमचे हिसे आहेत ते खाली लिहिल्याप्रमाणे

१ खुद आमचा हिसा येक पोटभागसुद्धां

१ लक्षुमण सखाराम याचा हिसा येक पोटभागसुद्धां येकूण हिसे दोन आहेत.

१३ सदरहू अंमल मूल संपादन करणारा याचे आज्यापासून मेहेरबान इनाम कमिशनर साहेब याचे नमुन्याप्रो आम्ही वंशावळ लिहून हजर केली आहे.

१४ माजी अंमलात सदर अंमलाचा पैसा चलनी मिळत होता व हाल अंमकातही सन १२३६ फसली पर्यंत सदरहू अंमलाचा पैसा चांदवड चलनी मिळत होता.

१५ माजी अंमलात सदरहू अंमलाचा पैसा येकसारखा नेमणुकी प्रो मिळत होता व हाल आमकातही सन १२३६ फसलीपर्यंत येकसारखा मिळत होता पुढे सदरहू अंमलाची आजपर्यंत जप्ती आहे.

१६ माजी अंमलांत सदरहू अंमलांचा पैसा परभारे गांवाकडून मिळत होता व हालअंमलांत मामलेदार परगणे, हवेली, जिल्हा पुणे यांचे तिजोरीतून सन १२३६ फसली पर्यंत मिळत होता.

येणे प्रो सवालचे जबाब कप्तान कोपर साहेब असि. इनाम कमिशनर याचे समोर लिहून देण्यास प्रारंभ केला. तारीख १६ नवंबर सन १८५३ इसवी पुरी

केली. तारीख १६ माहे नवंबर सन १८५३ इसवी दस्तुर कृष्णाजी नारायण कारकून ताा सदर

सदाशिव बलाल हुजूर कारकून ताा सदर

सही नरसो गोविंद नांदुसकर दस्तुर विसाजीगणेश नांदुसकर मुखत्यार

सही नरसो गोविंद नांदुसकर दस्तुर अंताजी लक्ष्मण भोले मुखत्यार

सदरहू कैफियत आम्ही वाचून ऐकली आम्हांस कबूल आहे ताा सदर दस्तूर कृष्णाजी नारायण कारकून

ताा सदर सही आबाजी गोविंद दस्तुर

सही आबाजी गोविंद दस्तुर

अंताजी लक्ष्मण मुखत्यार

सह्या आमचेसमोर केल्या असत. १८।११।१८५३

सही ......

कॅप्टन, असिं. इनाम कमिशन

तपासणार रामचंद्र बाबुराव कारकून ताा २ डिसेंबर सन १८५३

दिनकर रामचंद्र न्हेकर राहणार मौजे

नांदोसी तालुका हवेली, जिल्हा पुणे यास

सवाल तारीख २८ माहे जून सन १८५४

नरसो गोविंद व आबाजी गोविंद न्हेकर याणी मौजे नांदोसी, पेटा डोणजे तालुके हवेली, जिल्हा पुणे येथील मोकासा अंमलाबदल कैफियत दिल्ही तिचे आकरावे जबाबात सदरहू अंमलाबदल पुराव्याचे कागद तुम्हापासी असोन तुम्ही माहलकरी पेटा डोणजे, तालुके हवेली, जिल्हा पुणे यांजपासी लिष्टाबरोबर दिल्हेत

ते इकडे आले आहेत सबब तुम्हाकडून सदरहूचे पुराव्यास दाखल करून घेण्याविसी लिहून दिल्हे त्यास तुम्ही लिष्टाबरोबर दिल्हेले कागद हाल्ली तुम्हांस दाखविले आहेत ते पाहून सदरहू कागदापौ सदरहू अंमलाचे पुराव्यास लागू असतील ते दाखल करावे.

जबाब

सदरहू अंमलाचे पुराव्यास कागद लागू आहेत ते दाखल करून देतो ते खाली लिहिल्याप्रमाणे

१ मोकदम मौजे नांदोसी याचे नावे सु।। समान तिसैन मया व अलफ छ १५ माहे सफरची ताकीद दिल्ही ती असल येक देणाराचे नाव सदरहू कागदांत नाही.

२ शंकराजी नारायण सचिव याणी छ १४ माहे जिलकाद सु।। समान तिसैन अलफ सालचे पत्र हवालदार व कारकून तर्फ कर्याती मावल याचे नावे दिल्हे ते असल येक

३ सदप्रो सेना सप्तसदृश्री व पंचसदृश्री व सहश्री लस्कर याचे दिल्हे असल येक.

४ मोकदमानी मौजे नांदोसी तर्फ मजकूर याचे नांवे छ १८ माहे रबिकावल सु।। इसने मयाआलपुत्रारोचाा दिल्हा तो असल येक सदरहू कागदात देणाराचे नाव नाही.

५ सिदोजी जाधव याणी हवालदार व कारकून किले सिंहगड याणी छ १६ माहे रबिकावल सु।। इसने मयाब अलफचे पत्र सोमनाथ हावलदार व कारकून तर्फ कर्यात मावलयाचे नावे दिल्हे ते असले येक

६ राजा शाहू छत्रपती याणी राज्याभिषेक ३४ सर्वाजितनाम संवत्सरे कार्तिक बहुल दश पंचमीचे पत्र देशाधिकारी व लेखकवर्तमान भावी प्रांत मावळ याचे नावे असलपत्र येक

७ नारो शंकर सचिव याणी छ १६ लौवक सु।। आशर मया अलफचे पत्र शामजी हरी नामजाद व कारकून पो मावल याचे नावे दिल्हे ते असल येक

८ राजा शाहू छत्रपती याणी राज्याभिषेक ४८ आषाढ शु।। १ चे पत्र देशमुख देशपांडे तर्फ कर्यात मावल याचे नांवे दिल्हे ते असल येक

९ कृष्णाजी गोपाळ कमाविसदार याणी छ१ माहे मोहरम सु।। इसने अशरीन मया आलफ सालचे मोरो बलाल मौजे नांदोसी याचे नावे असल पत्र येक

१० पंताजी सिवदेव याणी छ २७ माहे जमादिलावल सु।। इसने आशरीन मया अलफचे पत्र रामाजी इतबारराव याचे दिल्हे ते असल पत्र येक

११ नारो शंकर सचिव याणी छ २४ साबान सु।। इसने आशरीन मया अलफचे पत्र देशमुख देशपांडे तर्फ कर्यात मावल याचे नावे पत्र दिल्हे ते असल येक

१२ ता मोकदमानी मौजे नांदोसी तर्फ कर्यात मावल याचे नावे छ१२ मोह रमजान सु।। इसने आशरीन मया अलफ सालचे ताकीदपत्र दिल्हे ते असल येक सदरहू कागदात देणाराचे नाव नमूद नाही.

१३ संताजी सोमवंसी हावालदार याणी छ १२ माहे रमजान सु।। इसने आशर मया अलफ सालचे रामाजी इतबारराव सरनाईक याचे नावे दिल्हे ते असलपत्र येक

१४ पंताजी सिवदेव याणी छ १ माहे जिल्हेज सु।। इसने आशरीन मया अलफचे पत्र मोरो बलाल याचे नावे दिल्हे ते असल येक

१५ पंताजी सिवदेव याणी छ१५ माहे मोहरम सु।। सलास आशरीन मया आलफ़सालचे देशमुख व देशपांडे ताा कर्यात मावळ याचे नावे दिल्हे ते असल पत्र येक

१६ नारो शंकर सचिव याणी छ१ माहे मोहरम सु।। समान आशेर मया अलफ सालचे भगवंतशऊ सोमवंसी हवालदार व कारकून किले सिंहगड याचे नावे दिल्हे ते असल पत्र येक.

१७ बाजीराव रघुनाथ प्रधान याणी छ १२ माहे साबान सु॥ समान मयातैन व अलफ सालचे कारकून दिमत गोविंद सदाशिव याचे नावे दिले ते असल पत्र येक.

१८ फारसी अक्षराचा फरमान असल येक

येणेप्रमाणे आठरा कागद सदरहू अंमलाचे पुराव्यास दाखल केले आहेत याशिवाय सदरहू अंमलाबदल पुरावा मौजेमजकूरचे माजी अंमलातील हिशेब सदर लिष्टाबरोबर आम्हांकडून आले आहेत त्यात सदरहू अंमल खर्ची पडत आला आहे त्याचा दाखला सदरहू हिशेबांत पाहावा याशिवाय पुरावा वगैरे कांही द्यावयाचा नाही येणेप्रमाणे सवालाचा जबाब लिहून दिल्हा सही ताा सदर

दस्तुर हरी नारायण कारकून ताा सदर

सही दिनकर रामचंद्र नऱ्हेकर देशपांडे ताा खेडेबारे व पाा मौजे नांदोसी दस्तुर खुद.

माझे समक्ष सह्या पुणे मुक्कामी सह्या केल्या असत
ता. २८ जून १८५४
सही..........
असि. इनाम कमिशनर

सदरहू कैफियतीचे तेरावे जबाबात लिहून दिल्हे प्रो

नरसो गोविंद नांदुसकर राहणार मौजे नांदोसी तालुके हवेली जिल्हा पुणे याणी मौजे नांदोसी ताो व जिल्हे मजकूर येथील मोकास अंमलाबदल कैफियत लिहून देऊन सदरहू कैफियतीचे तेरावे जबाबात लिहून दिल्ह्याप्रमाणे ही वंशावळ लिहून हजर केली आहे तारीख १८ नंबर सन १८५३ इसवी

दस्तुर कृष्णाजी नारायण कारकून ताा सदर

सही नरसो गोविंद नादुसकर दस्तुर
विसाजी गणेश नांदुसकर मुखत्यार
सही नरसो गोविंद दस्तुर अंताजी लक्ष्मण भोले मुखत्यार

सदरहू कैफियत आम्ही वाचून ही वंशावळ आम्ही पाहिली आम्हांस कबूल आहे ताा सदर

दस्तुर कृष्णाजी नारायण कारकून ताा सदर

माझे समक्ष सह्या पुणे मुक्कामी सह्या केल्या असत

ता. २८ जून १८५४

सही..........

असि. इनाम कमिशनर

इनाम
ए
कमिशन

नकल

अज दिवाण ठाणे ताा कर्यात मावल ताा मोकदम मौजे नांदोसी ताा माा सु।। समान तिसेन अलफ मौजे माा इनाम राा बालाजी बापूजी खेडेबारेकर यासी देविले ब।। सनद र।।। छत्रपती स्वामी छ १ सफर सन खमस तिसैन यासी सनद र।।। पंत सचिव छ १४ जिलकाद सालमार दर आहे जे माा इकेस मौजे माा इनाम कुलबाब कुलकानून हाकी पटी पेस्तर पटी झाडझाडोरा दिल्हा असे खेरीज हकदार व इनामदार दिल्हा असे. तरी मौजे माार येऊन किर्दीमामुरी करून जे मौज माा दिवाण बेरीज होईल ते माइलेच्या दुमाला करीत जाणे १५ सफर

मोर्तब सुद

नकल करणार आत्मराम रावजी कारकून ताा ६ माहे जुलाई सन १८५४ इसवी

सदरहू नकलेचे सातवे ओलीवर परी या आक्षराचा शोध नकलकर्तेसमईचा असे तारीख १० माहे जुलाई सन १८५४ इसवी रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर.

नकल

श्री

इनाम

ए

कमिशन

मा। अनाम हवालदार व कारकून ता। कर्याती मावळ यास शंकराजी नारायण सचिव सु।। समान तिसैन अलफ मौजे नांदोसी ता। कर्याती मावल हा गांव इनाम राजश्री **बालाजी बापूजी खेडेबारेकर** यास दिधला आहे याची सनद अलाहिदा राजश्री छत्रपती स्वामीची राजश्री सुभेदार प्रांत मावल याचे नाव सादर आहे त्याप्रो हुजरून देविले आसे तरी मौजे मा। माइकेचे दुमाले करणे ताजे सनदेचा सालदर हर साल उजूर करीत नवजाणे छ १४ जिलकाद पा। तालीक लिहून घेऊन असल मा। इलेजवळ परतोन देणे पा। हुजूर

लेखना

- वधि

सुरू सुद्

नकल करणार आत्माराम रावजी कारकून ता। ६ माहे जुलाई सन १८५४ इसवी

सदरहू नकलेचे नवे ओळीवर या अक्षराचा नकल कर्तेसमईचा असे तारीख १० माहे जुलाई सन १८५४ इसवी रुजु पाहणार वामन कृष्ण कारकून ता। सदर.

नकल

श्री

इनाम

ए

कमिशन

राजश्री सेना सप्तसर श्री व पंच सहश्री व सहश्री लस्कर गो.

स्नेहांकित अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री शंकराजी नारायण सचिव सु।। समान तिसैन अलफ मौजे नांदोसी ताा कर्याती मावल हा गांव राजश्री बालाजी बापूजी यास राजश्री छत्रपती स्वामीने इनाम करून दिल्हा आहे तरी मौजे माा रास तगादा हरयेक बाबे करीत नव जाणे बोभाट आला म्हणजे कोणाचा मुलाहिजा होणार नाही यैसे जाणून वर्तणूक करणे छ १४ जिलाकाद पाा हुजूर

लेखना वधि

सुरू सुद्

नकल करणार आत्माराम रावजी कारकून ताा ६ माहे जुलई सन १८६४ इसवी सदरहू नकलेचे पहिले ओळीत श्री या अक्षरास काट नकल कर्तेसमयीचा असे ताा १० माहे जुलाई सन १८६४ इसवी रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

नकल

श्री

इनाम   श्री सोमनाथ

ए

कमिशन

रोख ठाणे ता कर्यात मावळ ताा कर्यात मावळ ता मोकदमानी मौजे नांदोसी ता मार सु।। इसने मया अलफ मौजे मार पेसजी राजश्री बालाजी बापूजी अलाहिदा दप्तरी दिल्हे आहेत हाली रां पंत सचिव स्वामीनी मा .... चे स्वाधीन केला असे तर तुम्ही जो येवज होईल तो त्याचे स्वाधीन करणे रा छ १५ रबिलौवल मोर्तबसूद्र

मोर्तब सुद्र

नकल करणारा आत्माराम रावजी कारकून ताा ६ माहे जुलई सन १८५४ इसवी

रुजू पाहणार वामनकृष्ण कारकून ता १० जुलाई सन १८६४ इसवी.

नकल

श्री

.... सोमनाथ

हवालदार व कारकून .... ता

कर्याती मावल गोसावी यास

स्नेहांकित अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

श्री सि जी जाधव हवालदार कारकून किले सिंहगड व नमस्कार सु।। इसने मया अलफ मौजे नांदोसी ताा माा हा गाव हुजूरून राजश्री बालाजी बापूजी देश कुलकर्णी ताा खेडेबारे यास इनाम दिल्हा आहे येविसी राजश्री पंत सचिव या ताा माा रास आज्ञापत्र आहे तेणेप्रमाणे ....बहूत काय लि।। जाणिजे छ १६ रौलावक

मार्तव सुद

नकल करणार आत्माराव रावजी कारकून ताा ६ माहे जुलई सन १८५४ इसवी सदरहू नकलेचे आठवे ओळीवर इनाम अक्षरे शोधाची असल प्रो आहे ताा १० जुलाई सन १८५४ इसवी

रुजु पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

नकल

श्री

कलेक्टर जिल्हा पुणे दप्तरचा
रजिस्टर नंबर ३४ चौतीस सन १८४ इ।।।

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित नामसंवछरे कार्तिक बहूल पंचमी इंदूवासर क्षेत्रिये कुलावंतस श्री राजा शाहू छात्रपती स्वामी यांनी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत मावले यांस आज्ञा केली यैसिजे राजश्री बालाजी बापूजी देशकुलकर्णी ताा खेडेवारे प्राा मजकूर याचे पुत्र राा ....मोरो बल्लाल हुजूर दर्शनास येऊन विदित केले की आपणास इनाम गाव व वतनी मोकादमी आहे मौजे नांदोसी ताा कर्याती मावळ

मोकदमी आपकी वतनी आहे त्याप्रो चालत आहे १	मौजे माार राजश्री बालाजी बापूजी यास इनाम पहिले पासून चालत आहे

येणेप्राा मौजे मार इनाम चालत आहे व मोकदमी आपली वतनी आहे याप्रो माहाराज चालविले त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले आसे तरी तुम्ही मौजे माार मो इलास इनाम पहिले सनदप्रो चालवणे व मोकदमीचा कारभार याचे हाते घेत जाणे प्रतिवर्षी पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहोन घेऊन मुख्य पत्र परतोन देणे

मर्यादेयं विराजते

बार

नकल करणार आत्माराम रावजी कारकून ताा ६ माहे जुलई सन १८५४ इसवी

सदरहू नकलेचे चौदावे ओलीवर -क' आक्षर शोध नकल कर्ते समयीचे असे तााा १० जुलाई सन १८५४ इसवी

रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

नकल

श्री

इनाम

ए

कमिशन

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य
राजश्री शामजी हरी नामजाद व कारकून
प्रा मावल गोसावी यांस

सेवक नारो शंकर सचिव नमस्कार सुां अशर मया अलफ रा मोरो बल्लाल याणी राजश्री स्वामी समीप येऊन वर्तमान विदित केले की आपल्या वडिली या राज्यात सेवा केली त्यावरून मौजे नांदोसी ता कर्यात मावल हा गाव आपले मोकदमीचा तो इनाम दिल्हा आहे तेणे प्रा चालत आहे पेस्तर हि चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केले त्यावरून राजश्री स्वामीनी तुम्हास आज्ञापत्र सादर केले आहे तरी मौजे नांदोसी ता कर्यात मावल हा गांव पूर्वीपासून इनाम चालत आला. असल तेणे प्रो चालवणे छ १६ सौवाल पा हुजूर

यलेखना

– वधि

बार सुरू सुद्रबार

नकल करणार आत्माराम रावजी कारकून ता ६ माहे जुलई सन १८५४ शा सदरहू नकलेचे दाहावे ओळीवर तुम्हास अक्षराचा शोध असलेप्रो आहे ता १० जुलाई सन १८५४ इसवी

रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ता सदर

नकल

श्री

इनाम

ए

कमिशन

कलेक्टर जिल्हा पुणे दप्तराचा

रजिष्टर नंबर ३३ तेहतीस

सन १८४९ इसवी

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४८ प्लव संवत्सरे अषाढ शुद्ध प्रतिपदा सौम्यवासरे क्षत्रिय कुळावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वाती याणी देशमुख व देशपांडे ता। कर्यात मावल यास आज्ञा केली ऐसाजे

शिक्का पंतप्रधान	शिक्का पंतप्रतिनिधी

मौजे नांदोसी ता। मजकूर हा गाव रा। मोरो बल्लाल खेडेबारेकर यास कुलबाब कुळकानू पेशजीपासून इनाम चालत आल आहे. तेणे प्रो करार केला असे. तरी तुम्ही मौजे मजकूर मशारनिल्हेस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे. प्रतिवर्षी नूतनपत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती घेऊन मुख्य पत्र भोगवटीयास परतोन देणे लेखनालंकार

मर्यादेयं विराजते

रुजू सुरू सा।

निविद्र मंत्री

बार सुद्र सुरू सुद्र बार् बार्

नकल करणार आत्मारात रावजी कारकून ता। ६ जुलई सन १८५४ रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ता। १० माहे जुलाई सन १८५४ इसवी.

नकल

श्री

इनाम

ए

कमिशन

राजश्री मोरो बल्लाल मौजे नांदोसी

गोसावी यांस

सेवक कृष्णाजी गोपाल कमाविसदार प्रो सरदेशमुखी नमस्कार सु।। इसने आसरीन मया आलफ तुम्हा पासून मौजे माारचे इनामाब।। दिवाणीत शेरणी दुतर्फा सो १०० शंभर घेतले त्याची सरदेशमुखी साा १० दाहा पावले मजुरा असेत जाणिजे छ १ मोहरम

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकून ताा ६ जुलई ान १८५४ शा सदरहू नकलेचे तिसरे ओळीवर कमाविसदार प्राा सरदेशमुखी या अक्षराचा शोध असल प्रो आहे. शिवाय पांचवे ओळीत -स- आक्षरास काट व सदरहू ओळीवरच से आक्षराचा शोध नकल कते समई पडला असे ताा १० जुलाई सन १८५४ इसवी

रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

नकल

श्री

स्नेहांकित,

माा अनाम रामाजी इतबारराव यांसी पंताजी सिवदेव सु।। इसने आसरीन मया आलफ मौजे नांदोसी ताा कर्यात मावळ हा गाव मोरो बल्लाल याजकडे इनाम दिल्हा आहे तेथे तुम्ही कथला करीता म्हणून विदित जाले तरी तुम्हास कथला करावयासी प्रयोजन काय या उपरी मौजे मजकूराचा वसूल त्याकडे होईल तुम्हास कथला करावयास गरज नाही येविसी फिरोन बोभाट येऊन देणे जाणिजे छ २७ जमादिलोवल

मोर्तव सुद

सुरू सुद

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकून तारीख ६ जुलई सन १८५४ इसवी सदरहू नकलेचे चौथे ओळीत - ही- आक्षरास काटनकल कर्ते समईचा असे ताा १० माहे जुलाई सन १८५४ इसवी रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

नकल

इनाम श्री

ए

कमिशन

मशरुम अनाम देशमुख देशपांडे ता कर्यात मावल यासी नारो शंकर सचिव सु।। इसने आशरीन मया आलफ मौजे नांदोसी

श्री
शंकराजि
नारायण

ताा कर्यात मावळ हा गाव पूर्वी महाराज राजश्री काका साहेब कैलासवासी याणी मोरो बल्लाल खेडेबारेकर याचे पिते बालाजी बापूजी यांस .... जीचे मुकामीहून इनाम दिल्हा आहे त्याप्रमाणे तीर्थरूप राजश्री पंत वैकुंठवासी याणीही करार करून वतनपत्रे करून दिल्ही आहेत त्याप्रमाणे चालत आहे त्यास सनतिसा मध्ये मोरो बल्लाल श्री .... माहायात्रेस गेले मौजे मजकूर खराब होता त्यास किले सिंहगडकरी यानी रायाजी इतबार राऊ सरनाईक यास मुकासा दिल्हा यैसियास माार निले माहायात्रेहून आले आण हुजूर येऊन विनंती केली की मौजे मजकुरी पूर्वीपासून आपले पाटीलकीचा गांव म्हणोन राजश्री .... काका माहे बी इनाम दिल्हा त्याप्रमाणे राजश्री पंत वैकुंठवासी याणीही इनाम करार केला अलीकडे राजश्री स्वामीनीही वतनपत्रे करून दिल्हे त्याप्रमाणे आपण अनुभवीत आहो सामंत गडकरी यांनी घालमेल केली आहे. त्यास स्वामीनी पूर्ववतप्रमाणे इनाम करार करून वंशपरंपरेने चालविला पाहिजे म्हणोन विनंती केली त्यावरून पूर्वील पत्रे व भोगवटा मनास आणून माारनिलेकडे मौजे मजकूर पूर्वीप्रमाणे करार केला आहे. गडकरी याजकडून गांव दूर केला आहे. तर पुत्रपौत्रहि वंशपरंपरेने याचे कडे चालवणे यापत्राची प्रत लिहून घेऊन मुख्य पत्र भोगवटी यास मारनिलेकडे परतोन देणे जाणिजे छ २४ ताबल

सुरू सुद्र बार

नक्कल करणार रघुनाथ नरसिंह कारकून ताा ६ माहे जुलई सन १८५४ इसवी

सदरहू नकलेचे आठवे ओळीत त्या आक्षरास काट व सदरहू ओळीवरच त्या अक्षराचा शोध नकलकर्ते समईचा असे ताा १० माहे जुलाई सन १८५४ इसवी

रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

नकल

श्री

इनाम

ए

कमिशन

अज दिवाण किले सिंहगड ताा मोकदमानी मौजे नांदोसी ताा काा मावल सु॥ इसने अशरीन मया आलफ मौजे माार राा मोरो बल्लाल खेडेबारेकर यास राजश्री स्वामीनी इनाम गांव दिधला आहे. त्याप्राो प्रस्तुत राजश्री ...... पंत सचिव व राजश्री पंताजीपत याणी करारा .... किले माारास पत्र दिल्हे आहे तरी तुम्ही माारइलेस रुजुवात होऊन याचे रजातलबेने वर्तणूक करीजत जाणे छ १२ रमजान मो सुद्र

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकून ताा‌ा ७ जुलाई सन १८५४ इसवी.

सदरहू नकलेचे तिसरे ओळीवर गाव व चौथे ओलीवर दिल्हे आक्षरे शोधाची असल प्राो आहेत ताा १० जुलाई सन १८५४ इसवी

रुजू होणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

इनाम
ए
कमिशन

राजश्री रायाची इतबारराव सरनाईक
दोरा किले सिंहगड गोसावी यास

श्री संताजी सोमवंसी हवालदार व कार.... सिंहगड इसने आशरमया आलफ .... सी मा। का। मावल हा गाव किले मजकूरीहून जमावास मुकासा दिधला आहे त्याप्रो तुम्ही कर्दी केली आहे त्यास तूर्त रा। मोरो बल्लाल खेडेबारेकर यास राजश्री .... स्वामीनी इनामगाव पेशजी पत्र दिल्हे आहे त्या प्रो राजश्री पंतसचिव व राजश्री पंताजीपंत याणी माझ्याकडे गाव इनाम करार केला आहे त्यास साल मा।र येणे प्रो तह केल आसे

इनामदाराकडील बाकी मकसीमा पैकी चाकर लोकाकडे दुमाला कलम ...., १	दिवाणात इनामदारानी इवसूल द्यावी तो यैवज तुम्ही वसूल इनामदाराकडे देणे ..... कलम १

येणेप्रमाणे तह केला असे त्याप्रो वर्तणूक करून ये वर्षीचे ...... लाऊन घेणे पेस्तर साली गांव मोरो बल्लाल याचे दुमाला करणे तुम्ही दखलगिरी न कर्णे छ १२ रमजान मो सुद्र

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकून व सदरहू ता ७ माहे जुलई सन १८५४ इसवी

सदरहू नवे ओळीवर - क- आक्षरशोध व सदरहू ओळीतच - क- आक्षरस काट नकल कर्तेसईचा ता। १० माहे जुलाई सन १८५४ इसवी

रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ता। सदर

नकल

श्री

इनाम
ए
कमिशन

मा। अनाम मोरो बल्लाल यास पंताजी सिवदेव नमस्कार सु।।

इसने आशरीन मया आलफ मौजे नांदोसी ता कर्यात मावळ हा गांव तुम्हांस इनाम आहे यैसियास मौजे मारचा आकार होईल त्यापैकी तिजाई व बाबती जिल्हेकडील यैवज वसुली आहे तो किले सिंहगडाकडे देविला आहे मौजे मारी गडकरी लोकाची सेते आहे. त्याचा आकार होईल तो तिजाई पव बाबतीच्या अैवजांत वजा पडेल ...... ला अैवज तुम्हास पावेल जाणिजे छ१ जिल्हेज

।। श्री ।।
भागवत्चरणी
तत्पर पंताजी
शिवदेव नीरंतर

मोर्तब सुद

सुरू सुद्र

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकून ता ७ जुलईसन १८५४ इसवी
रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ता १० माहे जुलाईसन १८५४ इसवी

नकल

श्री

।। श्री ।।
भागवत्चरणी
तत्पर पंताजी
शिवदेव नीरंतर

स्नेहाकिंत,

मा॥ अनाम देशमुख व देशपांडे ता कर्यात मावल यांसी पंताजी सिवदेव सुहरसन सलास आशरीन मयाअलफ मौजे नांदोसी ता मजकूर हा गाव राजश्री मोरो बल्लाल देशपांडे ता॥ खेडेबा॥रे यासी पुरातन इनाम आहे त्याची दुमालपत्रे सालगुदस्ता सादर केली आहेत यैसे असता तुम्ही इनाम सुरळीत चालो देत नाही. कोण विचार यासी मौजे मजकूर इनाम **दिल्हा आहे तो देशपांडे म्हणून काही दिल्हा नाही. याच्या वडिलांनी या राज्यांत सेवा बहूत केली आहे याबदल इनाम गांव दिल्हा आहे. तरी याऊपरी यासी कटकट करावयाची प्रयोजन नसे याचा इनाम सुरळीत याजकडे चालवणे फिरोन भाट येऊ न देणे जाणिजे छ १५ मोहरम** नाही.

सुरु सुद्र

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकून ता॥ ७ जुलई सन १८५४ इसवी.

रुजू पाहणार वामन कृष्ण कारकून ता १० माहे जुलाई सन १८५४ इसवी.

नकल

श्री

इनाम
ए
कमिशन

स्नेहाकिंत,

राजश्री भगवंतराऊ सोमवंसी हवालदार व कारकून किले सिंहगड गोसावी यास

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री नारो शंकर सचिव आशिर्वाद व नमस्कार. सुहूर सन समान अशरैन मया अलफ रा मोरो बल्ला ल न्हेकर यांजकडे मौजे नांदोसी ता कर्यात मावळ हा गांव आहे तेथील इनामाचा यैवज याकडे व रा रघुनाथ मोरेश्वर सभासद नामजाद किले मा याकडे बाबतीचा व तिजाईचा यैवज पावावा यैसा तह करून तुम्हास साल गुदस्ता पत्र सादर केले आहे त्याप्रमाणे सालमारी सदरहू इनामाचे बाबतीचा व तिजाईचा यैवज या उभेताकडे पावणे जाणिजे छ १ मोहरम पा हुजूर

पत्रा वधिरय आधि

बार सुरू सुद्र बार

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकूल ता ७ माहे जुलई सन १८५४ इसवी

सदरहू नकलेचे पाचवे ओळीवर - रो - आक्षरे शोध आसलप्रो आहे सिवाय आठवे ओळीवर - पा- आक्षर शोध नकल कर्ते समईच असे ता १० जुलई सन १८५४ इसवी

रुजु पाहणार वामन कृष्ण कारकून ता सदर.

नकल

श्री

कलेक्टर जिल्हा पुणे दप्तराचा
रजिष्टर नंबर ३५ पसतीस
सन १८४९ इसवी

राजमान्य राजश्री कारकून दिमत
गोविंदराव सदासिव गो. यास

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सु।। समान मया तैन व आलफ खंडो मोरेश्वर पाटील मौजे नांदोसी ता कर्यात मावळ यास मौजे मजकूर येथील मोकासबावेचे अंमलापैकी इतलाख नेमणूक येकसे आठ्ठावीस रुपये होती ते त्याजकडून दूर करून सन इहिदे मया तैनापासून किले सिंहगड येथील बेगमीस सदरहू रुपये लाऊन दिल्हे आहे ते हाली किल्याकडून दूर करून पेशजीप्रमाणे खंडो मोरेश्वर यास मौजे मातरचे मोकास बाबेचे अंमलापैकी इतलाख नेमणूक रुपये १२८ येकसे आठावीस सालमारी करार करून दिल्ही आसे तरी लिहिल्याप्रमाणे नेमणूक पेशजी पासून सुदामकत पावत आल्याबरहुकूम पाववीत जाणे व सन खमस मया तैनापासून येकसे आठावीस रुपये दरसाल किल्याकडे पा....... नाही म्हणोन खंडो मोरेश्वर याणी विनंती केली त्यास सन खमस मसया तैनापासून याजकडील नेमणूकेपैकी गावाकडे बाकी राहिली असेल ती मारनिकेकडे देवणे जाणिजे छ १२ सावान

आज्ञाप्रमाण

लेखन सीमा

बार

सदरहू आसलेस चिकटबंद दोन त्याची चिकटवाणी येकतीजवर लेखनसीमा या अक्षराची मोर्तब येक असे

नकल करणार रघुनाथ नरसिंह कारकून ता ७ जुलई १८५४ इसवी सदरहू नकलचे आक्रावे ओळीत -म- आक्षरास काट व सदरहू ओळीवरच -म- आक्षर शोधनकल कर्तेसमईचे असे ताा १० माहे जुलाई सन १८५४ इसवी

रुजु पाहणार वामन कृष्ण कारकून ताा सदर

खरी नक्कल

सही........ कॅप्टन
असि. इनाम कमिशनर

نقل

R



درینوقت میمنت اقتران فرمان والاشان
واجب الاذعان عالیشان صادر شد که متصدیان مهمات موضع ناسی دوبا
طرف قریات واپرکه هیما اباد عرف بعانه سرکار جنیر صوبه
خجسته بنیاد اورنگ اباد و سر موضع مذکور در وجه انعام
التمغائی رو هندت و بالاجی هندت و مهادجی هندت و گوپال

نہ پنڈت بن رگھناتھہ پنڈت ابن موروپنڈت

بیرہ کر با فرزندان بمعافی تصدیق و یادداشت

سوای حقدار مقرری از ابتدای ربیع الاول

ییل حسب الضمن مقرر باشد کہ حکام بنبغی بلوازم و مراسم

آن پرداختہ دقیقہ از دقایق حزم و احتیاط غیر مرعی

نگذارد و رعایا از حسن سلوک خود راضی و شاکر داشتہ

در ازدیاد آبادی و تکثیر زراعت مساعی جمیلہ بیکار برد باید

کہ فرزندان نامدار کامکار و الا تبار و وزرای ذوی الاقتدار

و امرای عالیمقدار و حکام کرام و عمال کفایت فرجام

و متصدیان مهمات دیوانی و متکفلان معاملات

سلطانی و جاگیرداران و کروڑیان حال و استقبال

ابداً و موبداً در استقرار و استمرار این حکم مقدس معلی

کوشیده مشار الیهما را بر متعدی مذکور بحال و مقرر داشتند

نسلاً بعد نسل و بطناً بعد بطن خالداً و مخلداً بتصرف

انها واگذارند و دیگری را سهیم و شریک او ندانند

و رسوم مقرری بموافق معمول قدیم بمومی الیها میداده

باشند درینباب تاکید اکید و قدغن بلیغ

دانسته هر سال سند مجدد نطلبند و از یرلیغ کرامت

تبلیغ و الا تخلف و انحراف نورزند بتاریخ بیست

و هفتم شهر ذی الحجه سال چهار دهم از جلوس والا

زیب تحریر یافت

شاه عالم
فدوی بادشاه غازی
صاحب ... یار وفادار ...
آصف جاه برهان الملک شجاع الدوله ...
مدار المهام اعتماد الدوله
وزیر الممالک ...

برساله اشرف کتابت و دلالت منزلت

فرازنده لوای رکن دولت و حشمت طراز الابهت

عظمت اعتصام ...

دکور ... ظفر ... معارک ...

مکمل کامرانی ...

و فضائل ...

دا... کارفرمای سیف و القلم تدبیر

امور عالم ...

عمده امرای عظیم الشان وزیر صاحب تدبیر ممالک

مدار ... اختصاص

६३

R

والاعزاز واجب الاکرام والامتیاز رکن السلطنه بار

سلیمان اقتدار وزیر الممالک جملة الملک مدار المهام

یار وفادار شجاع الدوله برهان الملک والا

ور استحکام الدوله آصفجاه ابو المنصور خان

بهادر صفدر جنگ سلمه الله

مطلع شد

شاه عالم بادشاه غازی

سید هدایت علیخان فدوی

[illegible]

بموجب سوال و دستخطی انور
فرمان والاشان قلمی شد

خاص

داخل روزنامچه واقعه ۲ ذی‌حجه
سال ۱۵ ... داخل ...
... محمد سعید ...

سانح ...
عمل بدفتر ...

داخل اوارجه ...

... منصب ... بدو فرزند او تفویض

موضع ... طوائف ...

... موضع مذکور ...

... حقدار از قدیم الایام ...

فرمان تقرر است امیدوار فضل و کرم است

موضع مذکور ... بحسب دریافت
بضبطی ... حقدار ...

مقصدی درست موضع
سطور

[illegible]

५७

True Copies
[illegible] Captain
Assistant Inam Commr.

६९८
६

INAM
A
COMMISSION

R


रामाराम शंकर देशपांडे पाटील


पृष्ठ ८५ × १.५० = ११२ रु ५० पैसे
= ११३ रुपये


१०।२।२०००
२८/०३/२०००


6
30-27

डुंजारोळी
सहायक संचालक ।२०००
पुणे पुरालेखागार, पुणे


R
INAM COMMISSION
A







संभाजीराजांना सुखरूपपणे राजगडावर पोहचविल्याबद्दल
काशी त्रिमल यांना दिलेली बक्षिसाची सनद.
(पुराभिलेख विभाग पुराभिलेखागार, कोल्हापूर यांच्या सौजन्याने)

मौजे नांदोशी ता. हवेली जि. पुणे येथील
श्री. देशपांडे-पाटील (नऱ्हेकर, नांदोशीकर, बल्लाळ, मुद्रल, खेडेबारे
यांची आदिलशाही, निजामशाही व शिवकालीन व शिवकालोत्तर वंशावळ २०१० इ. स. पर्यंत

लढायांत घेतलेला भाग :


१. चिमणाजी व बाळाजी बापूजी - शाईस्तेखानावर हल्ला इ. स. शके चैत्र १५८५ शुभकृतनाम संवत्सर, रविवार, ५ एप्रिल शुद्ध ८ दि. १६६३ (जे.श.)

२. बापूजी मुद्रल नांदोशीकर - सिंहगड जिंकला - रक्तपाताशिवाय १४/०३/१६४८

३. नारो बापूजी - सुरतेवर १ ली चढाई - येताना - १० जानेवारी १६६४ रोजी वडगांव मावळ येथे घोड्यावरून मृत्यू शके १५४८ शुभकृत नाम संवत्सर, पौष वद्य ४, पुरंदर जिंकतांना खेडेबारेचे केशो नारायण (नांदोशीकर) देशपांडे हे शके १५९१ फाल्गुन वद्य १२ मंगळवार म्हणजेच इ. स. १८/३/ १६७० व नारायण उर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे ह्या वणी-दिंडोरीच्या लढाईतहे दि. १७/१०/१६७० रोजी तो मारला गेला. (शके १५९२ साधारण नामसंवत्सर, कार्तिक शु. १४ (जे.श.) अशी नांदोशीतील देशपांडे घराण्यातील तीन माणसे लढाईत मारली गेली आहेत.

४. चिमणाजी सरदार - साष्टी जिंकली - इ. स. १७४२

५. मोरोपंत पेशवे - आग्रा, जव्हार, कोप्पल, दिंडोरी वगैरे १४० लढायांत भाग (नारो बापूजींचे व्याही)



* टीप : इ.स. १६३६ ते १९७५ पर्यन्त ३३५ वर्षे या मुदतीत ३४ व्यक्ति पोलीस व मुलकी पदावर होत्या.

संदर्भ :
पेशवे दप्तर -कमाल क्र. ६
कागद क्र. ५९७/६
इनाम-कमिशन

इनाम वतने :
१. श्रीमंत शिवाजी महाराज इ. क्र. ४०५७६
२. श्रीमंत शाहू महाराज इ. क्र. ८१३२९
३. श्रीमंत राजाराम महाराज इ. क्र. १३२९
४. श्रीमंत पेशवे सरकार इ. क्र. १८५३
५. बादशहा शाहआलम (दुसरा) औरंगाबाद, २९ मुहर्रम २२/४/१७७३

छत्रपती शिवाजी महाराज कारकिर्दीतील (इ. स. १६३० ते १६८०) व मुद्गल - नऱ्हेकर - नांदोशीकर - देशपांडे (पाटील) ... कालानुक्रमे घटनांचा तपशील

१९-२-१६३०	छत्रपती शिवरायांचा जन्म
१६३०-३१	दुष्काळ
१६३०	मुरार जगदेवने पुणे जाळले
१६३६	बापूजी मुदगल-नऱ्हेकर-देशपांडे यांना शिवाजी महाराजांनी पाटीलकी दिली.
१६३७	शिवाजीचे पुण्यात आगमन
१६३९	शहाजीस बंगळूरची जहागिरी मिळाली.
१४ मे १६४०	सईबाईचा लालमहाली विवाह
१६४१-४२	जिजाऊ शिवराय शहाजीराजांकडे जातात.
१६४२	जिजाई व शिवराय पुण्यास येतात
१६४५ एप्रिल १५	रोहिडेश्वराची शपथ
१६४७ मार्च	दादोजी कोंडदेव यांचा मृत्यु
१६४७ मार्च १४	**बापूजी, मुदगल व नांदोशीकर यांनी सिंहगड (कोंढाणा) घेतला.**
१६४८ ऑक्टोबर	पुरंदरचा कबजा
१६४८ जुलै २५	शहाजी राजांना जिंजी येथे कैद
१६४९ मे १६	शहाजीराजांची सुटका
१६५९ सप्टेंबर ५	सईबाईंचे राजगडावर निधन
१६५९ नोव्हें १०	अफझलखान वध
१६६३ एप्रिल ६	**शाहीस्तेखानावर लालमहालातबाळाजी बापूजी चिमणाजी हल्ला छ. शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर हल्ला.**
१६६४ जानेवारी ६	सुरतेवर पहिली स्वारी
१६६४ जानेवारी २३	शहाजीराजे यांचा होदेगिरी येथे मृत्यु

१६६४ जानेवारी १०	नारोबापूजी नांदोशीकर देशपांडे यांचा वडगाव मावळ येथे मोगल सरदार मुकूंद रजपूत यांचेकडून घोड्यावरून पडून बाण लागून मृत्यु
१६६५ मे	पुरंदरवर मुरारबाजी देशपांडे यांचा मृत्यु
१६६५ जून १३	पुरंदरचा तह.
१६६६ मार्च	शिवराय संभाजीराजांसह आग्राकडे निघाले.
१६६६ मे १२	शिवराय औरंगजेबाच्या दरबारात
१६६६ मे २५	शिवराय औरंगजेबाच्या कैदेत
१६६६ ऑगस्ट १७	**शिवराय कैदेतून निसटले परंतू रघुनाथपंत बल्लाळ व त्र्यंबक सोनदेव डबीर आगऱ्यात आठ महिने कैदेत पडले.**
१६६ सप्टेंबर २	राजे रायगडावर आले.
१६६७ एप्रिल ३	**रघुनाथपंत व त्र्यंबकराव सुटले**
१६७० फेब्रुवारी ४	सिंहगड जिंकताना तानाजींचा मुत्यु
१६७० फेब्रुवारी २४	राजगडावर राजारामांचा जन्म.
१६७० मार्च ८	निळोपंताची पुरंदर जिंकला, नारायण देशपांडे नांदोशीकर यांचा मृत्यु
१६७० ऑक्टो. १७	**वणी दिंडोरीच्या लढाईत शिवाजी महाराज, मोरोपंत पेशवे व नारायण नांदोशीकर देशपांडे लढाई जिंकली. परंतू नारायण नांदोशीकर, पंचहजारी सेनापती, यांचा मृत्यु झाला.**
१६७२ ऑगस्ट	समर्थांची भेट
१६७३ डिसेंबर	गागाभट्टांना आणण्यासाठी नाशिकला पालखी रवाना.
१६७४ मार्च १९	काशीबाईंचा मृत्यु
१६७४ जून ६	रायगडावर शिवाजी महाराज यांना राज्याभिषेक
१६७४ जून १७	राजमाता जिजाऊंचा पाचाड येथे मृत्यु


	शिवाजी राजांचा पुन्हा राज्याभिषेक
१६७४ सप्टेंबर २४	रघुनाथ पंडित राजांकडे जातात.
१६७६	त्र्यंबकपंत डबीर शिवापुरात वारले.
१६७७ एप्रिल १८	संभाजीराजे मोगलांकडे गेले.
१७७८ डिसेंबर १३	संभाजीराजे मोगलांकडून परत
१६७९ नोव्हेंबर १९	शिवरायांचे राजगडावर निधन
१६८० एप्रिल ३	
१६९८	बाळाजी बापूजी नांदोशीकर देशपांडे यांना पाटीलकी
१७४२	चिमणजी बापूजी नांदोशीकर देशपांडे (पाटील) यांनी साष्टी जिंकली.
१७६३	राघो मोरेश्वर नांदोशीकर देशपांडे यांना पेशवे सरकारातून पाटीलकी दिली.
१७६७	महादजी रघुनाथ मुदगल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांना पेशवे सरकारांतून पाटीलकी.
१७७०	बापूजी रघुनाथ मुदगल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांना पेशवे सरकारांतून पाटीलकी.
१७७३	महादजी, मोरो बाळाजी व रघुनाथपंत यांना बादशहा शहाआलम (दुसरा) यांनी पाटीलकी, जहागिरी दिली.
१७७८	बापूजी रघुनाथ व खंडो मोरेश्वर मुदगल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे यांना पेशवे सरकारातून पाटीलकी
१७७८ ते ८१	खंडो मोरेश्वर यांना पेशवे सरकारातून पाटीलकी
१८२६ ते १८९६	श्रीपत राजाराम मुदगल-नऱ्हेकर-नांदोशीकर - देशपांडे पाटीलकी
१८९६ ते १९७५	रामचंद्र श्रीपत, शंकर रामचंद्र व मार्तंड रामचंद्र देशपांडे यांना पाटीलकी

ऐतिहासिक नीटस्

ऐतिहासिक नोटस्

























प्रोफिशन्ट™
पब्लिशिंग हाऊस

५३५, शनिवार पेठ, शॉप नं: ९, राधाकृष्ण बिल्डींग,
प्रभात सिनेमासमोर, पुणे ४११०३०, फोन नं २४४८४५३८
E-mail: sales@theproficient.com
www.theproficient.com